# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–१ राज्यशास्त्र**

**सत्र–१ : पेपर– Discipline Specific Course (DSC)-1 Mandatory**

# भारतीय राज्यघटना

**(Indian Constitution)**

**सत्र–२ : पेपर– Discipline Specific Course (DSC)-2 Mandatory**

# भारतीय शासन

**(Indian Government)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-41-0

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बी. ए. भाग १ च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक **(DSC)-1 Mandatory** सत्र-१ ''भारतीय राज्यघटना'' व पेपर **(DSC)-2 Mandatory**, सत्र २ ''भारतीय शासन'' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**भारतीय राज्यघटना** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये भारतीय राज्यघटनेची (ऐतिहासिक) पार्श्वभूमी, मूलभूत हक्क आणि कर्तव्ये, राज्यघटनेतील विशेष तरतुदी, भारतीय संघराज्य व्यवस्था आणि **भारतीय शासन** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, भारतातील पक्ष पद्धती इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक व सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. विजय देठे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–१ पेपर–१ : भारतीय राज्यघटना**
**सत्र–२ पेपर–२ : भारतीय शासन**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ पेपर–१ : भारतीय राज्यघटना** | |
| **डॉ. एस. डी. राक्षसे**<br>श्री गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, सुभाष रोड, कोल्हापूर | १ |
| **डॉ. के. डी. खळदकर**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | २ |
| **डॉ. सुनिल गायकवाड**<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, ता. जावळी, जि. सातारा | ३ |
| **डॉ. सुर्यकांत गायकवाड**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **श्री. अर्जुन येरगे**<br>श्री संपतराव माने महाविद्यालय, खानापूर, ता. खानापूर, जि. सांगली | ४ |
| **सत्र–२ पेपर–२ : भारतीय शासन** | |
| **डॉ. राहूल मांडणीकर**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १ |
| **डॉ. मोहन हजारे**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | २ |
| **श्री. धर्मवीर क्षीरसागर**<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | ३ |
| **डॉ. अनिल पाटील**<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. विजय देठे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **पेपर–१ : सत्र–१**<br>**भारतीय राज्यघटना** | |
| १. | भारतीय राज्यघटनेची (ऐतिहासिक) पार्श्वभूमी | १ |
| २. | मूलभूत हक्क आणि कर्तव्ये | १६ |
| ३. | राज्यघटनेतील विशेष तरतुदी | ६३ |
| ४. | भारतीय संघराज्य व्यवस्था | ९५ |
| | **पेपर–२ : सत्र–२**<br>**भारतीय शासन** | |
| १. | कायदेमंडळ | ११७ |
| २. | कार्यकारीमंडळ | १३० |
| ३. | न्यायमंडळ | १५१ |
| ४. | भारतातील पक्ष पद्धती | १६५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# भारतीय राज्यघटनेची (ऐतिहासिक) पार्श्वभूमी
## (Background of Indian Constitution)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय राज्यघटनेचे निर्मितीविषयक कायदे १९०९, १९१९ आणि १९३५

१.२.२ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१.२.३ भारतीय राज्यघटनेचा सरनामा

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये –

- भारतीय राज्यघटनेचे निर्मिती विषयक कायदे समजून घेणे.
- भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये समजून घेणे
- भारतीय राज्यघटनेचा सरनामा (प्रास्ताविक) समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना –

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर भारताने स्वत:ची स्वतंत्र अशी राज्यघटना निर्माण केली. प्रत्येक देश आपली राज्यघटना आणि कायदे या माध्यमातून देशाचे चरित्र घडवत असतात. आज लोकशाही देशातील विविध राष्ट्रांची परिस्थिती पाहता आपल्याला असे लक्षात येते की, एखाद्या राष्ट्रासाठी राज्यघटना किती महत्वाची आहे. कुठलेही राष्ट्र एका दिवसात उभे राहत नाही. त्यापाठीमागे खुप मोठ्या कायद्याचा कार्यकाल कार्यरत असतो. भारताच्याही राज्यघटनेच्या निर्मितीमागे अनेक कायद्याची पार्श्वभुमी होती त्यातूनच अनोखी अशी भारतीय राज्यघटना तयार झाली. सदरील प्रकरणात आपण भारतीय पारतंत्र्यात

ब्रिटिशांनी केलेले कायदे, राज्यघटनेची वैशिष्टे तसेच भारतीय राज्यघटनेचा सरनामा इ. बांबीचा आढावा घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन –

### १.२.१ भारतीय राज्यघटनेचे निर्मिती विषयक कायदे –

प्राचीन कालखंडापासून कायद्यााची देणगी ही ग्रीक राज्यव्यवस्थेने जगाला दिलेली आहे. सत्ता आणि त्याच्याशी संबधीत कायदे जगाला समजून सांगण्याचा प्रयत्न ग्रीक तत्ववेत्यांनी केला. त्यातून राजेशाही व्यवस्था निर्माण झाली. पुढे याच राजेशाही व्यवस्थेने वसाहतवादी धोरणाचा स्विकार करुन जगभर आपले साम्राज्य उभे केले. त्याचाच भाग म्हणून इ.स १६०० साली इंग्लडची राणी एलिझाबेथने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला तत्कालीन हिंदुस्थानात व्यापार करण्याची परवानगी दिली. पुढे या व्यापारी कंपनीने भारतात राजकीय सत्ता प्रस्थापित केली. दरम्यानच्या काळात ब्रिटिश पार्लमेंटने  अनेक कायदे पास केले त्यात इ.स. १७७३ चा रेग्युलेटिंग ॲक्ट, १७८४ चा पिट्स इंडिया कायदा तसेच १८५८ चा कायदा या अनेक कायद्याचा समावेश होता. शेवटी भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता मोडित निघाली.

**१९०९ चा मोर्ले मिंटो सुधारणा कायदा :** इ.स १८८५ पासून भारतीय राष्ट्रीय सभा कार्यरत होती. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये दोन गट कार्यरत होते. एक मवाळ आणि दुसरा जहाल

मवाळ नेते : सर फिरोजशहा मेहता, न्या. रानडे, नामदार गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इ.

जहाल नेते : लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष, लाला लजपतराय

इ. स १८८५ ते १९०५ या काळात भारतात आलेले लॉर्ड लेन्सडाउन, लॉर्ड एलिगन व लॉर्ड कर्झन हे तिघेजन भारतात आले. लॉर्ड कर्झन तर प्राचीन रोमचा हुकुमशहा निघाला. त्याने खूप मोठ्याा प्रमाणात दडपशाही सुरू केली आणि १९०५ साली बंगालच्या विभाजणाची आखणी केली. हिंदू आणि मुस्लिमात फुट पाडली. त्यामुळे भारतात खुप मोठा असंतोष वाढला या असंतोषाला मुठमाती देण्यासाठी ब्रिटिशांना काहीतरी करणे महत्वाचे वाटले आणि त्यातुनच त्यावेळचे व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो आणि सेक्रेटरी मोर्ले यांनी परस्पर संवादातून एक सुधारणा कायदा तयार केला. त्यालाच इंडिया कौन्सिल ॲक्ट म्हणतात. १९०९ साली ब्रिटिश पार्लमेंटमध्ये या मोर्लेमिंटो सुधारणा कायद्याला मंजूरी मिळाली.

**या कायद्यातील काही तरतुदी –**

- केंद्रिय व प्रातींय विधिमंडळाच्या सदस्य संख्येत वाढ करण्यात आली.
- कायदेमंडळाच्या सदस्यांसाठी मर्यादित प्रमाणात निवडणूक पध्दतीचा स्विकार करण्यात आला.
- मुस्लीमांना स्वंतत्र प्रतिनिधीत्व देण्यात आले.

**मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा**

मोर्ले–मिंटो सुधारणा कायद्यामुळे भारतीय जनता संतुष्ट होऊ शकली नाही. राष्ट्रीय काँग्रेसमधील जहाल गटाने मोठी आक्रमक भूमिका घेतली. लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी 'होमरुल चळवळ' सुरु केली. भारतीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा यासाठीचे आंदोलण होते. यातच १९१४ ला पहिल्या महायुध्दाची ठिणगी पडली. यामध्ये भारतीय जनतेचे सहकार्य आपणास मिळावे यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते प्रयत्नात होते. याच वेळी भारत मंत्री एडविन मॉटेंग्यु होते. केंब्रिज च्या वातावरणात वाढलेले हाते. त्यांचा लोकशाही शासनाबद्दलचा अभ्यास होता. त्यातूनच भारतातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन मॉटेंग्यु आणि लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी एक अहवाल तयार केला. या आधरेच भारत सरकारच्या प्रशासकीय कायद्यासंबधीचे विधेयक तयार केले. १९१९ साली या विधेयकाला ब्रिटिश पार्लमेंटने मंजुरी दिली.

- केंद्रीय कायदेमंडळात द्विगृही कायदेमंडळ पध्दती स्विकारली.
- भारतीय कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ स्वंतत्र केले.
- प्रातांत एकगृही कायदेमंडळपध्दती स्विकारली.
- लोकप्रतीनिधीची संख्या वाढवण्यात आली.
- प्रांतात द्विदल पध्दतीचा (System of Diaretry) स्विकारण्याात आली.
- प्रांतिक सरकारचे राखीव आणि सोयी व खाते असे प्रकार पाडण्यात आले.
- राखीव खाती हे गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाकडे देण्यात आली.

राखीव खाती : पोलिस, न्याय, जमीन महसूल, कालवे

- सोपीव खाती लोकनियुक्त मंत्र्याकडे देण्यात आली.

शिक्षण, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य, आरोग्य, उद्योगधंदे, जंगले इ.

या कायद्यात विविध सुधारण सुचविल्या होत्या पण काही उणीवा सुध्दा राहिल्या. सर्वसत्ता गव्हर्नर जनरलकडे राहिली त्यामुळे द्विदल शासनपध्दतीचा प्रयोग अयशस्वी झाली. तरी सुध्दा भारतात जबाबदार शासनपध्दती आणि संसदिय शासनपध्दतीचा प्रयोग सुरु होण्याच्या दृष्टिने हा कायदा महत्वाचा ठरला.

**१९३५ चा भारत प्रशासन कायदा –**

इ.स १९१९ साली ख्रिसमसच्या दिवसात काँग्रेसचे अधिवेशन अमृतसर याठिकाणी झाले. यावेळी मोतीलाल नेहरू हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. येथूनच गांधीच्या नेतृत्वाला सुरुवात झालेली. आता महात्मा गांधी की जय या घोषणा भारताच्या राजकीय क्षितीजावर घुमताना दिसत होत्या. गांधीनी ब्रिटिशांविरुध्द अहिंसात्मक मार्गाने लढा उभारला. सायमन कमिशनला विरोध, १९३० ते १९३२ च्या गोलमेज परिषदा त्यानंतर १९३० सालची सविनय कायदेभंगाची चळवळ असे अनेक आंदोलनकारी कार्यक्रमाचे संयोजक

आणि नियोजन गांधी च्या नेतृत्वात झाले. भारतीय जनतेला स्वयंशासनाचा अधिकार देऊन त्यांच्यातील असंतोष मर्यादित करण्याच्या हेतूने ब्रिटिश सरकारने १९३५ चा भारतप्रशासन कायदा केला. या कायद्यात ३२१ कलमे आणि १९ परिशिष्टे होती.

**१९३५ च्या भारत प्रशासन कायद्यातील ठळक तरतुदी**

- भारतात संघराज्य शासनपध्दतीला सुरुवात झाली.
- भारतात एकूण ११ प्रांत व देशी राज्ये या संघराज्यात समाविष्ट करण्यात आली.
- केंद्र व घटकराज्य यांच्यात अधिकाराची विभागणी करण्यात आली.
- विषय याद्या, संघसूची, प्रांतसूची आणि समवर्ती सूची याची निर्मिती.
- भारतात केंद्रस्थानी द्विगृहात्मक कायदेमंडळपध्दती स्विकारली.
- केंद्रस्थानी द्विदल शासनपध्दती सुरू केली.
- व्हाईसरॉय वास्तववादी सत्ता प्रमुख बनला.
- भारतीय संघराज्यासाठी संघिक न्यायालयाची तरतुद करण्यात आली.
- केंद्र सरकार व घटक राज्ये यांच्यातील संघर्ष मिटविण्यासाठी संघन्यायालयाची स्थापना करण्यात आली.

१९३५ च्या कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही. केवळ संघराज्य जन्माला आले. परंतु प्रांतिक स्वायतेचा प्रयोग असफल झाला.

## १.१.२ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये (Features of the Indian Constitution)

ॲरिस्टॉटलने असे म्हटले की, मानव हा निसर्ग:च 'राजकीय प्राणी' आहे आपल्या भोवती समाज असल्याशिवाय आपण खरी मानस होऊ शकत नाही. त्याने हे ही सांगितले की आपल्या मानवी गरजा या राज्यव्यवस्थेतच पूर्ण होऊ शकतात. आणि ती व्यवस्था राज्यघटनेने मार्गस्थ होते.

भारत स्वंतत्र झाल्यावर स्वत:ची अशी राज्यघटना अस्तित्वात आली. घटना समितीची पहिली बैठक दिल्ली येथे ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली ३८९ सदस्य या घटनासमितीत होते. तात्पुरते अध्यक्ष डॉ. सच्चिदानंद सिन्हा हे होते. स्थायी अध्यक्ष हे डॉ. राजेंद्र प्रसाद होते. मसुदा समितीच्या अध्यक्षपदी (Drafting Committee) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. घटना समितीचे कार्य २ वर्षे ११ महिने १८ दिवस चालले.

| मसुदा समिती | विविध राज्यघटनांचा प्रभाव |
|---|---|
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>के. एम. मुंशी<br>एन. गोपाल स्वामी अंयगार<br>अलादी कृष्णस्वामी अय्यर<br>सय्यद मोहंमद<br>बी. एन. राव<br>एन. माधवराव, टी. टी कृष्णमाचारी | अ) इंग्लडच्या राज्यघटनेचा प्रभाव-पार्लमेंट, नामधारी राजा, पंतप्रधान.<br>ब) अमेरिका- लिखित राज्यघटना, उद्देशपत्रिका, मुलभूत अधिकार, संघराज्यपध्दती, सर्वोच्चन्यायालय<br>क) कॅनडा - संघराज्यशासनपध्दती, प्रभावी मध्यवर्ती सत्ता, शेषाधिकार.<br>६) आर्यलंड- राज्याच्या धोरणाची मार्गदशतत्वे व उपराष्ट्रपतीचे निर्वाचण.<br>७) ऑस्ट्रेलिया- संसदेच्या दोन्ही गृहाची संयुक्त बैठक, समाईक सूची.<br>८) सोव्हिएत रशिया- मुलभूत कर्तव्य, पंचवार्षिक योजना. |

भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे व ९ परिशिष्ट्ये आहेत. या राज्यघटनेची अमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून करण्यात आली.

**राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये–**

**१) लिखित राज्यघटना आणि सर्वात मोठी राज्यघटना :–**

जगात अस्तित्वात असणाऱ्या विविध राज्यघटना मध्ये भारताची राज्यघटना ही लिखित राज्यघटना आहे. इंग्लडची राज्यघटना ही अलिखित स्वरुपाची आहे. भारतीय मुळ घटनेची ३९५ कलमे आणि ९ परिशिष्टे आणि २२ भाग आहेत. उदा. अमेरिका–७, कॅनडा–१४७, ऑस्ट्रेलिया–१२८, चीन–१०६ अशी राज्यघटनेत कलमे आहेत. या देशांच्या तुलनेत भारतीय राज्यघटना ही खूप व्यापक स्वरुपाची आहे. त्यामुळे ती मोठी बनलेली आहे. त्यात खूप सविस्तर प्रशासकीय तरतुदी, इतर राज्यघटनांच्या अनुभवाचा उपयोग, अनुसुचित जाती जमातीच्या हक्कांचे संरक्षण, संघराज्य, घटक राज्य यांची सविस्तर माहिती, मुलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य, मार्गदर्शक तत्वांच्या तरतुदी, निवडणूका, अल्पसंख्यांकाचे प्रश्न, आणिबाणी विषयक तरतुदीचा समावेश आहे.

**२) परिदृढ आणि परिवर्तनीय राज्यघटना :–**

ज्या राज्यघटनेमध्ये साध्या कायद्याप्रमाणे परिवर्तन हो होऊ शकते ती परिवर्तनीय राज्यघटना होय. ज्या घटनेत घटना दुरुस्तीसाठी कठिन प्रक्रिया करावी लागते आणि घटनेस सहजासहजी परिवर्तन होऊ शकत नाही. त्या घटनेला परिदृढ (ताठर) राज्यघटना म्हणतात. याचे उदा. अमेरिका भारत यांच्या राज्यघटना या दोन्ही सारख्या आहे. बहुअंशी परिवर्तणीय तर अल्पसंशी परिदृढ आहे. भारतीय राज्यघटनेत ३६८ व्या

कलमान्वये घटना दुरुस्तीची तरतुद आहे. त्या प्रक्रियेप्रमाणे घटकराज्याचे नाव, सीमा बदलणे, सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधिशांची संख्या ठरविणे इत्यादीसांठी घटना दुरुस्ती पध्दती अतिशय सोपी आहे तर राष्ट्रपतीची निवडणूक, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र केंद्र व घटकराज्यांची अधिकार विभागणी इत्यादी बाबत कठिण व परिदृढ पध्दतीची तरतुद आहे. भारतीय राज्यघटनेत आजपर्यंत ११२ घटना दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत.

**३) घटनेचे वर्चस्व आणि संसंदेचे सार्वभौमत्व:–**

भारताची राज्यघटना लिखित आणि सर्वोच्च आहे. भारताची राज्यघटना 'आम्ही भारतीय लोक' या शब्दांने सुरुवात होते. या घटनेचा भंग कुणीही करु शकत नाही. घटनेची स्थिरता देशाच्या व समाजाच्या प्रगतीच्या आड येऊ नये म्हणून संसदेला घटना दुरुस्तीचा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे बदललेल्या परिस्थिती प्रमाणे राज्यघटनेत दुरुस्ती करणे संसदेला शक्य झाले. घटना दुरुस्तीच्या हक्कामुळे संसदेचे सार्वभौमत्व प्रस्थापित होते.

**४) मुलभूत हक्कांची तरतुद :–**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मुलभूत हक्कांची यादी आणि मुलभूत हक्कांच्या रक्षणाची तरतुदी केली आहे. भारतीय नागरीकाला ७ प्रकारचे मुलभूत अधिकार मिळाले होते. परंतु १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा अधिकार कमी करत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे सध्या ६ मूलभूत हक्कांचा समावेश संविधानात आहे.

१. समतेचा अधिकार

२. स्वातंत्र्याचा अधिकार

३. शोषणाविरुध्दचा अधिकार

४. श्रार्मिक स्वातंष्याचा अधिकार

५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार

६. घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (सनदशीर इलाजाचा हक्क)

**५) मुलभूत कर्तव्य**

१९७६ साली भारतीय राज्यघटनेत दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला. परंतु घटनादुरुस्तीनुसार 'वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्याला पालकांनी शाळेत घातले पाहिजे.' या ११ व्या मूलभूत कर्तव्याची तरतूद केली आहे उदा. राष्ट्रध्वजाचा आदर राखणे आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्त्वाचे व एकात्मतेचे रक्षण करणे, राष्ट्रसेवेसाठी तयार असणे. पर्यावरणाचे संतुलन ठेवणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे. इत्यादी कर्तव्याचा समावेश घटनेच्या ४ थ्या भागात कलम ५१ (अ) मध्ये आहे.

### ६) मार्गदर्शक तत्वे

शासनकर्त्यानी शासन कसे करावे. त्यांची ध्येय काय असावीत यासंबधी मार्गदर्शन करणारी तत्वे भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागामध्ये ३६ ते ५१ कलमामध्ये आहेत. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी शासनाने कोणते कार्य करावे या संबधीच्या सूचना या तत्वामध्ये दिलेल्या आहेत.

### ७) धर्मनिरपेक्ष राज्य

धर्मनिरपेक्ष राज्य हे भारतीय राज्यघटनेचे एक वैशिष्ट्य आहे. भारतात विविध धर्म आहेत. सर्व धर्माच्या लोकांना हा देश आपला वाटावा त्यात ऐक्य असावे त्या सर्वांना संरक्षण मिळावे या दृष्टिने भारताने धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्विकारली आहे. पाकिस्तान हा इस्लामधर्म माननारा देश आहे. तर नेपाळ हा हिंदू धर्म माननारा देश आहे. पण भारताने राज्याचा असा कोणताही धर्म घोषित केला नाही. सर्व धर्मांना समान वागणूक आणि संरक्षण भारतात आहे. शासनाचा धार्मिक व्यवहारात कोणताही हस्तक्षेप नाही. सर्व नागरिकांना आपआपल्या धर्मानुसार पूजा-अर्चा, श्रध्दा बाळगण्याचा अधिकार आहे.

### ८) संसदिय शासनपध्दती

संसदिय शासनपध्दती म्हणजे कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांचा घनिष्ठ संबध असलेली शासनपध्दती होय. भारतीय शासनपध्दतीत पंतप्रधान त्याचे मंत्री लोकसभेचे व राज्यसभेचे सभासद असतात. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर बहुमत प्राप्त पक्ष सत्ता स्थापन करतो. संसद विविधमार्गाच्या द्वारे कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते. संसदेला जबाबदार राहून कार्य करणे मंत्री मंडळाची जबाबदारी असते. भारताच्या या संसदिय पध्दतीचा गणराज्य पध्दतीशी मेळ घालण्यात आला आहे. गणराज्य म्हणजे देशाचा सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती निर्वाचित असतो. इंग्लडामध्ये संसदिय शासनपध्दती असून तेथे घटनात्मक प्रमुख राजा आहे. परंतु राजेशाही आहे. भारताच्या संसदिय पध्दतीत राज्यप्रमुख लोक निर्वाचित आहे.

### ९) प्रौढ मतदान पध्दती

भारतीय राज्याचा विस्तारीत भू-प्रदेश, भारताची वाढती लोकसंख्या, दारिद्र्य अशिक्षितता इत्यादी अडचणी असून सुध्दा भारतीय घटनाकारांनी भारतात प्रौढ मतदान पध्दती स्विकारली आहे. भारतात मोठ्या प्रमाणात निरक्षरता असूनही प्रौढ मतदानपध्दती स्विकारणे हा घटनाकारांचा अतिशय धडाशी निर्णय होता. त्यांचा यामागील हेतु असा होता की, या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता यावे. प्रौढ मताधिकार म्हणजे जात, धर्म, लिंग, शिक्षण मालमत्ता यापैकी कोणतीही अट न ठेवता प्रत्येक १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरीकाला मतदानाचा हक्क प्राप्त होणे. वयाची अट पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरीकाला राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी त्यामुळे प्राप्त झाली आहे.

**१०) केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य**

भारत केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे. केंद्रशासन आणि राज्यशासन अशी दुहेरी व्यवस्था भारतात आहे आणि त्यांच्यात अधिकार विभागणी आहे. आणि त्याशिवाय घटनेची सर्वोच्चता स्विकारण्यात आलेली आहे. या वैशिष्ट्या वरून भारताच्या राज्याची चौकट संघराज्याची आहे. हे स्पष्ट होते. परंतु भारताने संघराज्य केंद्रात्मक प्रवृत्तीचे राज्य आहे केंद्र व राज्य यांच्यातील अधिकार विभागणी केंद्राकडे झुकणारी आहे. एकच राज्यघटना, एकच नागरीकत्व, एकेरी न्यायव्यवस्था, राष्ट्रपतीचा आणीबाणीचा अधिकार, राज्यपाल विषयक तरतुद यावरुन केंद्र सरकार शक्तीशाली आहे. असे दिसून येते. भारतात अशा प्रकारच्या केंद्राकर्षी संघराज्याची निर्मिती केली आहे. कारण भारत हा बहुभाषिक, बहुधर्मिय अनेक विविधता असलेला देश आहे. अशा देशात विघटनवादी शक्तींना मुठमाती देता येऊ शकते. के.सी व्हिअरच्या म्हणण्या प्रमाणे 'भारत अर्धसंघराज्य किंवा केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य स्थापन केले आहे.

**११) स्वंतत्र व एकेरी न्यायालय**

भारतात एकेरी व स्वंतत्र न्यायमंडळाची स्थापना केली आहे. भारतीय न्यायमंडळ कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळाच्या वर्चस्वापासून व हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त आणि स्वंतत्र आहे. त्यासाठी राज्य घटनेत काही महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. सर्व प्रकारचे दडपण व दडपणापासून मुक्त राहून न्यायाधीशांना कार्य करता यावे म्हणून स्वंतत्र न्यायव्यवस्थेची तरतुद करण्यात आली आहे. त्यांच्या नियंत्रणाखाली उच्च न्यायालये, दुय्यम न्यायालये याप्रमाणे एकेरी एकाखाली एक याप्रमाणे न्यायालयीन साखळी आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम न्यायालय म्हणून कार्ये करते.

**१२) एकेरी नागरीकत्व**

भारतात अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरीकत्व नाही. भारतात संघराज्य पध्दती असून सुध्दा भारतातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करुन एकेरी नागरीकत्वाची तरतुद केलेली आहे. राष्ट्रीय ऐक्य वाढावे हा त्यामागचा उद्देश होता.

**१३) जनतेचे सार्वभौमत्व**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रीकेतील सुरुवातीच्या शब्दामध्येच जनता सार्वभौम आहे. असे दिसून येते. भारताची राज्यघटना भारतीय लोकांनी निर्माण केली आणि स्विकारली असा उल्लेख उद्देशपत्रिकेमध्ये आहे. म्हणजेच भारतीय गणराज्याचे पालकत्व भारतीय जनतेकडे आहे.

**१४) क्रांतीकारी स्वरुप**

परंपरांगत परंपरा, रुढी, प्रथा लोकांचे अन्याय व शोषणास कारणीभूत होत्या अशा प्रथा परंपरा नष्ट करुन समता, न्याय, मानवता निर्माण करण्याच्या दृष्टिने भारतीय राज्यघटनेमध्ये अनेक तरतुदी केल्या आहेत.

दुर्बल घटकांसाठी त्याच्या उत्थानासाठी अनेक प्रकारच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यादृष्टिने भारतीय राज्यघटनेचे स्वरुप क्रांतीकारी आहे.

**१५) न्यायालयीन पुनर्विलोकन :-**

भारतातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पूनर्विलोकनाचा अधिकार आहे. न्यायालय या अधिकाराप्रमाणे कायदेमंडळाने केलेले कायदे कार्यकारी मंडळाची कृती घटने प्रमाणे नसेल तर ठरवू शकते. घटनेप्रमाणे संसदेला घटनादुरुस्ती करुन न्यायालयीन अधिकारांमध्ये योग्य बदल करू शकते. अशाप्रकारे एका बाजूला न्यायालयीन पुनर्र विलोकनामुळे न्यायालयाचे वर्चस्व व दुसऱ्या बाजूस घटना दुरुस्ती अधिकाराप्रमाणे संसदेचे सार्वभौमत्व याचा समतोल आपल्या घटनेने साधला आहे.

**१६) संविधानाद्वारे सामाजिक क्षमतेची हमी:-**

भारतीय घटनेने राजकीय आणि कायदेशीर समताच नाही तर सामाजिक समतेची हमी दिली आहे. उदा. अस्पृश्यता निवारण, सार्वजनिक स्थळी जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी आधारावर भेदभाव पाळण्यात येणार नाही. इत्यादी तरतुदी करुन घटनेने सामाजिक क्षमतेची हमी दिली आहे. मानवनिर्मित भेदभाव नष्ट करणे आणि समता स्थापन करणे हे उद्दिष्ट त्यामागे आहे.

निष्कर्ष स्वरुपात भारतीय राज्यघटनेच्या वरील वैशिष्ट्यामुळे भारताची राज्यघटना जगातील घटनापेक्षा वेगळी ठरते.

## १.२.३ भारतीय राज्यघटनेचा सरनामा किंवा उद्देशपत्रिका (Preable of the Indian Constitution)

- उद्देश पत्रिका म्हणजे - राज्यघटनेची प्रारंभीची प्रस्तावना किंवा सारांश म्हणजे राज्यघटनेची उद्देशपत्रिका होय.

भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीलाच भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका जोडली आहे. ही उद्देशपत्रिका २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने मंजूर केलेली आहे.

- उद्देशपत्रिकेचे महत्व - उद्देशपत्रिकेला भारतीय राज्यघटनेचा आत्मा म्हणतात. त्यावरुन संपूर्ण राज्यघटनेचे तत्वज्ञान स्पष्ट होते. स्वंतत्र भारतात घटनाकार कशा प्रकारची राज्यव्यवस्था निर्माण करु पाहत होते. याचे आकलण हाते. भारतीय घटनाकार राजकीय, सामाजिक, आर्थिक वातावरण सदृढ करु इच्छित हाते याची जाणीव उद्देशपत्रिकेवरुन होते.

- भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका किंवा सरनामा

भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका खालीलप्रमाणे आहे. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना-

न्याय : सामाजिक, आर्थिक व राजनैतिक

स्वातंत्र्य: विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा आणि उपासना यांचे

समानता: दर्जा व संधी या बाबतीत

बंधुता: व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता राखणारी, यांची शाश्वती देण्याचे आमच्या या घटना समितीत आज २६ नोव्हेंबर १९४९ रोजी विचारपूर्वक ठरवित आहोत आणि घटना मान्य करीत आहोत व त्यासंबधी कायदा करुन तिचा आम्ही स्वीकार करीत आहोत.

- भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान :

भारतीय घटनेच्या सरनाम्यावरुन पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

**१) भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान :**

आम्ही भारतीय जनता :- भारतीय राज्यघटनेची निर्मिती भारतीय जनतेच्या इच्छेतून झालेली आहे. वास्तविक भारतीय राज्यघटना समितीने निर्माण केलेली आहे. भारतीय राज्यघटना ही ब्रिटीशांनी निर्माण केलेली नाही तर या संविधान समितीस अनेक हुशार, मातबर, अनुभवी, तज्ञ व्यक्ति होते. हे सदस्य समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य होते. उद्देशपत्रिकेच्या सुरुवातीचे शब्दच ''आम्ही भारतीय लोक...... ही घटना आमच्यासाठी तयार मान्य व स्वीकृत करीत आहोत.'' या शब्दप्रयोगावरुन स्पष्ट होते की, भारतीय घटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे.

**२) भारतीय राज्याचे स्वरुप**

उद्देशपत्रिकेच्या दुसऱ्या ओळीवरुन भारतीय राज्याचे स्वरुप सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य असल्याचे स्पष्ट होते. सुरुवातीला 'सार्वभौम, लोकशाही गणराज्य' अशी शब्द योजना होती. पुढे १९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती झाली आणि त्यामध्ये '' समाजवादी, धर्मातीत हे शब्द नव्याने समावेष्टित केले. भारतीय राज्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येइल.

**सार्वभौम :-**

भारत सार्वभौम आहे म्हणजे इतर कोणत्याही बाह्य देशाचे अंतर्गत व बाह्य नियंत्रण किंवा वर्चस्व भारतावर नाही. देशातील सर्व व्यक्ती व संस्था यांच्यावर भारतीय राज्याची सत्ता आहे परराष्ट्राशी संबध ठरविण्याचा हक्क भारतीय राज्याला आहे. भारत ब्रिटिश राष्ट्रकूल सभासद (British Common Wealth) चा सभासद आहे. परंतु यामुळे भारताच्या सार्वभौमत्वावर कोणतीही मर्यादा येत नाही. कारण हा स्वंतत्र राष्ट्रांचा संघ आहे या संघाचे भारताचे सभासदत्व ऐच्छिक आहे. इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबध ठेवणे एवढाच उद्देश या संघाचे सभासदत्व घेण्यामागे आहे.

**गणराज्य:–**

भारतात गणराज्य पध्दती आहे. म्हणजे भारतीय गणराज्याचा प्रमुख राष्ट्रपती परंपरेने आलेल किंवा अनुवंशिकतेने निवडलेला नाही तर लोकांनी निवडलेला आहे. शासन, लोकांनी निवडून दिलेले व लोकांसाठी कार्य करणारे आहे.

**लोकशाही (प्रजासत्ताक)**

भारतीय घटनेच्या उद्देशपत्रिकेत 'लोकशाही' किंवा 'प्रजासत्ताक' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे. घटनेने जनतेचे सार्वभौम मान्य करुन प्रतिनिधीक लोकशाही शासनपध्दतीचा स्विकार केलेला आहे. राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट घटनाकारांनी गृहीत धरले होते. डॉ. आंबेडकरांना सामाजिक लोकशाही अभिप्रेत होती. भारतीय घटनेने भारतातील प्रौढ स्त्री– पुरुषांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे.

**समाजवाद**

१९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती होऊन भारतीय घटनेच्या सरनाम्यात 'समाजवाद हा नविन शब्द घालण्यात आला. भारतातील जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापित होणे आवश्यक आहे. त्यातूनच समाजवाद हा शब्द सरनाम्यात समाविष्ट केला. भारताने समाजवादी अर्थव्यवस्था स्विकारली नाही. तर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आहे.

**धर्मनिरपेक्ष**

इ.स १९७६ साली ४२ वी घटना दुरुस्ती होऊन 'धर्मनिरपेक्ष' शब्द समाविष्ट झाला. भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत रचनेचा तो एक भाग आहे. भारतीय राज्यघटनेने सर्व धर्मांना सारखेच संरक्षण दिले आहे. राज्याचा धर्मम्हणून कोणत्याही धर्माला मान्यता नाही. भारतीय नागरीकाला कलम २५ ते २८ नुसार धार्मिक स्वांतत्र्याचा अधिकार आहे. याउलट भारताच्या शेजारील असलेले देश पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, ब्रम्हदेश (म्यानमार) नेपाळ इत्यादी राष्ट्रांनी विशिष्ट धर्माला मान्यता दिली. ही राष्ट्रे धर्मातीत राष्ट्रे आहेत. भारत मात्र धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.

भारतीय राज्याचे स्वरुप कोणते आणि कसे आहे ते उद्देशपत्रिकेवरुन स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेची मुलभूत रचना कोणत्या तत्वावर आधारीत आहे हेही त्यावरून लक्षात येते.

**३) भारतीय राज्यघटनेची उद्दिष्टये :–**

उद्देशपत्रिकेवरुन भारतीय राज्याची मुख्य उद्दिष्ट स्पष्ट होतात. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता, व्यक्तिची प्रतिष्ठा, राष्ट्राची अखंडता व एकात्मता राखणे ही राज्यव्यवस्थेची उद्दिष्टे असून भारतीय नागरीकांना त्याविषयी शाश्वती देण्यात आलेली आहे.

**न्याय**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत घटनाकारांनी न्यायाचा पुरस्कार केला आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. व्यक्तिहित आणि समाज हिताचा मेळ म्हणजे न्याय, सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय भारतात प्रस्थापित व्हावा म्हणून मुलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, सामाजिक क्षेत्रात भेदभाव न करणे, आर्थिक क्षेत्रात समान संधी व दर्जा उपलब्ध करुन देणे इत्यादी तरतुदी घटणेत करण्यात आल्या आहेत.

**स्वातंत्र्य**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत नागरीकांना विचार, उत्पादन, विश्वास, श्रध्दा आणि उपासना यांचे स्वांतत्र्य मिळवून देण्याची शाश्वती देण्यात आलेली आहे. व्यक्तिच्या सर्वागीण विकासासाठी व्यक्तिस्वांतत्र्य सुरक्षित ठेवले पाहिजे. तसेच ते विकसित झाले पाहिजे भारतीय घटनेच्या तिसऱ्या विभागात नागरीकांना मुलभूत अधिकार दिलेले आहेत. तसेच घटनेने मुलभूत अधिकाऱ्यांना संरक्षण दिलेले आहे स्वांतत्र्य म्हणजे स्वैरचार नव्हे याची माहिती घटनाकारांना होती. स्वातंत्र्याचे अर्मायादित अधिकार त्यांनी आवळले. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्वांतत्र्य प्रस्थापित होण्यास मदत झालेली आहे.

**समता**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात समतेच्या तत्वाचा स्विकार केलेला आहे. समतेशिवाय स्वांतष्याला अर्थ नाही. म्हणूनच भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्कामध्ये पहिलाच हक्क ‘समतेचा आहे या हक्कानुसार कायद्यापुढे समानता, कायद्याचे सर्व नागरीकांना समान संरक्षण, प्रत्यकाला समान संधी व दर्जा देण्याात आला आहे. स्वातंत्र्य उपभोगण्याची व विकासाची समान संधी प्रत्येक नागरीकाला उपलब्ध करुन देणे हा त्यामागे उद्देश आहे.

**बंधुता**

भारतीय घटनेच्या सरनाम्यात व्यक्तिची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी बंधुता या उद्दिष्टांचा स्विकार केलेला आहे. प्रत्येक व्यक्तिला प्रतिष्ठा मिळावी. माणूस म्हणून जगता यावे, प्रत्येकाला मानवी वागणूक मिळावी. न्याय मिळावा यासाठी मार्गदर्शक तत्वामध्ये अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता राखणारा बंधूभाव निर्माण करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. भारतात एकता निर्माण व्हावी आणि राष्ट्राचे ऐक्य कायम रहावे यासाठी ‘बंधूभाव निर्माण करण्यावर भर आहे.

## १.३ सारांश

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे महत्व विशद करताना प्रा. अर्नेस्ट वार्कर यांनी आपल्या "Principles of Social and Political Theory" या ग्रंथाच्या प्रस्तावनेत भारतीय राज्यघटनेची

उद्देशपत्रिका छापलेली आहे तसेच एम. व्ही पायली यांच्यामते, ही उद्देशपत्रिका भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे असे म्हटले आहे.

सारांश रुपाने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात आधुनिक भारताचे राजकीय तत्वज्ञान संक्षिप्त स्वरुपात मांडले.

## १.४ पारिभाषिक शब्द –

- **स्वायत्तता** – राज्यकारभारचे स्वांतत्र्य
- **शेषाधिकार** – उर्वरित
- **धर्मनिरपेक्ष** – सर्व धर्मांना समान महत्व
- **लिखीत** – लिहून ठेवलेली
- **संघराज्य** – मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकार अशी विभागणी
- **सार्वभौम –** कुणाचेही बंधन नसलेला

## १.५ स्वंय – अध्ययन प्रश्न उत्तरे

प्रश्न – खालील पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) ब्रिटिश पार्लमेंटने मोर्ले – मिंटो सुधारणा कायदा..........साली मंजुर केला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४९

२) माँटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा......साली मंजूर झाला.

अ) १९१० ब) १९१५ क) १९१९ ड) १९३५

३) भारतीय घटनापरिषदेचे अध्यक्ष..........हे होते.

अ) पंडित नेहरु ब) सरदार वल्लभभाई पटेल

क) डॉ.सिन्हा ड) डॉ. राजेंद्र प्रसाद

४) भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष.......हे होते.

अ) म.गांधी ब) के.एम.मुन्शी क) डॉ.राजेंद्र प्रसाद ड) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

५) भारत हे.......स्वरुपाचे राज्य आहे.

अ) धार्मिक ब) धर्माधिष्टित क) धर्मनिरपेक्ष ड) धर्मबाह्य

६) भारतीय राज्यघटना..........रोजी मान्य करण्यात आली.

अ) २६ नोव्हेंबर १९४९ ब) १५ ऑगस्ट १९४७

क) ९ डिसेंबर १९४६ ड) यापैकी नाही.

७) भारतीय राज्यघटनेत............देशाच्या राज्यघटनेवरुन मुलभूत अधिकाराचा समावेश करण्यात आला आहे.

अ) अमेरिका ब) रशिया क) ऑस्ट्रेलिया ड) कॅनडा

८) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे............देशाच्या राज्यघटनेतून स्विकारण्यात आली आहेत.

अ) कॅनडा ब) अमेरिका क) आर्यलंड ड) सोव्हिएत रशिया

९) १९७६ च्या ४२ व्या घटना दुरुस्तीने..............हा शब्द घटनेच्या उद्देशपत्रिकेत समाविष्ट करण्यात आला.

अ) सार्वभौम ब) प्रजासत्ताक क) लोकशाही ड) धर्मनिरपेक्ष

१०) आपल्या राज्यघटनेच्या सरनाम्याने विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा आणि........त्यांचे स्वातंत्र्य दिले आहे.

अ) व्यवसाय ब) संघटना क) उपासना ड) संचार

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) अ २) क ३) क ४) ड ५) क ६) क ७) अ ८) क ९) ड १०) क

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टीपा लिहा.

१. मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा

२. माँटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा

३. १९३५- चा प्रशासन कायदा

४. धर्मनिरपेक्षता

५. समाजवाद

६. गणराज्य

ब) लघूत्तरी प्रश्न

१. १९३५ च्या प्रशासन कायद्यातील तरतुदी स्पष्ट करा.

२. १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्यासंबधी माहिती स्पष्ट करा.

३. मुलभूत हक्कांबद्दल थोडक्यात माहिती द्या.

क) दिर्घोत्तरी प्रश्न

१. भारताच्या घटनात्मक विकासाचा थोडक्यात परामर्श द्या.

२. भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट स्पष्ट करा.

३. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे स्वरुप व महत्व सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. डॉ. भोळे भा.ल – भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपुर, २००३

२. कुलकर्णी बी. वाय – भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपुर, २०००

३. पाटील बी.बी. उर्मिला चव्हाण – भारतीय शासन – कोल्हापूर, २०१३

४. बकाणे छाया – भारतीय राजकीय व्यवस्था – श्रीविद्या प्रकाशन पुणे.

५. डॉ. कारेकर शोभा, डॉ. घोडके शरद – भारतीय शासन आणि राजकारण, डायमंड प्रकाशन पुणे.

६. Basu D.D. – Introduction to the constitution of India


❑❑❑

# घटक २
# मूलभूत हक्क आणि कर्तव्ये
(Fundamental Rights and Duties)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ मूलभूत हक्क

  २.२.२ मूलभूत कर्तव्ये

  २.२.३ राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ स्तरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि कर्तव्ये या प्रकरणाचा अभ्यास करताना पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

- भारतीय राज्यघटनेतील भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांचा सविस्तर अभ्यास करणे.
- भारतीय राज्यघटनेमध्ये दिलेल्या मूलभूत कर्तव्यांचा अभ्यास करणे.
- भारतीय राज्यघटनेतील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे सविस्तर अभ्यासणे.

## २.१ प्रास्ताविक

लोकशाही राज्यव्यवस्थेत हक्क आणि कर्तव्ये यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. लोकशाही राज्यव्यवस्थेत हक्क आणि कर्तव्ये परस्परांपासून वेगळी करता येत नाहीत. लोकशाही राज्यव्यवस्थेत नागरिकांना जशी आपल्या हक्काबाबत जाणीव जागृती असते तशीच ती आपली कर्तव्ये व जबाबदारीबाबतही

असणे आवश्यक मानले जाते. जगात लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारलेल्या देशांच्या संविधानात मूलभूत हक्क व कर्तव्ये यांचा समावेश केलेला दिसतो. भारताने लोकशाही राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. तेंव्हा भारताच्या संविधानात मूलभूत हक्क व कर्तव्ये यांचा समावेश होणे साहाजिक आहे. लोकशाहीमध्ये व्यक्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. म्हणून भारतीय घटनाकारांनी व्यक्तीला राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य बाहल करून व्यक्तीविकास आणि पर्यायाने राष्ट्रविकास साधता येईल असा विचार मांडला. प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व असते. यानुसार प्रत्येक भारतीय व्यक्तीची प्रतिष्ठा जपण्याची हमी संविधानाने सरनाम्यात दिली आहे. त्यामुळे व्यक्तीच्या विकासाला पूरक आणि पोषक ठरणारे मूलभूत हक्क संविधानात देण्याची गरज निर्माण झाली. भारतातील विषम समाजरचनेचा विचार करता भारतात समता, बंधुता, न्याय या मुल्यांची रूजवणूक होणे आवश्यक होते. मूलभूत हक्कांच्या रूपाने हे शक्य होणार होते. सामाजिक समतेच्या कलमांची तरतूद करून घटनेने व्यक्तीला उचित न्याय देण्यासाठी संविधानात मूलभूत हक्कांची तरतूद करणे आवश्यकच नव्हे तर अनिवार्य मानले. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक स्वीकारताना दुसरे आपसूक लागू होते. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व्यक्ती आपल्या हक्कांबाबत जेवढी सजग असते तेवढीच आपल्या कर्तव्या बाबतही सजग दक्ष असायला हवी अशी अपेक्षा ठेवून घटनाकारांनी भारतीय संविधानात मूलभूत हक्कांबरोबरच मूलभूत कर्तव्यांची ही तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर संविधानाच्या प्रस्ताविकेत न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही जी उद्दिष्ट्ये नमूद केलेली आहेत ती पूर्ण करण्याचे, प्रत्यक्षात आणण्याचे मोठे आव्हान भारतीय संविधान निर्मात्यांसमोर होते. समजातील सर्वप्रकारच्या विषमतांचे निराकरण करणे आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देणे ही दुहेरी जबाबदारी त्यांना पार पाडणे गरजेचे होते. संविधानात मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांच्याशी संबंधित तरतूदी करून घटनाकारांनी ती जबाबदारी चोखपणे, योग्यरित्या पारपाडली आहे. असे म्हणता येईल. प्रस्तुत घटकात आपण मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ मूलभूत हक्क (Fundamental Rights)

भारतीय संविधानातील भाग तीन मध्ये कलम १२ ते ३५ मध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांची तरतूद केलेली आहे. मूलभूत हक्कांबद्दल हेरॉल्ड लास्की यांनी असे मत मांडले आहे की, ''कोणत्याही राज्याचे स्वरूप त्या राज्याने मान्यता दिलेल्या मूलभूत हक्कांवरून ठरत असते.'' (Every State is known by the rights that it maintains) यावरून आपल्या लक्षात येते की, व्यक्ती आणि समाज यांच्या विकासाचा आत्मा हा मूलभूत हक्कांमध्ये असतो. लोकशाहीमध्ये व्यक्ती ही केंद्रस्थानी असते. त्यामुळे भारताच्या संविधानात मूलभूत हक्कांना विशेष महत्त्व आहे.

व्यक्तीला काही मूलभूत हक्क प्राप्त झाल्याशिवाय लोकशाहीला अर्थ प्राप्त होऊ शकत नाही. व्यक्तीला मूलभूत हक्क प्राप्त झाल्यासच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. भारतीय घटनाकारांनी हे

योग्यप्रकारे जाणले होते. ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी, ''मूलभूत हक्क हा भारतीय संविधानाचा आत्मा आहे,'' असे म्हटले आहे. प्रो. हेरॉल्ड लास्कीच्या मते, ''माणसाला आपल्या आयुष्यात सर्वोत्त्म टप्प्यापर्यंत पोहोचता येईल अशी सामाजिक जीवनाची परिस्थिती अस्तित्वात आणणे हे हक्कांचे प्रयोजन होय.'' अनेक देशांच्या संविधानात मूलभूत हक्कांचा समावेश केलेला आढळतो. जगामध्ये मूलभूत हक्कांचा विचार सर्वप्रथम इग्लंडमध्ये केला गेला. इ.स. १२१५ मध्ये सर्वप्रथम इग्लंडमध्ये जनतेने राजाकडे मूलभूत अधिकारांची मागणी मॅग्नाचार्ट सनदेद्वारे केली. पुढे इ.स. १६२८ पासून इग्लंडमध्ये हक्कांची एक परंपरा निर्माण झाली. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रातिकारकांनी राष्ट्रीय सभेत मानवी हक्कांची घोषणा केली. अमेरिकेच्या संविधानात ''बिल ऑफ राइटस्'' (Bill of Rights) या १७९१ च्या घटनादुरूस्ती विधेयका द्वारे मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला. सो. रशियामध्ये १९३६ मध्ये स्टॅलिनने आपल्या राज्यघटनेत मूलभूत अधिकाराचा समावेश केला. जर्मनीच्या वाइमर राज्यघटनेत 'मूलभूत हक्क आणि कर्तव्ये' यांचा समावेश केला गेला.

भारतीय घटनाकारांनी सामाजिक परिवर्तनाचे जे अंतिम उद्‌िष्टये ठरविले होते. त्याचा केंद्रबिंदू म्हणून मूलभूत हक्कांकडे बोट दाखविता येईल. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून मूलभूत अधिकारांचा उगम झाल्याचे दिसते. भारतीयांना स्वातंत्र्य आणि समता प्राप्त झाली पाहिजे अशी आग्रही भूमिका स्वातंत्र्याच्या चळवळीतून व्यक्त झालेली दिसते. लोकांना आपले जीवन चांगल्या प्रकारे जगता यावे यासाठी त्यांना काही मूलभूत हक्क देणे आवश्यक असते. राष्ट्रीय कॉंग्रेसकडून ब्रिटिश काळापासून मूलभूत अधिकारांची मागणी सातत्याने होत होती. इ.स.१८९५ साली लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सत्तेकडे मूलभूत हक्कांची मागणी केली होती. पुढे १९१८ साली मुंबई - कॉंग्रेस अधिवेशनात मूलभूत हक्कांचा समवेश राज्यघटेत करावा आणि त्या हक्कांना न्यायालयीन संरक्षण असावे अशी मागणी करण्यात आली. मात्र ब्रिटिश राज्यकर्त्यांनी यामागणीला फारसा प्रतिसाद दिला नाही. इ.स. १९२८ मध्ये मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालील नेहरू समितीच्या अहवालामध्ये मूलभूत हक्कांची मागणी करण्यात आली होती. सायमन कमिशन (१९२७) आणि गोलमेज परिषदा (१९३०,३१,३२) यांनीही मूलभूत हक्कांविषयी नकार दर्शविला. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सततच्या पाठपुराव्याच्या परिणामी १९४६ रोजी त्रिमंत्री योजनेने (कॅबिनेट मिशन योजनेने) मूलभूत अधिकारांचा घटनेत समावेश करावा आणि त्या अधिकारांना हमी देण्यात यावी असे सुचविले होते. पुढे २२ जानेवारी १९४७ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जो वस्तुनिष्ठ ठराव मांडला होता त्यात मुलभूत अधिकारांची स्पष्ट मागणी केलेली होती.

दरम्यान १९४० च्या दशकात जागतिक पातळीवर मानवी हक्कांची जाणीव निर्माण झालेली दिसते. याच काळात संयुक्त राष्ट्र संघाचा (UNO) 'मानवी हक्काचा जाहीरनामा' (१० डिसेंबर १९४७) निर्माण झाला. मार्क्स, टी.एच.ग्रीन, हेरॉल्ड लास्की या विचारवंतांचा प्रभाव भारतीय राज्यघटनाकारांवर झालेला होता. अमेरिकेच्या राज्यघटनेतील 'बिल ऑफ राइटस्' व फ्रान्समधील 'मानवी हक्कांची सनद' (१७८९) यांनी भारतीय घटनाकारांना फारच प्रभावीत केले होते. आयलंड हक्कविषयक तरतुदी, तसेच संयुक्त राष्ट्राची 'मानवी हक्कांची सनद' याचांही भारतीय घटनाकारांवर मोठा प्रभाव पडलेला दिसतो. आयर्लंड, जपान,

ब्रम्हदेशातील समस्या बऱ्याच प्रमाणात भारत सारख्याच होत्या. त्यामुळे भारतीय राज्यघटनाकारांनी वरील राज्यघटनांचे बऱ्याच प्रमाणावर अनुकरण केलेले दिसते. परंतु हे अनुकरण भारतीय परिस्थितीच्या संदर्भात केलेले दिसते. घटनाकारांनी भारतीय परिस्थितीच्या संदर्भात मूलभूत अधिकारांना साकार केले आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकांना ज्या हक्कांवर दावा सांगता येईल आणि कायदा करण्याची वा राबवण्याची सत्ता असलेल्या प्रत्येक सत्ताधारकांवर जे बंधनकारक असतील असे मूलभूत हक्क राज्यघटनेत समाविष्ट असावेत यावर संविधान सभेत एकमत होते. परंतु हक्कांचे स्वरूप आणि त्यावरील मर्यादा याबाबतीत मात्र मतभेद होते. काही सभासदांचा भर नकारात्मक हक्क व स्वातंत्र्यावर होता. राज्यसत्तेने नागरिकांच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करणारे मूलभूत हक्क संविधानात असावेत ही या सभासदांची भूमिका होती. तर जे सभासद सकारात्मक हक्क व स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते ते राज्यसत्तेने नागरिकांना काही सामाजिक - आर्थिक हक्कांची हमी द्यावी असा आग्रह धरून होते. मूलभूत हक्कांचा भारतीय राज्यघटनेत समावेश करीत असताना घटनाकारांनी वरील दोन्ही भूमिकांचा समतोल साधला. नकारात्मक हक्क त्यांनी मूलभूत हक्कांच्या, तर सकारात्मक हक्क मार्गदर्शक तत्त्वांच्या भागात समाविष्ट केले. मूलभूत हक्कांच्या संदर्भात घटनापरिषदेने जे. बी. कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली जी उपसमिती नेमली होती, त्या समितीच्या १६ एप्रिल १९४७ रोजीच्या अहवालात भारतीय नागरिकांना दोन प्रकारचे हक्क देण्यात यावेत असे सुचविले होते. यामध्ये १) एक गोष्ट अशी होती की, एकाच वेळी, सर्व हक्क 'मूलभूत हक्क म्हणून भारतीयांना देणे शक्य नव्हते, म्हणून भारतीय नागरिकांना काही अधिकार (हक्क) असे दिले की, त्या हक्कांचे जर कोणांकडून (शासन, संस्था, संघटना, व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आदींकडून) उल्लंघन झाले तर त्यासाठी त्यांना न्यायालयाकडे न्याय (दाद) मागता यावा. म्हणजेच न्यायालयीन संरक्षण असणारे हक्क यांचा समावेश मूलभूत हक्कात करण्यात यावा. २) नागरिकांच्या ज्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाकडे न्याय (दाद) मागता येणार नाही असे न्यायालयाच्या कक्षेत न बसणारे हक्क 'राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांत' समाविष्ट करण्यात याव्येत. एकंदरित, न्यायालयीन संरक्षण असणारे न्याय हक्क म्हणजेच मूलभूत अधिकार (हक्क) होत आणि न्यायालयाच्या कक्षेबाहेरील अधिकार (हक्क) म्हणजे राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे होत.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क (अधिकार)** (Fundamental Rights in Indian Constitution)

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आलेली आहे.

१. समतेचा हक्क (Right to Equality) कलम १४ ते १८

२. स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom) कलम १९ ते २२

३ शोषणाविरूध्द (पिळवणुकी विरूध्दांचा) हक्क (Right Against Exploitation) कलम २३ ते २४

४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (Right to freedom of Religion) कलम २५ ते २८

५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (Cultural and Educational Rights) कलम २९ ते ३०

६. संपत्तीचा (मालमत्तेचा) हक्क (Rights to Property) कलम ३१

(१९७८च्या ४४ व्या घटनादुरूस्तीने हा हक्क रद्द करून तो कायदेशीर केला)

७. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क)

(Right to constitutional Remedies) कलम ३२

(टीप : संपत्तीचा हक्क (कलम ३१) १९७८ साली ४४ व्या घटना दुरूस्तीने मूलभूत हक्कातून रद्द केला असून तो आता केवळ वैधानिक (कायदेशीर) हक्क बनला आहे. त्यामुळे सध्या मुलभूत हक्कांची संख्या सहा आहे.)

**मूलभूत अधिकारांची किंवा हक्कांची वैशिष्ट्ये**

१. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकारांची मांडणी करण्यात आली आहे. जगातील अन्य कोणत्याही देशांच्या घटनेतील मूलभूत हक्कांच्या स्पष्टीकरणापेक्षा भारतीय संविधानातील मुलभूत हक्कांचे स्पष्टीकरण अधिक सविस्तरपणे करण्यात आले आहे.

२. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क देशातील सर्व संख्या व संघटनांना बंधनकारक आहेत. केंद्रशासना पासून ते स्थानिक शासन संस्थांपर्यंत तसेच सार्वजनिक संस्था, संघटनांवरही मूलभूत हक्कांच्या तत्त्वांचे पालन करणे बंधनकारक असते.

३. भारतीय संविधानाने कलम ३२ नुसार मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण दिलेले आहे. जर लोकांकडून मूलभूत हक्काचे उल्लंघन झाले तर व्यक्ती न्यायालयाकडे न्याय (दाद) मागू शकते.

४. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क मत/हित स्वरूपाचे आहेत. राज्यसत्ता काही प्रमाणात मूलभूत हक्कांवर मर्यादा घालू शकते. राष्ट्राचे ऐक्य व एकात्मका, सार्वभौमत्व, सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी स्वातंत्र्याच्या हक्कांवर शासनाकडून मर्यादा घालाण्यात येतात.

५. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क 'सकारात्मक' (Positive) आणि नकारात्मक (Negative) स्वरूपाचे आहेत. सकारात्मक स्वरूपाचे मूलभूत हक्क आहेत. या हक्कांमध्ये सरकारला सकारात्मक हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. तर नकारात्मक स्वरूपाचे मूलभूत हक्कामध्ये जसे धर्म, वंश, जात, भाषा, लिंग व प्रदेश या कारणावरून भारतातील कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोरील समानतेची वागणूक नाकारता येणार नाही.

६. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क कलम ३५९ अन्वये. आणीबाणीच्या काळात स्थगित अथवा मर्यादित करता येतात. अशावेळी कोणाही व्यक्तीला शासनांकडून मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले म्हणून न्यायालयाकडे दाद मागता येत नाही.

७. भारतीय संविधानाने मुलभूत हक्कांबाबत नागरिक व व्यक्ती असा फरक केलेला आहे. केवळ भारतीय नागरिकांनाच भाषण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क असे अधिकार (हक्क)

प्राप्त होतात. परकीय देशांच्या नागरिकांना (व्यक्तींना) असे हक्क दिलेले नाहीत. मात्र कायद्यासमोर समानतेची वागणूक मिळणे, धार्मिक स्वातंत्र्य असे मूलभूत हक्क भारतीय नागरिक व परकीय व्यक्ती असा दोघांनाही देण्यात आलेला आहेत.

८. भारतीय संविधान निर्मात्यांनी आयर्लंड, जपान, इंग्लंड, अमेरिका, ब्रम्हदेश, कॅनडा आदी देशांच्या संविधानातील मूलभूत हक्कांचा संविधानात विचारपूर्वक समावेश केलेला आहे. यावरून भारतीय घटनाकारांनी अन्य देशांच्या राज्यघटनांचे अंधानुकरण केलेले नाही हे स्पष्ट होते.

९. मूलभूत हक्क भारतीय संविधानाच्या मूलभूत चौकटीचा/ संरचनेचा (Basic Stacture) एक भाग मानण्यात येतो.

**मूलभूत हक्कांची सविस्तर मांडणी**

**कलम– १२**

कलम १२ मध्ये राज्याची व्याख्या करण्यात आली आहे. नागरिकांना मूलभूत हक्क देण्याची आणि त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी कलम १२ अन्वये संविधानाने राज्यावर सोपविली आहे. याठिकाणी 'राज्य' या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र, कर्नाटक, राज्यस्थान, गोवा इ. पैकी एक असा काढणे चुकीचे ठरेल. ही सर्व भारताची घटक राज्ये आहेत. हे लक्षात घ्यावे. म्हणून कलम १२ मध्ये 'राज्य' या शब्दाची केलेली व्याख्या जाणीवपूर्वक समजून घेऊ या.

'राज्य म्हणजे, ''भारत सरकार व संसद, तसेच प्रत्येक घटकराज्याचे शासन आणि विधानमंडळ, सर्व स्थानिक स्वशासन संस्था आणि भारताच्या भूप्रदेशातील व भारत सरकारच्या अधिकार क्षेत्रातील वा नियंत्रणाखालील सर्व स्थानिक वा इतर संस्था'', यांचा समावेश 'राज्य' या व्याख्येत होतो. या व्याख्येवरून, 'राज्य' या संज्ञेची व्यापकता लक्षात येते. अगदी ग्रामपंचायत ते केंद्रसरकार यामधील सर्व शासन संस्था, तसेच सर्व सेवा प्राधिकरणे यामध्ये समाविष्ट होतात. नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठी हे सर्व घटक 'राज्य' म्हणून बांधील आहेत.

**कलम – १३**

मूलभूत हक्कांच्या तरतुदीची विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण (दुय्यमीकरण) करणारे कायदे सरकारला करता येणार नाहीत किंवा असे कायदे केल्यास त्यातील मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या तरतूदी रद्द होतील.

शासनाचा एखादा कायदा मूलभूत हक्काच्या विरोधात जाणारा असेल तर न्यायालये तो कायदा घटनाविरोध आणि बेकायदेशीर (अवैध) घोषित करू शकतात. घटनेने कलम – ३२ अन्वये सर्वोच्च न्यायालयाला व कलम – २२६ अन्वये उच्च न्यायालयाला हा अधिकार दिलेला आहे. थोडक्यात, कलम – १३ मध्ये नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेणारा कायदा राज्यास करता येणार नाही, असे स्पष्ट करून न्यायालयीन पूनर्विलोकनाचे (Judicial Review) तत्त्व समाविष्ट केले आहे.

संविधानात २४ व्या घटनादुरूस्ती पूर्वी असा एक समज होता की, घटनेचा संरक्षक ही सर्वोच्च न्यायालयाची भूमिका विशेषतः मूलभूत हक्कांच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक आहे. घटनेतील १३ व्या कलमावर हा समज आधारित होता. कारण त्या कलमानुसार मूलभूत हक्कांचा भंग वा संक्षेप करणारा : कायदा' करण्याचा अधिकार संसदेला नाकारण्यात आला आहे. म्हणजेच मूळ घटनेत कलम – १३ मध्ये मूलभूत हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कायदा न करण्याची तरतूद होती. मात्र १९७१ च्या २४ व्या घटनादुरूस्तीने संविधान अधिनियम १९७१, कलम – २ द्वारे हे स्पष्ट केले आहे की, संसदेने कलम ३६८ नुसार संविधानात केलेल कोणत्या ही घटनादुरूस्तीला / सुधारणेला कलम १३ मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही. थोडक्यात, २४ व्या घटनादुरूस्तीने मूलभूत हक्कांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयीन पूनर्विलोकनांचे अधिकार क्षेत्र मर्यादित (संकुचित) झालेले दिसून येते. जरी २४ व्या घटनादुरूस्तीने (१९७१) संसदेस मूलभूत हक्कात बदल करण्याचा अधिकार मिळाला असला तरी हे हक्क सहजासहजी बदलता येत नाहीत. कारण ते घटनेची मूलभूत संरचना (Basic Structure) मानले आहेत. केशवानंद भारती विरूध्द केरळ राज्य खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने २५ एप्रिल १९७३ रोजी दिलेल्या निर्णयात घटनेचे ३६८ कलम संसदेला घटनेच्या मूलभूत चौकटीत /संरचनेत (Basic structures) फरक, बदल करण्याचा अधिकार देत नाही. या खटल्याने मूलभूत हक्कांना घटनेच्या मूलभूत चौकटीचा एक भाग मानले आहे. त्यामुळे संसदेला मूलभूत हक्कात व्यापक फेरबदल करता येणार नाहीत.

राज्यघटना अमलात आली (२६ जाने. १९५०) त्यावेळी भारताच्या राज्यघटनेने नागरिकांना सात (७) मूलभूत हक्क दिले होते. परंतु सध्या भारतीय नागरिकांसाठी सहा (६) मूलभूत हक्क राहिजे आहेत.

संपत्तीचा/मालमत्तेचा हक्क (कलम ३१) हा एक मूलभूत हक्क होता. तो आता मूलभूत हक्क राहिला नाही. मोरारजी देसाई पंतप्रधान असताना त्यांच्या जनता पक्षाच्या सरकारने १९७८ मध्ये ४४ वी घटनादुरूस्ती केली आणि त्या घटनादुरूस्ती नुसार भारतीय राज्यघटनेतील कलम १९ (६) आणि कलम ३१ ही संपत्तीच्या/मालमत्तेच्या हक्कासंबंधीची कलमे मूलभूत हक्कातून वगळण्यात आली आहेत. आणि त्याच घटनादुरूस्तीने कलम ३१ (१) यात असलेली तरतूद घटनेच्या कलम ३०० (अ) मध्ये केली आहे. अशा प्रकारे या मूलभूत अधिकाराच्या राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणातून ही कलमे काढून प्रकरण चार मधील बाराव्या (१२ व्या) भागात समाविष्ट केली आहेत. त्या ठिकाणी वित्त, मालमत्ता, करार, दावे याबाबतीत दिलेले अधिकार आहेत. त्यांचे स्वरूप 'कायदेशीर अधिकार' (Ligal Right) असे आहे. म्हणजे 'संपत्तीचा हक्क' हा सध्या 'मूलभूत हक्क' राहिला नसून तो एक ''वैधानिक/कायदेशीर हक्क'' झाला आहे.

भारतीय राज्यघटनेत नमूद असलेल्या सहा (६) मूलभूत हक्कांची मांडणी खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

**१) समतेचा हक्क (कलम १४ ते १८ )**

भारतात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित करणे हा या मूलभूत हक्कांचा प्रमुख उद्देश आहे. संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये यानुसार तरतुदी करणेत आल्या आहेत.

**कलम १४ कायद्यापुढे समानता**

कलम १४ नुसार संविधानाने कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान मानून त्यांना कायद्याचे समान संरक्षण मिळेल असे स्पष्ट केले आहे. याबाबत गरीब-श्रीमंत, धर्म, वंश, जात, लिंग असा भेदभाव होणार नाही. कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसते हे स्पष्ट केले आहे. (या कलमातून कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना स्पष्ट होते.) कोणत्याही व्यक्तीने केलेल्या प्रत्येक कृतीबद्दल कायद्याने समान जबाबदारी दिली आहे. येथे 'व्यक्ती' या संकल्पनेत नोंदणीकृत कंपन्या, संस्था याही येतात हे लक्षात घ्यावे.

अर्थात कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण याचा अर्थ मात्र असा नव्हे की राज्याने केलेले सर्वच कायदे सर्व व्यक्तींना सारखेच लागू असतील. कारण वेगवेगळ्या वर्गांसाठी व स्तरांसाठी वेगवेगळे कायदे करणे समाज हिताच्या दृष्टिने आवश्यक व अपरिहार्य ठरते. फक्त एवढेच की, राज्याने तसे वेगवेगळे कायदे न्याय कारणांसाठी करावेत.

कायद्यापुढील समानता या तत्वाला राष्ट्रपती, राज्यपाल, परराष्ट्र वकील, सैनिक इत्यादींना अपवाद आहेत. घटनेच्या कलम ३६१ ने या पदांना संरक्षण दिले आहे. यानुसार राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांनी आपले अधिकार व कर्तव्ये पार पाडताना जी कृती अथवा कार्यवाही कली असेल तर त्याविरूध्द न्यायालयात दाद मागता येणार नाही. तसेच राष्ट्रपती, राज्यपाल हे पदावर असेपर्यंत त्यांच्याविरूध्द फौजदारी कार्यवाही करता येणार नाही. ही दोन्ही पदे घटनात्मक प्रमुख असल्याने समानतेच्या कायद्याला अपवाद आहेत. तथापी कलम ६१ अन्वये दोषारोप झाल्यास राष्ट्रतींविरूध्द महाभियोग (Impeachment) चालवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कायद्यापुढील समानतचे आणखी एक तत्त्व आहे. समान परिस्थितीत समान असणाऱ्यांना समान वागणूक देणे आणि विशिष्ट परिस्थितीत भेद मान्य करून समाजाच्या गरजेनुसार लोकांचे हक्क पुरविणे हे ते तत्त्व. विशिष्ट परिस्थितीतील भेद हा भौगोलिक, वेळ, व्यवसाय इत्यादींच्या स्वरूपात असतो. माहिला, लष्करी व्यक्ती, बढतीची कार्यपध्दती याबाबतच्या तरतुदी या तत्त्वानुसार केलेल्या आहेत. अशाप्रकारे समान परिस्थिती आणि विशिष्ट परिस्थिती या दोन्ही बाबतीत, कायद्याचे समान संरक्षण ही सकारात्मक संकल्पना मांडून संविधानाने दर्जा, संधी व न्याय यांची समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात, भारताच्या भूप्रदेशात 'राज्य व्यक्तीला कायद्याच्या बाबतीत समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारू शकणार नाही. धर्म, वंश, जात, लिंग, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता, प्रत्येक व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण देण्यात येईल.

**कलम १५ भेदभावास मनाई (प्रतिबंध) :-**

१. केवळ धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान इत्यादींच्या आधारावर राज्याकडून नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. या आधारावर कोणत्याही नागरिकास दुकाने सार्वजनिक उपाहारगृहे, भोजनालये, हॉटेल, सार्वजनिक करमणूकीची ठिकाणे, सार्वजनिक विहिरी,

तलाव, घाट रस्ते, सभागृहे, सार्वजनिक विश्रांतीची ठिकाणे इ. ठिकाणी प्रवेश नाकारला जाणार नाही. याबाबी सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरता निर्माण केलेल्या असतात. याचा वापर करण्यास साधारण जनतेस अपात्र मानले जाणार नाही. अशा ठिकाणी समतेच्या तत्त्वाविरूध्द भेदभाव पाळणे हा दंडनीय गुन्हा मानला जातो.

२. परंतु याठिकाणी हे देखील लक्षात घ्यावे लागेल की, याला काही अपवाद असू शकतात. उदा. तलाव, विहिरी, घाट, या जर वैयक्तिक मालकीच्या असतील तर भेदभाव केला जाऊ शकेल. त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य, स्वास्थ व इतर न्याय कारणांसाठी काही व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारण्यात येईल. उदा. महारोग, क्षयरोग, कोरोना, अशा संसर्गजन्य रोगांनी पीडित व्यक्ती, मद्यपान केलेल्या व्यक्ती इ.

३. वरील कलमान्वये स्त्रिया वा लहान मुले यांच्यासाठी विशेष तरतूद (खाससोयी सुविधा) करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. शासनाकडून यावर्गांसाठी खास उद्याने व मनोरंजनाची ठिकाणे निर्माण केली जाऊ शकतात. स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी वेगळे कायदे करता येतील.

४. समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या विकासासाठी (उन्नतीसाठी) खास सवलती देण्यासंबंधी किंवा अनुसूचित जाती, जमाती यांच्यासाठी कोणतीही विशेष तरतूद करण्याचा अधिकार राज्यास असेल. वरील कलमान्वये या घटकांसाठी, कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्यास (शासनास) प्रतिबंध असणार नाही.

वरील अपवादामुळे भेदभाव होऊ शकत नाही, असे भारतीय राज्यघटना मानते.

**कलम १६ सार्वजनिक सेवांमध्ये समानसंधी**

संविधानाच्या कलम १६ मध्ये या अनुषंगाने पुढीलप्रमाणे तरतुदी केलेल्या आहेत.

१. संधीची समानता राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रात नोकरी (रोजगार) किंवा पद नियुक्ती बाबत सर्व नागरिकांना समान संधी असेल.

२. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान वा वास्तव्य/निवास या कारणांसाठी कोणीही नागरिक राज्यातील कोणत्याही नोकरीसाठी अपात्र ठरणार नाही किंवा त्याच्या बाबतीत प्रतिकूल भेदभाव केला जाणार नाही.

३. रोजगार किंवा पदनियुक्तीबाबत वास्तव्याची अट एखाद्या राज्यातील वा केंद्रशासित प्रदेशातील शासनामधील वा त्यांच्यातील एखाद्या स्थानिक स्वशासनातील रोजगारात (नोकरीत) किवा पदावर नियुक्ती करताना त्या राज्यात वा केंद्रशासित प्रदेशात नियुक्तीच्या पूर्वी वास्तव्य असण्याची अट घालण्याचा कायदा करण्यास संसदेला मनाई (प्रतिबंध) असणार नाही.

४. काही समूहांना राखीव जागा- एखाद्या मागासलेल्या वर्गाचे, जातीचे राज्याच्या आधाीन असलेल्या सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नाही असे राज्याला वाटल्यास त्या वर्गासाठी सेवांमध्ये (नोकऱ्यांमध्ये) किंवा पदांमध्ये आरक्षण (राखीव जागा) ठेवण्याची तरतूद राज्याला करता येईल. तसेच अनुसूचित जाती, जमातींसाठी पदोन्नतीसाठी आरक्षित जागा राखून ठेवता येतील.

५. एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थांशी संबंधित असलेल्या संस्थेचा कारभार किंवा शासक मंडळाचा सदस्य, नोकऱ्या किंवा पदे त्याविशिष्ट जाती-धर्माच्या किंवा संप्रदायाच्या अनुदायी असणाऱ्या व्यक्तींना देण्याची तरतूद राज्यास करता येईल. उदा. शिखांना आपल्या गुरूद्वाराच्या व्यवस्थापनासाठी शीख जातीच्या व्यक्तीला नेमता येईल.

सार्वजनिक सेवांमध्ये समानसंधी देण्यासाठी नोकरी देत असताना त्या पदासाठी काही शैक्षणिक पात्रता व वयाची अट असल्यास शैक्षणिक पात्रतेत सूट देता येणार नाही. काही प्रमाणात वयाची अट शिथिल करता येईल.

**कलम १७ अस्पृश्यता नष्ट करणे (अस्पृश्यता निवारण)**

(Abolition of untouchability)

कलम १७ नुसार 'अस्पृश्यता' नष्ट करण्यात आली असून कोणत्याही स्वरूपात अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आली आहे. कलम १७ च्या आधारे संसदेने १९५५ साली अस्पृश्यता निवारणाचा कायदा करून अस्पृश्तेवर पूर्णपणे बंदी आणली आहे. आणि त्या कायद्याने तो फौजदारी गुन्हा समजण्यात येतो. अस्पृश्यता पाळणाऱ्यास सहा महिने कैद किंवा पाचशे रूपये दंड होईल अशी तरतूद केली आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण होण्यासाठी आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अस्पृश्यता पाळण्यास प्रतिबंध करून संविधानाने क्रांतिकारी पाऊल उचलेले आहे.

संसदेने अस्पृश्यता निवारणासाठी 'नागरी हक्क संरक्षण कायदा १९५९' पारित केला. सध्या हा कायदा ''अनुसूचित जाती-जामाती अन्याय निवारण कायदा १९८९'' या नावाने प्रचलित आहे.

**कलम १८ : किताब किंवा पदव्यांची समाप्ती**

(Abolition of Titles )

राज्यघटनेच्य कलम १८ अन्वये सरकारकडून पदव्या किंवा किताब बहाल करण्याची पध्दती बंद करण्यात आली आहे. ब्रिटिश राजवटीत रावबहाद्दूर, रायबहाद्दूर दिवाण, दिवाणसाहेब, रावसाहेब, खानबहाद्दूर, दिवाणबहाद्दूर असे किताब दिले जायचे. ब्रिटिश काळात भारतात अनेकांना असे किताब, पदव्या बहाल करून नागरिकांमध्ये कृत्रिम भेद केला गेल्याचे दिसते. या पदव्या, किताब समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील फार मोठा अडसर आहे हे जाणून घटनाकारांनी किताब मध्ये कृत्रिम भेदभाव निर्माण करणाऱ्या या दोषावर कायमचा पडदा टाकला, परंतु याला अपवाद आहेत, कलम १८ (१) च्या तरतुदीने शैक्षणिक क्षेत्रात, लष्करात किंवा समाजसेवा क्षेत्रात विशेष योगदान अथवा कामगिरी बजावलेल्या व्यक्तींना,

त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याच्या दृष्टिने राष्ट्रपतींकडून काही पदव्या देण्याची सोय केली जाऊ शकते. या तरतुदी नुसार शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल भारताच्या राष्ट्रपतींकडून भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री या चार प्रकारच्या पदव्या दिल्या जातात. त्याचप्रमाणे लष्करातील व्यक्तींना त्यांच्या असामान्य कर्तृत्वाबद्दल 'परमविर चक्र' 'महावीर चक्र', 'कीर्तिचक्र', 'शौर्यचक्र', 'वीरचक्र', 'अशोकचक्र' अशा बहुमान सूचक पदव्या, (Awards) देण्यात येतात.

वर उल्लेखित क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान व गौरव व्हावा आणि त्यापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी असा उदात्त हेतू हे गौरव पुरस्कार देण्यामागे आहे. समाजासमोर आदर्शनिर्माण करणारे हे राष्ट्रीय पुरस्कार आहेत. भारतसरकारने १९५४ पासून हे राष्ट्रीय पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली. १९७७ मध्ये मोरारजी देसाईंच्या नेतृत्वातील जनतापक्षाच्या सरकारने या पदव्या देण्याची प्रथा बंद केली होती. मात्र १९८० मध्ये इंदिरा गांधीच्या नेतृत्वातील कॉंग्रेस सरकारने पुन्हा हे पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली. त्यानंतर १९९३ ते १९९७ या काळात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याने हे पुरस्कार दिले गेले नाहीत. या सन्मान पुरस्कारामुळे समतेच्या तत्त्वास बाधा येत नसल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने हे राष्ट्रीय पुरस्कार देण्यास पुन्हा सुरुवात झाली आहे.

संविधानाच्या याच कलमात पदव्यांबाबत आणखी अंकुश ठेवण्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत. त्यानुसार भारताच्या कोणत्याही नागरिकाला राष्ट्रपतींच्या समतीशिवाय परकीय देशाकडून कोणतीही सन्मानाची पदवी स्वीकारता येणार नाही. तसेच राज्यात लाभाच्या किंवा विश्वस्ताच्या पदावर असलेल्या व्यक्तीला राष्ट्रपतींच्या परवानगी शिवाय कोणत्याही परकीय देशाकडून कोणत्याही प्रकारची पदवी, भेट, अथवा बक्षीस स्वीकारता येणार नाही.

२. **स्वातंत्र्याचा हक्क** (Right to freedom)_ कलम १९ ते २२

समता आणि स्वातंत्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समतेइतकेच किंबहुना जास्त महत्त्व स्वातंत्र्याच्या हक्कांना दिले जाते. भारतीय संविधानाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, 'स्वातंत्र्य समता, आणि बंधुत्व' ही तीन तत्त्वे वेगळी नाहीत. त्या तिघांचा मिळून एकच संच तयार होतो. ती परस्परांपासून वेगळी करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतू नष्ट होईल. श्री.एम.व्ही. पायली असे म्हणतात की, 'स्वातंत्र्याचा हक्क म्हणजे मूलभूत हक्कांचा ही मूलभूत आधार आहे.' भारताच्या संविधानामध्ये कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा हा हक्क देऊन त्यावर काही योग्य, वाजवी (Reasonable), बंधने, मर्यादा देखील घातलेल्या आहेत.

भारतीय संविधानाच्या कलम १९ ते २२ मध्ये भारतीय नागरिकांना दिलेला स्वातंत्र्याचा हक्क व त्यावरील मर्यादा यांची सविस्तर चर्चा पुढील प्रमाणे केली आहे.

**कलम १९**

भारतीय राज्यघटना अमलात आली त्यावेळी भारतीय नागरिकांना कलम १९ नुसार सात स्वातंत्र्याचे हक्क देण्यात आले होते. मात्र १९७८ च्या ४४ व्या घटनादुरूस्तीने कलम १९ (६) हा स्वातंत्र्याचा हक्क रद्द केला. त्यामुळे सध्या ६ स्वातंत्र्याचे हक्क आहेत. ते खालीलप्रमाणे

कलम १९ (१) – भाषण व अभिव्यक्तीचे (मतप्रदर्शनाचे) स्वातंत्र्य.

कलम १९ (२) – शांततापूर्वक व नि:शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.

कलम १९ (३) – संस्था व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

कलम १९ (४) – भारतीय प्रदेशात मुक्तपणे सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य.

कलम १९ (५) – भारताच्या कोणत्याही भागात तात्पुरते राहण्याचे वा कायम वास्तव्याचे स्वातंत्र्य.

कलम १९ (६) – संपत्ती मिळविण्याचा, धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य. (४४ व्या घटनादुरूस्तीने हे स्वातंत्र्य रद्द करण्यात आले असून ते कायदेशीर केले आहे.)

कलम १९ (७) – कोणताही व्यवसाय, रोजगार, व्यापार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य.

[टीप : कलम १९ (६) संपत्ती मिळविण्याचे, धारण करण्याचे व तिचा विनियोग करण्याचे (विल्हेवाट लावण्याचे) स्वातंत्र्य हा हक्क ४४ व्या घटनादुरूस्तीने काढून घेतला आहे व तो आता मूलभूत हक्क नाही. तो केवळ कायदेशीर हक्क राहिला आहे.]

संविधानाने कलम १९ नुसार भारताच्या सर्व नागरिकांना पुढील सहा स्वातंत्र्य दिलेली आहेत.

**१. भाषण व अभिव्यक्तीचे (मतप्रदर्शनाचे) स्वातंत्र्य**

(Freedom of speech & Expression)

भाषण व विचार अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा एक महत्त्वाचा हक्क आहे. संविधानाने भारतीय नागरिकाला भाषा आणि आपल्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. या हक्कांमुळे व्यक्तीला परस्परांशी विचारांची चर्चा करता येते व विचारांची देवाणघेवाण करता येते. लोकशाही शासन व्यवस्थेतील असे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेला व विकासाला पोषक ठरते. या अभिव्यक्ती स्वातंत्र्यात लेखन व मुद्रण स्वातंत्र्याचाही समावेश आहे. भारतीय नागरिक आपले विचार अभिव्यक्त (प्रकट) करू शकतो. त्यासाठी त्यांना लेखन व मुद्रण स्वातंत्र्य दिले आहे. या स्वातंत्र्य हक्कानुसार भारतीय नागरिकाला शासनाच्या ध्येय-धोरणांवर भाषण, लेखन व मुद्रण याद्वारे टीका देखील करता येते. मात्र समाज आणि देशहितासाठी नागरिकांच्या या हक्कावर काही बंधने घातलेली आहेत. ती पुढील प्रमाणे –

१. देशाचे अखंडत्व, सार्वभौमत्व, सुरक्षितता याला धोका पोहोचेल असे भाषण व लेखन करता येणार नाही.

२. राष्ट्रीय व सामाजिक सभ्यता, नीत्तीमत्ता यांना बाधा आणणारे वक्तव्य करता येणार नाही.

३. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला धक्का लागेल अशी निवेदने करता येणार नाहीत.

४. न्यायालयाची बदनामी किंवा अवमान होईल, असे भाषण करता येणार नाही.

५. भारताच्या परराष्ट्रांबरोबर असलेल्या तह, करार व मैत्रीसंबंध यावर विपरित परिणाम करणारे भाषण वा निवेदन करता येणार नाही.

६. कोणाची बदनामी, वा अवमान होईल किंवा गुन्ह्याला, हिंसेला प्रोत्साहन मिळेल असे भाषण, लेखन करता येणार नाही.

वरीलप्रमाणे नागरिकांच्या भाषण व विचार स्वातंत्र्यावर सरकार पाहिजे त्यावेळी बंधने घालू शकते. ही वाजवी निर्बंध, किंवा बंधने (Resonable Restriction) समजण्यात येतात.

**२. शांततापूर्वक व नि:शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य**

**(To Assemble Peaceably and without Arms)**

भारतीय नागरिकांना शांततापूर्वक व शस्त्र न बाळगता (नि:शस्त्र) आपल्या विचारांच्या प्रचार व प्रसारासाठी एकत्र जमण्याचा, सभा घेण्याचा हक्क आहे. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क सभा स्वातंत्र्य शिवाय पूर्णत्वाला येवू शकत नाही. कारण आपले विचार, मते इतरांपर्यंत पोहचविण्यासाठी, इतरांना पटवून देण्यासाठी, सभा घेणे, बैठका घेणे, संमेलने भरिवणे, मिरवणुका काढणे, मोर्चे काढणे आवश्यक असते. परंतु अशा सभा, मिरवणुका, मोर्चे इत्यादी शांततामय मार्गाने झाले पाहिजेत. अशा वेळी शस्त्र बाळगता येणार नाही. अशाप्रकारे शांततापूर्वक व नि:शस्त्र एकत्र जमण्याच्या स्वातंत्र्यामुळे लोकशाही प्रस्थापित होऊ शकते. मात्र सार्वजनिक हित व कायदा सुव्यवस्था, सार्वभौमत्व व राष्ट्रीय ऐक्य यांना धोका पोहोचणार नाही यादृष्टीने या स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा अधिकार शासनाला देण्यात आला आहे. परंतु ही बंधने योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार घटनेने सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे.

**३. संस्था व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य**

**(To Form Association or union)**

भारतीय, घटनेने नागरिकांना संस्था व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य (हक्क) दिलेले आहे. कामगार संघटना व्यापारी संघटना, व्यावसायिक संस्था व संघटना, भागीदारी संस्था, कंपनी, राजकीय संघटना (पक्ष), सांस्कृतिक संघटना, मंडळे, इत्यादींचा समावेश संस्था व संघटना मध्ये केला जाते. अशा संस्था व संघटना स्थापन करण्याचा अधिकार भारतीय नागरिकांना आहे. अशा संस्था व संघटना व्यक्तिविकास व समाजविकास या दृष्टिने फार उपयोगी ठरतात. परंतु अशा संस्था वा संघटनामुळे भारताचे सार्वभौमत्व, एकता, राष्ट्रीय हित, सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था, सुरक्षितता व नितिमत्ता धोक्यात येत असेल तर राज्य कायद्याने त्यावर योग्य ती बंधने घालू शकते.

## ४. भारतीय प्रदेशात मुक्तपणे सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य

### (To Move Freely throught out the Territory of India)

राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्याचे मुलभूत कार्य या स्वातंत्र्यातून घडते भारताचा नागरिक भारताच्या कोणत्याही भूप्रदेशात सर्वत्र मुक्तपणे संचार करू शकतो, फिरू शकतो. परंतु हा अधिकार अमर्याद स्वरूपात दिलेला नाही. शासन लोकहित, मागासलेल्या व वन्य जाति-जमातींच्या हिताचा विचार करून संचार स्वातंत्र्यावर काही बंधने (मर्यादा) घालू शकते.उदा. आदिवासी क्षेत्रात आदिवासी संस्कृती व त्यांचे व्यवसाय आणि अनुसूचित जमातीच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी या क्षेत्रात बाहेरच्या व्यक्तींच्या प्रवेशास शासन बंधने घालू शकते. ज्यामुळे या समूहांची फसवणूक वा पिळवणूक होणार नाही. सार्वजनिक स्वास्थ्य व आरोग्याच्या दृष्टिने संसर्गजन्य रोगाने पीडित (उदा. कोरोना) व्यक्तींच्या संचार स्वातंत्र्यावर योग्य व आवश्यक अशीच बंधने घातली पाहिजेत. अनावश्यक व अयोग्य बंधने घातल्याने नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात येत असेल तर न्यायालय अशी बंधने बेकायदेशीर (अवैद्य) ठरवू शकते.

## ५. भारताच्या कोणत्याही भागात तात्पुरते राहण्याचे वा कायम वास्तव्याचे स्वातंत्र्ये-

### (Right to Reside and settle in Any part of the Territory of India)

मुक्त संचार स्वातंत्र्यास पूरक असे हे स्वातंत्र्य आहे. कलम १९ (५) नुसार भारतीय नागरिकांना भारताच्या कोणत्याही भूप्रदेशात आपल्या इच्छेनुसार तात्पुरते राहाण्याचे (वास्तव्याचे) किंवा कायमस्वरूपी वास्तव्य करण्याचे, स्थायिक होण्याचे, स्वातंत्र्य दिले आहे. परंतु या हक्कांमुळे भारताची राष्ट्रीय एकात्मता टिकून राहण्यास मदत होते. परंतु या अधिकारावरही शासनाला बंधने घालता येतात. उदा. शासन जनहितासाठी आदिवासी भागात बाहेरच्या व्यक्तींना वास्तव्य करण्यास निर्बंध, प्रतिबंध घालू शकते. तसेच नागालँड, मिझोराम, वन्य जाती जमाती प्रदेशात बाहेरच्या व्यक्तीच्या वास्तव्यावर बंधने आहेत.

## ६. कोणताही व्यवसाय, रोजगार, व्यापार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य

### (Right to practice any Profession, or to carry any occupation, Trade or Business)

कलम १९ (६) या स्वातंत्र्यात व्यक्तीच्या उपजीविकेचा, व्यक्तीच्या आर्थिक विकासाचा, विचार केला आहे. त्यानुसार प्रत्येक भारतीय नागरिकांना त्यांच्या इच्छेनुसार कोणताही, पेशा व्यवसाय, रोजगार, व्यापार, उद्योग किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. परंतु या अधिकार स्वातंत्र्यावरही शासनाला नियंत्रण ठेवता येईल. विशिष्ट पेशा अथवा व्यवसायासाठी सरकारकडून काही पात्रतेसंबंधीच्या अटी घातल्या जातात. उदा. शिक्षक वा इंजिनिअर या पेशात येण्यासाठी व्यावसायीक किंवा तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता आहे. वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता संपादन करून डॉक्टर होता येते. पुढे नोंदणी, करून वैद्यकीय व्यवसाय सुरू करता येतो. कायद्याने कोणाही व्यक्तीला कोणताही छोटा-मोठा व्यावसाय नोंदणी करूनच सुरू करता येतो. शासनाला जनहिताच्या दृष्टिने एखाद्या व्यवसाय किंवा धंद्यावर नियंत्रण

ठेवून तो व्यवसाय किंवा धंदा पूर्णत: किंवा अंशत: स्वत:कडे चालविण्यासाठी घेता येतो. एखाद्या व्यवसाय, व्यापार किंवा धंद्यावर शासनाने घातलेले निर्बंध, मर्यादा योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार घटनेने सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे.

भारतीय नागरिकांना कलम १९ मध्ये स्वातंत्र्याचे जे सहा अधिकार दिले आहेत, त्यांच्या संरक्षणाची हमी कलम २०, २१ व २२ मध्ये देण्यात आली आहे.

**कलम – २० ते २२ – जीविताचा हक्क व व्यक्तिस्वातंत्र्याची हमी.**

भारतीय संविधानाने प्रामुख्याने, व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार केलेला आहे लॉर्ड ए.बी.डायसी यांच्या, 'कायद्याचे राज्य' (Rule of Law) या सिध्दांतानुसार नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण देण्याची हमी घटनेने दिली आहे.

**कलम २० अपराधाच्या दोषसिध्दींबाबत संरक्षण**

जोपर्यंत एखाद्या व्यक्ती विरूध्द गुन्हा वा अपराध सिध्द होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीच्या जीविताचा, प्रतिष्ठेचा हक्क सुरक्षित ठेवला जातो. कलम २० अन्वये गुन्हा वा अपराध करणाऱ्या व्यक्तीस अन्याय, शिक्षा देण्यास, प्रतिबंध केला आहे. या कलमातील तरतूदीखालीलप्रमाणे आहेत.

१) जोपर्यंत तत्कालीन प्रचलित कायद्यानुसार एखाद्या व्यक्ती वरील गुन्हा वा अपराध सिध्द होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला शिक्षा देता येणार नाही. तसेच तत्कालीन प्रचलित कायद्यात एखाद्या गुन्ह्यासाठी जी शिक्षा सांगितलेली आहे. त्यापेक्षा जास्त शिक्षा देता येणार नाही.

२) कोणाही व्यक्तीला एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळ शिक्षा देता येणार नाही.

३) एखाद्या गुन्ह्याबद्दल आरोप असलेल्या व्यक्तीवर स्वत: विरूध्द साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.

**कलम २१ जीवित वा व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण**

**(Protection of Life and Personal Liberty)**

कलम २१ नुसार कायद्याने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा हक्क असल्याचे मान्य केले आहे. सक्षम न्यायालयात गुन्हा वा अपराध सिध्द झाल्याशिवाय आणि कायद्याने प्रस्थापित केलेल्या कायदेशीर तरतुदींची पूर्तता झाल्याशिवाय व्यक्तीच्या जीविताचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क हिरावून घेता येणार नाही. विशेष म्हणजे हा हक्क भारतीय नागरिक आणि परकीय व्यक्तींनाही प्राप्त आहे. चुकीच्या पध्दतीने व्यक्तीच्या जिवीत्वाला आणि प्रतिष्ठेला धक्का लागू नये याची काळजी घटनेने घेतली आहे.

**कलम २१ (क) शिक्षणाचा हक्क (६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना)**

न्यायालयांनी वेगवेगळ्या खटल्यात कलम २१ मधील जीविताच्या हक्कातील 'जीवित' या शब्दाची व्याप्ती वाढवून केवळ जिवंत राहण्याचा नव्हे तर प्रतिष्ठा पूर्वक जगण्याचा हक्क असा अर्थ लावला आहे उदा. उन्नी कृष्णन खटल्यात (१९९३) सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ ची व्याप्ती आणखी वाढवून जगण्याच्या हक्कात शिक्षणाचा हक्क ही समाविष्ट केला. शिक्षणाशिवाय व्यक्ती माणूसपणाने जीवन जगूच शकत नाही. अशी भूमिका घेतली. शिक्षण हा मूलभूत हक्क असून तो प्रत्येक व्यक्तीला असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात सांगितले, मात्र उच्च शिक्षण/व्यावसायिक शिक्षण हा मूलभूत अधिकाराचा भाग नाही असेही सांगितले. त्यामुळे वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे या निर्णयाने अधोरखित झाले. त्यानंतर २००२ साली संसदेने ८६ वी घटनादुरूस्ती करून कलम २१ (क) ची तरतुद केली, व शिक्षणाचा हक्क हा मुलभूत अधिकार माणून कलम २१ (क) मध्ये समाविष्ट केला. या दुरूस्तीनुसार ६ ते १४ वयवर्षापर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क प्राप्त झाला. अनेक वर्षानी राज्यसंस्थेच्या मार्गदर्शक तत्वातील ४५ वे कलम मूलभूत हक्कात समाविष्ट झाले. १ एप्रिल २०१० पासून 'शिक्षण' या मूलभूत हक्कांची अमंलबजावणी सुरू झाली.

मुळात अगोदर संसदेने २००२ साली शिक्षण हक्कासंदर्भात घटनादुरूस्ती केली. त्यानंतर भारतसरकारने २००९ साली शालेयस्तरासाठी शिक्षण हक्क अधिनियम २००९ पारित (संमत) केला आणि त्यानुसार सर्वापर्यंत शिक्षण पोहोचण्याची दारे खुली झाली.

**कलम २२ अटक व प्रतिबंधक स्थानबध्दता यापासून संरक्षण :–**

कलम २२ मध्ये अटक व प्रतिबंधक स्थानबध्दता यापासून व्यक्तीला संरक्षण याबाबतच्या तरतूदी केल्या आहेत त्यानुसार –

१) एखाद्या व्यक्तीला अटक झाल्यास शक्य तितक्या लवकर अटकेची कारणे तिला कळविली जावीत तसेच त्या व्यक्तीला आपल्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा किंवा बचाव करण्याचा हक्क नाकारला जाणार नाही.

२) अटक केलेल्या व्यक्तीला अटक केल्याच्या जागेपासून जवळच्या न्यायाधीशाच्या कोर्टापर्यंत जायला लागणारा वेळ वगळून २४ तासाच्या आत आरोपी व्यक्तीला न्यायाधीशांच्या समोर हजर (उभा) केले पाहिजे. आणि न्यायाधीशांच्या हुकुमाखेरीज त्या व्यक्तीला अधिक काळ अटकेत ठेवता येणार नाही.

या तरतुदींमुळे व्यक्तिगत स्वातंत्र्य अबाधित राहू शकते. परंतु या हक्कांना पुढील दोन अपवाद सांगितलेले आहेत.

१) अटकेतील व्यक्ती परकीय शत्रू असेल, किंवा

२) जी व्यक्ती प्रतिबंधक स्थान बध्दतेच्या कायद्याखाली अटक झालेली असेल, अशाप्रसंगी त्या व्यक्तीला वरील हक्क मागता येणार नाहीत.

३) कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंधक स्थानबध्दता कायद्याखाली (Preventive Detention) अटक झाल्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ अटकेत, (कैदेत) ठेवता येणार नाही. परंतु सल्लागार मंडळाने शिफारस केल्यास तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ त्या व्यक्तीला अटकेत ठेवता येऊ शकते. एखादी व्यक्ती कायद्याचा भंग करेल, बेकायदेशीर विघातक कृती करेल अशी शासनाला शक्यता आढळून आल्यास त्या व्यक्तीस कोणतेही कारण न देता सरकारकडून अटक केली जाते. त्यास प्रतिबंधात्मक स्थानबध्दता (Preventive Detention) असे म्हणतात.

घटनेतील प्रतिबंधक स्थानबध्दता कायद्याची तरतूद ही व्यक्तीस्वातंत्र्याला मारक आहे. कारण कोणत्याही व्यक्तीला कोणतेही कारण न सांगता तीन महिन्यापर्यंत अटक करण्याचा अधिकार सरकारला मिळाला आहे. आणि योग्य अशा सल्लागार मंडळाने शिफारस केल्यास त्या व्यक्तीला तीन महिन्यापेक्षा जास्त काळासाठी अटकेत ठेवता येते. मात्र संसदेने कायद्याने जी कमाल मर्यादा ठरविली असेल त्यापेक्षा जास्त काळ त्या व्यक्तीला अटकेत (स्थानबध्दतेत) ठेवता येणार नाही.

देशाची अंतर्गत सुरक्षितता, संरक्षण, परराष्ट्रसंबंध, घटक राज्यांची सुरक्षितता इत्यादींकांना धोका निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधक स्थानबध्दतेच्या कायद्याची तरतूद घटनेत करण्यात आलेली आहे. प्रतिबंधक स्थानबध्दतेची तरतूद व्यक्ती स्वातंत्र्यावरील अत्यंत जाचक, मर्यादा म्हटली जाते. हुकूमशाही प्रवृत्तीची सरकारे या घटनात्मक तरतूदींचा फायदा होऊन आपल्या विरोधकांना अटक करून आपली सत्ता अधिकधिक निरंकुश बनवू शकतात. या कायद्यातील तरतूदी किती ही अनुचित वाटत असल्यातरी न्यायालयदेखील हा कायदा रद्द करू शकत नाही. प्रतिबंधक स्थानबध्दता कायदा राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी उपयुक्त असला तरी विशेत: विरोधी पक्षाच्या नेत्याला अटक करण्यासाठीच या कायद्याचा अधिक वापर झाल्याचे दिसून येते.

### ३. शोषणाविरूध्दचा किंवा पिळवणूकी विरूध्दचा हक्क

**(Rights Against Exploitation)** (कलम २३ ते २४)

**कलम २३ – माणसांची खरेदी विक्री आणि मनाई**

कलम २३ नुसार माणसांची खरेदी–विक्री आणि तसेच अन्य सक्तीच्या मजुरीचे प्रकार यांना प्रस्तुत हक्कांद्वारे मनाई करण्यात आलेली आहे. जो कोणी या गोष्टींचे उल्लंघन करेल त्यास कायद्याप्रमाणे शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कलमाचा न्यायालयाने व्यापक अर्थ लावून त्यात केवळ गुलामगिरी व व्यक्तीची खरेदी–विक्रीच नव्हे तर स्त्री दास्यत्वाचा व त्यांवर सक्तीने लादलेल्या वेश्या व्यवस्था यावर देखील बंदी घालण्यात आली आहे. म्हणजे कोणताही मोबदला न देता सक्तीने काम करून घेणे. माणसाला गुलाम बनवणाऱ्या या पध्दतीला घटनेत कायद्याने प्रतिबंध केला आहे. अर्थात शोषणाविरूध्दंचा हा हक्क नागरिकांना देण्यात आला असला तरी सार्वजनिक हिताच्या दृष्टिने सरकार लोकांकडून काही वेळा एखादे काम सक्तीने करून घेऊ शकेल. विशेषत: संकट काळात म्हणजे पूर निवारण अथवा परकीयांच्या

आक्रमणाच्या वेळी सरकार आपल्या नागरिकांकडून सक्तीने काम करून घेऊ शकेल. अशा वेळी सरकार धर्म, वंश, जात, वर्ग इत्यादींच्या आधारे कोणताही भेदभाव करणार नाही.

**कलम २४–** १४ वर्षाखालील मुलांना धोकादायक ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई.

## ५. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom of Religion)

**(कलम २५ ते कलम २७)**

भारतीय संविधानात कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काची तरतूद केली आहे.

कलम २५ नुसार, सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता, नीतिमत्ता इत्यादींना बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व व्यक्तींना आपल्या सद्सद्विवेक बृध्दीनुसार वागण्याचे समान हक्क आहेत. तसेच आपल्या आवडीच्या धर्माचा उच्चार, आचार आणि प्रचार करण्याचाही हक्क आहे.

अर्थात या हक्कावर दोन बंधने (मर्यादा) आहेत

१. सामाजिक कल्याणासाठी समाजसुधारणा संबंधीचे कायदे सरकारला करता येतील.

२. धार्मिक संस्था जर राजकीय, आर्थिक व इतर प्रकारची कार्ये करीत असेल तर धर्म संस्थांवर नियंत्रण घालण्याचा/ठेवण्याचा अधिकार सरकारला देण्यात आलेला आहे. हिंदू धर्मातील जाती भेद नष्ट करण्यासाठी, अनिष्ट प्रथा, परंपरा नष्ट करण्यासाठी आवश्यक त्या समाजसुधारणा करण्यासाठी सरकारला हिंदु धर्मावर बंधने घालता येतील. उदा. हिंदु धर्मातील पध्दती, देवदासी प्रथा, नरबळी अशा अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी सरकार कायदेशीर बंधने घालू शकते. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य नष्ट होत नाही. भारत सरकारने आलीकडेच मुस्लीम महिला (विवाह हक्क संरक्षण) अधिनियम २०१९ अन्वये बंद केला आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास कायदेशीर शिक्षेची तरतुद केली आहे. तसेच सरकार हिंदु धर्मातील सर्व जातींना व वर्गांना धार्मिक संस्था खुल्या ठेवण्याची सक्ती करू शकते. कृपाण बाळगणे हा शीख धर्माचा एक भाग आहे असे घटनेत स्पष्ट म्हटले आहे.

**कलम २६** नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता नीतिमत्ता व स्वास्थ्य (आरोग्य), इत्यादींना बाधक ठरणार नाही. अशा मर्यादा सांभाळून प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा पंथास पुढील अधिकार असतील.

१. धार्मिक व धर्मादाय संस्था स्थापन करून स्वखर्चाने चालविण्याचे स्वातंत्र्य

२. धर्मविषयक बाबतीत स्वत:चा कारभार पाहणे.

३. स्थावर व जंगम मालमत्तेची मालकी असणे व ती धारण (संपादन) करणे

४. तसेच कायद्यानुसार सदर संपत्तीचे प्रशासन करण्याचे अथवा कारभार पाहण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. थोडक्यात, धार्मिक संस्था स्थापन करण्याचा, त्याबाबत कारभार पाहण्यांचा त्याच्या खर्चासाठी संपत्ती, संपादन करण्याचा, ती बाळगण्याचा अधिकार प्रत्येक धार्मिक संप्रदायास (पंथास) असेल.

**कलम २७** नुसार, 'ज्या करांचे उत्पन्न एखाद्या विशष्ट धर्माच्या वा पंथाच्या प्रचारासाठी व रक्षणासाठी, संवर्धनासाठी खर्च होणार असेल तर असे कर सक्तीने वसूल केले जाऊ शकत नाहीत.' थोडक्यात, धार्मिक कारणांसाठी कोणत्याही व्यक्तीकडून सक्तीने कर घेता येणार नाही.

**कलम २८** नुसार पूर्णतः शासनाच्या आर्थिक साहाय्यावर (अनुदानावार) चालणाऱ्या कोणत्याही शेक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण देता येणार नाही. परंतु शासन अशा संस्थांच्या आर्थिक बाजूंचे नियंत्रण करू शकते. अशासकीय शिक्षण संस्थातून धार्मिक शिक्षण देण्यास हरकत नाही. परंतु असे शिक्षण घेण्याची सक्ती कोणाही विद्यार्थ्यांवर करता येणार नाही. धार्मिक शिक्षण देण्याच्या हेतुनेच एखाद्या धर्मदाय संस्थेला दिलेल्या देणगीमधून वा विश्वस्त निधीतून चालणाऱ्या धर्मदाय संस्थेतून धार्मिक शिक्षण देता येईल. परंतु तेथे देखील पूजापाठ, प्रार्थना, विशिष्ट धर्माचे विधी करण्यासाठी विद्यार्थ्यांवर सक्ती केली जाऊ शकत नाही.

५. **सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क** (Cultural and Educational Rights) कलम २९ व ३०

भारताच्या संविधानातील हे हक्क अल्पसंख्यांकांना आपले सांस्कृतिक आणि शैक्षणिक हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. घटनेच्या कलम २९ व ३० या दोन कलमांतून हे हक्क देण्यात आले आहेत.

कलम २९ नुसार ''भारताच्या कोणत्याही प्रदेशात वा भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक समूहास जर स्वतःची विशिष्ट भाषा, लिपी वा संस्कृती असेल तर ती जतन करण्याचा, अबाधितराखण्याचा त्यासमूहास हक्क असेल.'' तसेच राज्याच्या खर्चातून अथवा सरकारी निधीच्या मदतीने चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थेत धर्म, वंश, जात, भाषा या कारणांवरून प्रवेश नाकारला जाणार नाही. परंतु जर एखाद्या शिक्षण संस्थेने लिंग, जन्मस्थान या कारणांवरून प्रदेश नाकारला तर तो मात्र या अधिकाराचा भंग अथवा उल्लंघन होत नसल्याचा निर्णय मद्रासाच्या उच्च न्यायालयाने मद्रास विद्यापीठ विरूध्द शांताबाई या खटल्यात दिला होता.

**कलम ३० नुसार**

धार्मिक किंवा भाषिक अल्संख्यांक समूहास आपल्या पसंतीप्रमाणे स्वतःच्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व त्या चालविण्याचा हक्क आहे. अशा संस्थांना आर्थिक साहाय्य करताना धर्म आणि भाषेच्या आधारे शासनास भेदभाव करता येणार नाही. केवळ एखादी शिक्षणसंस्था धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांक गटाकडून चालविली जाते म्हणून त्यांची सरकारी आर्थिक मदत थांबविता येणार नाही. अल्पसंख्याकांना स्वतःचे वेगळेपण टिकवून ठेवता यावे, स्वतःची संस्कृती टिकवून ठेवता यावी, त्यांच्यावर इतरांची संस्कृती आणि भाषिक अल्पसंख्याकांना हे हक्क दिले आहेत.

[संपत्तीचा/ मालमत्तेच्या मूलभूत हक्काची तरतूद संविधानाच्या कलम ३१मध्ये करण्यात आली होती. परंतु १९७८ च्या ४४ व्या घटनादुरूस्तीने ते कलम रद्द करण्यात आले आहे. या हक्काचे स्वरूप आता एक

कायदेशीर हक्क इतकेच मर्यादित आहे. त्यानुसार कोणाही व्यक्तीची मालमत्ता कायद्याच्या संमतीशिवाय हिरावून घेतली जाऊ नये अशी तरतूद घटनेच्या कलम ३०० (अ) मध्ये करण्यात आली आहे. ]

**६) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (Right to constitutional Remedies) कलम ३२ ते ३५**

भारतीय नागरिकांना मूलभूत हक्कांच्या संरक्षणाचा उपाय म्हणून या हक्कांकडे पाहता येते. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क किंवा सनदशीर इलाजाचा हक्क हा न्यायालयात दाद मागण्याचा हक्क आहे. भारतीय नागरिकांना वरील सर्व हक्क (कलम १४ ते ३०) उपभोगण्यासाठी त्या हक्कांना घटनात्मक संरक्षण देणे अत्यंत आवश्यक होते म्हणून राज्यघटनाकारांनी नागरिकांसाठी आपल्यावर झालेल्या अन्याविरूध्द न्यायालयात दाद मागता यावी यासाठी हा मूलभूत हक्क दिला आहे. नागरिकांना मिळालेल्या हक्कांचे संरक्षण केले जात नसेल व त्यांच्या हक्कांवर कोणाकडून ही अतिक्रमण झाल्यास, अतिक्रमण करणाऱ्याला प्रतिबंध अथवा मनाई करण्यात येत नसेल, तर त्याला मिळालेल्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी संविधानाने न्यायमंडळावर सोपविली आहे. त्यानुसार एखाद्या नागरिकांच्या मूलभूत हक्काचे कोणाकडून उल्लंघन, भंग झाल्यास अथवा त्याच्या हक्कांवर कोणाकडून अतिक्रमण झाल्यास संबंधित नागरिक/ व्यक्ती कलम ३२ अन्वये सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतात. कलम ३२ बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''कलम ३२ मधील हक्क म्हणजे भारतीय संविधानाचा प्राण आहे. मूलभूत हक्कांना संरक्षण दिले नाही तर ती मूल्यहीन व अर्थहीन ठरतील. या कलमाशिवाय घटना निरर्थक आहे.'' यावरून कलम ३२ चे महत्त्व अधोरेखित होते.

कलम ३२ नुसार मूलभूत हक्कांचे उल्लंघन वा भंग झाल्यास भारतातील कोणताही नागरिक उचित कार्यवाहीद्वरे सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो. या प्रक्रियेला रिट याचिका (Writ Petition) असे म्हणतात. रिट याचिकनुसार सर्वोच्च न्यायालय (कलम ३२) किंवा उच्च न्यायालय (कलम २२६) जो आदेश देते, त्यास 'रिटस्' निर्देश किंवा प्राधिलेख असे म्हणतात. मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी व्यक्ती जेव्हा न्यायालयाकडे अर्ज करते, दाद मागते तेव्हा न्यायालयाला पुढील पाच प्रकारचे आदेश देऊ शकते.

१. बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus)

२. परमादेश (Mandamus)

३. प्रतिषेध (Prohibition)

४. अधिकार-पृच्छा ( Quo-Wrranto)

५. उत्प्रेषण (Cerriorari)

### १) **बंदी प्रत्यक्षीकरण** (Habeas Corpus)

एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीररित्या अटक करून बंदी केले असेल तेंव्हा हा बंदी प्रत्यक्षीकरणाचा घटनात्मक अर्ज न्यायालयाकडे करता येतो. हा अर्ज अटकेत असलेल्या व्यक्तीला स्वत: किंवा तिच्या मित्राला किंवा नातलगाला न्यायालयाकडे करता येतो. असा अर्ज न्यायालयात दाखल झाल्यानंतर न्यायालय अटक झालेल्या व्यक्तीला कोणत्या कारणास्तव अटक केलेली आहे व त्याच बरोबर त्या व्यक्तीला न्यायालयासमोर उभे करण्यात यावे असा आदेश देते. न्यायालयाकडून हा आदेश अटक करून ठेवणाऱ्या व्यक्ती विरूध्द (पोलिसांना) किंवा शासनाला दिला जातो. दोन्ही बाजूंच्या युक्तीवादानंतर जर त्या व्यक्तीला बेकायदेशीररीत्या अटक करून बंदी करण्यात आले आहे असे न्यायालयात सिध्द झाले, तर त्या निरपराध व्यक्तीला मुक्त करण्याचा ओदश न्यायालय पोलिसांना अथवा शासनाला देते.

'Habeas Corpus' (हेलियस कॉर्पस) या लॅटिन शब्दाचा अर्थ, 'शरीराने उपस्थित राहणे' असा आहे. अटक करून बंदी केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करणे व त्याच्या अटकेची कारणे देणे बंधनकारक आहे. याबाबत न्यायालय पोलिसांना विचारणा करते. अटकेचे योग्य कारण न दिल्यास बेकायदेशीर अटक केलेल्या व्यक्तीस बंदी मुक्त करण्याचा आदेश न्यायालय देते. या आदेशाचा हेतू अटकेतील व्यक्तीची जलद आणि तत्काळ सुटका व्हावी हा असतो. थोडक्यात, बंदी प्रत्यक्षीकरणाच्या तरतुदीमुळे सरकारला मनमानीपणे कोणत्याही व्यक्तीस बेकायदेशीररित्या अटक करून ठेवत येत नाही.

### २. **परमादेश (Mandamus)**

ज्या व्यक्तीला आपल्यावर अन्याय झाला असे वाटते, त्या व्यक्तीने उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे 'परमादेश' चा अर्ज करायचा असतो.

एखादी व्यक्ती किंवा सरकार वा सरकारी अधिकारी किंवा एखादी संस्था आपल्या कर्तव्याचे योग्य पालन करीत नसेल आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल किंवा मूलभूत हक्कावर आक्रमण होत असेल तर ती व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करते. न्यायालय या अर्जाच्या आधारे त्या संस्थेला किंवा सरकारला अथवा सरकारी अधिकाऱ्याला आपले कर्तव्य योग्यरित्या पारपाडण्याचे व संबंधित व्यक्तीवरील अन्याय तत्काळ नाहीसा करावा असा आदेश संबंधित संस्था किंवा शासन किंवा शासकीय आधिकाऱ्याला देतो असा हा अन्यायाचे परिमार्जन करणारा परमादेशाचा अर्ज असतो. यालाच परमादेश असे म्हणतात. Mandamus हा लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ 'आम्ही आज्ञा देतो' (I Command, Do This) असा आहे.

### ३. **प्रतिषेध (Prohibition)** : प्रतिषेध म्हणजे प्रतिबंध मनाई

एखादा खटला कनिष्ठ न्यायालापुढे चालविला जात असेल व तो खटला कायदेशीररित्या त्या न्यायालयापुढे चालविणे त्या न्यायालयाच्या अधिकारात नाही असे वाटल्यास संबंधित व्यक्ती त्या खटल्याची सुनावणी (कामकाज) थांबविण्याविषयी उच्च न्यायालयाकडे अर्ज करू शकतो. हा अर्ज मंजूर झाल्यास वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयातील संबंधित खटल्याची सुनावणी ताबडतोब बंद करण्याचा आदेश देऊ

शकते. यालाच प्रतिषेध आदेश असे म्हणतात. वरिष्ठ न्यायालयाचा हा आदेश कनिष्ठ न्यायालयाला पाळावा लागतो. साधारणत: कनिष्ठ न्यायालयांनी आपल्या अधिकार क्षेत्रापुरतेच कार्य करावे हा उद्देश प्रतिषेधाचा असतो.

सार्वजनिक कामासाठी खासगी मालमत्ता द्यावी लागल्यास किंवा शासनाचे निर्णय अमान्य असल्यास प्रतिषेध (प्रतिबंध, मनाई) या याचिकेचा वापर केला जातो. प्रतिषेध आदेशाने वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास शासनाच्या कृतीस प्रतिबंद, किंवा मनाई करते. आपण अनेकदा शासनाच्या अमुक एखाद्या निर्णयाविरूध्द कोर्टातून मनाई मिळविली असे ऐकतो ते याच याचिकेद्वारे अशी मनाई तात्पुरती किंवा कायम स्वरूपी असू शकते. काहीवेळा शासनातील नोकरभरती, पदोन्नती, बांधकामे, विविध योजना राबविताना काही व्यक्तींच्या मूलभूत हक्कांवर गदा येते तेंव्हा रिट याचिका (Writ Petition) संबंधित व्यक्तींकडून न्यायालयात दाखल केली जाते. तेंव्हा न्यायालय मनाई आदेश देते आणि 'Status-co' (जैसे थे परिस्थिती) ने ही प्रक्रियाच थांबते.

## ४. अधिकार पृच्छा (Quo – Warranto)

पृच्छा म्हणजे विचारणे. एखादी व्यक्ती बेकायदेशीरपणे शासकीय किंवा सार्वजनिक पदावर अधिकार नसताना ते पद धारण करत असेल तर त्याविरूध्द अधिकारपृच्छा याचिका न्यायालयात दाखल करता येते. अशा वेळी अर्जदार व्यक्तीचा त्या पदाशी हितसंबंध असला पाहिजे. तिच्या अंगी ते पद धारण करण्याची पात्रता, योग्यता असला पाहिजे आणि ते पद कायमस्वरूपी असून ते पद धारण करणाऱ्या व्यक्तीला कोणाच्याही इच्छेनुसार काढून टाकता येत नाही अशी स्थिती असली पाहिजे. अशावेळी संबंधित याचिका कर्त्यांचा तक्रार अर्ज मंजूर करून ती व्यक्ती त्या पदाला अपात्र आहे असे दिसून आले तर न्यायालय त्या व्यक्तीस अधिकार पृच्छा करते. ''आपण कोणत्या कायद्यानुसार अधिकारपदावर आहात?'' अशी विचारणा न्यायालय त्या व्यक्तीला करते. संबंधित व्यक्तीने बेकायदेशीररीत्या ते पद बळकाविले असल्यास त्याला न्यायालयाच्या आदेशानुसार ते पद सोडावे लागते. मात्र खाजगी कार्यालयातील किंवा खासगी संस्थातील पदे यांच्या बाबतीत अधिकार पृच्छेचा अर्ज करता येत नाही. न्यायाधीश, विधिमंडळाचा सभापती, मंत्री, स्थानिक स्वराज्य संस्थातील अधिकारी, शासकीय सेवेतील अधिकारी आदींच्या बाबतीत अधिकार पृच्छेचा अर्ज न्यायालयात दाखल करता येतो. अर्थात, सर्वोच्च किंवा उच्च न्यायालय अशा अर्जाच्या बाबतीत संपूर्ण चौकशी करूनच आदेश काढू शकते.

## ५. उत्प्रेषण (Certiorar)

'उत्प्रेषण या रिट याचिकेस 'प्राकर्षण' असेही म्हणतात. कनिष्ठ न्यायालयात चालू असलेला एखादा खटला त्याच्या अधिकार क्षेत्राबाहेरचा असताना देखील तो चालविला जात आहे, या कारणास्तव तो वरिष्ठ न्यायालयात चालविला जावा, अशा प्रकारचा उत्प्रेषण अर्ज वरिष्ठ न्यायालयात चालविला जावा, अशा प्रकारचा उत्प्रेषण अर्ज वरिष्ठ न्यायालयाकडे करता येतो. वरिष्ठ न्यायालयाने तो अर्ज मंजूर केल्यास ते न्यायालय कनिष्ठ न्यायालयातील संबंधित खटल्याची सुनावणी बंद करून त्या खटल्याची संबंधित सर्व

कागदपत्रे, पुरावे वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवून द्यावीत असा आदेश देते. त्यास उत्प्रेषण असे म्हणतात. असा आदेश मिळाल्यानंतर कनिष्ठ न्यायालय संबंधित खटल्याची सर्व कागदपत्रे, पुरावे वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवून देते. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेल्या कागदपत्रांच्या व पुराव्यांच्या आधारे वरिष्ठ न्यायालय त्या खटल्याचा निर्णय देऊ शकते. साधारणत: कनिष्ठ न्यायालय एखादा खटला चालविण्यास असमर्थ आहे असे आढळून आले तर न्यायदानाचे कार्य जलद व योग्य न्याय मार्गाने व्हावे या हेतूने वरिष्ठ न्यायालय उत्प्रेषणाचा आदेश काढू शकते.

प्रतिषेध व उत्प्रेषण या दोन आदेशातील फरक असा की, प्रतिषेध हा प्राथमिक स्वरूपात कनिष्ठ न्यायालयाला एखाद्या खटल्याच्या संबंधी कोणतीही कृती करू नये असा असणारा न्यायालयाचा आदेश, तर उत्प्रेषण हा कनिष्ठ न्यायालयाकडून खटल्याची सर्व कागदपत्रे, पुरावे काढून घेऊन वरिष्ठ न्यायालयाकडे पाठविण्याबाबत आणि निर्णय घेण्याबाबत आदेश देणारा न्यायालयीन निर्देश होय.

अशाप्रकारे नागरिकांना आपल्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी वरील पाच प्रकारच्या घटनात्मक उपायांचा आधार घेता येतो. कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांच्या कडून नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण करणारे, अन्याय करणारे कायदे केले असतील, तर नागरिकांना कलम ३२ असल्याचा उल्लेख करतात. डॉ. आंबेडकर म्हणतात, ''घटनात्मक उपाययोजनेचा हक्क हा भारतीय संविधानाचा आत्मा व हृदय आहे.'' यावरून नागरिकांनाच्या जीवनातील कलम ३२ चे महत्त्व अधोरखित होते.

भारतीय संविधानातील ३३, ३४ व ३५ या कलमातील तरतूदी नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत उपवाद समजल्या जातात.

**कलम– ३३ – सैन्य दलातील (संरक्षक दल) व्यक्तींच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध**

कलम ३३ नुसार सैन्यदलातील सशस्त्र सेनादल, निमलष्करी सेनादल, पोलिसदल, गुप्तचर यंत्रणा व त्यांच्या साहय्यक स्टाफमधील विविध सेवा देणारे सदस्य (उदा. क्लर्क, शिपाई, स्वंयपाकी, चौकीदार इ.) यांचे मूलभूत हक्क मर्यादित करण्यात आले आहेत. या घटकांचे हक्क मर्यादित करण्याचा उद्देश यांचेकडून योग्य प्रकारे कर्तव्य आणि शिस्तीचे पालन व्हावे हा आहे. यांच्या हक्कांबाबत कायदेकारण्याचा, फेरबदल करण्याचा अधिकार सर्वस्वी केवळ संसदेला आहे. संसदेने लष्कर कायदा (१९५०), सीमा सुरक्षा दल कायदा (१९६८), पोलिसदल कायदा (१९६६) व यासारखे अन्य ही कायदे केले आहेत. अशा कायद्यांमुळे संरक्षक दलातील सदस्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापन, वृत्तपत्र संपर्क, सभा, संमेलने व निदर्शने, यासारख्या मूलभूत हक्कांवर मर्यादा आल्या आहेत. थोडक्यात, संरक्षक दलांचे सदस्य व या अनुषंगिक दलांचे सदस्य यांच्या मूलभूत हक्कांवर संसद आवध्यकते निर्बंध (मर्यादा) घालू शकते.

**कलम ३४ – लष्करी राजवट क्षेत्रात मूलभूत हक्कांवर निर्बंध**

भारताच्या कोणत्याही भूक्षेत्रात लष्करी कायदा (मार्शल लॉ) म्हणजेच लष्करी राजवट लागू झाल्यास कलम ३४ नुसार संसदेला आणि लष्करी अधिकाऱ्यांना असामान्य अधिकार प्राप्त होतात. परिणामी लष्करी

कायद्याचा अंमल बसलेल्या (क्षेत्रात) कायदा. सुव्यवस्था राहण्यासाठी संसद नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध आणि नियंत्रण घालते. याकाळात त्या भागातील नागरिकांना मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले म्हणून त्यांचे संरक्षणसाठी न्यायालयात दाद मागता येत नाही. लष्करी राजवट संपुष्टात आल्यावर नागरिकांना पुर्णवत मूलभूत हक्क उपभोगता येतात.

**कलम ३५ – संसदेला मूलभूत हक्कांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी कायदे करण्याचा अधिकार**

कलम ३५ अन्वये काही मूलभूत हक्कांची परिणामकारक अमंलबजावणी व्हावी यादृष्टीने कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे. असा अधिकार राज्याच्या विधानमंडळास नाही तो केवळ संसदेला असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे मूलभूत हक्कांचे स्वरूप व उल्लंघनाबदलच्या गुन्हा संदर्भात शिक्षा करण्यासंबंधीचे कायदे देखील संसदच करेल, ते राज्यांच्या विधिमंडळांना करता येणार नाहीत असे कलम ३५ मध्ये स्पष्ट केले आहे.

अशाप्रकारे भारतीय संविधानाच्या भाग तीन मधील मूलभूत हक्क या अंतर्गत कलम १२ ते ३५ मधील तरतुदींची सविस्तर मांडणी वरीलप्रमाणे करण्यात आली आहे.

**मुलभूत हक्कांचे टीकात्मक परीक्षण**

भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १४ ते ३५ मध्ये मूलभूत हक्क देऊन नागरीकांचे व्यक्तिस्वातंत्र्य जोपासण्याचा व विकसित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. घटनेने दिलेले मूलभूत हक्क नारिकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी व लोकशाही यशस्वीरित्या प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक व उपयुक्त आहेत. परंतु मूलभूत हक्कांवर घालण्यात आलेली बंधने, मर्यादा, अटी पाहाता घटनेने एका बाजूने नागरिकांना मूलभूत हक्क देऊन दुसऱ्या बाजूने बंधने, मर्यादा, अटी घालून ते काढून घेतल्याचे दिसून येतात. या अनुषंगाने भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांवर पुढीलप्रमाणे आक्षेप घेतले जातात किंवा टीका केली जाते.

१. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क अपुरे आहेत असा आक्षेप घेतला जातो. नागरिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या गेलेल्या हक्कांचा समावेश घटनेच्या मूलभूत हक्कांत केलेला नाही. जसे काम मिळविण्याचा हक्क, उपजीविकेचा हक्क, शिक्षणाचा हक्क, हे व्यक्तीच्या जीवितासंबंधीचे हक्क आहेत. त्यांचा घटनेत समावेश केला नाही. तसेच बेरोजगारी, वृध्दपकाळ, आजरपण, अपगत्व किंवा विकलांगत्व अशा कठीण परिस्थितीत नागरिकांना मदत मिळविण्याच्या हक्कांचा घटनेच्या मूलभूत हक्कांत करणे आवश्यक होते. परंतु देशाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता हे हक्क नागरिकांना देणे शासनाला अशक्य आहे. उदा. सर्वांना प्राथमिक ते उच्चशिक्षण (KG to PG) मोफत देणे, तसेच सर्व नागरिकांना कामधंदा मिळवून देणे. यासारख्या जबाबदऱ्या भारत सरकारला पार पाडता येण्यासारखी परिस्थिती नाही. म्हणूनच असा हक्कांचा समावेश मूलभूत हक्कात न करता, राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांत त्यांचा काही प्रमाणात समावेश करण्यात आले आहे.

२. दुसरी टीका अशी केली जाते की, एका हाताने हक्क दिले आणि दुसऱ्या हाताने ते काढून घेतले. घटनेने एका बाजूने हक्क दिले परंतु प्रत्येक हक्काला अनेक अपवाद सांगून त्यावर घटनेनेच विविध प्रकारचे निर्बंध, मर्यादा व बंधने घातले आहेत. उदा. घटनेने नागरिकांना मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपाययोजनेचा (न्यायालयात दाद मागणचा) हक्क दिला आहे. परंतु आणीबाणीच्या किंवा लष्करी राजवटीच्या काळात त्यावर अनेक निर्बंध व मर्यादा घालून ते काढून घेतले आहे. याशिवाय प्रतिबंधक स्थानबध्दतेचा कायदा, अतंर्गत सुरक्षा कायदा, मिसा, पोटा. यासारखेच कायदे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा संकोच करताना दिसतात. वास्ताविक नागरिकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने मूलभूत हक्क दिलेले आहेत. परंतु मूलभूत हक्कांवर एवढी बंधने, अटी व मर्यादा घातलेल्या आहेत की, त्यामुळे हक्काचे स्वरूपच पूर्ण बदलून गेले आहे. म्हणून मूलभूत हक्कांवरील मर्यादा विचारात घेता एम.व्ही. पायली यांनी मूलभूत हक्काच्या प्रकरणाला 'मूलभूत हक्कांवरील मर्यादा' असे शीर्षक देणे अधिक योग्य ठरेल असे म्हटले आहे.

३. मूलभूत हक्कांवर होणारा तिसरा आक्षेप असा की, आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क स्थगित होतात. त्यांचा मोठ्या प्रमाणात संक्षेप वा भंग होतो. तसेच त्यांच्या संरक्षणासंबंधी घटनात्मक उपाययोजनेचा अर्थात न्यायालयात दाद मागण्याची व्यक्तीचा हक्क देखील रद्द होतो. आणीबाणीच्या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा एवढा संकोच होतो की, व्यक्तीस्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट होते. आणीबाणीच्या काळात शासनाला इतके अमर्याद अधिकार प्राप्त होतात की, लोकशाही देखील धोक्यात येऊ शकते. पाशवी बहुमतातील सत्तारूढ पक्ष हुकुमशाही वृत्तीने वागून आणीबाणीच्या तरतूदींचा गैरवापर करून नागरिकांचे हक्क आणि स्वातंत्र्य धोक्यात आणू शकतो. उदा. १९७५ साली इंदिरा गांधीच्या नेतृत्वातील कॉंग्रेस पक्षाने लादलेली आणीबाणी. घटनेतील आणीबाणीच्या तरतूदींवर वरीलप्रमाणे टीका होत असली तरी घटना निर्माण होत असताना जी परिस्थिती भोवताली उद्भवली होती ती पाहाता राज्यघटनेत आणीबाणीची तरतूद स्वीकारताना घटनाकारांनी पूर्ण विचारांनी निर्णय घेतलेला आहे असे म्हणता येईल. कारण राष्ट्राचे सार्वभौमत्व सुरक्षित ठेवण्यासाठी, अंतर्गत सुरक्षिततेसाठी राष्ट्रहिताचा विचार करून घटनाकारांनी आणीबाणीची तरतूद स्वीकारली आहे. तरीपण या होणाऱ्या टीकेच्या अनुषंगाने विचार करता घटनाकारांनी ज्या परिस्थितीत देशाची फाळणी, धार्मिक दंगली, चळवळी इ. घटना तयार केली ती प्रतिबंधक स्थानबध्दतेची तरतूद असो अथवा आणीबाणीत मूलभूत हक्कांचा संक्षेप वा भंग करण्याची तरतूद योग्य, रास्त असली तरी, आज बदलेल्या परिस्थितीत या तरतूदी घटनेत तशाच ठेवण्याची काहीच गरज नाही. कारण त्या तरतूदींचा गैरउपयोग सत्ताधीश राज्यकर्ते करू शकतात. आणि हे इतिहासाने सिद्ध (उदा. १९७५ ची आणीबाणी) केले आहे. तेंव्हा घटनेतील या तरतूदींचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे असे अनेक न्यायपंडितांना, कायदेपंडितांना वाटते.

४. चौथा आक्षेप असा की, संसदेला मूलभूत हक्कांसह घटनेच्या कोणत्या ही कलमात बदल करण्याचा मिळालेल्या अमर्याद अधिकारामुळे नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य संपुष्टात येऊ शकतात. सर्वोच्च

न्यायालयाने केशवानंद भारती खटल्याचा (१९७३) निर्णय देताना असे म्हटले की, संविधानाच्या ३६८ व्या कलमानुसार संसदेला मूलभूत हक्कांच्या संदर्भात घटनेच्या कोणत्याही कलमात बदल करण्याचा अधिकार आहे. परंतु राज्यघटनेच्या मुलभूत स्वरूपात, चौकटीत (Basic Structure) बदल करण्याचा किंवा ती नाहीशी करण्याचा अधिकार नाही. भारतीय घटनेच्या मूलभूत चौकटीत भारतीय संघराज्याचे स्वरूप, कायद्याचे राज्य, न्यायालयाचे स्वातंत्र्य, स्वातंत्र्याचा हक्क, बेकायदेशीररित्या अटक करण्यास मनाई, भाषण, लेखन, वृत्तपत्र स्वातंत्र्य अशी स्वातंत्र्ये नाहीशी करण्याचा अधिकार संसदेला असणार नाही. परंतु संसदेने १९७६ साली ४२ वी घटनादुरूस्ती केशवानंद भारती खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द ठरविला आणि संसदेला घटनादुरूस्ती करण्याचा संपूर्ण आणि अमर्याद अधिकार देण्यात आला. ४२ व्या घटनादुरूस्तीने ३६८ व्या कलमात चौथे आणि पाचवे उपकलम समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे संसदेने केलेली एखादी घटनादुरुस्ती मुलभूत हक्कांच्या बाबतीत कितीही घातक असली तरी ती बेकायदेशीर असल्याचा निर्णय न्यायालय देऊ शकणार नाही. कलम ३२ नुसार मूलभूत हक्कावरील आक्रमणाबाबत नागरिकांना सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा जो हक्क देण्यात आला आहे तो ४२ व्या घटनादुरूस्तीने हिरावून घेतला आहे. यासंदर्भात प्रसिध्द कायदेपंडित पालखीवाला यांनी असे म्हटले आहे की, ''राज्यघटनेच्या शिल्पकारांनी मूलभूत हक्कांचे महत्त्व ओळखून त्या आधारे संगमरवरी शिल्प उभारले होते. मात्र ४२ व्या घटनादुरूस्तीने त्या संगमरवरी शिल्पाचे रूपांतर तांबड्या विटांच्या शिल्पात केलेले आहे.'' थोडक्यात, ४२ व्या दुरूस्तीने ससंदेला अमर्याद अधिकार दिल्याने सत्ताकर्ते मूलभूत हक्कात मोठा फेरबदल करून नागरिकांचे हक्क धोक्यात आणण्याची शक्यता आहे.

५. पाचवा आक्षेप असा की, मूलभूत हक्क हे व्यक्तीवादी व जैसे-थे वादी आहेत. घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जे समाजवादी समाजरचनेचे ध्येय राज्यकर्त्यांसमोर ठेवले आहे, त्या ध्येयांपर्यंत जाण्याच्या मार्गात मूलभूत हक्क आडसर ठरतात. काही टीकाकार मूलभूत हक्क हे वैयक्तिक असून मार्गदर्शक तत्त्वे ही सार्वजनिक असल्याचे गृहीत धरून मूलभूत हक्कांच्या समर्थकांना भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते ठरवून टीका करतात.

६. मूलभूत हक्कावरील सहावी टीका अशी की, कलम ३२ अन्वये मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासंबंधी घटनेत तरतूद असली तरी त्यासंबंधी न्यायालयाकडे दाद मागणे ही अतिशय खर्चिक बाब आहे. त्यामुळे केवळ मूठभर श्रीमंत वर्गालाच या तरतूदींचा लाभ घेता येतो.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे भारतीय राज्यघटनेतील प्रकरण तीन मध्ये भारतीय नागरिकंना दिलेल्या मूलभूत हक्कांवर आक्षेप घेतले जातात अथवा टीका होताना दिसत आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना हक्क आणि स्वातंत्र्य देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास कसा होईल यादृष्टिने अनेक महत्त्वाच्या घटनात्मक तरतूदी केलेल्या आहेत. परंतु या हक्कांवर इतक्या अटी, निर्बंध आणि अपवाद लादण्यात आलेले आहेत की, नागरिकांना खऱ्या अर्थाने मूलभूत हक्कांचा उपभोग घेता येत नाही. अशी मूलभूत हक्कांवर टीका होत आहे. त्याचप्रमाणे आजपर्यंत भारतीय संविधानात करण्यात आलेल्या विविध घटनादुरूस्त्या आणि

तरतूदी पाहता नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांचे संक्षपीकरण झाले आहे असे म्हणता येईल. नागरिकांच्या हक्क व स्वातंत्र्यावर किती बंधने असावीत याला ही मर्यादा असावी लागते. परंतु व्यक्तींना अनिर्बंध स्वातंत्र्य ही असून चालणार नाही. कारण अनिर्बंध, अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्य असणे लोकशाहीला घातक असते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार, अनिर्बंध वर्तन या भावनेने समाजात लोक वागू लागले तर व्यक्ती व समाज या दोघांच्याही विकासाला खिळ बसेल. तेंव्हा व्यक्तीच्या हक्क व स्वातंत्र्यावर मर्यादित स्वरूपाची नियंत्रणे, बंधने असणे आवश्यक ठरतात. अशी बंधने व्यक्ती व समाज यांच्या विकासाला पोषक ठरतात. अर्थात, व्यक्तीच्या हक्क व स्वातंत्र्यावर विशिष्ट परिस्थितीत गरजेनुसार काही प्रमाणात मर्यादा घालणे आवश्यक असले तरी संसदेला अमर्याद अधिकार देऊन नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हिरावून घेता येणार नाहीत. आणि तसा प्रयत्न झालाच तर नागरिकांच्या हक्कांना सर्वोच्च न्यायालय घटनात्मक संरक्षण देऊ शकेल अशी तरतूद करणे आवश्यक ठरते. तेंव्हाच भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीय नागरिकांना समान प्रमाणात मूलभूत हक्क उपभोगण्याची दिलेली हमी शाश्वत ठरेल.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–१**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय संविधानात कलम ............ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केलेली आहे.

अ) १२ ते ३५  ब) ३६ ते ५१  क) ५२ ते ७८  ड) ७९ ते ८८

२. भारताच्या घटनापरिषदेने मूलभूत हक्कांच्या संदर्भात .......... यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमली होती.

अ) पंडित नेहरू  ब) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

क) जे.बी.कृपलानी  ड) वल्लभभाई पटेल

३. १९७८ च्या .......... व्या घटनादुरूस्तीने संपत्तीचा हक्क मूलभूत हक्काच्या यादीतून रद्द केला.

अ) ४२  ब) ४३  क) ४४  ड) ४५

४. सध्या भारतीय संविधानात......मूलभूत हक्क आहे.

अ) ६  ब) ७  क) ८  ड) ९

५. भारतीय संविधानाच्या कलम........नुसार मूलभूत ह हक्कांना न्यायालयीन संरक्षण दिलेले आहे.

अ) ३२  ब) ३६  क) ५१  ड) ७८

६. आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क कलम.........अन्वये स्थगित अथवा मर्यादित करता येतात.

अ) ३५९  ब) ३५२  क) ३५६  ड) ३६०

७. भारतीय संविधानाच्या..........कलमानुसार भारतीय नागरिकांना मूलभूत हक्क देण्याची व त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी राज्यावर सोपविली आहे.

अ) १२ ब) १३ क) १४ ड) १५

८. भारतीय संविधानाच्या कलमानुसार नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेणारा कायदा राज्यास करता येणार नाही

अ) १२ ब) १३ क) ३२ ड) २२६

९. सर्वोच्च न्यायालयाने..........खटल्यात मूलभूत हक्कांना घटनेच्या मूलभूत चौकटीचा (Basic Structure) एक भाग मानले आहे.

अ) केशवानंद भारती विरूध्द केरळ राज्य (१९७३)

ब) ए.के.गोपाला विरूध्द मद्रास राज्य (१९५०)

क) वेकंटरामन विरूध्द मद्रास राज्य

ड) गोलकनाथ विरूध्द पंजाब राज्य (१९६७)

१०. सन २००२ च्या ......... घटनादुरूस्तीने ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क प्राप्त झाला.

अ) ६१ ब) ७३ क) ७४ ड) ८६

११. भारतीय संविधानातील..........कलम नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी देते.

अ) ३१ ब) ३२ क) ३६ ड) ५१

१२. भारतीय घटनेच्या कलम...........मध्ये संविधानातील दुरूस्त्यांबाबत कार्यपध्दती स्पष्ट केली आहे.

अ) ३६८ ब) ३५२ क) ३५६ ड) ३६०

१३. ......... यांनी 'घटनात्मक उपाययोजनांचा हक्क हा संविधानाचा आत्मा आहे' असे म्हटले आहे.

अ) पंडित नेहरू ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) डॉ.राजेंद्र प्रसाद ड) जे.बी.कृपलानी

### २.२.२ मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties)

लोकशाही राज्यव्यवस्थेत हक्क आणि कर्तव्ये परस्परांपासून वेगवेगळी करता येत नाहीत. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका स्वीकारताना दुसरे आपसूक लागू होते. सुरुवातीला संविधानात मूलभत कर्तव्यांचा समावेश केलेला नव्हता. भारताचे संविधान निर्माण केले जात असताना मूलभूत हक्कांबरोबरच कर्तव्ये अभिप्रेत असतात, म्हणून ती स्वतंत्रपणे देण्याची गरज नाही. असा खुलासा घटनाकारांकडून त्यावेळी करण्यात आला. घटनाकारांनी संविधानात सामाविष्ट करताना नागरिकांनी मूलभूत हक्कांचा उपभोग घेताना काही कर्तव्ये पार पाडावीत असे गृहीत धरले होते. नागरिकांना आपल्या मूलभूत

हक्कांबाबत जशी जाणीव, जागृती, दक्षता मूलभूत कर्तव्यांच्या बाबतीत ही असणे अपेक्षित आहे कारण जेंव्हा एखादा मूलभूत हक्क नागरिकांना दिला जातो तेंव्हा त्याच्या बरोबरीने कर्तव्यपालनाची जबाबदारीही अप्रत्यक्षपणे त्यावर येते. उदा. व्यक्तीला आपल्या उपजिवीकेसाठी संपत्ती हिरावून घेऊ नये. कारण दुसऱ्या व्यक्तीलाही उपजिवीकेसाठी संपत्ती मिळवण्याचा, धारण करण्याचा हक्क असतो. म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपले हक्क उपभोगत असताना दुसऱ्या व्यक्तीचे हक्क धोक्यात येणार नाहीत हे पाहणे तिचे कर्तव्ये असते. मूलभूत हक्क व कर्तव्याच्या अनुषंगाने विचारकरता खरेतर गांधी-नेहरू-आंबेडकर या तिघांचाही देशातील सामान्य माणसावर दृढ विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर एका ठिकाणी असे म्हणतात की, ''या देशातील नेत्यांवर माझा भरवसा नाही. एकवेळ सर्व नेते आपला रस्ता चुकतील मात्र सर्वसामान्य नागरिक राष्ट्र विकासाला खरी दिशा देईल.'' याचाच अर्थ असा की, राष्ट्रांप्रती आसणारी आपली कर्तव्ये (उदा. राज्याचा कायदा पाळणे, राज्याचा कर भरणे, मतदानाचा हक्क बजावणे आदी.) स्वयंस्फूर्तीने पारपाडतील संविधान निर्मिती वेळी अशी कर्तव्ये नागरिकांकडून गृहीत धरल्याने त्यांचा स्वतंत्र समावेश संविधानात केला गेला नाही. नागरिकांना मूलभूत हक्कांचा वापर करताना कर्तव्यांचीही जाणीव होईल अशी घटनाकारांना अपेक्षा होती. परंतु ती अपेक्षापूर्ती फारशी न झाल्याने भारत सरकारने ४२ व्या घटनादुरूस्तीने मूलभूत कर्तव्यांचा संविधानात समावेश केला आहे. थोडक्यात, भारतीय नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करणे भाग पडले आहे.

स्वर्णसिंग समितीच्या शिफारशीनुसार १९७६ साली ४२ वी घटनादुरूस्ती झाली. त्याची अंमलबजावणी ३ जानेवारी १९७७ पासून सुरू झाली या दुरूस्तीने भारतीय संविधानात भाग ४ 'क' मधील ५१ 'क' या कलमान्वये १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. तसेच २००२ साली ८६ व्या घटनादुरूस्तीने आणखी एका मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला. सध्या भारतीय संविधानात ११ मूलभूत कर्तव्य दिली आहेत. प्रत्येक भारतीय नागरिकांवर त्या मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याची जबाबदारी आहे. भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्याचा विचार व प्रेरणा रशिया, चीन, पोलंड, अल्बानिया, झेकोस्लाव्हिया, युगोस्लाव्हिया इत्यादी, साम्यवादी देशाच्या संविधानातून मिळाली आहे.

भारतीय संविधानाच्या भाग ४ 'क' मधील ५१ ''क'' या कलमात पुढीलप्रमाणे ११ मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला आहे.

१. संविधानाचे पालन करणे आणि तिच्यातील आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा सन्मान राखणे, आदर करणे.

२. आपल्या स्वातंत्र्य लढाला प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शांचे जतन करणे व त्यांचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता, एकात्मता व अखंडता यांचा पुरस्कार करणे व त्याचे संरक्षण करणे.

४. राष्ट्राचे संरक्षण करणे व देशाला आवश्यकता भासेल तेंव्हा आवाहन केलेस राष्ट्रीय सेवा बजाविणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा वर्गीयभेद आड न येऊ देता त्याच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय जनतेमध्ये एकोपा, सुसंवाद व मातृभाव (बंधुभाव) वाढीस लावणे, तसेच स्त्रियांच्या प्रतिष्ठेला मारक, (बाधक) ठरणाऱ्या चालीरीतींचा, प्रथांचा त्याग करणे.

६. आपल्या देशाच्या एकात्म (संयुक्त) संस्कृतिचा संपन्न व गौरवशाली वारसा मौल्यवान समजून त्याचे जतन करणे.

७. जंगले, सरोवर, तळी, नद्या तसेच वन्य पशुजीवन इत्यादींसह नैसर्गिक पर्यावरणातील संपत्तीचे संरक्षण करणे, त्यात सुधारणा करणे, तसेच सजीव प्राण्यांबद्दल भूत दया दाखविणे, दयाबुध्दी बाळगणे.

८. वैज्ञानिक (शास्त्रीय), दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबृध्दी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा त्याग करणे.

१०. राष्ट्र यशाच्या व प्रगतीच्या दिशेने सातत्याने वाटचाल करील अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक (सामूहिक) कार्य क्षेत्रात उत्तमोत्तम होण्याचा, यश संपादन करण्याचा प्रयत्न करणे.

११. ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून प्रत्येक आई-वडीलांनी किंवा पालकांनी प्रयत्न करणे.

वरीलप्रमाणे भारतीय संविधानात आकरा मूलभूत कर्तव्ये दिलेली आहेत. यामूलभूत कर्तव्यांचे नागरिकांनी दैनंदिन जीवन व्यवहारात पालन करून देशाचा मान सन्मान व अस्मिता वाढवून देशाचा विकास साधावा अशी नागरिकांकडून अपेक्षा आहे.

**मूलभूत कर्तव्यावरील टीका**

मूलभूत कर्तव्यासंबंधी तरतूंदीमध्ये काही दोष, उणीवा किंवा त्रुटी दिसून येत असल्याने त्यावर टीका होताना दिसते.

१. मूलभूत कर्तव्यासंबंधी तरतूदीतील अस्पष्टता-मूलभूत कर्तव्याबाबत अस्पष्टता असून अनेक प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळत नाहीत. उदाहरणार्थ, मूलभूत हक्कांचे मूलभूत कर्तव्यांशी संबंध नेमके कसे असतील? कर्तव्ये हक्कांवर मर्यादा घालू शकतील काय? त्यांच्या पाठीशी कोणते पाठबळ राहणार आहे काय? नागरिकांकडून त्यांच्या पाठीशी कोणते पाठबळ राहणार आहे काय? नागरिकांकडून त्यांच्या पालनात कसूर, चुक झाल्यास ती नेमकी कशी व कोण मोजणार? ती कर्तव्ये नागरिकांना विना अडथळा पारपाडता यावीत यादृष्टिने राज्यसत्तेवर कोणत्याच नव्या जबाबदाऱ्या पडणार नाहीत काय? त्यांचा मूलभूत कर्तव्यासंबंधी ४२ व्या घटनादुरूस्तीत स्पष्ट निर्देश का नसावा? समाजवादी कल्याणकारी राज्याच्या व नवसमाजरचनेच्या दृष्टीने त्यांचा आशय पुरेसा आहे काय? यासारख्या मूलभूत कर्तव्यांसबंधी काही प्रश्नांची उत्तरे स्पष्ट स्वरूपात मिळत नाहीत. म्हणून टीकाकारांकडून मूलभूत कर्तव्यांसंबंधी तरतूदी अस्पष्ट स्वरूपाच्या असल्याची टीका होताना दिसते.

२. मूलभूत कर्तव्यांसंबंधी तरतूदींचा समावेश भारतीय संविधानात करण्याची आवश्यकता नव्हती, अशी टीका होताना दिसते आहे. कारण राज्याचे शासन नागरिकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी कायदे करू शकते. तसेच भारतीय नागरिकांनी स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत विविध कायद्यांचे पालन केले आहे. त्याचप्रमाणे विविध कर्तव्ये बजावून नागरिकांनी राज्याच्या धोरणाला व कार्यपध्दतीला सहकार्य केलेले आहे. तेंव्हा संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्याची आवश्यकता नव्हती. साम्यवादी शासनपध्दती असणाऱ्या देशात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर अमर्याद निर्बंध, नियंत्रण, अटी घालण्यात आलेल्या असतात. त्यामुळे त्या देशात राज्यघटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला जातो. परंतु भारता सारख्या लोकशाही राज्याच्या संविधानात साम्यवादी विचारसरणी असलेल्या देशाच्या संविधानांचे अनुकरण करून मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्याची आवश्यकता नव्हती अशी टीका होत आहे.

३. भारतीय संविधानात जी मूलभूत कर्तव्ये दिलेली आहेत ती मोघम, अस्पष्ट व संदिग्ध स्वरूपाची आहेत. कारण मूलभूत कर्तव्यांच्या तरतूदीत मोघमपणा, अस्पष्टता असल्यामुळे त्यांचा आशय व हेतू नेमकेपणाने स्पष्ट होत नाही. अशा नेमकेपणाच्या अभावी मूलभूत कर्तव्यांच्या तरतूदी आमंलबजावणी करणारांच्या हातातील मनमानी सत्तासाधने होऊन असतात. आणि हव्या त्या व्यक्तिंविरूध्द त्यांना ती वापरता येतात. अशावेळी पहिला बळी पडतो ते कायद्याच्या राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये अतिशय अस्पष्ट, त्रोटक व मोघम स्वरूपात असल्याने त्याच्यात नेमकेपणाचा अभाव आहे. त्यामुळे त्यांचा निश्चित व स्पष्ट हेतू व स्वरूप समजून येत नाही. उदा. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याला प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शांचे जतन करणे व त्यांचे पालन करणे या कर्तव्यात नेमके काय करावयाचे? नेमके कोणते उदात्त आदर्श समजावययाचे? याविषयी अस्पष्टता, दिसून येते. सहाव्या कर्तव्यात आपल्या देशाच्या एकात्मिक (संयुक्त) संस्कृतीचा गौरवशाली वारसा जतन करणे हे एक मूलभूत कर्तव्ये घटनेत सांगितले आहे. परंतु आपल्या एकात्मिक संस्कृतिचा गौरवशाली वारसा जतन करणे म्हणजे नेमके काय करावयाचे याबाबत स्पष्टता नाही. आठव्या कर्तव्यात शास्त्रीय दृष्टिकोन, मानवतावाद, जिज्ञासूपणा (शोधकबृध्दी) व सुधारणावादी वृत्ती यांचा विकास करणे असे म्हटलेले आहे. परंतु बहुसंख्य लोक निरक्षर, धार्मिक व दैववादी असलेल्या आपल्या देशात लोकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन व जिज्ञासावृत्ती अंगी बाळगणे हे त्यांचे मूलभूत कर्तव्ये ठरविणे हास्यास्पद ठरते अशी टीकाकारांकडून टीका केली जाते. दहाव्या कर्तवयात राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नागरिकांनी करावयाची व्यक्तिगत कार्ये कोणती व सामुदायिक (सामूहिक) कार्ये कोणती हे कोणी व कशाच्या आधारे ठरवावयाची याबाबत स्पष्टता नाही. अकरावे कर्तव्ये. ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी पालकांनी प्रयत्न करावेत असे सांगते. परंतु भटक्या विमुक्त, आदिवासी, दरिद्री व दुर्गम डोंगरी भागात राहणाऱ्या कुटुंबातील मुलांना शिक्षणाशी निगडीत पुरेसा सोईसुविधा अद्याप उपलब्ध नसताना असी तरतूद करणे विसंगत वाटते. अशी टीका याकर्तव्यावर होत

आहे. एकंदरित घटनेतील मूलभूत कर्तव्यांसंबंधीच्या तरतूदी अस्पष्ट, संदिग्ध व मोघम स्वरूपाच्या आहेत असे म्हणता येईल.

४. मूलभूत कर्तव्ये न्यायप्रविष्ट अथवा वादयोग्य नाहीत अशी टीका होताना दिसते. मूलभूत कर्तव्यांचे पालन न केल्यास शिक्षेची तरतूद नाही. तसेच त्या विरोधात न्यायालयात दाद मागता येत नाही. म्हणजेच मूलभूत कर्तव्यांना न्यायालयीन संरक्षणाची हमी देण्यात आलेली नाही, त्यामुळे ही कर्तव्ये निरर्थक ठरतात, अशी टीका केली जाते उदा. ६ ते १४ वयोगटातील मुलांना पालकांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली नाही तर त्याविरूध्द न्यायालयात दाद मागण्यासंबंधी स्पष्ट तरतूद केली आहे.

५. मूलभूत कर्तव्यांचा संविधानातील समावेशामुळे राज्यकर्त्यांवर पडणाऱ्या जबाबदाऱ्यांचा उल्लेख त्यात नसणे ही सर्वात मोठी उणीवा किंवा दोष असल्याची टिका केली जाते. जगातील ज्या देशांच्या संविधानात मूलभूत कर्तव्यांची तरतूद आहे. तेथे नागरिकांबरोबरच राज्यसत्तेची जबाबदारी ही स्पष्टपणे नमूद केलेली असते. भारताच्या राज्यघटनेत मात्र केवळ नागरिकांनी कर्तव्यपालन करण्याची अपेक्षा केली आहे. सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची कामे या कर्तव्यांच्या यादीत कुठेच दिसत नाही. नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टिने विचार करावा हे सांगताना ग्रामीण जनतेला शास्त्रीय पध्दतीने जगण्याचे व आपले काम करण्याचे प्रशिक्षण राज्यसत्तेने द्यावे. देववाद, अंधश्रध्दा, धार्मिकतेचे राजकारण इत्यादींना उत्तेजन देणारे कोणतेही कृत्य शासनाच्या पदावर असणाऱ्या कोणत्याही व्यक्ती च्या (राष्ट्रपती, पंतप्रधान, शासकीय अधिकारी, सरपंच इत्यादींच्या) हातून घडू नये असा स्पष्ट निर्देश वा उल्लेख घटनेत असायला हवा होता. तो नसल्याने मूलभूत कर्तव्यांवर टीका होत आहे.

६. आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क स्थगित होतात. परंतु मूलभूत कर्तव्ये स्थगित होतात की नाहीत हे ४२ व्या घटनादुरूस्तीने स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. येथे मूलभूत हक्कांबरोबरच मूलभूत कर्तव्ये स्थगित होतात असेच गृहीत धरावे लागेल. नाहीतर मूलभूत हक्क स्थगित होतात आणि सरकार मूलभूत कर्तव्यांचा आधार घेऊन हव्या त्या व्यक्तींविरूध्द विशेषत: विरोधी संघटनांवर अन्याय करू शकेल. या शिवाय व्यक्तीने अमुक एक कर्तव्य केले नाही म्हणून तिच्यावर मनमानीपणे सरकार कारवाई करण्यास मागेपुढे पाहाणार नाही. अशावेळी कायद्याचे राज्य या तत्त्वाला पहिला तडा जातो. आणि सत्ताधारी बेलगाम वागण्याची शक्यता अधिक निर्माण होते अशी टीका होताना दिसते.

७. भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्यांची यादी अपूर्ण वाटते. कारण या यादीत प्रत्येक नागरिकांनी लष्करी शिक्षण घ्यावे, प्रत्येकाने आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, प्रत्येकाने वेळेवर कर भरावा. शासकीय कायद्यांचे पालन करावे. यासारखी आणखी काही महत्त्वाची कर्तव्ये घटनेत समाविष्ट करता आली असती. परंतु ठराविकच कर्तव्ये घटनेत समाविष्ट केल्यामुळे कर्तव्यांची ही यादी अपूर्ण वाटते असा आक्षेप काही टीकाकारांकडून घेतला जातो.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे मूलभूत कर्तव्यांवर टीका होत असली, अथवा त्यात काही त्रुटी, दोष वा उणीवा असल्या तरी मूलभूत कर्तव्यांचे महत्त्व नाकारता येणार नाही. कारण लोकशाही राज्यव्यवस्थेत मूलभूत हक्क व मूलभूत कर्तव्ये परस्परांपासून वेगळी नसतात, तर ती परस्पर पूरक असतात. ती एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. नागरिकांनी आपल्या मूलभूत हक्कांचा उपभोग घेताना मूलभूत कर्तव्यांचेही पालन करणे आवश्यक आहे. नागरिकांना आपल्या कर्तव्याचा विसर पडू नये त्यांनी व्यक्तिगत विकासाबरोबरच सामूहितरित्या सामाजिक विकासासाठी ही प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती जसी आपल्या मूलभूत हक्कांबाबत जागृत व दक्ष असते. तशीच ती मूलभूत मूलभूत कर्तव्याबाबत जागृत व दक्ष राहून जबाबदारीने आपली कर्तव्य पारपाडू लागली तर भारतीय संविधानाने जे समाजवादी समाजरचना असलेल्या कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट स्वीकारले आहे ते साध्य होण्यास वेळ लागणार नाही. सर्व नागरिकांनी आपले हक्क व कर्तव्ये गांभीर्याने घेऊन जबाबदारीने त्यांचे पालन केले तर भारत लवकरच एक विकसित व सामर्थ्यशाली राष्ट्र बनेल.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. १९७६ च्या ...........व्या घटनादुरूस्तीने भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे.

अ) ४२ ब) ४३ क) ४४ ड) ४५

२. भारतीय संविधानाच्या..............कलमात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे.

अ) ५१ ब) ५१ (क) क) ५२ ड) ३६

३. भारतीय संविधानात ४२ व्या घटनादुरूस्तीने.........मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

अ) १० व्या ब) ११ व्या क) ७ व्या ड) ६ व्या

४. १९७६ साली....... समितीच्या शिफारशीनुसार भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

अ) स्वर्णसिंग समिती ब) जे.बी.कृपलानी समिती

क) बलवंतराय मेहता समिती ड) अशोक मेहता समिती

५. भारतीय संविधानात २००२ च्या ८६ व्या घटनादुरूस्तीने ........... मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला

अ) एका ब) दोन क) तीन ड) चार

६. सध्या भारतीय संविधानात नागरिकांसाठी.........मूलभूत कर्तव्ये दिलेली आहेत.

अ) १०　　　　ब) ११　　　　क) १२　　　　ड) १३

७. भारतीय संविधानातील..........वे मूलभूत कर्तव्ये ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी पालकांनी प्रयत्न करावेत असे सांगते.

अ) ११　　　　ब) १०　　　　क) ९　　　　ड) ८

## २.२.३ राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

**(Directive Principles of State policy)** (कलम ३६ ते ५१)

भारतीय संविधानाच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केलेली आहेत. राज्याच्या धोरणांसंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांना नीतिनिर्देशक तत्त्वे (Directive Principles) असेही म्हटले जाते. राज्याने राज्यकारभार कसा करावा हे सांगण्याचे कार्य मार्गदर्शक तत्त्वे करतात. राज्याचे ध्येयधोरण आणि योजना ठरविताना योग्य न्याय व चांगला मार्ग कोणता हे सांगण्याचे, मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्गदर्शक तत्त्वे करतात. राज्याच्या धोरणासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वांची ही कल्पना भारतीय राज्यघटनेने आयर्लंडच्या (आयशिश) राज्यघटनेवरून घेतली आहे. आयर्लंड प्रमाणेच स्पेन, चीन, ब्रम्हदेश, नेपाळ, युगोस्लाव्हिया इत्यादी देशांच्या राज्यघटनांतील मार्गदर्शक तत्त्वांचा आधार आवश्यक तेवढ्या प्रमाणात भारतीय घटनाकारांनी घेतला आहे.

मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आदर्श व कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडलेली आहे. भारतात आर्थिक, सामाजिक व राजकीय आधारित समाजरचना आकारास यावी, इथे समाजवाद रूजावा व वाढीस लागावा. तसेच विषमता नष्ट होऊन व्यक्ती आणि व्यक्तिसमूहांना समान संधी व समान दर्जा प्राप्त व्हावा अशी मार्गदर्शक तत्त्वांची भूमिका आहे. यानुसार संविधानातील या कलमांची तरतूद म्हणजे संविधानाने राज्याला (सरकारला) दिलेले सकारात्मक आदेशच आहे. राजकीय लोकशाहीची यशस्विता ही सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर अवलंबून असते. शासनाने मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास आर्थिक व सामाजिक लोकशाहीची निर्मिती होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शक तत्त्वांचा राज्यघटनेत समावेश करण्यासंबंधी जे स्पष्टीकरण दिले आहे ते असे की, 'हा भाग मुद्दाम म्हणून राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला आहे. कारण आमच्या मते, आदर्श आर्थिक लोकशाही कशी असावी याची कल्पना यावी याकरिता घातलेला आहे. आम्हाला केवळ प्रौढ मतदान देऊन राजकीय लोकशाहीच साधायची नाही. कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार जरी अधिकारपदावर असले तरी त्यांना भारतीयांसाठी काय केले जावे ते या भागावरून कळू शकेल. त्यामुळे कायदे करताना व त्यांची अंमलबजावणी करताना राज्यकर्त्यांनी ही तत्त्वे सदैव समोर ठेवावीत अशी घटनाकारांची अपेक्षा आहे.'

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे घटनेच्या प्रारंभी असलेली जी उद्देशपत्रिका/सरनामा आहे त्यात उद्घोषित केलेल्या तत्वांचा विस्तार होय. कलम ३७ नुसार ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे कोणतेही हक्क, नियम वा कायदे नाहीत. त्यामुळे मूलभूत हक्कातील तरतुदींप्रमाणे या तत्त्वांविरूध्द कोणत्याही

न्यायालयात दाद मागता येणार नाही. या तत्त्वांचे स्वरूप अ-वाद योग्य (Non-Justiceable) असे आहे. तथापि, ही तत्त्वे देशाचा राज्यकारभार चालविण्यासाठी मूलभूत समजली जातील आणि राज्याने/शासनाने कायदे करताना ही तत्त्वे प्राधान्याने लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल. या धोरणांची अंमलबजावणी संविधानाच्या कक्षेत करावी अशी घटनाकारांची अपेक्षा आहे. थोडक्यात, कलम ३७ अन्वये मार्गदर्शक तत्वांविरूध्द न्यायालयात दाद मागता येत नाही. त्यामुळे राज्यसत्तेवर त्यांच्या अंमलबजावणीची सक्ती केली जाऊ शकत नाही. तरीपण घटनेतील तरतूदीनुसार ही तत्त्वे देशाच्या राज्यकारभारात मूलभूत महत्त्वाची आहेत आणि कायदे करताना त्यांची अंमलबजावणी होईल हे पाहणे राज्यसत्तेचे कर्तव्य असेल. अशी राज्यघटनेत स्पष्ट तरतूद केलेली अहे. देशाचा राज्यकारभार करताना, सामाजिक व आर्थिक विकास करताना या मार्गदर्शक तत्त्वांची अवहेलना व उपेक्षा करणे कोणत्याच जबाबदार शासनाला शक्य होणार नाही. कारण जे सरकार या तत्त्वातील कल्याणकारी तत्त्वांची अंमलबजावणी करणार नाही त्यास जनता मतदानाद्वारे निवडणूकांच्या माध्यमातून सत्ताबाह्य करू शकते, म्हणून कोणत्याही सत्ताधारी पक्षाचे जबाबदार शासन मार्गदर्शक तत्त्वांना नजरेआड करून आपल्या सत्तेचे भवितव्य धोक्यात आणू इच्छिनार नाही.

कलम ३६ मध्ये राज्याची व्याख्या करण्यात आली आहे. भारत सरकार, घटक सरकारे आणि सर्व स्थानिक स्वशासन संस्था, संसद, राज्याचे कायदेमंडळ आणि भारतीय भूप्रदेशात भारत सरकारच्या अधिकार क्षेत्रात/कक्षेत मोडणाऱ्या सर्व संस्थांचा समावेश 'राज्य' या व्याख्येत होतो.

कलम ३८ मध्ये मार्गदर्शक तत्त्वांचा उद्‌देश पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेला आहे.

१. ज्या समजव्यवस्थेत सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित केला जाईल त्या समाजव्यवस्थेचे परिणाम कारकरितीने संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न राज्याकडून केला जाईल.

२. राज्य केवळ व्यक्ती व्यक्तीतील नव्हे तर विविध क्षेत्रातील व व्यवसायातील लोकसमूहात उत्पन्नाच्या बाबतीत असले तरी आर्थिक विषमता किमान पातळीवर आणण्याचे प्रयत्न करील आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नष्ट करण्योच प्रयत्न करील. थोडक्यात, भारतीय संविधानात घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्या पाठीमागचा उद्‌देश भारतात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करून कल्याणकारी राज्य निर्माण करणे हा आहे.

**मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण**

भारतीय संविधानाच्या भाग-४ कलम ३६ ते ५१ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे तर्कशुध्द असे वर्गीकरण केलेले नाही. काही लेखकांनी आपापल्या मतानुसार यांचे वर्गीकरण केलेले आढळते. येथे सर्व मार्गदर्शक तत्त्वांची कलमवार चर्चा करण्याऐवजी आपल्या अभ्यासाच्या सोयीसाठी त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१) आर्थिक तत्त्वे २) सामाजिक तत्त्वे ३) राजकीय तत्त्वे ४) आंतरराष्ट्रीय संबंध (परराष्ट्रसंबंध) विषयक तत्त्वे

## १) आर्थिक तत्त्वे

संविधानात कलम ३९, ४१, ४२, ४३ (क), ४८, ४८ (क) मधील तरतुदीने देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील आर्थिक तत्त्वे राज्याला (सरकारला) सुचविली आहेत.

**कलम ३९ :**

कलम ३९ नुसार राज्य (सरकार) पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टिने आपले धोरण आखील

१) भारतातील स्त्री-पुरूषांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान अधिकार असावा.

२) समाजातील भौतिक साधनसंपत्तीच्या मालकीचे सर्वसामान्य जनतेच्या सामूहिक हिताला पोषक (उपकारक) ठरेल अशाप्रकारे वितरण व्हावे.

३) समाजाच्या सामूहिक हिताला मारक (अपायकारक) ठरेल अशाप्रकारे संपत्ती व उत्पादन साधनाचे केंद्रीकरण होऊ देऊ नये.

४) स्त्री व पुरूष यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.

५) स्त्री व पुरूष कामगारांचे आरोग्य व शारीरिक शक्ती (ताकद) तसेच मुलांचे केवळ वय विचारात घेऊन त्यांना रोजगार (काम) देण्यात यावा. नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय व ताकद (शक्ती) यांना न पेलवणारा व्यवसाय पत्करण्यास भाग पाडले जाऊ नये.

६) बालकांना निरोगी व मुक्त वातावरणात वाढण्याची आणि आपला विकास करण्याची संधी व सुविधा मिळाव्यात. बालके व युवक यांचे शोषणापासून आणि नैतिक ऱ्हासापासून संरक्षण व्हावे.

७) १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीने घातलेल्या कलम ३९ 'अ' नुसार संविधानाच्या प्रस्ताविकेत सर्व व्यक्तींना ज्या समान न्यायाची हमी दिली आहे ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी योग्य अशी पाऊले राज्यसत्तेने उचलावीत आणि गरीबांना (आर्थिकदृष्ट्या दुर्बल) मोफत कायदेविषयक मदत मिळवून द्यावी. थोडक्यात आर्थिक किंवा अन्य अडचणीमुळे कोणत्याही नागरिकांवर अन्याय होऊ नये म्हणून शासनाने मोफत कायदेविषयक साहाय्य मिळवून द्यावे.

**कलम ४१**

कलम ४१ नुसार राज्याने आपली आर्थिक क्षमता व विकास लक्षात घेऊन, बेरोजगारी, वृध्दत्व, आजारपणा, आणि अंपगत्व यांनी पीडित लोकांना आणि स्वत:चा दोष नसताना ज्यांना निष्कारण हलाखीचे जीवन जगावे लागते अशा लोकांना सार्वजनिक आर्थिकसाहाय्य करणे. तसेच सर्व नागरिकांना रोजगाराची व शिक्षणाची सोय व्हावी यासाठी राज्याने प्रभावी पावले उचलावीत.

**कलम ४२**

कलम ४२ नुसार राज्याने कामधंद्याच्या बाबतीत न्याय व माणुसकीचे वातावरण निर्माण करावे. तसेच स्त्रियांना प्रस्तूसाहाय्य देण्यासाठी तरतूदी कराव्यात.

**कलम ४३ :**

कलम ४३ नुसार देशातील सर्वक्षेत्रातील (शेती, उद्योग इ.) कामगारांना रोजगार व वाजवी निर्वाहवेतन मिळवून देणे, राहणी मानाचा दर्जा उंचावणे, पुरेशी विश्रांती व आपला सामाजिक आणि सांस्कृतिक विकास करून घेता येईल. अशाप्रकारचे त्यांच्या कामाच्या ठिकाणचे वातावरण ठेवण्याची शाश्वती राज्य कायदे करून वा आर्थिक रचना करून किंवा अन्य मार्गाने देण्याचा प्रयत्न करेल. विशेषत: राज्य ग्रामीण भागात वैयक्तिक अथवा सहकारी तत्वावर कुटीरोद्योगधंदे वाढविण्याचा प्रयत्न करील.

४२ व्या घटनादुरूस्तीने घातलेल्या कलम ४३ 'अ' नुसार कोणत्याही उद्योग धंदाच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे या करिता राज्य (सरकार) योग्य ते कायदे करील अथवा इतर उपाय करेल.

**कलम ४८**

कलम ४८ नुसार राज्य (सरकार) आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने शेती व पशुसंवर्धन यांची योग्य व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करील. प्रामुख्याने गाई, वासरे, इतर दुभती व आणि जुंपणीच्या जनावरांचे जतन करणे व त्यांची पैदास सुधारण्याचे तसेच त्यांच्या कत्तलीस मनाई, प्रतिबंध करणेसाठी, राज्य (सरकार) उपाययोजना करील.

४२ व्या घटनादुरूस्तीने घटनेत घातलेल्या कलम ४ (अ) नुसार देशातील पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा व्हावी, जंगले सुरक्षित राहावीत आणि देशातील वन्य जीवांची जोपासना व संरक्षण व्हावे यासाठी राज्याने (सरकारने) प्रयत्न करावेत, असे स्पष्ट केले आहे.

**३. सामाजिक तत्त्वे**

समाजव्यवस्था सुदृढ करण्यासाठी आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी राज्याने काय करावे याचे मार्गदर्शन या सामाजिक तत्त्वातून केलेले आढळते. भारतीय संविधानाच्या कलम ४५, ४६, ४७ व ४९ मध्ये सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

**कलम ४५**

देशाचे संविधान अंमलात आल्यानंतर १० वर्षाच्या आत १४ वर्षाखालील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची योजना राज्याने (सरकारने) करावी.

**कलम ४६**

कलम ४६ नुसार समाजातील दुर्बल घटकांचे विशेषत: अनुसूचित जाती-जमातींचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांची राज्य विशेष काळजी घेईल. तसेच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करील.

**कलम ४७**

कलम ४७ नुसार राज्य आपल्या जनतेचा आहार व राहणीमानाचा दर्जा उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्यव्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करेल. विशेषत: जनतेच्या आरोग्याला अपायकारक

अशा अंमली पदार्थ यांचे औषधांच्या उपयोगाव्यतिरिक्त सेवन वा अन्य प्रकारे वापर करण्यावर राज्य (सरकार) बंदी घालील. उदा. चरस, गांजा, अफू, तंबाखूजन्य पदार्थ, दारूबंदी इ.

**कलम ४९**

कलम ४९ नुसार प्राचीन स्मारके, राष्ट्रीय व महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे, कलाकृतींच्यादृष्टीने महत्त्वाची ठिकाणे विध्वंसापासून तसेच विकृतीकरणापासून संरक्षणकरण्याची जबाबदारी राज्याने घ्यावी.

**३. राजकीय तत्त्वे :**

आपण या तत्त्वांना गांधीवादी तत्त्वे असेही म्हणून शकतो. म. गांधीना ज्या प्रकारची आदर्श राज्यव्यवस्था अपेक्षित होती, ती प्रत्यक्षात यावी यादृष्टिने काही मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेच्या चौथ्या भागात केला आहे. संविधानाच्या कलम ४०, ४४ व ५० मध्ये राजकीय स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत.

**कलम ४०**

कलम ४० नुसार राज्य/शासन ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या दृष्टिने पुढाकार घेईल. व त्यांना स्वयंशासीत संस्था म्हणून सक्षमपणे स्वत:चा कारभार पाहता यावा यासाठी आवश्यक ते अधिकार व सत्ता देईल.

**कलम ४४**

कलम ४४ नुसार भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा असावा यासाठी भारत सरकार प्रयत्न करेल.

**कलम ५०**

कलम ५० नुसार भारत सरकारने न्यायमंडळ व कार्यकारी मंडळ हे एकमेकांपासून अलग वा स्वतंत्र्य कार्यरत राहतील अशी उपाययोजना करावी.

**४. आंतरराष्ट्रीय संबंध (परराष्ट्रसंबंध) विषयक तत्त्वे :**

कलम ५१ मध्ये राज्याने आंतरराष्ट्रीय (परराष्ट्र) संबंध कसे राखावेत याबाबत मार्गदर्शन केलेले आहे. त्यानुसार

१) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्रा-राष्ट्रांत शांतता व सुरक्षितता कायम राहिल असे भारतसरकारकडून प्रयत्न केले जावेत.

२) राष्ट्रा-राष्ट्रांतील संबंध न्याय व सन्मानपूर्वक ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत.

३) आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेले कायदे व करार याविषयी आदर (मान) राखावा.

४) आंतरराष्ट्रीय मतभेद, वादविवाद, भांडण-तंटे समजुतीच्या मार्गाने किंवा लवादामार्फत सोडविण्याचा प्रयत्न करावा तसेच अशा प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे.

वरीलप्रमाणे राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद पाहता आयर्लंडची राज्यघटना, मानवी हक्कांची सनद, १९३५ चा भारत सरकार कायदा, समाजवादी विचार, राष्ट्रीय काँग्रेसची (राष्ट्रसभेची) ध्येयधोरणे, आणि गांधीवादाचा प्रभाव या सर्वबाबींचा आदर्श समन्वय म्हणजे 'मार्गदर्शक तत्त्वे' असल्याचे म्हणता येईल. संविधान कर्त्यांनी भारतातील सर्व स्त्री-पुरूष, लहान मुले व वृध्द, दुर्बल व मागासघटक, जग आणि पर्यावरण इत्यादी सर्व गोष्टींचा सखोल विचार मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद करताना कसा केला हे यावरून स्पष्ट होते. थोडक्यात देशात कोणत्याही राजकीय पक्षाची सत्ता असो, राष्ट्र आणि व्यक्ती विकासास पूरक व पोषक, तसेच सत्ताधारी शासनकर्त्यांस पथदर्शी ठरतील अशीच ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

**मार्गदर्शक तत्त्वांचे मूल्यमापन**

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व महत्त्वाची असली तरी या मार्गदर्शक तत्त्वांवर आक्षेप घेतले जातात अथवा टीका होताना दिसते.

१) मार्गदर्शक तत्त्वांच्या बाबतीत घेतला जाणारा सर्वात मोठा आक्षेप म्हणजे या तत्त्वांना कायदेशीर आधार नसतो. या तत्त्वांचे पालन न झाल्यास त्याविरूध्द नागरिकांना न्यायालयात दाद (न्याय) मागता येत नाही. न्यायालयीन संरक्षण नसल्यामुळे ही मार्गदर्शक तत्त्वे निरर्थक आहेत. मार्गदर्शक तत्त्वांत केवळ आदर्शवाद व आशावाद असल्यामुळे ती प्रत्यक्षात येणे कठीण आहेत. म्हणूनच प्रा. के.सी.व्ही.अर यांनी या तत्त्वांना 'केवळ अशा-अपेक्षांचा जाहीरनामा' असे संबांधले आहे.

२) मार्गदर्शक तत्त्वांवर अशी टीका केली जाते की, ही तत्त्वे आदर्शवादी व अशावादी असल्यामुळे, या तत्त्वांचा आधार घेऊन निवडणूकांच्या काळात राजकारणी लोक आकर्षक घोषणा करून आपल्या मतपेट्या भरून घेऊ शकतील. राज्यकर्त्यांच्या इच्छेवरच या तत्त्वांची अमंलबजावणी करायची की नाही ते अवलंबून राहते. म्हणून घटनापरिषदेत प्रा. के.टी.शहा यांनी या तत्त्वांचे वर्णन ''मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे असा एक धनादेश (cheque) आहे की, जो वटविला जायचा की नाही हे बँकेच्या मर्जीवर अवलंबून आहे.'' असे केले आहे. याठिकाणी बँकेची इच्छा आणि तिची ऐपत (क्षमता) या गोष्टी अत्यंत बोलक्या आहेत.

३) मार्गदर्शक तत्त्वे अत्यंत संदिग्ध अस्पष्ट व अनिश्चित स्वरूपाची आहेत असा आक्षेप घेतला जातो. कारण ही तत्त्वे प्रामुख्याने सौध्दांत्तिक असून त्यांच्यात व्यवहार्य मार्गांचा तपशील आढळत नाही. उदा. कामगार व स्वरूप कसे असावे? यांबाबतीत स्पष्टता नाही.

४) तुषार चटर्जी सारख्या साम्यवादी नेत्यांकडून अशी टीका केली जाते की, ''संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे निरूपयोगी असून केवळ संविधानाची शोभा वाढविण्यासाठी त्यांचा स्वीकार केलेला आहे.''

५) मार्गदर्शक तत्त्वांवर अशी टीका केली जाते की, ही तत्त्वे शासनाकडून निर्विवादपणे मान्य केलेली दिसून येत नाहीत. काही तत्त्वांची उपयुक्तता शंकास्पद वाटते. मार्गदर्शक तत्त्वांत आरोग्यास हानीकारक आमली पदार्थ व मादक पेयांवर बंदी आणण्याची तरतूद आहे. उदा. दारूबंदी, आरोग्यस घातक दारूबंदी संबंधी तत्वाचे शासनाकडुन कितीप्रमाणात पालन केले जाते हा एक आजचा गंभीर प्रश्न आहे. एकीकडे शासन दारूचे उत्पादन वाढवून त्याच्यावरील कररूपाने आपल्या आर्थिक कोषात भर टाकीत असल्याचे दिसते, तर दुसरीकडे काही घटकराज्यांत दारूबंदी केल्याने त्यांचे उत्पन्न बुडते अशी ओरड केली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. उदा. गुजरात, बिहार.

६) मार्गदर्शक तत्त्वांनी नागरिकांना फारच पोकळ आणि अनिश्चित स्वरूपाची आश्वासने दिली आहेत. कारण या तत्त्वांना कायद्याचे पाटबळच नाही. प्रो. एन. श्री निवासन म्हणतात, 'राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे हे प्रकरण उत्साहवर्धक आहे असे निश्चितच म्हणता येणार नाही. पुनरूच्चार व पोकळपण हे दोन्ही दोष त्यात आहेत. मार्गदर्शक तत्त्वांची तर्कशुद्ध रचना (मांडणी) करण्यात आलेली नाही किंवा त्यांचे योग्यरित्या वर्गीकरण देखील केलेले दिसत नाही. महत्त्वाचे असे सामाजिक व आर्थिक प्रश्न आणि अनेक प्रश्न यांची सरमिसळ करण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात आला आहे. अशी बहुविध स्वरूपाची टीका मार्गदर्शक तत्त्वांवर केली जाते.

७) मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात काही टीकाकार असे म्हणतात की, 'राज्य हे सार्वभौम असते तेंव्हा अशा सार्वभौम राज्याला मार्गदर्शन केले तरी ते त्यांच्यावर बंधनकारक असू शकत नाही म्हणून घटनाकारांचा हा प्रयत्न अतिशयोक्तीकारक वाटतो.

वरीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांवर केल्या जाणाऱ्या टीकांमध्ये तथ्य असले तरी या मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही. शासनकर्ते स्वत:च्या स्वार्थासाठी त्यांचा उपयोग करून घेत असले तरी त्यांची उपयुक्तता कमी होऊ शकत नाही.

**मार्गदर्शक तत्त्वांचे समर्थन व उपयुक्तता (महत्त्व)**

वरीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणीबाबत टीका होत असली तरी त्यांचे महत्त्व व उपयुक्तता नाकारता येत नाही. कारण देशाचा राज्यकारभार करताना, राज्याची ध्येयधोरणे ठरविताना कायदे करताना ही तत्त्वे अत्यंत मूलभूत व महत्त्वाची मानली जातात.

१) पंडित नेहरूंनी मार्गदर्शक तत्त्वांचे समर्थन केले आहे. घटना परिषदेत मार्गदर्शक तत्त्वांवरील चर्चेच्या वेळी पंडित नेहरूंनी असे विचार मांडले की, 'भारतीय जनतेचे दारिद्र्य, अज्ञान, बेकारी आदी गोष्टी नष्ट करण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, सुखी-समृध्द करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक व उपयुक्त आहेत.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेतील चर्चेच्या वेळी मार्गदर्शक तत्त्वे संविधानात समाविष्ट करण्याच्या उद्देशाविषयी बोलताना म्हणाले की, ''भारताच्या भावी कायदेमंडळ व मंत्रिमंडळ यांनी

कसा राज्यकारभार करावा यासंबंधी दिलेले ते आदेश आहेत. त्यांच्या कृतीचा पाया ही मार्गदर्शक तत्त्वे बनली पाहिजेत, हाच उद्देश मार्गदर्शक तत्त्वे संविधानात समाविष्ट करण्यामागचा आहे.''

३) ग्रॅनविल ऑस्टिंनच्या मते, 'संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीद्वारे देशातील सामाजिक क्रांतीची उद्दिष्टे साध्य होतील. या हेतूनेच मार्गदर्शक तत्त्वांचा संविधानात समोवश केलेला आहे. ही तत्त्वे सामाजिक क्रांतीसाठी पोषक वातावरण (परिस्थिती) निर्माण करण्याचे कार्य करतात.'

४) न्या.एम.सी.छागला यांच्या मते, ''जर या मार्गदर्शक तत्त्वांचे योग्य प्रकारे प्रत्यक्षात पूर्णपणे पालन झाले तर भारतदेश पृथ्वीवरील स्वर्ग बनेल. भारतात राजकीय लोकशाही बरोबरच समाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण होईल. प्रत्येक व्यक्तीला काम करण्याची व शिक्षण घेण्याची, सर्वांना आपल्या श्रमांची फळे पदरात पाडून घेण्याची समान संधी मिळेल, भारत असे एक कल्याणकारी राज्य होईल.''

५) श्री. अमर नांदी यांच्या मते, ''मार्गदर्शक तत्त्वे कोणत्याही राजकीय पक्षांना अतिरेकी टोकाची भूमिका घेण्यापासून परावृत्त करतात. डावे अथवा उजवे, पुरोगामी अथवा प्रतिगामी अशी अतिरेकी भूमिका होणाऱ्या राजकीय पक्षांपासून या तत्त्वांमुळे सामान्य नागरिकांना हमी मिळते.''

६) श्री.एम.सी.सेटलवाड यांच्या मते, ''ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे स्पष्ट व विस्तृत स्वरूप होय. जनतेला न्याय, समता आणि बंधुत्व प्रदान करणे हे त्यांचे ध्येय, उद्दिष्ट आहे. 'न्यायालयाकरिता या तत्त्वांचे अस्तित्व दीपस्तंभासारखे आहे. कायद्याचा अर्थ लावीत असताना सर्वोच्च न्यायालयाचे किंचा उच्च न्यायालयाचे लक्ष या तत्त्वांकडे आकर्षित होत असते. सर्वोच्च न्यायालयकडून अनेक खटल्यात आपला निर्णय देत असताना या तत्त्वांचा उल्लेख करावा लागला आहे.' उदा. एन.के.गोपालन विरूध्द मद्रास राज्य (१९५०), कामेश्वरसिंग विरूध्द बिहार राज्य या खटल्यांच्या निर्णयात मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व स्पष्ट झाले आहे. यावरूनच या तत्त्वांची आवश्यकता निर्विवादपणे सिध्द होते.

७) श्री. अलादी कृष्णस्वामी यांच्या मते, ''भारतातील कोणतेही सत्ताधारी प्रतिनिधिक सरकार संविधानाच्या चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वे दुर्लक्षित करू शकत नाही. कारण या तत्त्वांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला सत्तेपासून वंचित व्हावे लागते. निवडणूकांच्या माध्यमातून जनता अशा सत्तारूढ पक्षाला सत्तेवरून दूर करते.''

८) डॉ. आंबेडकर यांच्या मते, ''भारतात राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी व भारत हे एक कल्याणकारी राज्य होण्यासाठी ही मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त व आवश्यक आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष करणाऱ्या राज्यकर्त्यांना मतदार निवडणूकांमध्ये धडा शिवण्याखेरीज राहणार नाहीत आणि विरोधी पक्षही त्यांच्या विरूध्द प्रचार करताना त्यांच्या या अपयशाचे नक्कीच भांडवल करतील'', असा विश्वास आंबेडकर यांनी व्यक्त केला होता.

९) डॉ. एम.व्ही. पायली यांच्या मते, ''राज्यघटनेतील ही मार्गदर्शक तत्त्वे भारतातल्या खऱ्याखुऱ्या लोकशाहीसाठी सर्वात मोठी हमी आहेत.''

१०) आर्थिक लोकशाही प्रस्थापित केल्याशिवाय राजकीय लोकशाही फार काळ टिकू शकत नाही. आर्थिक लोकशाही अभावी राजकीय लोकशाहीचे हूकूमशाहीत रूपांतर होत असते. असा जगाचा आजपर्यंतचा इतिहास आहे. भारतात हा धोका टाळण्यासाठी मार्गदर्शक तत्वांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणे आवश्यक ठरते मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीद्वारे आर्थिक लोकशाही क्रमशः वृद्धींगत व विकसित होईल आणि त्याचबरोबर राजकीय लोकशाही देखील वृद्धींगत व विकसित होईल आणि ती चिरस्थायी टीकून राहील.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे विविध विचारवंतानी, राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे समर्थन करून त्यांची उपयुक्तता व महत्त्व स्पष्ट केलेले आहे. भारताच्या राज्यकर्त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांचा योग्यप्रकारे अवलंब करून समाजवादी समाजव्यवस्था असलेल्या कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करावे असे भारतीय संविधानकर्त्यांनी सुचविले आहे. भारतीय घटनाकारांनी पाहिलेले जनतेच्या इच्छा-आकांक्षा प्रतिबिंबित होणारे हे एक रम्य स्वप्नरंजन आहे. ते तत्काळ पूर्ण होणे शक्य नाही म्हणून या तत्त्वांचे महत्त्व कमी होत नाही. आज ना उद्या ते स्वप्न साकार होईल अशी आशा वाटावी इतपत चांगली कामगिरी आजपर्यंतच्या सर्व सत्ताधारी राज्यकर्त्यांकडून झाल्याची, होत असल्याचे दिसून येते. जसे जमीन सुधारणसंबंधीचा कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, विविध स्वरूपाचे कामागार कायदे, किमान वेतन कायदा, स्त्री-पुरूषांना समान कामासाठी समान वेतन, प्रस्तूती काळासाठी सवलती, १४ वर्षाखालील मुलांना धोक्याच्या ठिकाणी काम न देण्याची व्यवस्था, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्याद्वारे बेकारी निवारणाचे प्रयत्न सरकारकडून होते आहेत. शिक्षण, आरोग्य, राहणीमान, संस्कृती या बाबतीत राज्याने मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार केलेला आहे. भारत सरकारने २००२ साली १४ वर्षाखालील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा केला आहे. त्याची अमंलबजावणी २०१० पासून सुरू झाली आहे. त्याच बरोबर प्राथमिक, माध्यमिक, उच्च तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणाबाबत सरकारने विविध उपाययोजना केलेल्या आहेत. आलीकडेच महाराष्ट्र शासनाने मुलींना उच्च, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. मागासलेल्या व अनुसूचित जातिजमातींच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विविध तरतूदी सरकारकडून करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय नागरिकांचे आरोग्य व स्वास्थ विचारात घेऊन सरकारने अमली पदार्थांच्या चोरट्या आयातीवर व सेवनावर कायद्याने बंदी घातली आहे. गुटखाबंदी, तंबाखूबंदी, दारूबंदी करण्यात आली आहे. खाद्यपदार्थांच्या भेसळीबाबत उपाययोजना म्हणून भेसळ प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. आलीकडे सार्वजनिक क्षेत्रात वाढलेल्या भ्रष्टाचारावर नियंत्रण आणण्यासाठी लाचलूचपत प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. १९९२ साली ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती करून स्थानिक स्वशासन संस्था (ग्रामीण व शहरी) निर्माण करण्याचे मार्गदर्शक तत्त्वाचे (कलम ४०) उद्दिष्ट्य पूर्णपणे अंमलात आणले आहे. गेल्या ७५ वर्षात मार्गदर्शक तत्त्वांचा आधारे भारत सरकारने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता व सुरक्षा अबाधित (कायम) रहावी यादृष्टिने आपले परराष्ट्र धोरण व संबंध ठेवलेले दिसून येतात.

संयुक्त राष्ट्राच्या (UNO) आंतरराष्ट्रीय शांततेच्या धोरणाला पूर्णपणे सक्रिय सहभाग, सहकार्य, पाठिंबा दिलेला आहे. भारतातील सर्व नागरिकांना समान नागरी कायदा लागू करणे अद्यापही शक्य झाले नसले तरी सध्याचे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए (NDA) आघाडीचे सरकार असा कायदा करण्याच्या बाबतीत प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे. यासंबंधी आघाडी सरकारमधील सर्व घटकांमधील सहकार्य मिळण्याचा प्रयत्न सुरू आहे अशाप्रकारे वरीलप्रमाणे भारतातील केंद्रशासनाने व घटक राज्यांतील सरकारांनी आपापली ध्येयधोरणे व योजना ठरविताना, कायदे करताना आणि त्यांची अंमलबजावणी करताना संविधानावरील मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून कल्याणकारी राज्याच्या दिशेने योग्य पाऊले टाकताना दिसत आहेत. थोडक्यात, राज्याने (केंद्र व घटकराज्य सरकारने) मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करावे हे भारतीय घटनाकारांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने मार्गदर्शक तत्त्वातील अनेक तरतूदींसंबंधी कायदेकरून व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून मंदगतीने पण आशादायी वाटचाल भारतसरकार व घटकराज्य सरकारांकडन होताना दिसत आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय संविधानात...........कलमानुसार राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद केलेली आहे.

अ) १२ ते ३५ ब) ३६ ते ५१ क) ५१ ते ७८ ड) ७९ ते ८८

२. राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्त्वांची कल्पना......... देशाच्या राज्यघटनेवरून घेतली आहे.

अ) आयर्लंड (आयरीश) ब) अमेरिका क) इंग्लंड ड) फ्रान्स

३. .........तत्त्वांचे राज्यांकडून पालन न झाल्यास त्याविरूध्द नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नाही.

अ) मूलभूत हक्क ब) मूलभूत कर्तव्ये क) मार्गदर्शक तत्त्वे ड) यापैकी नाही.

४. ..........यांनी मार्गदर्शक तत्त्वांना 'केवळ अशा-आक्षेपांचा जाहीरनामा' असे संबांधले आहे.

अ) प्रा.के.सी.व्हीअर ब) प्रा.के.टी.शहा क) तुषार चटर्जी ड) डॉ.एम.व्ही.पायली

५. ....... यांच्या मते, मार्गदर्शक तत्त्वांचे प्रत्यक्षात पूर्णपणे पालन झाले तर भारत देश पृथ्वीवरील स्वर्ग बनेल.

अ) न्या.एम.सी.छागला ब) श्री.अमर नंदी

क) श्री.एम.सी सेटलवार ड) डॉ.एम.व्ही.पायली

६. भारतीय शासनाने राज्यकारभार कसा करावा हे सांगण्याचे कार्य.........करतात.

अ) मार्गदर्शक तत्त्वे ब) मूलभूत कर्तव्ये क) मूलभूत हक्क ड) यापैकी नाही

७. ............व्या कलमानुसार स्त्री-पुरूष यांना समान कामासाठी समान वेतन देण्याची तरतूद केली.

अ) ३९ ब) ४० क) ४१ ड) ४४

८. .........व्या कलमात भारतातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा असावा अशी तरतूद आहे.

अ) ४४ ब) ४५ क) ४६ ड) ४७

९. .........मध्ये आदर्श व कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली आहे.

अ) मूलभूत हक्क ब) मूलभूत कर्तव्ये क) मार्गदर्शक तत्त्वे ड) यापैकी नाही.

## २.३ सारांश

भारतीय संविधाननिर्मात्यांनी संविधानात भाग तीन व चार मध्ये अनुक्रमे मूलभूत हक्क, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये यांची तरतूद केलेली आहे. देशात राजकीय लोकशाही बरोबरच आर्थिक व सामाजिक लोकशाही स्थापन करणे हा या तरतूदी मागचा प्रमुख उद्‌देश आहे. हे उद्दिष्ट सामूहिकरित्या साध्य करण्याचे कर्तव्य व जबाबदारी घटनाकारांनी भारत सरकार, घटकराज्य सरकारे व भारतीय नागरिक यांच्यावर सोपविलेली आहे. राजकीय लोकशाहीची यशस्विता ही सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर अवलंबून असते. मूलभूत ह हक्क व मार्गदर्शक तत्त्वातील तरतूदींचा योग्य समन्वय साधून शासनाने त्यांची अमंलबजावणी केल्यास आर्थिक व सामाजिक लोकशाहीची निर्मिती होऊ शकते. घटनाकारांनी हक्कांचे मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे या दोन भागात वर्गीकरण करण्याच्या मुळाशी त्यांचे महत्त्व जास्त किंवा कमी अशी भावना नव्हती. तर काही हक्क नकारात्मक स्वरूपाचे असल्यामुळे त्यांना ताबडतोब अंमलात आणणे राज्यसत्तेला शक्य होते. म्हणून घटनाकारांनी अशा हक्कांचा समावेश मूलभूत हक्कांच्या यादीत केला, मात्र काही हक्क सकारात्मक स्वरूपाचे असल्याने सर्वांना तात्काळ उपलब्ध करून देणे राज्यसत्तेच्या आवाक्यात नसल्यामुळे ते अ-वादयोग्य (Non-Justiceable) ठरविणे भाग पडले. (अ-वादयोग्य म्हणजे कोणत्याही न्यायालयात या तत्त्वांविरूध्द न्याय (दाद) मागता येत नाही.) म्हणून असे हक्क मार्गदर्शक तत्त्वांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. असे वर्गीकरण केवळ राज्यकारभाराच्या सोयीसाठी केलेले होते. राज्यकारभाराच्या दृष्टिने दोन्ही प्रकारच्या हक्कांचे महत्त्व सारखेच मूलभूत आहे. या दोन्ही हक्कांची सरकारने योग्यरित्या अंमलबजावणी केल्यास भारतातील युगायुगांच्या सामाजिक-आर्थिक विषमतेला, दारिद्र्याला, उच्चनीचतेला, जातीयतेला व सांप्रदायिकतेला तिलांजली देऊन आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेल्या आधुनिक समाजाची निर्मिती होऊ शकेल.

आर्थिक लोकशाही प्रस्थापित केल्याशिवाय राजकीय लोकशाही फारकाळ टिकू शकत नाही. आणि आर्थिक लोकशाही अभावी राजकीय लोकशाहीचे हुकूमशाहीत रूपांतर होत असते, असा आजपर्यंतचा जगाचा इतिहास आहे. तेव्हा राज्यसत्तेने मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांचे योग्यप्रकारे प्रत्यक्षात पालन केले तर देशातील आर्थिक व सामाजिक विषमतेचे उच्चाटन होऊन निकोप राजकीय लोकशाही विकसित होईल. राजकीय लोकशाहीचे हुकूमशाहीत रूपांतर होणार नाही हे पाहण्याचे कर्तव्य व जबाबदारी जशी राज्यकर्त्यांची आहे तेवढीच किंबहुना त्यापेक्षा अधिक ती भारतीय नागरिकांवर आहे. भारतीय नागरिक जेवढे आपल्या हक्कांबाबत जागरूक व दक्ष आहेत तेवढेच त्यांनी आपल्या कर्तव्ये व जबाबदारी बाबत जागरूक व दक्ष राहणे आवश्यक आहे. तसेच देशात सामाजिक, आर्थिक व राजकीय लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी राज्यसत्तेला योग्य ते सहकार्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. तेव्हाच भारतीय घटनाकारांना अपेक्षित समाजवादी समाजव्यवस्था असलेले भारत हे एक कल्याणकारी राज्य बनेल. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ७५ वर्षाचा आढावा घेतल्यास राज्यसत्ता व नागरिक यांनी आपापली कर्तव्ये व जाबाबदारी योग्यरित्या पारपाडली आहेत. त्यामुळे आज २१ व्या शतकात भारत सर्व क्षेत्रांत प्रगतीच्या दिशेने गतीने वाटचाल करत असल्याचे दिसून येत आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) सरनामा : राज्यघटनेची प्रस्तावना, उद्देशपत्रिका

२) शोषण : पिळवणूक

३) अ-वादयोग्य : न्यायालयात न्याय (दाद) मागता न येणे.

४) मॅडमस : आम्ही आज्ञा देतो.

५) हेबियस कॉर्पस : बंदी प्रत्यक्षीकरण म्हणजे शरीराने उपस्थित राहणे.

६) प्रतिषेध : प्रतिबंध, मनाई, निर्बंध, बंधन

७) बेअदबी : अवमान

८) वेठबिगारी : कोणताही मोबदला न देता सक्तीने काम करून घेणे.

९) मानवी हक्क : प्रत्येक व्यक्तीस मानव म्हणून जन्मत:च नैसर्गिकपणे प्राप्त होणारे हक्क यामध्ये जीविताचा, संपत्तीचा व स्वातंत्र्याचा हक्क यांचा समावेश होतो.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. अ) कलम १२ ते ३

२. क) जे.बी.कृपलानी

३. क) ४४ व्या

४. अ) ६

५. अ) कलम ३२

६. अ) कलम ३५९

७. अ) कलम १२

८. ब) कलम १३

९. अ) केशवानंद भारती विरूध्द केरळ राज्य (१९७३)

१०. ड) ८६ व्या

११. ब) कलम ३२

१२. अ) कलम ३६८

१३. ब) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१. अ) ४२ व्या

२. ब) कलम ५१-क

३. अ) १०

४. अ) स्वर्णसिंग समिती

५. अ) एका

६. ब) ११

७. अ) ११

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३ ची उत्तरे**

१. ब) कलम ३६ ते ५१

२. अ) आयर्लंड (आयरीश)

३. क) मार्गदर्शक तत्त्वे

४. अ) प्रा.के.सी.व्हीअर

५. अ) न्या.एम.सी.छगला

६. अ) मार्गदर्शक तत्त्वे

७. अ) कलम ३९

८. अ) कलम ४४

९. क) मार्गदर्शक तत्त्व

**२.६ सरावासाठी स्वाध्याय**

अ) टीपा लिहा.

१. मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये

२. मूलभूत हक्कांचे महत्त्व

३. मूलभूत कर्तव्ये

४. समतेचा हक्क

५. स्वातंत्र्याचा हक्क

६. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

७. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

८. शोषणाविरूध्दचा हक्क

९. घटनात्मक उपाय योजनेचा हक्क

१०. राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भारतीय संविधानातील समतेचा हक्क स्पष्ट करा.

२. भारतीय संविधानातील स्वातंत्र्याच्या हक्काचे टीकात्मक परीक्षण करा.

३. भारतीय संविधानातील धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कांवर चर्चा करा.

४. भारतीय संविधानातील घटनात्मक उपाय योजनेची साधने (मार्ग) याविषयी लिहा.

५. भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांची टीकात्मक चर्चा करा.

६. मूलभूत हक्कांचे महत्त्व सांगा.

७. भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांची चर्चा करा.

८. मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यातील भेद (फरक) स्पष्ट करा.

९. भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्ये स्पष्ट करा.

१०. भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्याची टीकात्मक चर्चा करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ किंवा पुस्तके


1. Avasthi and Avasthi, (2017), Indian Constitution, 2nd ed, Lakshmi Narain Agarwal, Agra.
2. Basu, D.D, & (2015). Introduction to Indian Constitution, Lexis Nexis, Gurgaon
3. Dasarathy Bhuyan, (2016). Political process in India, Kitab Mandal, Cuttak
4. Laxmikanth,M. (2021) .Indian Polity. Mcgraw Hill Education. New Delhi.
5. ऑस्टिन ग्रॅनव्हिल, (२०१३), भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोणशीला, डायमड पब्लिकेशन, पुणे.

६. बंग, के. आर, (२०१६), भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया, विद्या बुक्स पब्लिकेशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

७. भोळे, भा.ल. (२००३) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

८. जोशी, प.ल, भारतीय संविधान शासन आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर

९. पाटील बी.बी, भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. जाधव, तुकाराम आणि शिरपूरकर महेश, भारतीय संविधान आणि भारतीय राजकारण, दि युनिक अकादमी प्रकाशन, पुणे (२०२१).


❑❑❑

# घटक ३
# राज्यघटनेतील विशेष तरतुदी

**अनुक्रमणिका**


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

 ३.३.१ आणीबाणीविषयक तरतुदी

 ३.३.२ घटनादुरुस्तीसाठीच्या तरदुती (कलम ३६८ नुसार)

 ३.३.३ भारतीय निवडणूक आयोग

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ स्वयं अध्यन प्रश्न आणि उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भ ग्रंथ


## ३.१ उद्दिष्ट्ये

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील माहिती मिळेल

१. आणीबाणीविषयक तरतुदीचा अभ्यास करता येईल.

२. कलम ३६८ नुसार घटनादुरुस्तीसाठीच्या तरदुती समजून घेता येईल.

३. भारतीय निवडणूक आयोगचे रचना, कार्य व अधिकार समजून येईल.

## ३.२ प्रास्ताविक

भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेमध्ये आणीबाणीची तरतूद, घटनादुरुस्तीची पद्धत, निवडणूक आयोगाची रचना, अधिकार व कार्ये इत्यादी विशेष तरतुदी स्पष्ट केले आहेत. भारतामध्ये राष्ट्रीय स्तर, घटकराज्य स्तर आणि आर्थिक या तीन स्तरावर आणीबाणी परिस्थितीनुसार लागू करण्याची तरतूद केली आहे. त्यावेळी राष्ट्रपती यांच्याकडे त्यांचा अधिकार देण्यात आले आहे. घटनादुरुस्ती करण्याची पद्धत तीन प्रकारे आहेत. संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करणे, संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती करणे, संसदेच्या

विशेष बहुमताने व घटक राज्यांच्या विधानसभांच्या संमतीने घटनादुरुस्ती करणे. या तीन पद्धतीने घटनादुरुस्ती करत येतो.त्याचप्रमाणे भारतीय निवडणूक आयोगाची रचना, त्यांचे अधिकार कोणते याविषयी घटनेमध्ये सविस्तर तरतूद करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात या विशेष तरतुदींचा आपण अभ्यास करणार आहोत.

## ३.३ विषय विवेचन

आणीबाणीविषयक तरतुदी, घटनादुरुस्तीच्या तरतुदी आणि भारतीय निवडणूक आयोगा इत्यांदीची चर्चा या प्रकरणामध्ये करणार आहोत.

### ३.३.१ आणीबाणीविषयक तरतुदी

भारतीय घटनाकारांनी आणीबाणीची तरतूद करून देशाच्या अंतर्गत वा बहिर्गत असे कोणतेही संकट उभे राहिल्यास केंद्रसरकारला वाढीव अधिकार मिळतील अशी व्यवस्था संविधानात केली. या व्यवस्थेनुसार राष्ट्रपतीला आणीबाणीचे विशेष अधिकार प्राप्त होतात आणि संघराज्यात्म असलेली राज्यव्यवस्था आणीबाणीची घोषणा होताच एककेंद्री राज्यव्यवस्थेचे स्वरूप धारण करते. राष्ट्रीय आणीबाणी, घटक-राज्यातील आणीबाणी आणि आर्थिक आणीबाणी अशा तीन प्रकारच्या आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने राष्ट्रपतीला दिला आहे.भारतीय घटनेच्या अठराव्या भागात आणीबाणीविषयक तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम ३५२ ते ३६० या नऊ कलमांमध्ये त्या समाविष्ट आहेत. ही नऊ कलमे घटनेतील इतर कोणत्याही कलमांपेक्षा जास्त टीकास्पद ठरली आहेत.

**राष्ट्रीय आणीबाणी :** ३५२ व्या कलमानुसार युद्धामुळे वा बाह्य आक्रमणामुळे किंवा अंतर्गत अशांततेमुळे भारताच्या वा भारतातील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका निर्माण झाला आहे, अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो एक जाहीरनामा काढून आणीबाणीची घोषणा करू शकतो अशी तरतूद होती. १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार 'अंतर्गत अशांतता' हे शब्द काढून त्याजागी 'सशस्त्रउठाव' असे शब्द योजले. त्यामुळे जेव्हा अशांततेचे स्वरूप सशस्त्र उठावइतके गंभीर नसेल तेव्हा आणीबाणी पुकारली जाऊ शकत नाही. बाह्य आक्रमण किंवा सशस्त्र उठाव प्रत्यक्ष होण्यापूर्वीही आणीबाणी घोषित केली जाऊ शकते. सर्वसाधारणपणे या जाहीरनाम्याची मुदत एका महिन्याची असते. ती संपण्यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर तो ठेवला जाणे आवश्यक असते. ती त्यास रद्द करू शकतात वा त्याची मुदत वाढवूही शकतात. जाहीरनामा काढण्याच्या वेळी किंवा त्यानंतर महिन्याभरात लोकसभा बरखास्त झाली असेल तर जाहीरनाम्याची मुदत वाढू शकते. मात्र राज्यसभेने त्यास मान्यता देणे आवश्यक असते. नवीन लोकसभा निर्वाचित झाल्यावर तिच्या पहिल्या बैठकीत ३० दिवसांच्या आत जाहीरनाम्यास तिची मान्यता न मिळाल्यास मात्र तो रद्द ठरतो. संसदेच्या दोन्ही सभागृहांची त्या घोषणेला महिन्याभरात संमती मिळावी अशीही व्यवस्था केली. पूर्वी ही मुदत दोन महिन्यांची होती. ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार आणीबाणीच्या घोषणेला संसदेने द्यावयाची मान्यता दोन्ही सभागृहांपैकी प्रत्येकातील एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि उपस्थित मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने दिलेली असावी असे निश्चित करण्यात आले.

१९७५ ची आणीबाणी पुकारली गेली तेव्हा युद्धजन्य परिस्थितीच्या कारणावरून राष्ट्रीय आणीबाणी देशात आधीपासूनच अस्तित्वात होती. त्यातच आणीबाणीचे 'अंतर्गत अशांतता' हे जे दुसरे कारण त्यावेळी घटनेत होते त्याचा आधार घेऊन श्रीमती गांधींनी राष्ट्रपतीकरवी अंतर्गत आणीबाणीची घोषणा करून घेतली. एक आणीबाणी अमलात असताना अशी दुसरी आणीबाणीही लावता येते काय असा प्रश्न यातून निर्माण झाला होता. ३८ वी आणि ४२ वी घटनादुरुस्ती करून राष्ट्रपतीकडे आणीबाणीचा अमर्याद अधिकार आणीबाणीतल्या संसदेनेसोपवला होता.४४ व्या घटनादुरुस्तीने न्यायालयांना तसेच संसदेला आणीबाणीच्या संदर्भातील त्यांचे अधिकार परत मिळवून दिले आहेत.

**घटक राज्यातील आणीबाणी:**

घटक राज्यामध्ये दोन प्रकारच्या आणीबाणी संभवतात. एक, राज्यातील घटनात्मक रचना मोडल्यामुळे निर्माण होऊ शकणारी आणीबाणी आणि दुसरी, आर्थिक कारणामुळे उद्भवलेली आणीबाणी. घटनेच्या ३५५ व्या कलमानुसार 'प्रत्येक राज्याचे परकीय आक्रमणापासून आणि सशस्त्र उठावापासून रक्षण करणे आणि प्रत्येक राज्याचे सरकार या घटनेतील व्यवस्थेनुरूप चालू राहील,' असे आश्वासन देणे हे केंद्रसरकारचे 'कर्तव्य' ठरविण्यात आले आहे. या 'कर्तव्या'चा उल्लेख करण्याची आवश्यकता घटनाकारांना वाटली, कारण भारत संघराज्यात्म असून घटनेचा स्पष्ट आधार असल्याशिवाय केंद्राला राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करता येत नाही. ३५६ व्या कलमात घटनेतील व्यवस्थेनुरूप कारभार चालू राहण्याचे आश्वासन केंद्राकडून देता येण्यासाठी आवश्यक असलेल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. एखाद्या राज्यात घटनेप्रमाणे सरकारी कारभार चालू राहाणे अशक्य आहे अशी राष्ट्रपतीची राज्याच्या राज्यपालाकडून आलेल्या इतिवृत्ताच्या (Report) आधारे वा अन्यथाही जर खात्री झाली असेल तर राष्ट्रपती त्या राज्यासाठी सदर कलमान्वये आणीबाणीचा जाहीरनामा काढू शकतो. राज्याकडून जर केंद्राने दिलेल्या सूचनांचे नीट पालन किंवा अंमलबजावणी झाली नाही तर अशा कारणानेही अशी आणीबाणी घोषित करता येते.मात्र उच्च न्यायालयाच्या अधिकारांबाबत राष्ट्रपतीस असे अधिकार या कलमान्वये प्राप्त होत नाहीत. आधीच्या प्रकारच्या आणीबाणी जाहीरनाम्याप्रमाणेच याही प्रकारच्या आणीबाणीचा जाहीरनामा संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवला जाणे आवश्यक असते. तत्संबंधीच्या इतरही अटी वरीलप्रमाणेच आहेत. मात्र ही आणीबाणी दर सहा महिन्यांनी ठराव करून संसदेला वाढवावी लागते. अर्थात् ही आणीबाणी कोणत्याही परिस्थितीत तीन वषर्षापेक्षा अधिक काळ अमलात राहू शकत नाही. पण ४४ व्या घटनादुरुस्तीने अशी तरतूद केली आहे की या आणीबाणीची मुदत एका वर्षाच्या पलीकडे वाढवायची असल्यास तसा ठराव करताना पुढील दोन गोष्टी असल्या पाहिजेतः (१) संपूर्ण देशात किंवा देशाच्या भागात आणीबाणी लागू असली पाहिजे; (२) आणि निवडणुका घेण्याजोगी परिस्थिती त्या राज्यात नाही असा दाखला निवडणूक आयोगाने दिला पाहिजे. अनु. ३५६ ची व्याप्ती घटनेत कोठेही निश्चित करण्यात आलेली नाही. केंद्राचे आदेश मोडणे, सूचना अमलात न आणणे, अंतर्गत अराजकांमुळे राज्यपालाला मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यकारभार न करता येणे किंवा असे मंत्रिमंडळच उपलब्ध होऊ न शकल्यामुळे कारभार अशक्य होणे अशा सर्व बाबींतून उद्‌भवणाऱ्या परिस्थितींचा ३५६ खाली समावेश होऊ शकतो. त्याचप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांचा अंमल न

करणारे राज्य, तसेच सर्वसाधारण कायदा- सुव्यवस्था राखण्यात अयशस्वी होणारे राज्यही ३५६ कलमान्वये दोषी ठरू शकते.

घटनाकारांच्या चर्चेवरून त्यांना पुढील प्रसंगी ३५६ कलमाचा अवलंब करणे अपेक्षित होते असे दिसते. अंतर्गत अराजकामुळे व हिंसाचारामुळे घटनात्मक यंत्रणा मोडणे; किंवा राज्यमंत्रिमंडळाने केंद्राच्या सूचना पाळण्याचे अमान्य करणे; किंवा बहुमतवाल्या पक्षाने कार्य करायलाच नकार देणे, किंवा राज्यातील पक्षबळ विचित्रपणे वाटले जाऊन कोणत्याच पक्षाचे/पक्षांचे स्थिर शासन अशक्य होऊन बसणे, इत्यादी.अंतर्गत हिंसाचार करणाऱ्यांच्या विरोधात जर राज्यातील सत्ताधारी पक्ष असेल तर त्या पक्षाचे सरकार तो हिंसाचार मोडून काढू शकते पण जर हिंसाचाराला राज्यातल्या सत्ताधारक पक्षाचीच सहानुभूती असली तर ते मंत्रिमंडळ व विधिमंडळही नियंत्रित केले जाणे आवश्यक ठरते आणि त्या प्रसंगी ३५६ चा अवलंब केला जाऊ शकतो. प्रसंग आणीबाणीचा असल्यामुळे नेहमीची जी पद्धती आहे (विधिमंडळ बरखास्त करून निवडणुका घेण्याची) तिचा या प्रसंगी उपयोग केला जाऊ शकत नाही अशा वेळी घटनात्मक अचूकतेपेक्षा वेळेवर हालचाल केली जाणे अधिक महत्त्वाचे ठरते. ३५६ चा उपयोग अशा वेळीही संभवतो, जेव्हा सरकारातील पक्षांची स्थिती अशी असेल की ज्यामुळे अराजकांविरुद्ध कुठलीही उपाययोजना करणे अशक्य होऊन बसावे. हिंसक आंदोलने व जाळपोळ करणाऱ्यांचे पक्षपातीच जेव्हा सरकारात सत्ताधारी असतात तेव्हा केंद्रसरकारला ३५६ चा अवलंब करण्याखेरीज दुसरे गत्यंतरच उरत नाही. त्याचप्रमाणे ३५६ अनुसार आणीबाणी जाहीर करण्याजोगी परिस्थिती एखाद्या राज्यातील सत्ताधारी पक्षाचा कार्यक्रम केंद्रातील सत्ताधारी पक्षाच्या कार्यक्रमापेक्षा वेगळा व विसंगत असल्यामुळेही निर्माण होऊ शकते. राज्यसरकारांची धोरणे जर अखिल भारतीय अर्थव्यवस्थेला मारक ठरू लागली तर त्यावर नियंत्रण ठेवणे केंद्रासाठी अनिवार्य ठरते. केंद्राने सुरू केलेला एखादा कार्यक्रम एखाद्या राज्याने अंमलात न आणणे हेही बऱ्याचदा ३५६ लागू करण्याचे कारण होऊ शकते. पण यात अडचण अशी आहे की, समजा जर राज्यविधिमंडळाचा पाठिंबा असलेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाने केंद्रसरकारच्या नियोजनविषयक सूचना फेटाळल्या - तर अशा वेळी कोणती गोष्ट राज्यातली घटनात्मक यंत्रणा मोडणारी ठरेल? केंद्राच्या सूचना फेटाळणे की राज्य-विधिमंडळाच्या इच्छेविरुद्ध जाणे ?मंत्रिमंडळ व विधिमंडळाने घटनेच्या तरतुदींनुसार कारभार करण्यास नकार दिल्यासही राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोसळू शकते. अशा प्रसंगी प्रथम राज्यपालाने विधानसभा बरखास्त करून फेरनिवडणुकांचा आदेश द्यावा. पण जर तोच पक्ष पुन्हा बहुमतात आला व आपली जबाबदारी घ्यायला तयार नसला तर राष्ट्रपतीकडे वृत्तान्त पाठवून ३५६ वे कलम लागू करण्यास सांगण्याखेरीज राज्यपालास पर्यायच उरणार नाही. पण असा प्रसंग उद्‌भवू शकतो काय? सर्वसामान्यतः नाही. पण शक्यता पूर्णपणे बाद ठरविता येणार नाही. केंद्रसरकारचे एखादे आर्थिक वा अन्य धोरण अमान्य असलेले एखादे राज्यसरकार असेल आणि त्या राज्यसरकारच्या पाठीशी जर त्या राज्याची संबंध जनता असेल तर केंद्राशी घटनात्मक दोन हात करण्याच्या हेतूनेतिथला बहुमताचा पक्ष कार्यभार उचलण्यास नकार देऊ शकतो. केंद्राने आपले भाषेचे वा दारूबंदीचे धोरण इच्छा नसणाऱ्या राज्यांवर लादण्याचा प्रयत्न केल्यास वरील प्रसंग येणे अशक्य नाही. कोणत्याही पक्षाला पुरेसे बहुमत न मिळाल्यास, किंवा अल्पसंख्येत असलेल्या पक्षाने आपल्या मागण्या पूर्ण

होईपर्यंत बहुमताच्या पक्षाला कामकाज चालविणेच अशक्य करून सोडल्यास आणि त्याबरोबरच स्थिर सरकार देऊ शकेल अशी आघाडी निर्माण न होऊ शकल्यास, एखाद दोन संयुक्त आघाड्या व एखाद दोन विधानसभा विसर्जने करून पाहिल्यानंतरही राज्यपालाला जर स्थिर व समर्थ मंत्रिमंडळ मिळूच शकले नाही तर ३५६ कलम लागू करण्याचे आवाहन करण्याशिवाय त्याला गत्यंतरच राहाणार नाही. ३५६ कलमातील 'घटनात्मक व्यवस्था मोडणे' या वाक्याचे असे अनेक अर्थ संभवतात. याहूनही निराळे अर्थ राज्यांमधील वस्तुस्थितीत काढले आहेत, त्यांची चर्चा पुढील प्रकरणात येणारच आहे.

**आर्थिक आणीबाणी :** कलम ३६० नुसार भारताचे किंवा त्यातील एका भागाचे आर्थिक स्थैर्य, वा पत धोक्यात आहे अशी राष्ट्रपतींची खात्री झाली तर आर्थिक आणीबाणीची घोषणा करू शकतात. आर्थिक आणीबाणीचा जाहीरनामा अंमलात असेपर्यंत केंद्राची कार्यकारी सत्ता आपल्या आदेशाद्वारे अर्थविषयक औचित्याची तत्त्वे पाळण्यासंबंधी वा इतरही सूचना कोणत्याही राज्याला देऊ शकते. या आदेशान्वये राज्याच्या नोकरांची वेतने व भत्ते कमी करण्याची, तसेच महत्त्वाची अर्थविधेयके राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवायची तरतूद केली जाऊ शकते. एवढेच नव्हे, तर हा जाहीरनामा जारी असेपर्यंत राष्ट्रपतीला सर्वोच्च व उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांसह केंद्रीय प्रशासनात नोकरी करीत असणाऱ्या कोणाचेही वेतन व भत्ते कमी करण्याचा आदेश देता येतो. आतापर्यंत भारतात आर्थिक आणीबाणी एकदाही जाहिर करण्यात आली नाही.

**आणीबाणीच्या तरतुदींवरील टीका:**

आणीबाणीच्या तरतुदीवर खालील टिका केली जाते.

१) राष्ट्रीय आणीबाणीमुळे व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर गदा येऊ शकते.

२) राष्ट्रीय आणीबाणीमुळे केंद्राचे अधिकार मोठ्या प्रमाणात वाढतात.

३) राष्ट्रपती हा जर संसदेतील बहुमतातल्या पक्षाचा असेल आणि त्याच्या अंगी जर हुकुमशहाला लागणारे उपजत गुण असतील तर तो सहज हुकुमशहा होऊ शकतो.

४) घटक राज्यातील आणीबाणीविषयक तरतुदी अधिकच लोकशाही विरोधी आहेत. त्यामुळे घटकराज्यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो.

५) ३५६ कलमानुसार घटकराज्यातील सरकारे पाडण्याचे प्रयत्न होतील.

६) आर्थिक आणीबाणीमुळे सुद्धा केंद्राला राज्याच्या अर्थव्यवहारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळतो. त्यामुळे केंद्र वरचढ ठरते.

७) आर्थिक आणीबाणी हे कोणत्या भागात आर्थिक स्थैर्य धोक्यात आहे हे कसे ठरवायचे आणि कुणी सांगायचे हा प्रश्न निर्माण होतो.

**आणीबाणीच्या अधिकाराचा प्रत्यक्ष वापर**

भारतामध्ये आणीबाणीचा प्रत्यक्ष वापर करण्यात आला आहे ते पुढीलप्रमाणे-

१) राष्ट्रीय आणीबाणीचा १९६२, १९६५, १९७१ आणि १९७५ साली वापर करण्यात आला आहे. जेव्हा युद्ध परिस्थिती होती किंवा प्रत्यक्ष युद्ध झाले होते तेव्हा या आणीबाणीचा वापर केला.

२) घटकराज्यातील आणीबाणीचा वापर वारंवार झालेला आहे. १९५१ व १९६६ साली पंजाबमध्ये, १९५७ साली त्रावण व कोचीन राज्यामध्ये, १९६४ साली केरळमध्ये करण्यात आला. अशाच प्रकारे उत्तरप्रदेश, बिहार, पंजाब, पं. बंगाल, ओरीसा व केरळ इत्यादी राज्यातही घटनाप्रणित शासनयंत्रणा अशक्य ठरल्याच्या कारणास्तव ३५६ व्या कलमाने दिलेल्या आणीबाणीच्या अधिकाराचा वापर राष्ट्रपतीला करावा लागला होता.

### **३.३.२ घटनादुरुस्तीची पद्धती आणि प्रमुख घटनादुरुस्त्या** (Amendment Procedure and Major Amendments)

जगातील कोणत्याही राष्ट्राची राज्यघटना शाश्वत, कायमस्वरूपी असू शकत नाही. कधीच बदलता येणार नाही, अशी शाश्वत घटना कोणत्याही राष्ट्राने निर्माण केलेली नाही. बदलत्या परिस्थितीनुसार आणि गरजेनुसार घटनेत बदल करणे आवश्यक असते. भारतीय घटनाकारांनी घटनानिर्मितीच्या वेळी पुढील पिढ्यांना केव्हाही घटनेत दुरुस्ती करण्याचा हक्क आहे असे स्पष्ट मत मांडलेले आहे.८ नोव्हेंबर, १९४८ रोजी घटनापरिषदेत भाषण करताना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटनादुरुस्तीच्या आवश्यकतेबाबत पुढील मत मांडले होते, 'भारतीय जनतेची अशी अपेक्षा आहे की, आपण जी घटना निर्माण करणार आहोत ती मजबूत व टिकाऊ स्वरूपाची असावी. परंतु जगातील कोणतीही घटना कायमस्वरूपी असू शकत नाही. जग झपाट्याने बदलत आहे आणि आपण जे ठरवू ते भविष्यकाळात योग्य ठरेलच असे नाही. म्हणून आपली घटना परिवर्तनीय असली पाहिजे. सुरुवातीची काही वर्षे तरी तिच्यात सहजपणे बदल करता आले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशी ग्वाही दिली होती की, 'घटना लवचिक व्हावी आणि तिच्यात कायदेबाजी शिरू नये म्हणूनच घटनादुरुस्ती सहजसुलभ व्हावी अशी तरतूद करण्यात आलेली आहे.' सर बेनेगल राव यांच्या मते, 'प्रौढ मतदान पद्धतीने निवडलेल्या संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार देणे आवश्यक व अपरिहार्य आहे.'

सामान्यतः प्रत्येक राष्ट्राला राज्यघटना असते. घटना हा देशाचा मूलभूत कायदा असतो. शासकीय नियंत्रण करणारी ती एक मूलभूत यंत्रणा असते. शासनसंस्थेच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन विभागांची रचना, त्यांचे परस्परसंबंध आणि त्यांची कार्ये, तसेच शासन आणि नागरिक यांचे संबंध, नागरिकांचे मूलभूत अधिकार इत्यादींचा समावेश राज्यघटनेत असतो. राज्यकारभारासंबंधी ही एक मूलभूत स्वरूपाची नियमावलीच होय. सामान्यतः राज्यघटना स्थिर व परिदृढ असावी लागते. राज्यघटनेत वारंवार बदल झाले तर लोकांचा घटनेवरील विश्वास कमी होईल तसेच घटना म्हणून तिला जो दर्जा असतो तो कमी होईल. तरीपण घटना पूर्णपणे परिदृढ असून चालत नाही, कारण राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाबरोबरच राज्यघटना बदलणे आवश्यक असते, घटना ही गतिमान, विकासक्षम आणि परिस्थितिसापेक्ष राज्यघटना लागते. परिदृढ राज्यघटना असेल आणि तिच्यात बदल होत नसतील तर ही

राज्यघटना जनतेकडून केव्हा उलथून टाकली जाईल हे सांगता येणार नाही. लॉर्ड मेकॉले यांच्या मते, ‘क्रांती होण्याचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रे जेव्हा प्रगती करीत असतात तेव्हा त्यांच्या राज्यघटना तशाच स्थिर (न बदलणाऱ्या) असतात. (The great cause of revolution is this that while nations move onward, constitutions stand still - Macaulay) ‘सामान्यतः परिस्थितीनुसार राज्यघटनेत बदल, दुरुस्त्या घडवून आणणे आवश्यक ठरते. राज्यघटना तशीच संकुचित ठेवून भविष्यकाळात तिचा उपयोग करून घेणे म्हणजे व्यक्तीने प्रौढपणी आपल्या बालपणातील कपडे वापरण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल’ असे प्रो. गार्नर यांनी म्हटले आहे. तेव्हा राज्यघटना परिस्थितीनुसार, परिवर्तनीय असणे योग्य होय. प्रसिद्ध राजकीय विचारवंत के. सी. व्हीअर यांच्या मते, ‘भारतीय घटनेने परिदृढता आणि परिवर्तनीयता यांचा वास्तववादी आणि व्यवहार्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.’

एकंदरीत भारतीय घटनेत घटनाकारांनी घटनादुरुस्तीची पद्धती स्वीकारलेली आहे. घटनाकारांनी कॅनडा, आयर्लंड, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका अशा विविध राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास करून भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्तीची पद्धती निश्चित केलेली आहे. जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींना घटनादुरुस्तीचा अधिकार दिलेला आहे. तसेच घटक राज्यांच्या विधिमंडळांना घटनादुरुस्तीचा अधिकार दिलेला आहे. भारतीय घटनादुरुस्तीची पद्धती तशी साधी, सोपी नाही. साध्या बहुमताने घटनेतील काही कलमांत बदल करता येतो. परंतु काही कलमांबाबत विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला जातो. संसदेच्या विशिष्ट बहुमताने आणि घटक राज्यांच्या विधिमंडळाच्या संमतीने घटनादुरुस्ती करणे कठीण जाते. त्यामुळे भारतीय राज्यघटना काहीशी परिदृढ स्वरूपाची बनली आहे. भारतीय घटनादुरुस्तीबाबत असे म्हणता येईल की, भारतीय राज्यघटना अंशतः परिवर्तनीय आणि अंशतः परिदृढ स्वरूपाची आहे. तसेच ती इंग्लंडच्या राज्यघटनेएवढी अति लवचिक नाही किंवा अमेरिकेच्या राज्यघटनेएवढी अति परिदृढही नाही.गेल्या ६० वर्षांच्या कालखंडात भारतीय राज्यघटनेत ११० घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. तेव्हा ही घटना काही अंशी परिवर्तनीय वाटत असली तरीही तिचे संसदीय स्वरूप, तिचा आशय आणि उद्देश यामध्ये तीळमात्र बदल झालेला नाही. कालमानानुसार, परिस्थितीनुसार आणि गरजेनुसार भारतीय राज्यघटनेत अनेक बदल करण्यात आलेले आहेत.

**घटनादुरुस्तीची पद्धती** (Amendment Procedure)

भारतीय घटनाकारांनी स्थैर्य आणि परिवर्तन यात संतुलन साधण्यासाठी ३६८ वे कलम समाविष्ट केलेले आहे. भारतीय घटनेच्या २० व्या भागातील ३६८ व्या कलमात घटनादुरुस्तीची पद्धती स्पष्ट केलेली आहे. भारतीय घटनेत दुरुस्ती करण्याच्या तीन पद्धती आहेत.

१. संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करणे.

२. संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती करणे.

३. संसदेच्या विशेष बहुमताने व घटक राज्यांच्या विधानसभांच्या संमतीने घटनादुरुस्ती करणे.

**१. साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करणे :** संसदेला आवश्यक वाटल्यास किंवा घटक राज्यांनी तशी विनंती केल्यास संसद साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करू शकते. राज्यसभा व लोकसभा या दोन्ही सभागृहांत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्तीचे विधेयक मंजूर केले जाते. संसद ज्या पद्धतीने सर्वसाधारण मसुदा मंजूर करते त्याच पद्धतीने घटनादुरुस्तीचे विधेयक दोन्ही गृहांत मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतीच्या सहीने ते विधेयक मंजूर होते. पुढील विषयांसंबंधी घटनादुरुस्ती करताना ही पद्धती स्वीकारली जाते.

१. नवीन घटक राज्ये निर्माण करणे. घटक राज्यांच्या सीमांत, नावात किंवा सरहद्दीत बदल करणे. (कलम २,३ आणि ४)

२. घटक राज्यातील विधान परिषद हे वरिष्ठ गृह रद्द करणे किंवा घटक राज्याच्यामागणीनुसार विधान परिषद निर्माण करणे. (कलम १६९)

३. नागरिकत्वासंबंधी कायदे करणे, नागरिकत्व देणे किंवा नागरिकत्व काढून घेणे. (कलम ५ ते ११)

४. लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागा ठरविणे. (कलम ८१) संसदेची गणसंख्या ठरविणे. (कलम १०० (३)) संसदेच्या सदस्यांचे विशेष हक्क ठरविणे. (कलम १०५ (३)) संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते ठरविणे. (कलम १०६) संसदेच्या कामकाजपद्धतीचे नियम ठरविणे. (कलम ११८)

५. सर्वोच्च न्यायालयाच्या कार्याची कक्षा ठरविणे. (कलम १३५) सर्वोच्च न्यायालयातील तात्पुरत्या न्यायाधीशांची निवड करणे. (कलम १२४)

६. संसदेच्या किंवा घटक राज्यांच्या निवडणुकीसंबंधी मतदारांच्या याद्या तयार करणे, मतदार संघ निश्चित करणे. (कलम ३२७)

७. न्यायालयातील कामकाजाची भाषा ठरविणे. (कलम ३४८)

८. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती, सर्वोच्च आणि उच्च न्यायाधीशांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या अटी ठरविणे. (परिशिष्ट-२)

९. अनुसूचित प्रदेश, टोळ्यांचे प्रदेश यांच्या प्रशासनासंबंधी आणि नियंत्रणासंबंधी नियमकरणे. (परिशिष्ट-५)

१०. आसाम, मेघालय, मिझोराम विभागांतील प्रशासनासंबंधी नियम करणे. (परिशिष्ट-६)

११. भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे वेतन व भत्ते ठरविणे. (कलम १४८)

**२. संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती करणे :** संसदेच्या दोन्ही गृहांत (राज्यसभा व लोकसभा) २/३ बहुमताने घटनादुरुस्तीच्या विधेयकाला मंजुरी देणे म्हणजेच विशेष बहुमताने घटनादुरुस्ती करणे होय. भारतीय घटनेच्या ३६८ व्या कलमात ही पद्धती स्पष्ट केलेली आहे. संसदेच्या प्रत्येक गृहात गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व हजर असलेल्या सदस्यांपैकी २/३ सदस्यांनी घटनादुरुस्तीच्या विधेयकाला मंजुरी दिली असता आणि राष्ट्रपतीची मंजुरी मिळाली असता ती घटनादुरुस्ती होऊ शकते. या

घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेमध्ये 'विशेष' प्रकारचे बहुमत किंवा 'दुहेरी बहुमत' महत्त्वाचे मानले जाते. दुहेरी बहुमत याचा अर्थ असा की संसदेच्या प्रत्येक गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने म्हणजेच गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या निम्म्याहून अधिक सदस्यांची मान्यता घेणे, शिवाय त्या गृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासद संख्येच्या २/३ बहुमताने घटनादुरुस्ती विधेयकास मंजुरी घेणे आवश्यक असते. सध्याच्या लोकसभेत ५४४ प्रतिनिधींपैकी २७३ प्रतिनिधी आणि राज्यसभेत २५० पैकी १२६ प्रतिनिधी हे साधे बहुमत आवश्यक असतेच, शिवाय प्रत्येक गृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या प्रतिनिधीसंख्येच्या २/३ प्रतिनिधींची मान्यता आवश्यक असते. उदा. लोकसभेत ४५० प्रतिनिधींनी उपस्थित राहून मतदान केले तर त्यांचे २/३ बहुमत म्हणजे ३०० प्रतिनिधी होय. तेव्हा विधेयकाच्या संमतीसाठी ३०० प्रतिनिधींची संमती आवश्यक ठरते. ही संख्या २७३ पेक्षा जास्त आहे. त्यामुळे हे घटनादुरुस्ती विधेयक संमत होते. राज्यसभेत संमतीसाठी या घटनादुरुस्ती विधेयकाला १२६ पेक्षा जास्त सदस्यसंख्येची संमती आवश्यक असते. राज्यसभेत २१० सदस्यांनी उपस्थित राहून मतदान केले आणि त्यापैकी १४० सदस्यांची मान्यता त्या विधेयकाला मिळाली असेल तर ती घटनादुरुस्ती मंजूर होते. अशा प्रकारे दोन्ही गृहांकडून दुहेरी बहुमत पद्धतीने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर केले जाते.

**३. संसदेच्या विशेष बहुमताने व घटक राज्याच्या विधानसभाच्या संमतीने घटनादुरुस्ती करणे**

भारतीय घटनेच्या कलम ५४, ५५, ७३, १६२ आणि २४१ इत्यादी कलमांत दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताने व घटक राज्यांच्या विधानसभांच्या संमतीने घटनादुरुस्ती करणे. भारतीय घटनेच्या कलम ३६८ मध्ये ही पद्धती दिलेली आहे. संसदेच्या दोन्ही गृहांत (राज्यसभा व लोकसभा) गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व हजर असलेल्या सदस्यांच्या २/३ बहुमताने घटनादुरुस्तीचे विधेयक मंजूर केले जाते. नंतर ते विधेयक सर्व घटक राज्यांच्या विधानसभांच्या संमतीसाठी पाठवावे लागते. एकूण घटक राज्यांपैकी निम्म्याहून अधिक घटक राज्यांच्या विधानसभांनी ते विधेयक बहुमताने मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतींच्या संमतीने ते घटनादुरुस्तीचे विधेयक मंजूर होते.

पुढील विषयासंबंधी दुरुस्ती करण्यासाठी ही विशिष्ट पद्धती स्वीकारली जाते.

१. भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक आणि निवडणूक पद्धती (कलम ५४ व ५५)

२. केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांची कार्यकारी सत्ता (कलम ७३ ते १६२)

३. केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्यातील कायदेविषयक संबंध (परिशिष्ट-७)

४. सर्वोच्च न्यायालय आणि घटक राज्यातील उच्च न्यायालय यासंबंधीच्या तरतुदी. (घटनेचा ५ वा भाग प्रकरण ४ थे आणि ६ वा भाग - प्रकरण ५ वे)

५. संसदेतील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व (परिशिष्ट-४)

६. ३६८ व्या कलमातील घटनादुरुस्तीची पद्धती. (यासंबंधी २४ वी व ४२ वी घटनादुरुस्ती केलेली आहे. आतापर्यंत या पद्धतीने भारतीय राज्यघटनेत ११० घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत.

संसदेच्या दोन्ही गृहांनी मंजूर केलेल्या घटनादुरुस्तीच्या विधेयकाला राष्ट्रपती मंजुरी देतो. घटनादुरुस्तीच्या संमत झालेल्या विधेयकास राष्ट्रपती नकार देऊ शकत नाही. (२४ वी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७१) घटनादुरुस्तीच्या विधेयकास संमती मिळविण्यासाठी दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलाविण्याची तरतूद भारतीय घटनेत नाही. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांत घटनादुरुस्तीचे विधेयक स्वतंत्रपणे घटनादुरुस्तीच्या पद्धतीनुसार संमत करावे लागते.

**प्रमुख घटनादुरुस्त्या** (Major Amendments)

१ ली घटनादुरुस्ती (१९५१) : भारतीय घटनेच्या कलम १५, १९, ३१ (क), ११ (ख), ८५, ८७, १७४, ३४१, ३४२, ३७२, ३७६ मध्ये बदल करण्यात आले आहेत. समतेचा हक्क, भाषणस्वातंत्र्य, मालमत्तेचा हक्क, संसदेची कार्यपद्धती, राष्ट्रपतीचे अभिभाषण, राज्य विधानमंडळाची कार्यपद्धती, राज्यपालांचे अभिभाषण, अनुसूचित जाती-जमाती, राष्ट्रपतीचे कायद्यांच्या अंमलबजावणीविषयीचे अधिकार, उच्च न्यायालयातील न्यायाधीश, नवव्या अनुसूचित भर घालणे इत्यादींसंबंधीच्या कलमांत दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

३ री घटनादुरुस्ती (१९५४) : सार्वजनिक हितासाठी सातव्या परिशिष्टातील समाईकसूचीतील ३३ वा विषय (अन्नधान्य, पशुआहार, कापूस, ज्यूट इत्यादी) केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आला.

४ थी घटनादुरुस्ती (१९५५) : घटनेच्या ३१ व्या कलमात (मालमत्तेच्या अधिकारात) आणि घटनेच्या नवव्या परिशिष्टात दुरुस्ती करण्यात आली. सार्वजनिक हितासाठी राज्य खासगी मालमत्ता सक्तीने काढून घेईल त्यासाठी संसद ठरविल तो मोबदला देण्यात येईल. त्यासंबंधी व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयात जाता येणार नाही.

७ वी घटनादुरुस्ती (१९५६) : राज्यपुनर्रचना आयोगाने भाषावार प्रांतरचनेसंबंधी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन घटनेत बरेच महत्त्वाचे बदल करण्यात आले.

८ वी घटनादुरुस्ती (१९५९) : अनुसूचित जाती-जमाती आणि अँग्लो इंडियन लोकांसाठी लोकसभा आणि विधानसभा यात जागांचे आरक्षण दहा वर्षांनी वाढविण्यात आले.

१२ वी घटनादुरुस्ती (१९६२) : गोवा, दमण, दीव हे केंद्रशासित प्रदेश करण्यात येऊन ते संघीय प्रदेशात समाविष्ट करण्यात आले.

१३ वी घटनादुरुस्ती (१९६२) नागालँड या भारतीय संघराज्याच्या सोळाव्या घटक राज्याची स्थापना करण्यात आली.

१४ वी घटनादुरुस्ती (१९६२) फ्रेंचांच्या नियंत्रणाखालून मुक्त झालेला पाँडिचेरी प्रदेश हा संघीय प्रदेशात समाविष्ट करण्यात आला तसेच केंद्रशासित प्रदेशाकरिता विधिमंडळ आणि मंत्रिमंडळ निर्माण करण्याबाबतचा अधिकार संसदेला देण्यात आला.

१५ वी घटनादुरुस्ती (१९६३) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ६० ऐवजी ६२ करण्यात आले. तसेच उच्च न्यायालयांना प्रतिलेख काढण्याचे व्यापक अधिकार देण्यात आले.

१७ वी घटनादुरुस्ती (१९६४) : ३१ व्या कलमातील मालमत्तेच्या अधिकारासंबंधी ही घटनादुरुस्ती करण्यात आली. Estate (संपदा) या शब्दाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली.

२३ वी घटनादुरुस्ती (१९६९) : अनुसूचित जाती–जमातीसाठी आणि अँग्लो इंडियनसाठी आरक्षण ठेवण्याची मुदत आणखी दहा वर्षे म्हणजे १९८० पर्यंत वाढविण्यात आली.

२४ वी घटनादुरुस्ती (१९७१) : घटनादुरुस्तीसंबंधीच्या घटनेच्या १३ व ३६८ या कलमांत दुरुस्त्या करून संसदेच्या मूलभूत हक्कांचे संक्षेपीकरण करण्याचा अधिकार स्पष्ट करण्यात आला.

२५ वी घटनादुरुस्ती (१९७१) : भारतीय घटनेच्या ३१ व्या कलमामध्ये 'मोबदला' (भरपाई) या शब्दाऐवजी 'रक्कम' हा शब्द घालण्यात आला. सार्वजनिक हितासाठी शासनाने घेतलेल्या खासगी संपत्तीसाठी 'मोबदला' देण्याऐवजी शासन ठरविल ती 'रक्कम' (Amount) देण्यात येईल.

२६ वी घटनादुरुस्ती (१९७१) : संस्थानिकांचे विशेष अधिकार आणि त्यांचे तनखे रद्द करण्यात आले.

३१ वी घटनादुरुस्ती (१९७३): लोकसभेची सदस्यसंख्या ५२५ वरून ५४५ करण्यात आली आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व २५ ऐवजी २० करण्यात आले. ३५ वी घटनादुरुस्ती (१९७५) : सिक्कीम राज्याला संलग्न राज्याचा (Associate State) दर्जा देण्यात आला. तसेच भारत सरकार आणि सिक्कीम यांचे संबंध निश्चित करण्यात आले.

३६ वी घटनादुरुस्ती (१९७५) सिक्कीम राज्याला भारताच्या घटक राज्याचा दर्जा देण्यात आला.३९ वी घटनादुरुस्ती (१९७५) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभेचे सभापती यांच्या निवडणुका न्यायालयीन कक्षेबाहेर ठेवण्यात आल्या. ४१ वी घटनादुरुस्ती (१९७६) राज्य लोकसेवा आयोगातील सदस्यांचे निवृत्ती वय ६० वरून ६२ करण्यात आले.

४२ वी घटनादुरुस्ती (१९७६) : बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने भारतीय घटनेचा सरनामा, या घटनेतील इतर ४० कलमे आणि ७ वे परिशिष्ट यात दुरुस्त्या सुचविण्यात येऊन १४ नवी कलमे समाविष्ट करण्यात आली. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेमध्ये आमूलाग्र बदल बडवून आणला, त्यामुळे त्या घटनादुरुस्तीला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

१ सप्टेंबर, १९७६ रोजी बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीचे विधेयक संसदेत मांडण्यात आले. २ नोव्हेंबर, १९७६ रोजी संसदेने हे विधायक संमत केले. १८ डिसेंबर, १९७६ रोजी राष्ट्रपतींनी आपल्या सहीने या घटनादुरुस्तीला मान्यता दिली. भारतीय घटनेचा सरनामा, मूलभूतअधिकार, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, राष्ट्रपतीचे अधिकार, विधिमंडळ, न्यायमंडळ, केंद्र राज्य संबंध, आणीबाणी, घटनादुरुस्तीची पद्धती इत्यादी विषयांबाबत अनेक महत्वाचे बदल ४२ व्या घटनादुरुस्तीने केलेले आहेत, त्यामुळे घटनेची मूलभूत चौकटच बदलली गेली असे वाटते.

**१. भारतीय घटनेचा सरनामा :** सुरुवातीला भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'सार्वभौम, लोकशाही व गणराज्य' अशी शब्द योजना होती. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने 'सार्वभौम, समाजवादी, धर्मातीत, लोकशाही गणराज्य' (Sovereign, Socialist, Secular, Democratic, Republic) अशी नवी शब्दयोजना करण्यात आली. समाजवादी व धर्मातीत हे दोन नवे शब्द घालण्यात आले.

**२. मूलभूत अधिकार :** कलम ३१ (क) ची व्याप्ती वाढविण्यात आली. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करताना मूलभूत हक्कांच्या १४, १९ व ३१ कलमांचा भंग होतो या मुद्द्यांवर कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही. त्यासंबंधीचा कोणताही कायदा मूलभूत हक्कांशी विसंगत आहे किंवा त्यामुळे मूलभूत अधिकार संकुचित किंवा समाप्त होतात म्हणून तो कायदा कोणतेही न्यायालय अवैध ठरवू शकत नाही. कलम ३१ (ड) या नवीन कलमाचा घटनेत समावेश करण्यात आला. या कलमाद्वारे राष्ट्रविरोधी कारवाया तसेच त्यासाठी स्थापन होणाऱ्या संघटनांना प्रतिबंध करणारा कोणताही कायदा मूलभूत अधिकाराच्या विरोधी असला तरीही तो रद्द करता येणार नाही.

**३. मार्गदर्शक तत्त्वे :** भारतीय घटनेत कलम ३९ (अ), ४३ (अ) आणि ४८ (अ) या तीन नव्या कलमांचा समावेश करण्यात आला. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना मोफत कायदेविषयक सल्ला, औद्योगिक क्षेत्रांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग, जंगलसंपत्ती आणि वन्यप्राणी यांचे संरक्षण ही नवी मार्गदर्शक तत्त्वे घटनेत समाविष्ट करण्यात आली.

**४. मूलभूत कर्तव्ये :** घटनाकारांनी भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला नव्हता. ती गृहीत धरण्यात आलेली होती. ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार ५१ (अ) भाग ४ (अ) हे नवे कलम घालण्यात आले. त्यानुसार भारतीय नागरिकांची दहा मूलभूत कर्तव्ये देण्यात आलेली आहेत.

**राष्ट्रपतीचे अधिकार :** भारताचा राष्ट्रपती इंग्लंडच्या राणीप्रमाणे नामधारी प्रमुख असून वास्तववादी सत्ता पंतप्रधान व मंत्रिमंडळाकडे असते. या नव्या तरतुदीनुसार (७४ व्या कलमानुसार) मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतीवर पूर्णपणे बंधनकारक राहील.

कलम ७७ नुसार केंद्र सरकारचा कारभार सोयीस्कर पद्धतीने व्हावा आणि खातेवाटप मंत्र्यांमध्ये योग्य पद्धतीने व्हावे यासाठी राष्ट्रपतींना नियम करण्याचा अधिकार आहे. नव्या घटनादुरुस्तीने हे नियम दाखल करण्याची मागणी न्यायालय करणार नाही. त्यामुळे मंत्रिमंडळाची सत्ता प्रबल होऊन न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मर्यादित झाले.

**५. विधिमंडळासंबंधीच्या दुरुस्त्या :** (अ) विधिमंडळातील जागांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली. या दृष्टीने कलम ५५, ८१, १७० व ३३० मध्ये बदल करण्यात आले. संसद आणि राज्यांची विधिमंडळे यातील सदस्यांची संख्या लोकसंख्येशी संबंधित असते. १९७१ सालच्या शिरगणतीचा आधार मानून विधिमंडळाची सदस्य संख्या गोठविण्यात आली. तसेच इ.स. २००१ पर्यंत या संख्येत वाढ करता येणार नाही. अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षित केलेल्या जागांमध्ये वाढ केली जाणार नाही.

(ब) कलम ८३ आणि १७२ मध्ये दुरुस्ती करून लोकसभा आणि विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षांऐवजी सहा वर्षे करण्यात आला.

(क) कलम १०० आणि १९१ नुसार विधिमंडळाची गणसंख्या (कोरम) विधिमंडळाच्या गृहातील एकूण सभासद संख्येच्या १/१० मानली आहे. या दुरुस्तीनुसार गणसंख्या निश्चित करण्याचा अधिकार प्रत्येक सभागृहात देण्यात आला.

(ड) विधिमंडळाच्या सदस्यांचे हक्क ठरविण्याचा अधिकार संसदेच्या प्रत्येक गृहाला देण्यात आला. (कलम १०५ व १९४)

(इ) विधिमंडळाच्या सदस्यांची पात्रता ठरविताना राष्ट्रपती निवडणूक मंडळाचा सल्ला घेतील आणि आवश्यक असेल तेथे चौकशी करतील.

६. न्यायविषयक दुरुस्त्या (अ) केंद्र सरकारच्या कायद्यांची वैधता तपासण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाला असेल. उच्च न्यायालये फक्त राज्यांच्या वैधतेवर निवाडा देतील. ज्या खटल्यामध्ये केंद्र आणि घटक राज्यांचा संबंध येतो तेथे कायद्यांची वैधता तपासण्याचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयासच देण्यात आला आहे.

(ब) जेव्हा एकाच वेळी एखादा खटला सर्वोच्च व उच्च न्यायालय या दोहोंत चालू असेल तर तो खटला उच्च न्यायालयाच्या कक्षेतून काढून सर्वोच्च न्यायालयाकडे पाठविण्याचा अधिकार भारताच्या ॲटर्नी जनरलला देण्यात आलेला आहे. एका उच्च न्यायालयाकडून दुसऱ्या उच्च न्यायालयाकडे दावा पाठविण्याचे अधिकार सर्वोच्च्च न्यायालयाला देण्यात आले.

(क) केंद्रीय कायद्यांची वैधता पाहताना सर्वोच्च न्यायालयाच्या कमीतकमी सात न्यायाधीशांनी सुनावणी केली पाहिजे. यापैकी २/३ बहुमतांनी किंवा किमान पाच न्यायाधीशांचे एकमत होऊन निवाडा झाला पाहिजे अशी दुरुस्ती करण्यात आली. उच्च न्यायालयात घटक राज्याच्या कायद्यांची वैधता तपासताना त्या खटल्याची सुनावणी पाच न्यायाधीशांपुढे झाली पाहिजे. उच्च न्यायालयात २/३ बहुमताने किंवा चार न्यायाधीशांच्या एकमताने न्यायनिवाडा झाला पाहिजे अशी तरतूद करण्यात आली. केंद्रीय किंवा राज्याचा कायदा अवैध ठरविण्यासाठी बेंचच्या २/३ बहुमतांची तरतूद केल्याने एखादा कायदा अवैध ठरविणे कठीण होईल याबाबत शंका नाही. गोलकनाथ खटल्यात केवळ एका न्यायाधीशाच्या मताने निर्णयाचे स्वरूप बदलले होते.

(ड) उच्च न्यायालयाला मूलभूत हक्कांच्या बाबतीत तसेच इतर कोणत्याही बाबतीत सूचना, हुकूम किंवा आदेश देण्याचा जो अधिकार होता तो कमी करण्यात आला आहे. प्रस्तुत दुरुस्तीमुळे उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र फार मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आले आहे. उच्च न्यायालयांचे अधिकार कमी केल्यामुळे नागरिकांच्या अधिकारांवर अन्याय, आक्रमण करण्याची शासकीय अधिकाऱ्यांची प्रवृत्ती वाढेल असा धोका संभवतो. उच्च न्यायालयातील खटला स्वत:कडे चालविण्यास घेणे, तसेच एका उच्च

न्यायालयातील खटला दुसऱ्या उच्च न्यायालयात पाठविणे असे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार समर्थनीय वाटत असले तरी म्हणजे न्यायव्यवस्थेवर अन्याय होय.

(इ) केंद्र, राज्ये, स्थानिक शासन यातील सनदी नोकरांचे तंटे, तक्रारी यांची दखल घेण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार (कलम ३२३ (अ) (ब)) संसदेला देण्यात आला आहे. प्रशासकीय न्यायालयांची तरतूद प्रथमच करण्यात आलेली आहे त्यामुळे ती स्वागतार्ह वाटते.

**७. केंद्र-राज्य संबंधविषयक दुरुस्त्या :** (अ) बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने घटनेत २५७ (अ) या नव्या कलमाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार एखाद्या घटक राज्यात कायदा आणि सुव्यवस्था याबाबत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास केंद्र सरकार आपले लष्करी दल त्या घटक राज्यात पाठवू शकते. हे लष्करी दल केंद्र सरकारच्या आदेशानुसार कार्य करते. घटक राज्य सरकारचे या दलावर नियंत्रण राहणार नाही. यासंबंधी कायदे करण्याचा अधिकार संसदेला राहील. या नव्या तरतुदीमुळे घटक राज्याची स्वायत्तता धोक्यात आली आहे. कारण या तरतुदीचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे. केंद्र सरकारच्या विरोधी धोरण असणाऱ्या घटक राज्यावर अन्याय, आक्रमक करण्याच्या हेतूने या तरतुदीचा दुरुपयोग केंद्र सरकारकडून होण्याचा संभव आहे.

(ब) केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्या विषयांबाबत दुरुस्ती करण्यात येऊन जिल्हा पातळीवरील दुय्यम न्यायालयांची रचना आणि न्यायदान, शिक्षण, वजने, मापे, जंगले, वन्य प्राण्यांचे संरक्षण हे विषय राज्य सूचीतून काढून समाईक सूचीत घालण्यात आले आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन यावर प्रसारित होणाऱ्या जाहिरातीवरील कर घटक राज्यांच्या उत्पन्नातून वगळण्यात आले आहेत.

**८. आणीबाणीसंबंधीच्या तरतुदी** (अ) राष्ट्रीय आणीबाणी : बाह्य आक्रमण, युद्ध यामुळे देशाची सुरक्षितता किंवा अंतर्गत सुरक्षितता धोक्यात येत असेल तर राष्ट्रपती आणीबाणी घोषित करतात. ती आणीबाणी सर्व देशाला लागू होत असे. आता नव्या दुरुस्तीनुसार राष्ट्रपती अशी आणीबाणी एखाद्या भागालाही लागू करू शकतात. आणीबाणीची घोषणा संपूर्ण भारतासाठी किंवा भारताच्या एखाद्या विशिष्ट भागासाठी करता येईल. तसेच तिचा अंमल संपूर्ण भारतासाठी किंवा त्या विशिष्ट भागापुरताच चालू ठेवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आलेला आहे.

(ब) घटक राज्यातील राष्ट्रपती राजवट : घटनेच्या ३५६ व्या कलमानुसार घटक राज्यात राष्ट्रपती राजवट चालू करता येते. अशा घोषणेला संसद एकावेळी सहा महिने कालावधीसाठी संमती देते. नव्या दुरुस्तीनुसार आता संसद प्रत्येक वेळी एक वर्षासाठी मुदत देऊ शकते आणि अशा प्रकारे त्या राज्यात अशी एकूण सलग तीन वर्षे राष्ट्रपती राजवट (पंजाब राज्य) चालू ठेवता येते. अंशतः आणीबाणी घोषित करण्याच्या नव्या तरतुदीमुळे देशाच्या एका भागातील जनता मूलभूत हक्कांचा उपभोग घेते आणि त्याचवेळी दुसऱ्या भागातील जनता त्याच हक्कांपासून वंचित होते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने ही तरतूद अयोग्य वाटते.

**९. घटनादुरुस्तीच्या ३६८ व्या कलमातील महत्त्वाचे बदल :** १. घटनेच्या ३६८ व्या कलमानुसार केलेल्या घटनादुरुस्तीला आता कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणास्तव आव्हान देता येणार नाही.

२. घटनादुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारांवर कोणत्याही स्वरूपाचे बंधन राहणार नाही. या तरतुदीमुळे भारतीय संसदेच्या मूलभूत हक्कांचे सक्षमीकरण करण्याच्या सार्वभौम अधिकारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. संसदेचे अधिकार व महत्त्व वाढून न्यायालयाचे अधिकार मर्यादित करण्यात आले आहेत.

४३ वी घटनादुरुस्ती (१९७८) : बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने घटनेच्या १४, १९, ३१ कलमांतील मूलभूत अधिकारांचा केलेला संकोच रद्द करण्यात आला, त्यामुळे न्यायालयाला मूलभूत अधिकारांच्या संदर्भात वैधता ठरविण्याचा अधिकार पुन्हा प्राप्त झाला.

४४ वी घटनादुरुस्ती (१९७८) : ही घटनादुरुस्ती म्हणजे बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीमधील त्याज्य भाग काढून टाकण्यासाठी केलेली एक उपाययोजनाच होय. चव्वेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार पुढील काही बदल करण्यात आले.

१. मालमत्तेचा अधिकार मूलभूत हक्कातून वगळण्यात आला आणि तो हक्क घटनेच्या ३०० (क) कलमात समाविष्ट करण्यात आला.

२. लोकसभेची व विधानसभांची मुदत ६ वर्षांवरून पुन्हा ५ वर्षांवर आणण्यात आली.

३. ४२ व्या घटनादुरुस्तीमुळे सर्वोच्च न्यायालयांच्या अधिकारांवर लादलेले निर्बंध दूर करण्यात आले.

४. अंतर्गत आणीबाणी जाहीर करण्याच्या शासनाच्या अधिकारावर काही निर्बंध घालण्यात आले.

५. उच्च न्यायालयासमोर चालू असलेला खटला स्वतःकडे घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला.

६. घटनेच्या ३६१ व्या कलमात दुरुस्ती करून वृत्तपत्रांना विशेष संरक्षण दिले आहे; त्यासाठी ३६१ (अ) या कलमाची तरतूद करण्यात आली.

७. घटनेच्या ३५६ व्या कलमात ४२ व्या घटनादुरुस्तीने जो बदल केला होता तो रद्द करण्यात आला. घटक राज्यात राष्ट्रपती राजवट लादल्यानंतर सहा महिन्याच्या आत संसदेची मंजुरी घेण्याची पूर्वीची अट चालू ठेवण्यात आली. ही मुदत १ वर्षे करण्यात आली होती ती रद्द करण्यात आली.

४५ वी घटनादुरुस्ती (१९८०) : संसद आणि विधानसभा यातील अनुसूचित जाती- जमातींसाठी आरक्षित केलेल्या जागा आणखी दहा वर्षांसाठी ठेवण्यात आल्या.

५२ वी घटनादुरुस्ती (१९८५) : पक्षांतराच्या वाढत्या प्रमाणावर निर्बंध घालण्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली. निवडून आल्यानंतर स्वतःच्या पक्षाचा त्याग करून दुसऱ्या पक्षाचे सदस्यत्व स्वीकारण्याच्या पद्धतीवर निर्बंध घालण्यात आले.

५३ व्या घटनादुरुस्तीने (१९८६) मिझोराम संघप्रदेशाला, ५५ व्या घटनादुरुस्तीने (१९८६) अरुणाचल प्रदेश या संघप्रदेशाला आणि ५७ व्या घटनादुरुस्तीने (१९८७) गोवा या संघप्रदेशाला घटक राज्याचा दर्जा देण्यात आला.

५९ वी घटनादुरुस्ती (१९८८) : राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहोचणारी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पंजाबात आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला.

६१ वी घटनादुरुस्ती (१९८८) मतदाराचे पात्रता वय २१ वर्षांवरून १८ वर्षांपर्यंत खाली आणण्यात आले.

६२ वी घटनादुरुस्ती (१९८९) : लोकसभा व विधानसभा यातील अनुसूचित जाती-जमातीसाठी आरक्षित जागांची मुदत आणखी दहा वर्षांनी म्हणजे इ. स. २००० पर्यंत वाढविण्यात आली.

६३ वी घटनादुरुस्ती (१९८९) : पंजाबात आणीबाणी जाहीर करण्याची तसेच तेथील नागरिकांच्या जगण्याचा हक्क स्थगित करण्याची तरतूद असलेली ५९ वी घटनादुरुस्ती रद्द करण्यात आली.

७१ वी घटनादुरुस्ती (१९९२) : कोकणी, मणिपुरी व नेपाळी या भाषांचा घटनेच्या आठव्या परिशिष्टात समावेश करण्यात आला, त्यामुळे आता भारतीय भाषांची संख्या 'अठरा' झाली आहे. विधानसभा व लोकसभा मतदार संघाची फेररचना करण्यात यावी.

७३ वी घटनादुरुस्ती (१९९२) : त्रिस्तरीय पंचायत राज्याच्या पद्धतीला अधिक बळकटी आणण्याच्या दृष्टीने ही दुरुस्ती करण्यात आली. ग्रामसभेस अधिक अधिकार, अनुसूचित जाती- जमाती व स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व आणि दर पाच वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे यासारख्या तरतुदी करण्यात आल्या.

७४ वी घटनादुरुस्ती (१९९३) : नगरपालिक, नगरनिगम आणि नगरपरिषदा अशा तीन प्रकारच्या नगरपालिकांची स्थापना, नगरपालिकांवर अनुसूचित जाती-जमाती व स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व, महानगर नियोजन समितीची स्थापना यासारख्या तरतुदी करण्यात आल्या.

७९ वी घटनादुरुस्ती (२०००) : या घटनादुरुस्तीनुसार अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागांची मुदत दहा वर्षांनी म्हणजे २०१० पर्यंत वाढविण्यात आली.

८४ वी घटनादुरुस्ती (२०००) : या घटनादुरुस्तीने बिहार, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या घटक राज्यांचे विभाजन करून झारखंड, छत्तीसगड आणि उत्तरांचल या तीन नवीन घटक राज्यांची निर्मिती करण्यात आली.

८६ वी घटनादुरुस्ती (१९९५) यानुसार जाती-जमातींच्या सनदी नोकरांसाठी आणि त्यांच्या पदोन्नतीसाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

९१ वी घटनादुरुस्ती (२००१) : निर्वाचन क्षेत्रातील मतदारसंघाची रचना करण्यासंबंधी मे २०२६ पर्यंत लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील सदस्य संख्या आहे तशीच ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

९२ वी घटनादुरुस्ती : यानुसार शासकीय सेवांमध्ये काम करणाऱ्या अनुसूचित जाती-जमातीच्या सेवकांना पदोन्नती देण्यासाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

९३ वी घटनादुरुस्ती : ६ ते १४ वयोवर्षांतील मलांचे शिक्षण अनिवार्य व तसा मूलभूत अधिकार करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

९४ वी घटनादुरुस्ती : अनुसूचित जमातीसाठी स्वतंत्र आयोगाची नियुक्ती.

९६ वी घटनादुरुस्ती : मतदारसंघ पुनर्रचनाबाबत दुरुस्ती.

९७ वी घटनादुरुस्ती : पक्षांतरबंदी कायदा.

१०० वी घटनादुरुस्ती : बोडो, संताली, मैथिली व डोंगरी या चार भाषांचा राष्ट्रीय भाषांमध्ये समावेश करण्यात आला.

१०१ वी घटनादुरुस्ती : जीवनावश्यक वस्तूबाबत तरतुदी.

१०३ वी घटनादुरुस्ती : राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची तरतूद.

१०४ वी घटनादुरुस्ती : भारतीय राज्यघटनेच्या कलम १५(४) मध्ये विना अनुदानित खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ३.३.३ भारतीय निवडणूक आयोग

सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते असे पोलॉक या राज्यशास्त्रज्ञाने म्हटले आहे. त्यावरून लोकशाहीसाठी निवडणुकांचे असलेले महत्त्व स्पष्ट होते. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनव्यवहारांत सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणुका हे असते. निवडणुकांमधून लोकांनी दिलेले कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय मार्गांनी व सुविहीतपणे सत्तांतर घडवून आणतो. त्यामुळे उत्तम निर्वाचन व्यवस्था ही प्रातिनिधिक शासनाची आधारशिला असते. ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी क्रियान्वित होते, किती कार्यक्षमपणे व निःपक्षपातीपणे काम करते, तिचे सूत्रधार किती सक्षम, प्रामाणिक आणि राजकीय पूर्वग्रहापासून व दडपणांपासून मुक्त असतात यावरच देशाच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. आपल्या निवडणूक व्यवस्थेवर लोकांचा विश्वास नसेल तर निवडणूक निकालांवरही तो असणार नाही, म्हणजेच संपूर्ण लोकशाही प्रक्रियांकडेच लोक संशयाच्या नजरेने पाहू लागतील.

**निष्पक्ष व कार्यक्षम निवडणूक यंत्रणेची गरज :** निवडणुकांचे प्रशासन निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास टिकून राहावा व वाढावा अशा पद्धतीने व्हायचे तर त्यासाठी 'पक्षीय' सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असलेल्या यंत्रणेकडे ते सोपवलेले असणे गरजेचे ठरते. भारतीय संविधानकर्त्यांना याची जाणीव होती. त्यांनी निवडणुकांची कार्यवाही पार पाडण्यासाठी अशा स्वतंत्र यंत्रणेची निर्मिती केली.

निवडणूक किंवा निर्वाचन आयोग म्हणून ही यंत्रणा ओळखली जाते. सर्व स्तरांवरील लोकप्रतिनिधींची निवड न्याय्य व मुक्त निवडणुकांच्या द्वारे होईल याची हमी निर्वाचन आयोग देतो. संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये संविधानकारांनी एका स्वतंत्र निवडणूक आयोगाची योजना केली आहे. संसदेच्या तसेच राज्यांच्या विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मतदारांच्या याद्या तयार करणे, त्या निवडणुकांचे त्याचप्रमाणे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणुकांचे संचलन करणे, या निवडणुकांच्या कामावर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण करणे इ. अधिकार निवडणूक आयोगाकडे देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगात मुख्यनिर्वाचन आयोग, निवडणुका आणि निवडणूक सुधारणा / ४३७ निर्वाचन आयुक्त आणि राष्ट्रपतींना वाटल्यास अधिकही आयुक्त असू शकतील. (सध्या असे जास्तीचे दोन आयुक्त नेमलेले आहेत.) आयोगात अधिक आयुक्त असल्यास मुख्य आयुक्त हा आयोगाचा अध्यक्ष असेल अशा तरतुदी अनु. ३२४ मध्ये करण्यात आल्या आहेत. त्यात पुढे संसदेच्या किंवा राज्यविधिमंडळांच्या निवडणुकीविषयीच्या शंका व तंटे उद्‌भवल्यास त्यांचा निवाडा करण्यासाठी निवडणूक न्यायाधिकरणे नेमण्याच्या आयोगाच्या अधिकाराचाही उल्लेख आहे. देशाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सर्वस्वी एकाच मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेच्या हाती सोपवली असून तिच्या मदतीसाठी प्रादेशिक आयुक्तांची तरतूद केली आहे. प्रादेशिक आयुक्तांनी राज्याच्या राज्यपालाच्या नव्हे तर मध्यवर्ती निर्वाचन आयोगाच्या देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रणाखाली काम करायचे असते. ही वस्तुस्थिती नोंदवून डॉ. आंबेडकर म्हणाले होते की आधी जे अधिकार राज्यपालावर सोपवायचे ठरले होते ते निर्वाचन आयोगाकडे दिले, हा बदल मूलगामीच म्हणावा लागेल. निवडणूक प्रशासनाचे केंद्रीकरण काही स्पष्ट हेतूंसाठी केले गेले आहे. मुख्य हेतू असा की वांशिक, भाषिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या राज्यातील लोकांपेक्षा वेगळ्या असलेल्या जनसमूहांवर प्रांतिक सरकारांकडून संभवणाऱ्या अन्यायावर प्रतिबंध बसावा.

**निर्वाचन आयोगाची रचना** (Structure of the Election Commission)

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ (२) प्रमाणे निर्वाचन आयोग हा मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपतीने वेळोवेळी एखादी संख्या निश्चित केल्यास तेवढे अन्य निवडणूक आयुक्त मिळून बनलेला असेल, आणि मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य निवडणूक आयुक्त यांची नियुक्ती, संसदेने त्या संबंधात केलेल्या कायद्यानुसार राष्ट्रपतीकडून होईल.निर्वाचन आयोगात कायमस्वरूपी एक मुख्य निर्वाचन आयुक्त असतो. सामान्यतः दर पाच वर्षांनी निवडणुका होतात परंतु पोटनिवडणुका केव्हा होतील हे कोणासही सांगता येणार नाही. कदाचित लोकसभा किंवा विधानसभा मुदतीपूर्वी बरखास्त केली गेली तर मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतात. तेव्हा निवडणूक यंत्रणा, मतदार याद्या नेहमी अद्ययावत ठेवाव्या लागतात. मुख्य निर्वाचन आयुक्त कायमस्वरूपी ठेवल्याने आणि निवडणुकीच्या वेळी आवश्यकतेनुसार जादा निर्वाचन अधिकारी नियुक्त केल्याने निवडणुकीचा कार्यभाग योग्य प्रकारे साधला जाईल असे घटनाकारांनी गृहीत धरले होते.

भारतीय निर्वाचन आयोगात एकच प्रमुख निर्वाचन आयुक्त असतो. एकापेक्षा जास्त निर्वाचन आयुक्त नियुक्त करण्याचा पर्याय घटनाकारांच्या पुढे होता. परंतु विचारांती एकच निर्वाचन आयुक्त व त्याच्या गरजेनुसार अन्य निर्वाचन आयुक्त नेमता येतील अशी तरतूद करण्यात आली. तारकुंडे समितीच्या

अहवालानुसार १९९७ साली निर्वाचन आयोगातील सदस्य संख्या तीन करण्यात आलेली आहे. ३२४ (२) या कलमानुसार भारताचा राष्ट्रपती निर्वाचन आयोगाच्या मुख्य आयुक्ताची नियुक्ती करतो. अर्थात, ही नियुक्ती तो संसदेने केलेल्या म्हणजेच त्याने मंजूर केलेल्या कायद्यानुसार करीत असतो. राष्ट्रपती मुख्य निर्वाचन आयुक्ताच्या सल्ल्याने इतर चार प्रादेशिक आयुक्तांची नियुक्ती करू शकतो. परंतु १९५१-५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी सहा महिन्यांसाठी केवळ दोन प्रादेशिक निर्वाचन आयुक्तांची नियुक्ती करण्यात आलेली होती, तर १९५६ साली वरील चार पदांऐवजी दोन निर्वाचन उपायुक्तांची नियुक्ती करण्यात आली होती. मुख्य निर्वाचन आयुक्ताची नियुक्ती पाच वर्षांसाठी केली जाते. वयाच्या ६५ वर्षांपर्यंत तो आपल्या पदावर राहू शकतो. निर्वाचन आयोगाचे कार्य सरकारपासून स्वतंत्रपणे चालावे म्हणून मुख्य निर्वाचन आयुक्ताचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशासमान ठेवण्यात आलेला आहे. एकदा नियुक्ती झाल्यानंतर मुख्य निर्वाचन आयुक्ताच्या सेवेच्या अटी बदलता येत नाहीत. अकार्यक्षमता, गैरवर्तन या कारणांवरून मुख्य निर्वाचन आयुक्ताला पदावरून कमी करता येते. तशी तरतूद ३२४ व्या कलमात केलेली आहे. संसदेच्या दोन्ही गृहांत तशा आशयाचा ठराव मांडून एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतीयांश बहुमताने तो ठराव संमत झाला तर राष्ट्रपती त्या निर्वाचन आयुक्ताला पदच्युत करू शकतो. मुख्य निर्वाचन आयुक्ताच्या शिफारशीवरून राष्ट्रपती इतर निर्वाचन आयुक्तांना पदच्युत करू शकतो. १९७९ साली मुख्य निर्वाचन आयुक्त शकधर यांनी केलेल्या शिफारशीनुसार उपायुक्त श्रीनिवास मूर्ती यांना पदावरून जावे लागले होते. मुख्य निर्वाचन आयुक्ताचा कार्यकाल हा भारताच्या राष्ट्रपतीने केलेल्या नियमांवर अवलंबून असतो. त्यामुळे पाच वर्षापेक्षा जास्त काल मुख्य निर्वाचन आयुक्त आपल्या पदावर राहू शकतो. उदा. मुख्य निर्वाचन आयुक्त सुकुमार सेन आणि के. व्ही. के. सुंदरम् हे आठ वर्षे आपल्या पदावर कार्य करीत होते. पुढे १९७२ साली मुख्य निर्वाचन आयुक्ताचा कार्यकाल पाच वर्षे किंवा वयाच्या ६५ वर्षांपर्यंत करण्यात आला.

मुख्य निर्वाचन आयुक्ताचे वेतन राष्ट्रपती ठरवितो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाएवढे म्हणजेच दरमहा ९० हजार रुपये वेतन, भत्ते व सवलती निर्वाचन आयुक्ताला देण्यात येतात. निर्वाचन आयोगाला स्वतंत्र नोकरवर्ग नेमता येत नाही. निवडणुका घेण्यासाठी लागणारा नोकरवर्ग राज्यांनी पुरवावयाचा असतो. निवडणूक आयोगाने विनंती केल्यास राष्ट्रपती किंवा राज्यपाल त्यांना आवश्यक असेल तेवढा नोकरवर्ग उपलब्ध करून देतो. निवडणुकीच्या काळात हा नोकरवर्ग शासनाशी जबाबदार राहत नाही, तर तो निर्वाचन आयोगाला जबाबदार राहून कार्य करीत असतो. निवडणुकीचे काम संपले की हा नोकरवर्ग पूर्ववत आपल्या सरकारी कामाशी जबाबदार राहतो.

**निर्वाचन आयोगाचे अधिकार आणि कार्य** (Powers and Functions of Election Commission)

भारतीय संविधानाच्या ३२४ व्या कलमात निर्वाचन आयोगाचे अधिकार आणि कार्ये दिलेली आहेत. १९५० चा उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीचा कायदा, १९६३ चा संघप्रदेशाच्या शासनाचा कायदा, १९६६ चा उपराष्ट्रपतीच्या कायदा इत्यादीमुळे निर्वाचन आयोगाच्या अधिकारांत नवीन नियमांची आणि आदेशांची भर पडलेली आहे. निवडणुकांच्या संदर्भातील कायद्यांची, नियमांची अंमलबजावणी करताना निर्वाचन आयोगाला (मुख्य निर्वाचन आयुक्ताला) पुढील कार्ये करावी लागतात.

**१. मतदारांच्या याद्या तयार करणे** (Preparation of Electoral Rolls) : भारतीय राज्यघटनेच्या ३२६ व्या कलमानुसार जी व्यक्ती भारताचा नागरिक आहे आणि ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण आहे आणि कायदेमंडळाने केलेल्या कायद्यानुसार जी व्यक्ती गुन्हेगार, भ्रष्टाचारी, अनिवासी अशी नाही, तिला प्रौढ मतदानाचा अधिकार दिला जाऊन तिची नोंद मतदार यादीत केली जाते. संसदेच्या दोन्ही गृहांच्या तसेच घटक राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र असणाऱ्या नागरिकांचा समावेश प्रादेशिक मतदार यादीत केला जातो. ३२५ व्या कलमानुसार कोणतीही व्यक्ती धर्म, वंश, जात किंवा लिंग या कारणांवरून मतदार यादीत समाविष्ट करण्यास अपात्र ठरविण्यात येणार नाही. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव केला जाणार नाही (कलम १५). सर्वांना समानतेची वागणूक देऊन कायद्याचे समान संरक्षण दिले जाईल. प्रादेशिक मतदारसंघातील मतदारांच्या याद्या करताना ज्या व्यक्ती मतदाराच्या पात्रतेच्या अटी पूर्ण करतील त्यांना मतदार म्हणून नोंदविण्यात येईल. योग्य व अचूक मतदार याद्या तयार करणे हे जरी निर्वाचन आयोगाचे काम असले तरी प्रत्यक्षात राज्यांतील अधिकारी मतदार याद्या तयार करताना पक्षपातीपणा करतात आणि अपात्र व्यक्तींना मतदार म्हणून प्रौढ मतदानाचा अधिकार देतात. याबाबत तक्रारी हरियाणा, पश्चिम बंगाल, आसाम, सिक्कीम या राज्यांच्या मतदार यादी संदर्भात झालेल्या आहेत. या राज्यांत अपात्र, बोगस मतदारांची नावनोंदणी झालेली आहे. मतदार याद्यांच्या बाबतीत निर्वाचन आयोगाला पूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु काही वेळा घटक राज्यांच्या दबावाखाली शासकीय अधिकारी बोगस मतदारांची नावनोंदणी करतात. अपात्र, अनिवासी, गुन्हेगार, कोर्टाने नादार ठरविलेल्या व्यक्ती, अपूर्ण वय, इत्यादी स्वरूपाच्या व्यक्तींची मतदार यादीत नोंद होते. काही वेळा एकच व्यक्ती एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदार म्हणून नावाची नोंद करते. तेव्हा अचूक, योग्य अशा पात्र मतदारांची नोंदणी करणे आणि अद्ययावत मतदार याद्या तयार करणे ही जबाबदारी निर्वाचन आयोगाला पार पाडावी लागते. या नावनोंदणीच्या कार्यात न्यायालय कोणताही हस्तक्षेप करीत नाही (३२९ कलम). मतदारांच्या नावांची नोंदणी करण्याबाबतचे निवेदन निर्वाचन आयोग वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमाद्वारे प्रसारित करीत असते.

**२. निवडणुकांचे संचालन करणे** (Conduct of the Poll) : सार्वत्रिक निवडणुका घेणे, त्यासंबंधी तयारी करणे, प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी नियंत्रण करणे असे संचालनाचे महत्त्वपूर्ण कार्य निर्वाचन आयोगाला करावे लागते. सत्तारूढ पक्ष, इतर प्रभावी गट आणि व्यक्ती यांच्याकडून निवडणुकीच्या वेळी वाममार्गाचा वापर होऊ नये यासाठी निर्वाचन आयोगाला दक्ष राहावे लागते. निवडणुका खुल्या व स्वच्छ वातावरणात होण्यासाठी आचारसंहिता तयार करावी लागते. आचारसंहितेनुसार राजकीय पक्ष आणि नागरिक निवडणुकीच्या वेळी योग्य असे वर्तन करू शकतात.

समाजातील दुर्बल घटकांसाठी स्वतंत्र मतदान केंद्रांची व्यवस्था करणे, निवडणुकीच्या-प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती करणे, बोगस मतदान होऊ नये यासाठी मतदारांना ओळख-पत्र देणे, मतदानाच्या वेळी मतदाराच्या बोटावर न पुसणारी शाई लावण्याची व्यवस्था करणे, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींचे सहीचे सील मतपेटीवर लावणे, मतदान गुप्त-पद्धतीने होण्यासाठी मतदान करण्याची

व्यवस्था योग्य अशी ठेवणे, इत्यादी कामे निर्वाचन आयोगाला करवून घ्यावी लागतात. मुख्य निर्वाचन आयुक्त उपनिर्वाचन आयुक्ताच्या किंवा निर्वाचन आयोगाच्या सचिवाच्या सहकार्याने निवडणुकांचे संचालन करीत असतो.

**३. निवडणूक रद्द करणे** (Cancellation of Poll): निर्वाचन आयोग केवळ निवडणुका घेण्याचेच कार्य करीत नसून निवडणुका रद्द करण्याचे कार्यही करीत असते. निवडणुकीच्या वेळी गैरप्रकार घडले तर अशा वेळी निर्वाचन आयुक्त ती निवडणूक रद्द करतो आणि नंतर योग्य अशा वेळी तो फेरनिवडणूक किंवा पोटनिवडणूक घेऊ शकतो. मतदानाच्या वेळी मतदारांवर दडपण आणणे, बोगस मतदान करणे, मतदान केंद्रावर हल्ला करणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतपेट्या पळविणे, मतदारास मतदान करण्यास प्रतिबंध करणे असे गैरप्रकार घडले असता निर्वाचन आयुक्त ती निवडणूक रद्द करू शकतो.

**४. पोटनिवडणुका घेणे** (Holding of By-Elections): लोकसभा किंवा विधानसभा यांच्या रद्द झालेल्या निवडणुका पुन्हा त्या मतदारसंघात घ्याव्या लागतात. निवडणुकीच्या वेळी उमेदवाराकडून वाममार्गाचा वापर झाला किंवा अन्य गैरप्रकार घडला तर निवडणूक रद्द करावी लागते. काही वेळा प्रतिनिधीच्या मृत्यूमुळे किंवा राजीनामा दिल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागांच्या पोटनिवडणुका घ्याव्या लागतात. रद्द झालेली निवडणूक सहा महिन्यांच्या आत पुन्हा घ्यावी लागते. परंतु काही वेळा सहा महिन्यांपेक्षाही अधिक काळाने अशा पोटनिवडणुका घेण्यात आलेल्या आहेत. उदा. १९८१ साली उत्तर प्रदेशातील गढवाल लोकसभेच्या जागेची पोटनिवडणूक २० महिन्यांच्या कालावधीनंतर झालेली होती. सामान्यतः निर्वाचन आयोगाला पोटनिवडणुका घेण्यासाठी राज्य सरकारचे सहकार्य आवश्यक मानले जाते. राज्य सरकारला पोटनिवडणुका घेण्यायोग्य परिस्थिती आहे असे वाटत असेल तरच ती निवडणूक घेता येते. पोटनिवडणुका घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्ताला राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागते. राज्य सरकारला सोयीची वेळ असेल त्यावेळीच पोटनिवडणूक घ्यावी लागते.

**५. राजकीय पक्षांना मान्यता देणे व त्यांची पक्षचिन्हे ठरवून देणे** (Recognition of Political Parties and Allotment of Symbols): भारतातील राजकीय पक्षांना 'अखिल भारतीय पक्ष' किंवा 'प्रादेशिक पक्ष' म्हणून मान्यता देणे हे निर्वाचन आयोगाचे महत्त्वाचे कार्य होय. सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षाला देशातील चार घटक राज्यांत चार टक्के मते मिळतात त्या पक्षाला अखिल भारतीय पक्ष म्हणून मान्यता मिळते. तसेच ज्या राजकीय पक्षाला एखाद्या घटक राज्यात सार्वत्रिक निवडणुकीत चार टक्के मते मिळतात त्या पक्षाला प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देण्यात येते. काही वेळा व्यक्तिगत किंवा तात्त्विक मतभेदामुळे राजकीय पक्षात फूट पडते. अशा वेळी दोन्हीही फुटलेले गट पक्षचिन्हाविषयी निर्वाचन आयोगाकडे मागणी करतात. निर्वाचन आयोग मूळ राजकीय पक्षाला ते चिन्ह देतात. पक्षचिन्हाबाबत पक्षांच्या दोन गटांत निर्माण होणारा वाद मिटविणे हे निर्वाचन आयोगाचे महत्त्वाचे कार्य होय. माजी निर्वाचन आयुक्त श्री. एस. एल. शकधर यांनी या संदर्भात असा निर्णय घेतला होता की ज्या गटाचे खासदार आणि आमदार संख्येने जास्त असतील त्या गटाला ते राखून ठेवलेले पक्षचिन्ह देण्यात येईल. परंतु एखाद्या राजकीय

पक्षाचे विघटन होऊन निर्माण झालेले गट दुसऱ्या पक्षात विलीन झाले तर त्या मूळ पक्षाची मान्यता काढून घेतली जाते आणि त्या पक्षाचे चिन्ह गोठविण्यात येते. अशी परिस्थिती १९७५ साली मेघालयात झाली होती. तेव्हा निवडणूक मंडळाने कोणत्याही पक्षाची मान्यता काढून घेतली नाही की त्यांचे पक्षचिन्ह गोठविले नाही. १९८५ साली निवडणूक मंडळाने सिक्कीम संग्राम परिषद या पक्षाला प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देऊन 'हत्ती' हे पक्षचिन्ह देण्यात आले कारण या पक्षाने प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी लागणाऱ्या अटी पूर्ण केलेल्या होत्या. परंतु सिक्कीममधील इतर २४ संघटनांना राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली नाही; कारण त्यांनी प्रादेशिक पक्षास लागणाऱ्या अटी पूर्ण केलेल्या नव्हत्या. त्यांनी प्रथम निवडणूक लढवावी आणि नंतर अटी पूर्ण करून पक्षमान्यतेसाठी निर्वाचन आयोगाशी संपर्क साधावा असे त्या गटांना सांगण्यात आले. निवडणुकीत त्यांना व्यक्तिगत उमेदवार म्हणून चन्हे देण्यात आली. थोडक्यात, राजकीय पक्षांना मान्यता देणे आणि त्यांचे पक्षचिन्ह ठरवून देणे महत्त्वपूर्ण कार्य निर्वाचन आयोगाला करावे लागते.

**६. उमेदवारांना अपात्र ठरविणे** (Disqualifying of the Candidates) : १९५१ च्या कोप्रतिनिधित्वाच्या कायद्यानुसार जर उमेदवाराने ठरावीक मुदतीत निवडणूक फाईल भरून नाही दिली तर त्याला अपात्र ठरविण्याचा अधिकार निर्वाचन आयोगाला देण्यात आलेला आहे. एका निवडणुकीनंतर निवडणुकीसंबंधीच्या नोंदीची फाईल तयार ठेवण्याचे बंधन उमेदवारावर असते. १९८५ साली निवडणुकीसंबंधीची नोंदणी न केल्यामुळे ८७१ उमेदवारांना अपात्र ठरवण्यात आले होते.

**७. संसद सदस्य आणि विधानसभा सदस्य यांना अपात्र ठरविणे** (Disqualifica- of the MPs and MLAs): संसदेच्या कोणत्याही गृहाचा किंवा विधानसभेचा एखादा सदस्य अपात्र आहे हे ठरविताना राष्ट्रपती निवडणूक आयोगाचे मत विचारात घेऊन निर्णय घेत असतो. राज्यघटनेच्या कलम १०२ प्रमाणे एखादा सदस्य अपात्र ठरत असेल तर त्यासंबंधी निर्वाचन आयोग राष्ट्रपतीला सल्ला देतो. १९५१ च्या लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्यानुसार संबंधी सदस्यास पुढील कारणांमुळे अपात्र ठरविण्यात येते.

१. निवडणुकीतील भ्रष्टाचाराबाबत न्यायालयाने किंवा निर्वाचन आयोगाने दोषी ठरविल्यास, २. न्यायमंडळाने दोषी ठरवून दोन वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा दिल्यास, ३. निवडणुकीतील झालेल्या खर्चाचे हिशेब योग्य वेळेत व योग्य पद्धतीने दिले नसल्यास, ४. भ्रष्टाचार, लाचलुचपत या कारणास्तव सरकारी सेवेतून कमी केले असल्यास, ५. परकीय, वेडी, दिवाळखोर, सरकारी नोकर असल्यास, ६. शासकीय करारात किंवा शासकीय आर्थिक व्यवहार असणाऱ्या संस्थेत हितसंबंध गुंतलेले असल्यास ती व्यक्ती संसद सदस्य राहण्यास अपात्र ठरते. यासंबंधी निर्वाचन आयोग राष्ट्रपतीला सल्ला देतो. निर्वाचन आयोग त्यासंबंधी चौकशी करून तो अपात्र असल्यास तशी शिफारस राष्ट्रपतीकडे करतो. राष्ट्रपतीने निर्णय घेतल्यानंतर त्या व्यक्तीचे कायदेमंडळातील प्रतिनिधित्व रद्द होते. निर्वाचन आयोगाने १९८४ साली हरचंदसिंग यांचे पंजाब विधानसभेचे सदस्यत्व रद्द करून त्यांना सहा वर्षांसाठी अपात्र ठरविले होते. निवडणुकीपूर्वी प्रत्येक उमेदवार आपले नामांकनपत्र भरून देतो त्यावेळी वरील सर्व अटी पूर्ण करणारी व्यक्तीच आपला अर्ज

उमेदवार म्हणून भरीत असते. तरीपण एखादी व्यक्ती अपात्र ठरत असेल तर निवडणूक मंडळाकडून तिची चौकशी करण्यात येते.

**८. अंशतः न्यायालयीन अधिकार** (Quasi-Judicial Powers): १९४९ साली निवडणूक न्यायालये (Election Tribunals) निर्माण करण्याचा अधिकार निर्वाचन आयोगाला देण्यात आला होता. संसदेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात काही वाद, शंका, संघर्ष उद्‌भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचे कार्य निवडणूक न्यायालये करीत असत. परंतु पुढे १९६६ साली १९ व्या घटनादुरुस्तीनुसार निर्वाचन आयोगाचा हा अधिकार रद्द करण्यात आला. त्यामुळे निवडणुकीच्या वादाच्या संदर्भात व्यक्तीला उच्च न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. ३९ व्या घटनादुरुस्तीमुळे राष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती यांच्या निवडणुकीसंबंधी न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. परंतु ४२ व्या घटनादुरुस्तीने पुन्हा निवडणूक न्यायालयांची तरतूद केलेली आहे. ४४ व्या घटनादुरुस्तीने पुन्हा फेरबदल करण्यात आले. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांच्या निवडणुकीसंबंधीचे वाद, विवाद सर्वोच्च न्यायालयात व उच्च्च न्यायालयात दाखल करण्यासंबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. निवडणुकीच्या संदर्भातील खटल्यांचा निर्णय देण्याचा अधिकार उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांना देण्यात आलेला असला तरीही निवडणूक न्यायालये (Election Tribunals) या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजाविताना दिसतात.

**निवडणूक आचारसंहिता**

सार्वत्रिक निवडणुका खुल्या वातावरणात योग्य व चांगल्या पद्धतीने होण्यासाठी निर्वाचन आयोगाने आचारसंहिता तयार केलेली आहे. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष, उमेदवार, शासन, वृत्तपत्रे, दूरदर्शन यांनी कोणत्या पद्धतीने वागावयाचे यासंबंधी जे नियम केलेले आहेत त्यांना आचारसंहिता असे म्हणतात. आचारसंहितेचे पालन न करणाऱ्यास गंभीर गुन्हा समजून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद केलेली असते. भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहितेचा अंमल राहतो. निवडणुका सुरळीत व शांततेने पार पाडण्यासाठी करावयाची उपाययोजना, कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत जे नियम केले जातात त्या नियमांच्या संहितेस आचारसंहिता असे संबोधले जाते.

निवडणूक आचारसंहिता प्रथम १९७९ साली तयार करण्यात आली होती. त्यावेळी शकधर हे निर्वाचन आयुक्त होते. त्यावेळी राजकीय पक्षांनी त्या आचारसंहितेची फारशी दखल घेतली नाही. निर्वाचन आयोगानेसुद्धा निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी म्हणून कठोर धोरण स्वीकारले नव्हते. १९९१ साली निर्वाचन आयुक्त टी. एन. शेषन यांनी पुन्हा नव्याने निवडणूक आचारसंहितेचा वचक राजकीय पक्ष, नेते, उमेदवार, वृत्तपत्रे यांच्यावर चांगल्या प्रकारे बसला. जर राजकीय पक्ष आचारसंहितेचे पालन करणार नाहीत त्यांची राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील मान्यता काढून घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्यामुळे राजकीय पक्षांकडून आचारसंहितेचे पालन जबाबदारीने, जाणीवपूर्वक झाले. जे उमेदवार आचारसंहितेचा भंग करतील त्यांच्या विरुद्ध निर्वाचन आयोगाने खटले भरले. आचारसंहितेत

उमेदवाराने, त्याच्या पक्षाने किंवा त्याच्या वतीने प्रचार करणाऱ्या इतर घटकांनी कोणते नियम पाळावयाचे व कोणत्यागोष्टी करावयाच्या नाहीत यासंबंधी निर्वाचन आयोगाने स्पष्ट नियम घालून दिलेले आहेत. निवडणूक प्रचारात धर्म, भाषा, जात या घटकांचा वापर करता कामा नये. जाहीरसभा, मिरवणुका, भित्तीपत्रके, ध्वज लावणे, ध्वनि क्षेपकांचा व वाहनांचा वापर, सार्वजनिक तसेच खासगी जागेत कटआऊटस् व मोठे फलक लावणे, पोस्टर्स, बॅनर्स छापून घेणे व लावणे, फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी यांचा वापर करणे, शासकीय वाहनांचा वापर न करणे इत्यादीबाबत स्पष्ट नियम केलेले आहेत.या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची मदत घेतली जाते. निवडणुकीच्या काळात हत्यारे, दारूगोळा वापरावर व दारू विक्रीवर निर्बंध घातले जातात. तसेच शासकीय व निमशासकीय वाहन वापरावर निर्बंध घातले जातात. निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंत्री, शासकीय संस्थांचे अध्यक्ष, संचालक यांची शासकीय वाहने, शासकीय विश्रामगृहे, शासकीय कर्मचारी इत्यादींच्या वापरावरबंदी घालण्यात आलेली असते. मंत्री किंवा इतर प्राधिकारी यांनी मतदारांना कोणत्याही स्वरूपाची वित्तीय अनुदाने किंवा सार्वजनिक कामांची, उपक्रमांची आश्वासने देऊ नयेत. प्रत्येक उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत खर्चाचे हिशेब ठेवण्याचे आहेत. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार नोंदवहीत रोजच्या रोजखर्च लिहून ठेवणे बंधनकारक असते. मतदानाच्या दिवशी मतदान शांततेने व व्यवस्थित पार पाडण्यासाठी निर्वाचन आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन उमेदवारांनी करावे लागते. मतदार केंद्रामध्ये तसेच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश करण्याबाबतच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करणे ही सर्वच उमेदवारांची जबाबदारी असते. अशा प्रकारे टी. एन. शेषन यांनी सुरू केलेल्या आचारसंहितेमुळे निवडणुका अधिक स्वच्छ व खुल्या, निकोप वातावरणात होऊ लागलेल्या आहेत.

राजकीय पक्ष व उमेदवारांनी 'काय करावे' व 'काय करू नये' यासंबंधीची निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे आणि महत्त्वपूर्ण निवडणूक प्रक्रिया खुल्या व मुक्त वातावरणात पार पडावी, सर्व राजकीय पक्षांना समान न्याय मिळावा, प्रचाराच्या कालावधीत संघर्ष, वादविवाद होऊ नयेत, केंद्रात किंवा राज्यात सत्तेवर असलेल्यांनी निवडणुकीसाठी सत्तेचा गैरवापर करू नये या हेतूने आचारसंहिता बनविण्यात आलेली आहे. राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार, सरकार आणि सरकारी कर्मचाऱ्यात ती लागू असते.

**काय करावे**

१. चालू असलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील.

२. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना / निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निष्पक्षपातीपणे उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निष्पक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.

३. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.

४. इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा व मिरवणुकीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करण्यात येऊ नयेत.

५. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि अशी परवानगी मिळविण्यात यावी.

६. प्रस्तावित सभेची ध्वनिवर्धक किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी परवानगी मिळविली पाहिजे.

७. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अन्यथा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींबरोबर व्यवहार करण्यासाठी पोलिसांचे साहाय्य मिळविण्यात यावे.

८. मोर्चामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.

९. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मोर्चात सहभागी असलेल्या व्यक्तींनी जवळ बाळगू नयेत.

१०. निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी बिल्ले व ओळखपत्रे ठळकपणे लावली पाहिजेत.

११. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठ्या या साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे चिन्ह यांचा निर्देश असणार नाही.

१२. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधाचे पूर्णपणे पालन करण्यात येईल.

१३. निवडणूक आयोगाचे वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तींना मतदान / मतमोजणी केंद्रात जाता येणार नाही.

१४. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

१५. शासकीय वाहने, कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये.

१६. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टाबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.

१७. कोणत्याही वित्तीय अनुदानांची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इ. गोष्टी करू नयेत.

१८. कोणताही मंत्री, तो उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाही.

१९. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.

२०. मतदाराच्या जातीय भावनांना आवाहन करण्यात येऊ नये व परस्परांतील वैमनस्य वाढेल अशी कोणतीही कृती करू नये.

२१. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरूप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

२२. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इ. साठी देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा कोणत्याही प्रार्थनास्थळाचा वापर करू नये.

२३. लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदान कक्षापासून २०० मीटरच्या आत निवडणूक प्रचार करणे, मतदानाची वेळ समाप्त होण्याच्या वेळेबरोबर संपणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत सार्वजनिक सभा घेणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचवणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूकविषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहे.

२४. व्यक्तीची मते किंवा कृत्ये याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरांसमोर निदर्शने करणे किंवा धरणे धरण्यात येऊ नयेत.

२५. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्या वितरित करण्याच्या जागी किंवा मतदान कक्ष निकट प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

२६. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारे मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.

**निवडणुक सुधारणा**

केंद्रशासनाने काही निवडणूक सुधारणा करून त्या अंमलात आणल्या आहेत.

**(अ) निवडणुकीच्या खर्चासंबंधीच्या सुधारणा :** निवडणूक नगरपालिकेची असो वा लोकसभेची असो उमेदवार निवडणूक जिंकण्यासाठी वारेमाप खर्च करताना दिसतात. आज नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुकीत उमेदवार लाखो रुपये खर्च करतात. विधानसभा, लोकसभा, राज्यसभा व निवडणुकांत उमेदवारांचा निवडणूक खर्च कोटीच्या घरात जातो. अर्थात, हा सर्व पैसा बेहिशोबी असतो, तेव्हा काळ्या पैशांची व निवडणुकांची फारकत होणे गरजेचे आहे. निवडणुका लढविणे ही बाब सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील झालेली आहे. धनिक, श्रीमंत लोकांचा निवडणुका लढविणे हा एक खेळ बनलेला आहे.

केंद्रशासनाने वेळोवळी नियुक्त केलेल्या समित्यांनी निवडणुकीवर होणाऱ्या खर्चावर मर्यादा घालण्यासाठी शिफारशी केलेल्या आहेत. संथानाम समितीने असे सुचविले की, राजकीय पक्ष निवडणुकीसाठी प्रचंड प्रमाणात निधी गोळा करतात. तेव्हा राजकीय पक्षांनी निवडणूक निधी आणि प्रत्यक्ष खर्च यांचा हिशेब ठेवून तो निर्वाचन आयोगाला सादर करावा. वांछू समितीने अशी शिफारस केली आहे की, निवडणूक प्रचाराचा सर्व खर्च शासनाने करावा आणि शासनाच्या लेखापरीक्षा विभागाकडून निवडणूक खर्चाचे हिशेब तपासावेत. जगन्नाथराव समिती, तारकुंडे समिती आणि गोस्वामी समिती इत्यादी समित्यांनी असे सुचविले की, उमेदवारांच्या खर्चात शासनाने आंशिक योगदान करावे, असे योगदान वस्तू किंवा सेवा

या स्वरूपाचे असावे. १९९८ साली मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना राज्यशासनाच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर (दूरदर्शन, नभोवाणी) विनामूल्य प्रचार करण्याची संधी द्यावी असे निर्वाचन आयोगाने आपले मत मांडलेहोते. निवडणुकीच्या खर्चासंबंधी पुढील सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१. राजकीय पक्ष आणि निवडणूक लढविणारे उमेदवार यांनी निवडणूक खर्चाचा हिशेब रोजच्या रोज लिहिला पाहिजे. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमानुसार नोंदवहीत रोजच्या रोज खर्च लिहून ठेवणे बंधनकारक असते.

२. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराला २५ लाख रुपयांपर्यंत आणि विधानसभेच्या निवडणुकीसाठी १० लाख रुपये निवडणूक प्रचारखर्च करता येईल.

३. लोकसभेची निवडणूक लढविण्यासाठी सर्वसाधारण उमेदवाराला १० हजार रुपये आणि अनुसूचित जातिजमातीच्या उमेदवाराला ५ हजार रुपये अनामत रक्कम ठेवावी लागते. विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी सर्वसाधारण उमेदवाराला ५ हजार रुपये आणि अनुसूचित जातिजमातींच्या उमेदवाराला २५०० रुपये अनामत रक्कम ठेवावी लागते.

४. राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला १५ हजार अनामत रक्कम भरावी लागते. तसेच उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवाराला १५ हजार रुपये अनामत रक्कम (Security Deposit) भरावी लागते.

**(ब) निवडणूक आयोगाची रचना, निवडणूक पद्धती व प्रक्रिया यासंबंधीच्या सुधारणा :** निर्वाचन आयोगाने प्रतिनिधींची निवड निकोप, स्वच्छ वातावरण, निर्भीडपणे व्हावी म्हणून निवडणूक आयोगाच्या रचनेत, कार्यपद्धतीत पुढील सुधारणा केलेल्या आहेत.

१. १९८८ साली ६१ वी घटनादुरुस्ती करून मतदान पात्रतेचे वय २१ वर्षांहून खाली १८ वर्षांपर्यंत आणले.

२. तारकुंडे समितीच्या शिफारशीनुसार १९९६ साली निर्वाचन आयोगातील सदस्य संख्या तीन करण्यात आलेली आहे. एक मुख्य निर्वाचन आयुक्त आणि त्याच्या मदतीला इतर दोन आयुक्त नियुक्त करण्यात आले.

३. मतदारांच्या याद्या अद्ययावत करण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची मदत घेतली जाईल आणि हे कार्य करीत असताना त्या काळात त्यांच्यावर निर्वाचन आयुक्त देखरेख, नियंत्रण करील अशी सुधारणा १९८८ साली करण्यात आली.

४. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राज्यघटना अशा तीन राष्ट्रीय प्रतीकांचा अवमान केल्यामुळे शिक्षा झालेल्या व्यक्तीला लोकसभा, विधानसभा निवडणुकीस अपात्र समजण्यात येईल. १९७१ च्या (Prevention of Insults to National Honour - Act) कायद्यानुसार अशा अपात्र झालेल्या व्यक्तीला सहा वर्षे निवडणूक लढविता येणार नाही.

५. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस आणि मतदानाचा दिवस यामध्ये २० दिवसांऐवजी १४ दिवसांचा कालावधी राहील.

६. लोकसभा व विधानसभा या दोन्ही गृहांसाठी एकाच व्यक्तीला दोन्ही ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार नाहीत.

७. लोकसभा, विधानसभा यांच्या निवडणुकीदिवशी सर्वांना सार्वत्रिक सुट्टी दिली जाईल.

८. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावांची यादी पुढील क्रमाने त्यांच्या नावाच्या आद्याक्षरानुसार केली जाईल.

(अ) मान्यता मिळालेले राष्ट्रीय राजकीय पक्ष

(ब) मान्यता मिळालेले प्रादेशिक राजकीय पक्ष

(क) मान्यता न मिळालेले परंतु नोंदणी केलेले राजकीय पक्ष

(ड) स्वतंत्र किंवा अपक्ष उमेदवार.

९. १९८९ साली मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशीन्सचा वापर करण्यासंबंधी सुधारणा करण्यात आली. १९९८ साली प्रत्यक्षात या इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला. सध्या मतदानासाठी संपूर्ण देशभर या इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्सचा वापर केला जात आहे.

१०. निवडणुकीच्या मतदानाच्या दिवसापूर्वी स्वतंत्र किंवा अपक्ष उमेदवाराचा मृत्यू झाला तर त्या मतदार संघाची निवडणूक स्थगित केली जाणार नाही. जर तो मृत उमेदवार एखाल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा सदस्य असेल तर त्या पक्षाला ७ दिवसांच्या आत दुसऱ्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्याचा पर्याय निर्वाचन आयोग देऊ शकेल.

११. मतदान करतेवेळी मतदाराकडे त्याचे ओळखपत्र असले पाहिजे. परंतु काही कारणाने त्याच्याकडे ओळखपत्र नसेल तर त्याच्याकडे किमान रेशनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना (लायसेन्स) असणे आवश्यक असते.

(क) राजकीय गुन्हेगारवृत्तीला प्रतिबंध घालण्यासंबंधीच्या सुधारणा संसदेच्या आणि विधानसभांच्या विद्यमान सदस्यांपैकी अनेक सदस्य फौजदारी, गुन्हेगारी स्वरूपाच्या खटल्यात किंवा आरोपात गुंतलेले आहेत असे निर्वाचन आयोगाला आढळून आलेले आहे. राजकीय गुन्हेगार वैयक्तिक संपत्ती, दादागिरी किंवा अन्य वाममार्गांचा वापर करून विधिमंडळात प्रवेश करताना दिसतात. तेव्हा अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांचा राजकारणात प्रवेश होऊ नये म्हणून निर्वाचन आयोगाने विविध उपाय आणि सुधारणा केलेल्या आहेत. या संदर्भात निर्वाचन आयोगाने वेळोवेळी आदेश काढलेले आहेत.

१. निर्वाचन आयोगाने २८ ऑगस्ट, १९९७ रोजी असा आदेश काढला की, अपराधी व्यक्तीने जरी उच्च न्यायालयात अपील केले असले तरीही त्याचा अपराध सिद्ध झाला असेल तर त्या दिवसापासून ती व्यक्ती निवडणुकीस अपात्र ठरविण्यात येईल. निर्वाचन आयोगाने निर्वाचन अधिकाऱ्यांना असा आदेश

दिला की, त्यांनी उमेदवारांकडून शपथपत्रे करून घ्यावीत. त्यामध्ये अपराध सिद्ध झाला असल्यास त्याची तारीख, अपराधाचे स्वरूप, झालेली शिक्षा आणि तुरुंगवासाची मुदत इत्यादी माहिती स्पष्ट असावी. फौजदारी गुन्हा सिद्ध झाला तर ती व्यक्ती सहा वर्षे निवडणुकीस अपात्र समजण्यात येईल. २००२ साली सर्वोच्च न्यायालयानेच नागरिकांच्या माहितीचा अधिकार व निर्वाचन आयोगाचा आदेश काढण्याचा अधिकार मान्य केल्यामुळे निर्वाचन आयोगाने असा आदेश काढला की, प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा अर्ज भरताना शपथेवर पुढील माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक राहणार आहे.

(अ) उमेदवाराला एखाद्या गुन्ह्याखाली शिक्षा झाली आहे काय? शिक्षा झाली असल्यास तिचे स्वरूप देणे आवश्यक आहे.

(ब) उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी जर सहा महिन्यांच्या काळात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा आरोप त्या उमेदवारावर ठेवला असेल की, ज्यामध्ये त्याला दोन वर्षांहून अधिक शिक्षा होऊ शकेल, यासंबंधीची माहिती अर्जात भरली पाहिजे.

(क) उमेदवाराच्या नातलगांच्या किंवा पती-पत्नी यांच्या नावावर असणारी मालमत्ता, पैसा यांविषयीची माहिती देणे बंधनकारक असते.

(ड) बँका, संस्था यांची देणी, थकीत रकमा यांचा तपशील प्रत्येक उमेदवाराने दिला पाहिजे.

(इ) उमेदवाराचे शिक्षण किती आहे हे स्पष्टपणे लिहिले पाहिजे.

२. निवडणुकीची मतदान केंद्रे, मतदान केंद्राचा परिसर येथे कोणतेही शस्त्र बाळगून फिरणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा मानला जाईल. अशा ठिकाणी पोलीस शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या हेतूने शस्त्रास्त्रे बाळगू शकतील.

३. मतदानास सुरुवात होण्यापूर्वी ४८ तासांत दारू किंवा मादक द्रव्ये यांची विक्री करण्यास कायद्याने मनाई केली जाईल. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला सहा महिन्यांची - तुरुंगवासाची शिक्षा किंवा दोन हजार रुपये दंड किंवा दोन्हीही शिक्षा देण्यात येतील.

४. निवडणुकीचा प्रचार गैरमार्गाने (वस्तू, पैसा यांचे वाटप, धाक, भीती दाखविणे, जेवणावळी घालणे इत्यादी.) होत असल्याचे कोणाच्या निदर्शनास आल्यास निवडणूक - निरीक्षकांशी किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याशी संपर्क साधून योग्य व खरी माहिती देणे.

५. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर खटला भरून कारवाई करण्यात येईल

(ड) निवडणूक सुधारणासंबंधी आतापर्यंत झालेल्या घटनादुरुस्त्या व कायदे

१. १९५० व १९५१ चे लोकप्रतिनिधित्वाचे कायदे

२. १९५२ चा राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या निवडणुकी कायदा

३. १९६१ चा राष्ट्रपतीच्या निर्वाचन मंडळाच्या रचनेसंबंधीची दुरुस्ती

४. १९६३ चा संघप्रदेशाच्या शासनाचा कायदा

५. १९६६ चा दिल्ली प्रशासनाचा कायदा

६. १९६६ साली झालेल्या १९ व्या घटनादुरुस्तीनुसार संसदेच्या किंवा विधानसभेच्य निवडणुकीसंदर्भात काही संघर्ष उद्भवल्यास निवडणूक न्यायालये ज्या अधिकाराद्वारे न्यायनिवाड करीत असत तो अधिकार रद्द करण्यात आला. त्यामुळे निवडणुकीच्या वादासंबंधी उच्च न्यायालयाकडे जाणे भाग पडले.

७. १९७५ साली ३९ व्या घटनादुरुस्तीनुसार राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती यांच्या निवडणुकीच्या वादासंबंधी न्यायालयात जाता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली.

८. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने वरील ३९ व्या घटनादुरुस्तीत बदल करून पुन्हा निवडणूक न्यायालयाची तरतूद करण्यात आली आहे.

९. १९७९ साली ४४ वी घटनादुरुस्ती होऊन राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि सभापती यांच्या निवडणुकीसंबंधीचे वाद सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयात दाखल करण्यासंबंधीची तरतूद केलेली आहे.

१०. १९८५ साली ५२ वी घटनादुरुस्ती होऊन पक्षांतरबंदीचा कायदा संमत झाला. परंतु या कायद्याचा पक्षांतर बंदीला फारसा उपयोग झाला नाही. गृहातील १/३ पक्षसदस्यांनी पक्षांतर केले तर त्यास परवानगी दिली जाते. म्हणजेच एकटा प्रतिनिधी पक्षांतर करू शकत नाही, मात्र अधिक प्रतिनिधी १/३ संख्येने पक्षांतर करू शकतात. १९८५ नंतरच्या दहा वर्षांत पक्षांतराचे प्रमाण अधिक वाढलेले आहे.

११. १९८८ साली ६१ वी घटनादुरुस्ती होऊन मतदानपात्रतेचे वय २१ वरून १८ वर आणण्यात आले.

१२. १९९३ साली ७३ वी आणि ७४ वी अशा घटनादुरुस्त्या होऊन ग्रामीण व शहरी भागांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधी तरतुदी करण्यात आल्या. या घटनादुरुस्तीनुसार राज्य निर्वाचन आयोग, राज्य वित्त आयोग यांची निर्मिती करण्यात आली.

१३. २००१ साली ८४ वी घटनादुरुस्ती होऊन कायदेमंडळातील प्रतिनिधित्वाची फेरनिश्चिती २००० ऐवजी २०२६ पर्यंत वाढविण्यात आली. देशात लोकसभेचे ५५० मतदार संघ निर्माण करण्यात आलेले आहेत.

अशा प्रकारे निर्वाचन आयोगाचे कार्य स्वतंत्रपणे निष्पक्षपातीपणे व निर्भयपणे होण्यासाठीभारतीय संसदेने वरील विविध घटनादुरुस्त्या व केलेले कायदे आहेत.

## ३.४ सारांश

भारतीय राज्यघटनेतील तीन महत्त्वाच्यातरतुदी आहेत. त्यात आणीबाणीच्या संदर्भातील तरतुदी, घटनादुरुस्तीची पद्धत व भारतीय निवडणूक आयोग यांच्या संदर्भातील तरतुदी महत्वाचे आहेत. आणीबाणी

हेही तीन प्रकारची आहे त्यापैकी एक- राष्ट्रीय आणीबाणी, दोन राज्य- आणीबाणी, तीन- आर्थिक आणीबाणी होय. ३६८ कलमानुसार घटनादुरुस्ती करण्याची पद्धती स्पष्ट केली आहे. भारतामध्ये निवडणुका घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोग स्थापन करण्यात आले आहे. त्यानुसार भारतातील लोकसभा राज्यसभा विधानसभा, विधानपरिषद पंचायत राज इत्यादी ठिकाणच्या निवडणुका या भारतीय निवडणूक आयोगाद्वारे आयोजित केले जाते.

## ३.५ पारिभाषिक शब्द

आणीबाणी -राष्ट्रपतींना दिलेला अधिकार

घटनादुरुस्ती - राज्यघटनेमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्यासाठीची नियमावली

भारतीय निवडणूक आयोग - भारतातील निवडणूक घेणारी संस्था

आचार संहिता- योग्य पद्धतीने काम करणाऱ्यासाठीची योग्य नियमावली

## ३.६ स्वयं अध्यन प्रश्न आणि उत्तरे

१. राष्ट्रीय आणिबाणी कोणत्या कलमानुसार घोषित केली जाते?

- कलम ३५२ नुसार

२. राज्यातील आणीबाणी कोणत्या कलमानुसार घोषित केली जाते?

- कलम ३५६ नुसार

३. घटनादुरुस्तीचा अधिकार किंवा तरतुदी भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमात करण्यात आला आहे?

- कलम ३६८

४. ४२ वी घटनादुरुस्ती कोणत्या साली करण्यात आली?

- १९७६

५. भारतीय निवडणूक आयोगाची रचना कोणत्या कलमानुसार केली जाते?

- कलम ३२४

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

१. आणीबाणीविषयक तरतुदींची सविस्तर चर्चा करा.

२. घटनादुरूस्तीविषयक तरतुदीची चर्चा करा.

३. भारतीय निवडणूक आयोगाची रचना सांगून त्याचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

## ३.८ संदर्भ ग्रंथ


१. बसू दुर्गादासः इन्ट्रॉडक्शन टु दि कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया.

२. जोहारी जे.सी. इंडियन पोलिटिकल सिस्टीम

३. मुन्शी के. एम्.: दि प्रेसिडेन्ट अंडर दि कॉन्स्टिट्यूशन

४. हार्डग्रेब आर. एलः इंडिया–गव्हर्नमेन्ट अँड पॉलिटिक्स इन् ए डेव्हलपिंग नेशन.


❑❑❑

# घटक ४
# भारतीय संघराज्य व्यवस्था

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ भारतीय संघराज्याचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

 ४.२.२ केंद्र राज्य संबंध

 अ. केंद्र-राज्य कायदेविषयक सबंध

 ब. केंद्र-राज्य प्रशासकीय सबंध

 क. केंद्र-राज्य आर्थिक सबंध

 ४.२.३ भारतीय संघराज्यापुढील आव्हाने

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्दावली

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर पुढील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

१) भारतीय संघराज्याचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.

२) संघराज्य शासन व्यवस्थेत केंद्र-राज्य संबंध कसे असतात याची माहिती होईल.

३) कायदेविषयक, प्रशासकीय व आर्थिक बाबतीत केंद्र-राज्य संबंधाची माहिती होईल.

४) भारतीय संघराज्यापुढील आव्हानांची माहिती होईल.

## ४.१ प्रस्ताविक :

केंद्र व घटक राज्य यांच्यातील परस्पर संबंधांच्या आधारावर शासन व्यवस्थेचे 'एकात्म शासन' आणि 'संघराज्य शासन' असे दोन प्रकार पडतात. त्यातील एकात्मक शासनपद्धतीत देशाची संपूर्ण सत्ता केंद्र शासनाकडे असते. या पद्धतीत देशात फक्त केंद्र शासनाचे अस्तित्व असते. प्रशासकीय व अन्य सोयीच्या दृष्टीने देशात घटक राज्यांची निर्मिती करण्यात आलेली असते. तेथे घटक राज्यासाठी स्वतंत्र शासन अस्तित्वात नसते. त्यामुळे अशा राज्यांना कोणतेही संविधानिक अधिकार नसतात. राज्यांना देण्यात आलेले अधिकार त्यांना केंद्राकडूनच प्राप्त होतात. थोडक्यात, एकात्म शासन व्यवस्थेत केंद्र शासनाच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. उदा: इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादी देशात एकात्म शासन व्यवस्था आहे.

संघराज्य शासन व्यवस्थेत राष्ट्रीय पातळीवर केंद्रशासन कार्यरत असते तर देशातील प्रत्येक घटक राज्यासाठी स्वतंत्र राज्यशासन असते. म्हणजेच संघराज्य शासन व्यवस्थेत दुहेरी शासन व्यवस्था असते. संघराज्याचे संविधान लिखित स्वरूपाचे असते. त्याचप्रमाणे त्यात केंद्र व राज्यांच्या अधिकाराची स्पष्ट विभागणी केलेली असते. केंद्र व राज्य शासनांना संविधानाच्या मर्यादेत आपापल्या अधिकार क्षेत्रात स्वायत्तता लाभलेली असते. उदा. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात संघराज्यात्मक शासन व्यवस्था आहे. भारताने सुद्धा संघराज्य शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात भारतीय संघराज्य व्यवस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये, भारतातील केंद्र व घटक राज्य यांच्यातील कायदेविषयक, प्रशासकीय व आर्थिक संबंध तसेच भारतीय संघराज्यापुढील आव्हाने या घटकांचा सविस्तरपणे अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ भारतीय संघराज्याचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

आपल्या संविधान निर्मात्यांचे उद्दिष्ट विशिष्ट संघराज्य व्यवस्था प्रस्थापित करणे हे होते. भारतातील संघराज्याची निर्मिती ही ब्रिटिश राजवटीत सुरू झालेल्या दीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचा परीणाम आहे. मॉर्ले-मिंटो सुधारणा कायदा, मॉटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा, सायमन कमिशन रिपोर्ट, नेहरू रिपोर्ट आणि १९३५ चा कायदा हे संघराज्य प्रक्रियेचे प्रारंभिक टप्पे होते. भारतात संघराज्य शासन व्यवस्था स्वीकारण्यात आली. परंतु ती अमेरिका या देशाच्या संघराज्यासारखी तंतोतंत नाही. याचा अर्थ भारतीय शासन व्यवस्था बाह्य रूपाने संघराज्य आहे, परंतु अंतरंगात संघराज्यात्मक व एकात्म या दोन्ही शासनाची वैशिष्ट्ये दिसून येतात. भारतीय राज्यघटनेने संघराज्य शासन व्यवस्था स्वीकारली असली तरी राज्यघटनेत 'Federation' हा शब्द कोठेही आढळत नाही. किंबहुना, 'संघराज्य' या शब्दाच्या जागी 'युनियन ऑफ स्टेट्स' या शब्दाचा वापर करण्यात आला. राज्यघटनेतील अनुच्छेद १ मध्ये भारत हा 'राज्याचा संघ' असेल असे म्हटले आहे. (India that is a Bharat, shall be a union of States) याचा अर्थ भारतीय संघराज्य व्यवस्था

राज्यांमधील परस्पर कराराद्वारे अस्तित्वात आलेली नाही. तसेच घटक राज्यांना राज्यांच्या संघातून बाहेर पडण्याचा अधिकार मिळालेला नाही.

अनेक विचारवंतानी भारतीय संघराज्याविषयी आपले मत व्यक्त केले आहे ते पुढील प्रमाणे.

**के. सी. व्हीअर** यांनी भारतीय संघराज्यास 'अर्ध संघराज्य' असे म्हटले आहे.

**मॉरीस जोन्स** हा विचारवंत भारतीय संघराज्याच्या प्रयोगास 'सहकारी संघराज्य' असे संबोधतो.

**कन्हैयालाल मुन्शी** यांच्या मते, भारतीय संघ एकात्म राज्याची अनेक वैशिष्ट्ये असलेला अर्धसंघात्मक स्वरूपाचा आहे.

**प्रा. अलेक्झांड्रोविच** यांनी भारतीय संविधानाची अन्य कोणत्याही संविधानात न आढळणारी वैशिष्ट्ये लक्षात घेऊन भारतीय संघराज्य हे 'आगळे वेगळे' असल्याचे म्हटले आहे.

**प्रा. टी. चाको** यांच्या शब्दात सांगायचे तर, भारतीय संविधानाचे बाह्यरूप संघात्मक असेल, परंतु प्रत्यक्षात त्यात एकात्म शासनाची स्थापना करण्यात आली आहे.

**बी. एम. गुप्ता** यांच्या मते, भारत हे संघराज्य नसून ते एक विकेंद्रीक्रत एकात्म राज्य आहे.

**दुर्गादास बसू** यांच्या मते, भारतीय संविधान पूर्णतः संघात्मक ही नाही आणि एकात्मक ही नाही तर त्या दोघांचे मिश्रण आहे.

**मायकल स्टुअर्ट** यांनी असे म्हटले आहे की, भारत हे एकात्मक आणि संघराज्यात्मक पद्धतीचे मिश्रण आहे.

थोडक्यात भारतीय संविधानात एक प्रकारची संघीय एकात्मक पद्धती स्वीकारण्यात आली असून ती बऱ्याच मर्यादेपर्यंत एकात्म पद्धतीकडे झुकलेली आहे आणि यामध्ये घटक राज्य बहुतांशी केंद्राच्या आधीन आहेत, असे म्हणता येते.

**भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये :** भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेत संघात्मक वैशिष्ट्याबरोबर एकात्मिक व्यवस्थेची वैशिष्ट्ये आढळतात ती पुढील प्रमाणे.

**१. दुहेरी शासन व्यवस्था :** भारतात केंद्र सरकार व घटक राज्य सरकार असे दुहेरी शासन व्यवस्था स्वीकारण्यात आली आहे. केंद्र व घटक राज्य शासनाला आपापल्या अधिकार क्षेत्रात कार्य करण्याची स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे. मात्र दोघांनाही संविधानिक बंधने पाळावी लागतात.

**२. अधिकार क्षेत्राची विभागणी :** भारतीय संविधानात केंद्र व राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्राच्या विभागणी संबंधी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे .या अंतर्गत केंद्र सूचीत ९९ विषय, राज्य सूचीत ६१ विषय तर समवर्ती सूचीत ५२ विषय समाविष्ट करण्यात आले आहेत.

**३. लिखित संविधान :** भारतीय संविधान पूर्णतः लिखित स्वरूपात असून त्यामध्ये केंद्र व घटक राज्य यांची रचना व अधिकार यांचे विस्तृत मांडणी केलेली आहे. भारतात संविधान सर्वोच्च असून केंद्र व राज्य

यांना संविधानातील तरतुदीनुसारच कार्य करावे लागते. संसद अथवा राज्य विधिमंडळाने केलेला कायदा संविधानाचे उल्लंघन करीत असेल तर न्यायालय त्यास  घटना बाह्य ठरवून रद्द करू शकतात.

**४. न्याय मंडळाचे श्रेष्ठत्व :** भारतात स्वतंत्र न्यायमंडळ अस्तित्वात असून ते संविधानाचे संरक्षक म्हणून काम करते. केंद्र व घटक राज्य शासन संस्थांनी आपल्या मर्यादेतच काम करावे याबाबत न्यायव्यवस्था दक्ष असते. केंद्र शासन आणि घटक राज्य यांच्यातील संघर्ष मिटवण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करीत असते. अशा न्यायालयांना राज्यघटनेशी विसंगत असलेला कायदा घटनाबाह्य घोषित करण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो. अशाप्रकारे संघराज्य शासन पद्धतीचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयावर असते.

**५. राज्यसभेची स्थापना :** भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेत केंद्रीय कायदेमंडळ द्विगृही ठेवण्यात आले आहे. घटक राज्यांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी राज्यसभा या वरिष्ठ सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यातील लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे कनिष्ठ सभागृह असून दुसरे राज्यसभा हे घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ सभागृह आहे.

**६. घटना दुरुस्ती पद्धती :** भारतीय राज्यघटनेतील घटना दुरुस्ती पद्धती पूर्णपणे संघराज्य प्रक्रियेनुसार आहे. राष्ट्रपतींच्या संमतीसाठी काही घटना दुरुस्ती विधेयके सादर करण्यापूर्वी, किमान अर्ध्या राज्यांच्या विधानसभेच्या ठरावाद्वारे मंजुरी घेणे आवश्यक आहे. निम्म्या राज्यांच्या विधिमंडळांची मान्यता न मिळाल्यास राज्यघटनेतील अनेक महत्त्वाच्या भागांमध्ये दुरुस्ती करता येणार नाही

**भारतीय संघराज्यातील एकात्मक शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये**

**१. प्रबळ केंद्र शासन :** भारतात केंद्रशासन अधिक अधिकार संपन्न असून केंद्र सूचित सर्वाधिक ९९ विषयाचा समावेश आहे तर राज्य सूचीमध्ये ६१ विषय आहेत. तुलनात्मक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे विषय केंद्र सूची मध्ये आहेत. समवर्ती सूचीमध्ये ५२ विषय असून त्यावर केंद्र व राज्य दोघांनाही कायदे करता येतात. परंतु काही अपवाद वगळता राज्याने केलेला कायदा केंद्राच्या कायद्याशी विसंगत असल्यास तो रद्द होतो. तसेच संविधानाने शेष अधिकार केंद्र शासनास प्रदान केले आहेत. याचा अर्थ कोणत्याही सूचित समावेश नसलेल्या उर्वरित विषयावर कायदे करण्याचा अधिकार केवळ केंद्र सरकार म्हणजे संसदेस आहे. यावरून केंद्रास राज्यापेक्षा अधिक अधिकार आहेत.

**२. एकच संविधान :** संघराज्यात केंद्रात एक राज्यघटना व प्रत्येक घटक राज्यास एक राज्यघटना अशी तरतूद केलेली असते. उदा: अमेरिका. परंतु भारतात असे नाही भारतात केंद्र व राज्यासाठी एकच राज्यघटना आहे. त्यामुळे अशी व्यवस्था एकात्मशासन पद्धतीशी सुसंगत वाटते.

**३. एकेरी नागरिकत्व :** भारतीय संविधानाने कॅनडाच्या संविधानाप्रमाणे प्रत्येक नागरिकास एकेरी म्हणजेच केवळ देशाचे नागरिकत्व प्रदान केले आहे. भारतीय व्यक्तींना अमेरिका वा स्विझर्लंड प्रमाणे घटक राज्यांचे वेगळे नागरिकत्व देण्याची व्यवस्था करण्यात आली नाही. अमेरिकेत संघराज्य शासन पद्धती असल्यामुळे तेथे दुहेरी नागरिकत्व आहे. एक व्यक्ती केंद्र व घटक राज्याचा नागरिक बनतो. परंतु भारतातील एकरी नागरिकत्वाची ही पद्धती एकात्मशासन पद्धतीस पूरक वाटते.

**४. एकेरी न्यायव्यवस्था :** संघराज्यात दुहेरी न्यायव्यवस्था असते. उदा: अमेरिकेत संघ न्याय व्यवस्था व राज्य न्यायव्यवस्था या एकमेकांपासून वेगळ्या व स्वतंत्र आहेत. मात्र भारतात केंद्र व राज्यांसाठी एकेरी न्यायव्यवस्था अस्तित्वात असून सर्वोच्च न्यायालय न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी विराजमान आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय उच्च न्यायालय, दुय्यम न्यायालय, केंद्र व राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच देशाचे नागरिक या सर्वांवर बंधनकारक असतात.

**५. आणीबाणीत एकात्म शासनपद्धती :** भारतीय संविधानांतर्गत राष्ट्रपतीस आणीबाणी संबंधित अधिकार प्राप्त असून अनुच्छेद ३५२ व ३५६ नुसार घोषित राष्ट्रीय आणीबाणी व राज्यांतर्गत आणीबाणीच्या काळात संसदेस विशेष अधिकार प्राप्त होतात. देशात आणीबाणी लागू झाल्यावर भारतीय राजकीय व्यवस्था एकात्म होत असते. केंद्र शासनास घटक राज्य सूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. अशावेळी केंद्र शासन राज्य शासनास आदेश देऊ शकते.

**६. अखिल भारतीय नागरी सेवा :** सर्व संघराज्यात केंद्रीय नागरी सेवा आणि राज्य नागरी सेवा अशी व्यवस्था असते. भारतात दुहेरी शासन व्यवस्था असल्यामुळे देशात दुहेरी नागरी सेवा आहे, परंतु त्यास अखिल भारतीय सेवा अपवाद ठरतात. भारतीय संविधानान केंद्र व राज्यांना त्यांचे लोकसेवा आयोग स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे. परंतु राष्ट्रीय स्तरावर अखिल भारतीय नागरी सेवांची तरतूद केली आहे. या पदांची भरती अखिल भारतीय पातळीवरच केली जाते. या सेवेतील सदस्याची संपूर्ण संघराज्यात महत्त्वाच्या पदावर नियुक्ती केली जाते. अखिल भारतीय सेवांच्या बाबतीत अधिकार केंद्र शासनाकडे असल्यामुळे एक प्रकारे राज्यांच्या सेवेतील अधिकाऱ्यांवर केंद्राचे नियंत्रण प्रस्थापित होते.

**७. राज्यपालाची नियुक्ती** : राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती करतो. राज्यपाल हा घटक राज्य शासनाचा घटनात्मक प्रमुख असतो. तो घटक राज्याचा कार्यभार राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून पाहत असतो. या राज्यपालाच्या वतीने केंद्रशासन राज्यावर नियंत्रण ठेवते. यावरून दिसून येते की, राज्यपालाची भूमिका संघराज्य पद्धतीशी विसंगत आहे.

**८. घटक राज्याची निर्मिती व नामांतर :** भारतीय संसद घटक राज्यांच्या नावात, क्षेत्रात व सीमेत परिवर्तन करू शकते. तसेच नवीन राज्याची निर्मिती करू शकते. त्यासाठी संविधानात सुधारणा करण्याची आवश्यकता नसते. अशाप्रसंगी राष्ट्रपती संबंधित घटक राज्याचे मत मागितले तरी ते मत संसदेवर बंधनकारक नसते. अशाप्रकारे घटक राज्यांचे अस्तित्व केंद्राच्या मर्जीवर अवलंबून असते.

**९. राज्यसभेत असमान प्रतिनिधित्व :** संघराज्यात कायदेमंडळातील वरिष्ठ सभाग्रहात सर्व राज्यांना समान दर्जा लाभला असतो. परंतु भारतात राज्यसभेत सर्व राज्यांना समान प्रतिनिधित्व लाभलेले नसून राज्याचे प्रतिनिधित्व त्या त्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून आहे ही बाब संघराज्य प्रणालीशी पूर्णतः विसंगत ठरते उदा: राज्यसभेत उत्तर प्रदेशचे ३१ सभासद, महाराष्ट्राचे १९ सभासद आहेत, तर अरुणाचल प्रदेश, गोवा, मणिपूर, मेघालय, मिझोरम, सिक्किम, त्रिपुरा अशा राज्यातून राज्यसभेत एकेक सभासद आहेत.

**१०. एकेरी निवडणूक व्यवस्था :** संपूर्ण भारतासाठी एकच केंद्रीय निवडणूक आयोग कार्यरत असून केंद्रीय व राज्य पातळीवरील निवडणूक विषयक कायदे करणे, निवडणुका घेणे आदी कार्य त्यास करावे लागतात. केंद्रीय निवडणूक आयोगातील आयुक्तांची नियुक्ती केंद्र सरकारद्वारेच केली जाते. त्यामुळे या केंद्रीय निवडणूक आयोगावर केंद्र सरकारचे अप्रत्यक्ष वर्चस्व प्रस्थापित होते.

**११. एकच लेखापरीक्षण यंत्रणा :** भारतात केंद्रीय पातळीवर एकच नियंत्रक व महालेखा परीक्षक असून त्यास केंद्राचे व राज्यांच्या लेखांची तपासणी करण्याचा अधिकार आहे. केंद्रीय नियंत्रक व महालेखा परीक्षकाची नियुक्ती केंद्र सरकारद्वारे म्हणजेच राष्ट्रपतीद्वारे केली जाते.

**१२. घटक राज्याचे आर्थिक पारवलंबित्त्व :** भारतातील घटकराज्य आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नाहीत. ही राज्य व्यापक प्रमाणात मध्यवर्ती शासनावर निर्भर आहेत. मध्यवर्ती शासन घटकराज्यांना विविध प्रकारचे अनुदान देत असते. त्यामुळे मध्यवर्ती शासनाची  अशी मदत घटकराज्यांना परावलंबी करीत असते. अशा रीतीने काही प्रमाणात का होईना पण राज्यांची स्वायत्तता कमी होत असते.

**१३. केंद्रशासित प्रदेश :** भारतात आठ केंद्रशासित प्रदेश असून त्यांचा कारभार केंद्र शासनामार्फत चालतो ही बाब संघराज्य प्रणालीशी संपूर्णतः विसंगत ठरते.

थोडक्यात भारतीय संघराज्य हे राज्याचा संघ असून ते अविनाशी आहे. देशाचे व येथील जनतेचे विभाजन वेगवेगळ्या घटक राज्यात करण्यात आले असले तरी भारत हे संपूर्णतः एक राष्ट्र आहे. भारतीय शासन व्यवस्था संपूर्ण संघराज्य पद्धतीची व संपूर्ण एकात्म स्वरूपाचे आहे असे म्हणता येणार नाही. वास्तविकदृष्ट्या भारतीय शासन व्यवस्था संघराज्य स्वरूपाचे असून त्यात एकात्म पद्धतीची वैशिष्ट्ये लक्षणीय स्वरूपात दिसून येतात. म्हणूनच भारत हे अर्ध संघराज्य आहे असेही म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचा मसुदा आणि त्यावरील आपला अहवाल प्रस्तुत करताना असे म्हटले आहे की, 'या संविधानाची संरचना संघराज्य स्वरूपाची आहे, पण प्रकृती मात्र एकात्म स्वरूपाची आहे.'

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) रिकाम्या जागी योग्य उत्तर लिहून विधाने पूर्ण करा.

१. संघराज्य व्यवस्थेत ............. शासन व्यवस्था असते.

२. राज्यघटनेतील अनुच्छेद १ मध्ये भारत हा.............असेल असे म्हटले आहे.

३. के. सी. व्हीअर यांनी भारतीय संघराज्यास .............असे म्हटले आहे.

४. भारतात केंद्रशासन अधिक अधिकार संपन्न असून केंद्र सूचित सर्वाधिक............. विषयाचा समावेश आहे.

५. भारतात ............. केंद्रशासित प्रदेश असून त्यांचा कारभार केंद्र शासनामार्फत चालतो.

### ४.२.२ केंद्र-राज्य संबंध-कायदेविषयक, प्रशासकीय, आर्थिक

**अ) केंद्र-राज्य कायदेविषयक संबंध -**

भारतीय राज्यघटनेच्या भाग क्रमांक ११ मध्ये कलम २४६ नुसार परिशिष्ट सात मध्ये तीन सूची दिल्या आहेत त्या म्हणजे संघ सूची, राज्य सूची व समवर्ती सूची होत. यात केंद्र शासन आणि घटक राज्य शासन यांच्या अधिकार क्षेत्रातील विषयाची तरतुद करण्यात आले आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टात पुढील प्रमाणे तीन विषय सूची दिलेले आहेत.

१. केंद्र सूची ९९ विषय

२. राज्य सूची ६१ विषय

३. समवर्ती सूची ५२ विषय

**१. केंद्र सूची :** केंद्रीय सूचीमध्ये नमूद केलेल्या विषयांवर कायदे बनवण्याचा विशेष अधिकार संसदेला आहे. केंद्र सूचित ९९ विषयाचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय केंद्र सूचित समाविष्ट करण्यात आले आहेत. संपूर्ण भारताशी संबंधित असणाऱ्या आणि ज्यांचे धोरण देशभर एकच असावे लागते असे विषय केंद्र सूचित समाविष्ट करण्यात आले आहेत. उदा: संरक्षण, आरमार, हवाई दल, लष्कर, बँका, परराष्ट्रीय धोरण, परराष्ट्रीय व्यापार, कर्ज, विमा कंपन्या, आर्थिक महामंडळ, खनिज तेल, विद्यापीठ संशोधन, आयात निर्यात, रेल्वे, पोस्ट, राष्ट्रीय मार्ग व वाहतूक, मत्स्य उत्पादन केंद्र, मीठ, अफू, केंद्रीय विद्यापीठे, आयकर, न्यायालय रचना, निगमकर, सीमा कर, दूरध्वनी, आकाशवाणी, नागरिकता, युद्ध, तह इत्यादी ९९ विषयाचा समावेश केले आहेत.

**२. राज्य सूची :** राज्य सूची मध्ये ६१ विषयाचा समावेश करण्यात आला आहे. या ६१ विषयावर राज्य विधिमंडळाला कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्यामध्ये सार्वजनिक सुरक्षितता, पोलीस, शांतता, कनिष्ठ न्यायालय, तुरुंग, रिमांड होम्स, स्थानिक स्वराज्य संस्था, दळणवळणाची साधने, विद्यापीठे, व्यापार, जंगले, पाणीपुरवठा, जमीन सुधारणा, सार्वजनिक आरोग्य, महसूल, राज्यसेवा व्यवसाय, उद्योगधंदे, दवाखाने, चिकित्सालय, औषधालय, मादक पेय, वाचनालय, वस्तू संग्रहालय, रस्ते, जलमार्ग, शेती, सिंचन कालवे, भूमी प्रबंध आणि भूमी अधिकार, नाट्यशाळा, चित्रपट, शेतसारा, शेती, उत्पादनकर, पशु आणि वाहनकर मनोरंजनावरील कर, जमीन, घरे यावरील कर इत्यादी ६१ विषय आहेत.

**३. समवर्ती सूची :** समवर्ती सूचीत ५२ विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वन,शिक्षण, फौजदारी कायदे, विवाह, घटस्फोट, दत्तक पत्रे, मृत्युपत्रे, दिवाळखोरी, धार्मिक संस्था, वृत्तपत्रे, छापखाने, कामगार संघटना, कामगार कल्याण, खाद्यपदार्थ व इतर वस्तूमधील भेसळ, वकिली, वैद्यकीय व्यवसाय, आर्थिक आणि सामाजिक योजना, शेती जमीन विक्री ते इतर मालमत्तेचे हस्तांतरण करार, विश्वस्त निधी, भावनियंत्रण, कुटुंब नियोजन, वीज, सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित प्रतिबंधात्मक स्थानबद्धता, जन्म

मृत्यू नोंद इत्यादी ५२ विषय आहेत. या समवर्ती सूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकार व घटक राज्य सरकार या दोघांनाही असतो. मात्र एकाच विषयावर दोघांनी केलेला कायदा परस्पर विसंगत असल्यास केंद्राच्या कायद्यास प्राधान्य देण्यात येते. समवर्ती सूचीची तरतूद १९३५ च्या कायद्यानुसार करण्यात आली आहे. श्री. एम. व्ही. पायली यांनी समवर्ती सूचीला 'संधी प्रकाशाच्या झोता'ची उपमा दिली आहे.

**४. शेषा अधिकार :** ज्या विषयांचा स्पष्ट उल्लेख कोणत्याही यादीत केला नाही त्यांना शेष अधिकार असे म्हणतात. शेषा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत. भविष्यकाळात नव्याने निर्माण होणाऱ्या विषयासंदर्भात कायदा करण्याचा अधिकार शेषा अधिकाराच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे देण्यात आलेला आहे.

**राज्यसूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा संसदेचा अधिकार**

राज्य सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला असतो परंतु काही विशिष्ट परिस्थितीमध्ये भारतीय संसदेला राज्य सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार प्राप्त होतो ते पुढील प्रमाणे.

**१. भारतीय राज्यघटनेच्या २४९ कलमानुसार** राष्ट्रहित विचारात घेऊन राज्य सूचीतील विषयावर कधी कधी कायदा करणे गरजेचे असते. त्यासाठी दोन तृतीयांश बहुमताने त्या प्रकारचा ठराव राज्यसभा संमत करू शकते. त्यानंतर त्या विषयावर संसद कायदा करू शकते. मंजूर झालेला कायदा एखाद्या भागापुरता किंवा संपूर्ण देशासाठी लागू करता येतो. या कायद्याचा अंमल एक वर्षापुरता असतो.

**२. भारतीय राज्यघटनेच्या ३५६ व्या कलमानुसार** घटक राज्यात किंवा देशात आणीबाणी घोषित करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. आणीबाणी घोषित केले असता घटनेच्या कलम २५० नुसार संसदेला राज्य सूचीतील कोणत्याही विषयासंबंधी त्या भागासाठी किंवा संपूर्ण देशासाठी लागू होणारा कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

**३. राज्यघटनेच्या २५२ व्या कलमानुसार** घटक राज्यांच्या दोन वा अधिक राज्याच्या विधिमंडळाने केलेल्या विनंतीवरून संसद राज्याच्या विशेष सूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते. ज्या राज्याने विनंती केली त्या राज्यांनाच हा कायदा लागू होतो.

**४. भारतीय घटनेच्या कलम २५३ नुसार** केंद्र सरकारने परराष्ट्राशी काही करार, तह, संधी केली असेल तर त्याचे पालन करण्यासाठी आवश्यकता वाटल्यास राज्य सूचीतील एखाद्या विषयासंबंधी कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो.

**५. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५६ व ३५७ नुसार** घटक राज्यात अनागोंदी कारभार असेल, शासनाच्या कारभार योग्य प्रकारे चालत नसल्यास राज्यपाल तसा अहवाल राष्ट्रपतीकडे पाठवतो. राष्ट्रपतीची

खात्री पटल्यास तेथे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात येते. अशावेळी घटक राज्याच्या कायदेमंडळाची सत्ता राष्ट्रपती काढून घेतो आणि ती राज्याची कायदेविषयक सत्ता तो स्वतःकडे ठेवतो किंवा संसदेकडे सोपवतो.

**६. राष्ट्रपतीची मंजुरी :** राज्य सूचीतील एखाद्या विषयावर घटक राज्यातील विधिमंडळाने मंजूर केलेले विधेयक राज्यपालाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येते. गरजेनुसार राज्यपाल ते विधेयक राष्ट्रपतीच्या मंजुरीसाठी पाठवतात. अशा प्रकारे राष्ट्रपतीची मंजुरी अंतिम निर्णायक असते.

**केंद्र–राज्य प्रशासकीय संबंध –**

कायदेविषयक अधिकारांच्या विभागणीला अनुसरून प्रशासकीय अधिकारांची विभागणी करण्यात आली आहे. संसद ज्या विषयावर कायदे करते तेवढ्या विषयाशी संबंधित केंद्र शासनाची प्रशासकीय सत्ता मर्यादित असते. त्याचप्रमाणे घटक राज्याचे विधिमंडळ ज्या विषयावर कायदा करते त्या विषयावरती त्या घटक राज्याची प्रशासकीय सत्ता मर्यादित असते. मात्र समवर्ती सूचीतील विषयावर संसदेने कायदा करून केंद्र शासनास कारवाई करण्यास सुचविल्यास केंद्रशासनाची घटनात्मक तरतुदीनुसार कार्यकारी सत्ता कार्यरत असते. केंद्र–राज्य प्रशासकीय संबंधा विषयी भारतीय राज्यघटनेच्या २५६ ते २६३ या कलमात तरतूद केले आहे. केंद्र व राज्य प्रशासकीय संबंध १९३५ च्या कायद्यावर आधारित आहेत. प्रशासकीय संबंधाच्या बाबतीत केंद्र शासनाचे राज्यावरून नियंत्रण पुढील तरतुदीवरून स्पष्ट होते.

**१. राज्य शासनास निर्देश :** घटनेच्या कलम २५६मधील तरतुदीनुसार प्रत्येक राज्याने आपल्या कार्यकारी अधिकाराचा वापर करताना संसदेद्वारा निर्मित कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. म्हणजेच राज्यांची धोरणे हे केंद्र शासनाला प्रतिकूल ठरणारे नसावीत अन्यथा केंद्र संबंधित राज्यांना त्यासंबंधी निर्देश देऊ शकते.

**२. केंद्राचे राज्यावरील नियंत्रण :** राज्यघटनेच्या कलम २५७मधील तरतुदीनुसार केंद्र शासन एखाद्या राज्याला त्या राज्यातील राष्ट्रीय किंवा लष्करी दृष्ट्या महत्त्वपूर्ण म्हणून घोषित केलेल्या दळणवळण साधनांची उभारणी व देखभाल यासंबंधी निर्देश देऊ शकते. केंद्र शासन एखाद्या राज्यातील रेल्वे मार्गाच्या रक्षणासंबंधी उपाय योजना करण्याबाबत त्या राज्याला निर्देश देऊ शकते.

**३. राज्य शासनाकडे कामे सोपविणे :** भारतीय राज्यघटनेच्या २५८ कलमा प्रमाणे केंद्र शासनाच्या आखत्यारीतील कामे घटक राज्यांच्या अनुमतीने राष्ट्रपती घटक राज्यांच्या शासनास वा तेथील अधिकाऱ्यांकडे सोपवू शकतो. संसद त्याप्रमाणे कायदा करू शकते. यासाठी येणारा जास्तीचा खर्च केंद्रशासन देईल. तसेच घटनेच्या २६१ व्या कलमानुसार केंद्र सरकारने आणि प्रत्येक घटक राज्य सरकारने केलेल्या कायद्यांना आणि न्यायालय निर्णयांना संपूर्ण भारतात पूर्ण मान आणि विश्वासहार्यता देण्यात येईल.

**४. नदी पाणी वाटप तंटा :** राज्यघटनेच्या २६२ व्या कलमानुसार नदीच्या पाण्याचा वापर किंवा वाटणी यासंबंधी दोन किंवा अधिक घटक राज्यांमध्ये वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी निर्णय देण्यासाठी संसद

कायदा करू शकते अथवा लवाद नेमू शकते. त्याचप्रमाणे अशा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे किंवा अन्य न्यायालयाची अधिकारीता प्रतिबंधित करू शकते उदा: कृष्णा नदी पाणी वाटप तंटा आयोग.

**५. आंतरराज्यीय परिषद :** घटनेच्या २६३व्या कलमानुसार जून १९९० मध्ये आंतरराज्यीय परिषद स्थापन करण्यात आली. पंतप्रधान या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. देशातील संघराज्य व्यवस्था व केंद्र राज्य संबंध सुरळीतपणे कार्यरत राहावे यासाठी परिषद कार्यरत असते. आंतरराज्यीय परिषद स्थापन करणे तिच्या कर्तव्याचे स्वरूप ठरवणे तसेच तिची रचना व कार्यपद्धती निश्चित करण्याचे अधिकार राष्ट्रपतीस असतात.

**६. राष्ट्रपती राजवट :** घटनेच्या कलम ३५६ नुसार एखाद्या राज्यात संविधानिक तरतुदीनुसार कारभार करणे अशक्य आहे असा अहवाल त्या राज्याच्या राज्यपालाने दिल्यास व राष्ट्रपतीची तशी खात्री पटल्यास त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात येते. अशावेळी राज्यांच्या प्रशासकीय अधिकारावर केंद्राचे नियंत्रण प्रस्थापित होते.

**७. राज्यपालांची नियुक्ती :** राष्ट्रपती प्रत्येक घटक राज्यात राज्यपालाची नियुक्ती करतो. राज्यपाल केंद्र शासनाचा प्रतिनिधी या नात्याने राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण व देखरेख ठेवतो.

**८. अखिल भारतीय सेवा :** राज्यघटनेच्या ३१२ व्या कलमानुसार अखिल भारतीय सेवांची तरतूद करण्यात आली आहे. उदा: भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा इत्यादी. या सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक केंद्र शासनाकडून होते व त्यांच्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण असते. मात्र हे अधिकारी राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेत काम करतात. साहजिकच याद्वारे राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेवर केंद्राचे नियंत्रण प्रस्थापित होते.

वरील सर्व बाबीवरून घटक राज्याच्या प्रशासनावरील केंद्र शासनाचे नियंत्रण स्पष्ट होते.

**केंद्र–राज्य आर्थिक संबंध –**

केंद्र शासन व घटक राज्य यांचे प्रशासन संघराज्यात योग्य प्रकारे चालण्यास त्यांचा आर्थिक व्यवहार वेगळा असला पाहिजे त्यांच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी सुद्धा वेगळ्या असल्या पाहिजेत. घटक राज्य आर्थिक दृष्टीने परिपूर्ण असणे हे संघराज्याचे सैद्धांतिक तत्व असते. परंतु या आर्थिक बाबतीत भारतीय संघराज्यात घटक राज्य केंद्र शासनावर निर्भर असलेले दिसून येतात. घटक राज्यांना केंद्र सरकारकडून आर्थिक सहाय्य घ्यावे लागते. भारतीय राज्यघटनेच्या १२ व्या आणि १३ व्या भागात २६४ ते ३०७ या कलमात केंद्र राज्य आर्थिक व्यवहाराविषयी तरतुदी करण्यात आले आहेत. त्यानुसार घटक राज्यांना पुढील प्रमाणे सहाय्यक अनुदान देण्यात येतात.

**१. केंद्र सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी :** भारतीय संसदेला केंद्र सरकारच्या स्वाधीन असलेल्या पुढील बाबी संबंधी कर लावण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. उदा: तंबाखूवरील कर, हवाई, नाविक, रेल्वे प्रवासी आणि मालवाहतुकीवरील कर, शेती वगळून इतर उत्पन्नावरील कर, आयकरावरील अधिकार,

वृत्तपत्राच्या खरेदी विक्रीवरील कर, जाहिरातीवरील कर, आंतरराज्य व्यापारा वरील कर, डाक, तार, दूरध्वनी, वायरलेस प्रसारण व संचार साधनापासून मिळणारे उत्पन्न, रोखे बाजार आणि वायदे बाजारातील व्यवहारावरील कर, हुंडी, धनादेश, मुद्रांक शुल्क, आयात निर्यात कर इत्यादी.

**२. घटक राज्याच्या उत्पन्नाच्या बाबी :** घटक राज्यांना पुढील बाबींपासून उत्पन्न मिळते उदा: शेतसारा, शेत जमिनीच्या मालमत्तेवरील वारसा कर, शेती उत्पन्नावरील कर, जमीन आणि इमारतीवरील कर, विजेवरील कर, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शनच्या जाहिरातीवरील कर, चैनीच्या वस्तूवरील कर, व्यावसाय कर, करमणूक कर, यात्रा कर, लॉटरी पासून मिळणारे उत्पन्न, अफु, मादक पदार्थावरील कर, रस्ते व अंतर्गत नाविक मार्गाने होणाऱ्या प्रवासी मालवाहतुकीवरील कर, जुगारावरील कर, यात्रा कर, पशु वरील कर, करमणूक कर इत्यादी. भारतीय राज्यघटनेच्या कलम २६८ नुसार काही कर केंद्रशासन लावत असून तसे कर जमा करण्याचे कार्य घटक राज्यांना करावे लागते. उदा: मुद्रांक शुल्क, औषधी व प्रसाधने यावर अबकरी कर, केंद्रशासित प्रदेशातील कर केंद्र शासनच जमा करते.

**३. केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकारी यांच्यातील उत्पन्नाची वाटणी :** भारतीय घटनेच्या २६९व्या कलमानुसार पुढील काही कर लावण्याचा आणि गोळा करण्याचा अधिकार केंद्र सरकारचा असतो परंतु या करापासून मिळणारे उत्पन्न घटक राज्यांना वाटून दिले जाते

१. शेतजमिनी व्यतिरिक्त मालमत्तेवरील वारसा कर.

२. रेल्वे प्रवासी भाडे व वाहनावरील कर.

३. वृत्तपत्रांच्या विक्री खरेदीवरील व त्यात प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीवरील कर.

४. शेत जमिनी व्यतिरिक्त मालमत्तेवरील संपदा कर.

५. रोखे बाजार व वायदे बाजार यातील व्यवहारावरील मुद्रांक शुल्का व्यतिरिक्त इतर कर.

६. रेल्वे हवाई नाविक मार्गाने नेल्या जाणाऱ्या मालावर आणि उतारावरील सीमा कर

७. आंतरराज्य व्यापारात समाविष्ट झालेल्या वृत्तपत्रांशिवाय वस्तूच्या खरेदी विक्री वरील कर

**४. राज्यघटनेच्या कलम १४८ ते १४९ नुसार :** केंद्र सरकार व घटक राज्य यांच्या जमाखर्चाचा हिशोब ठेवणे आणि त्याचे निपक्षपातीपणे तपासणी करणे यासाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक पदाची तरतूद केली आहे.

**५. राज्यघटनेच्या २७० व्या कलमानुसार :** शेतीच्या उत्पन्ना शिवाय इतर करांची आकारणी वसुली भारत सरकार करेल परंतु या करा पासून मिळणारे उत्पन्न केंद्र आणि घटक राज्य यांच्यात विभागले जाते हे विभागणी वित्त आयोग करीत असते.

**६. राज्यघटनेच्या २७२ व्या कलमानुसार :** केंद्र यादीत उल्लेख केलेल्या औषधे व प्रसाधने यावरील करा व्यतिरिक्त केंद्र सरकारने लावलेल्या जकातीचे उत्पन्न केंद्र सरकारच्या कार्यक्षेत्रात येते परंतु संसदेला वाटल्यास त्याचा काही भाग घटक राज्यांना देता येतो. वाटणीची तत्त्वे संसदेच्या कायद्यात स्पष्ट केली जातात.

**७. राज्यघटनेच्या २७३ व्या कलमानुसार :** ताग आणि तागापासून तयार होणाऱ्या वस्तूवरील निर्यात करा पासून जे उत्पन्न मिळते त्याच्या उत्पन्नाच्या बदल्यात ताग उत्पादन करणाऱ्या राज्यांना खास अनुदान देण्याची तरतूद आहे या अनुदानाची रक्कम ठरविण्याचा अधिकार वित्त आयोगाला आहे.

**८. राज्यघटनेच्या कलम २७४ नुसार :** केंद्र सरकारने लावलेल्या परंतु ज्यांच्या उत्पन्नातील पूर्णतः किंवा अंशतः रक्कम घटक राज्यांना दिली जाते अशा करांची तरतूद करणाऱ्या विधेयकांना राष्ट्रपतीची शिफारस घ्यावी लागते.

**९. राज्यघटनेच्या कलम २७५ नुसार :** जी घटक राज्य आर्थिक दृष्ट्या दुर्बल व मागासलेली आहेत अशा राज्यांना विशेष अनुदान देण्याची तरतूद आहे. उदा: बिहार, ओरिसा, आसाम.

**१०. राज्यघटनेच्या २७६ व्या कलमानुसार :** घटक राज्य सरकार किंवा अंतर्गत नगरपालिका, जिल्हा मंडळ, स्थानिक संस्था, व्यवसाय, व्यापार, रोजगार इत्यादी कर लादला जातो. हा कर उत्पन्नावरील कर समजला जात नाही. हा कर दरडोई २५०० पेक्षा जास्त असता कामा नये.

**११. राज्यघटनेच्या कलम २८० नुसार :** राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची नेमणूक करतात. ज्यामध्ये एक अध्यक्ष व इतर चार सदस्य असतील. २०२३ मध्ये १६ व्या वित्त आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ.अरविंद पनगढीया यांची नियुक्ती केली आहे. केंद्र व राज्य यांच्यातील उत्पन्नाची वाटणी ठरविणे, भारताच्या संचित निधीतून घटक राज्यांना द्यावयाच्या अनुदानाची तत्वे ठरविणे, राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राष्ट्रपतीने आयोगाकडे सोपविलेल्या प्रश्नावर अभ्यास करून सल्ला देणे इत्यादी कार्य वित्त आयोगाला करावी लागतात.

**१२. राज्यघटनेच्या २८५ व्या कलमानुर :** केंद्र सरकारची मालमत्ता घटक राज्यांनी लावलेल्या करांच्या कक्षेतून वगळण्यात येईल. घटक राज्यांचे कोणते कर केंद्राच्या मालमत्तेस लागू होतील हे संसद ठरवील.

**१३. राज्यघटनेच्या कलम २८६ नुसार :** आपल्या राज्याबाहेर किंवा देशाबाहेर होणाऱ्या खरेदी विक्री व्यवहारावर राज्य सरकारला कर लावता येणार नाहीत. कोणत्या बाबतीत असा कर लावता येईल हे संसद ठरविले.

**१४. राज्यघटनेचे कलम २८७ नुसार :** केंद्र सरकारकडून जी वीज वापरली जाते किंवा रेल्वे, रेल्वे वाहतूक अशा केंद्र सरकारच्या कक्षेतील कार्यावर जी वीज घटक राज्याकडून मिळते. त्यावर कर लावण्याचा अधिकार संसदेला आहे.

**१५. राज्यघटनेच्या कलम २८८ नुसार :** आंतरराष्ट्रीय नद्यांच्या पाणी वाटपा संबंधित कोणत्याही घटक राज्याला संसदेच्या परवानगीशिवाय कर लावता येणार नाही.

**१६. राज्यघटनेच्या कलम २८९ नुसार :** घटक राज्याची मालमत्ता आणि प्राप्ती यांना केंद्र सरकारच्या कक्षेतून वगळण्यात येईल. केंद्र सरकारचे कोणते कर घटक राज्यांच्या मालमत्तेस लागू होतील हे संसद ठरवील.

**१७. राज्यघटनेचे कलम २९२ व २९३ नुसार :** भारताच्या संचित निधी च्या आधारावर केंद्र सरकारला आणि घटक राज्याच्या संचित निधी च्या आधारावर घटक राज्यांना कर्ज उभारणी करता येते तसेच केंद्र सरकारकडून घटक राज्यांना कर्जे देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**१८. राज्यघटनेच्या कलम ३०१ ते ३०४ नुसार :** भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र व्यापार, वाणिज्य व्यवहार संबंध यांचे स्वातंत्र्य राहील. सार्वजनिक हिताच्या रक्षणासाठी आवश्यकता वाटल्यास आंतरराज्य व्यापारावर बंधने लादण्याचा अधिकार संसदेला राहील. ही बंधने लादताना केंद्र सरकार राज्या राज्यात भेदभाव करणार नाही. याला दुष्काळी राज्यांचा अपवाद राहील.

थोडक्यात केंद्र-राज्य आर्थिक संबंध पाहिले असता आर्थिक बाबतीत केंद्राचे राज्यावर नियंत्रण अधिक प्रमाणात असलेले दिसते. आर्थिक बाबतीत राज्य परावलंबी असून त्यांना केंद्र सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

ब. रिकाम्या जागी योग्य उत्तर लिहून विधाने पूर्ण करा.

१. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय ............ समाविष्ट करण्यात आले आहेत.

२. ............राज्यघटनेच्या ३५६ व्या कलमानुसार घटक राज्यात आणीबाणी घोषित करू शकतात.

३. राज्यघटनेच्या............व्या कलमानुसार जून १९९० मध्ये आंतरराज्यीय परिषद स्थापन करण्यात आले.

४. राज्यघटनेच्या कलम २८० नुसार राष्ट्रपती दर पाच वर्षांनी............नेमणूक करतात.

५. राज्यघटनेच्या............व्या कलमानुसार अखिल भारतीय सेवांची तरतूद करण्यात आली आहे.

## ४.२.३ भारतीय संघराज्यापुढील आव्हाने

भारताने संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु भारतीय संघराज्य पद्धती पूर्णपणे अमेरिकेसारखे संघराज्य शासन नाही, तर त्यामध्ये एकात्म शासन पद्धतीचे अनेक वैशिष्ट्य आपणास पहावयास मिळतात. भारतीय संविधान निर्मात्यांनी भारतातील विविधतेमध्ये एकात्मता टिकवण्यासाठी म्हणून संघराज्य शासन पद्धती स्वीकारून सुद्धा त्यामध्ये एकात्म शासन पद्धतीच्या अनेक गोष्टी स्वीकारण्यात आल्या व केंद्र सरकारला घटक राज्यांपेक्षा जास्तीचे अधिकार बहाल करण्यात आले. भारतात जात, धर्म,

भाषा, पंथ, संस्कृती, प्रदेश इत्यादी मोठ्या प्रमाणात विविधता पहावयास मिळते. त्यामुळे या विविधतेला एकात्मतेमध्ये बांधत असताना भारतीय संघराज्या समोर अनेक आव्हाने निर्माण होतात. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १. प्रदेशिकतावाद :

भाषिक, वांशिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक अस्मितेवर आधारित प्रादेशिक पक्ष आणि चळवळींच्या उदयामुळे भारताच्या राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेला आव्हान निर्माण झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात यशस्वी संघीय शासनाची भारताची परंपरा असूनही, प्रादेशिकता किंवा एखाद्या प्रदेशाबद्दलचे प्रेम आजही देशाच्या विविध भागात डोके वर काढते आहे. काही प्रदेश किंवा गटांनी अधिक स्वायत्तता, विशेष दर्जा किंवा भारतीय संघराज्यापासून वेगळे होण्याची मागणी केली आहे. अलीकडच्या काळात, विशेषत: २०१४ मध्ये तेलंगणाच्या स्थापनेनंतर अनेक राज्यांची मागणी करणारा आवाज अधिक ठळक झाला आहे. उत्तर प्रदेशचे चौपट विभाजन आणि पश्चिम बंगालमधून गोरखालँडची निर्मिती यासारख्या अलीकडील मागण्या ही आक्रमक प्रादेशिकतेची उदाहरणे आहेत. ज्यामुळे भारताच्या संघराज्य रचनेला धोका आहे.

### २. भाषिक संघर्ष :

भारतातील भाषांचे वैविध्य कधी कधी संविधानाच्या संघराज्य भावनेला धक्का पोहोचवते. भारतात २२ भाषांना घटनात्मक मान्यता आहे. याव्यतिरिक्त, देशभरात शेकडो बोलीभाषा बोलल्या जातात. जेव्हा मजबूत केंद्र सरकार एखादी विशिष्ट भाषा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करते तेव्हा समस्या उद्‌भवतात. भारतातील अधिकृत भाषेचा संघर्ष अजूनही ज्वलंत प्रश्न आहे. हिंदीला भारताची अधिकृत भाषा म्हणून दक्षिणेकडील राज्यांनी विरोध केल्यामुळे भारतातील भाषेचे संकट अधिक गडद झाले आहे.

### ३. अधिकारांचे विभाजन :

अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाच्या विपरीत, भारतात केंद्र आणि राज्याच्या अधिकाराचे विभाजन घटनेच्या सातव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या तीन सूचींनुसार केली जाते. केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांचे अधिकार अनुक्रमे केंद्रिय सूची आणि राज्य सूचीमध्ये दिलेले आहे, तर समवर्ती सूचीमध्ये नमूद केलेल्या अधिकारांचा वापर केंद्र व राज्य हे दोन्ही सरकार करू शकतात. शेषअधिकार केंद्र सरकारकडे निहित आहेत. अधिकारांचे विभाजन करण्याचे सामान्य तत्व असे आहे की संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे आणि चलन यासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्व बाबी केंद्र सरकारला दिले जातात, तर ज्या बाबी प्रामुख्याने स्थानिक किंवा प्रादेशिक महत्त्वाच्या असतात, जसे की, सार्वजनिक आरोग्य, पोलिस, स्थानिक प्रशासन इत्यादी राज्य सरकारांना दिले गेले आहे. काही बाबी ज्यात केंद्र आणि राज्य दोघांचा सहभाग आवश्यक आहे जसे की फौजदारी कायदा, वने, शिक्षण, आर्थिक आणि सामाजिक नियोजन या समवर्ती सूचीमध्ये देलेल्या आहेत. परंतु अधिकाराचे वाटप करत असताना केंद्र सरकारला झुकते माप दिलेले दिसून येते. कारण केंद्र सूचीमध्ये ९९ विषय व राज्य सूची मध्ये ६१ विषय अशी असमानता दिसून येते. समवर्ती सूची मधील ५२ विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्र व घटक राज्य सरकार या दोघांनाही समान असला तरीही, जेव्हा एकाच

विषयावर दोघांनाही कायदे करण्याचा प्रसंग निर्माण होतो त्यावेळेस केंद्र सरकारचा कायदा अंतिम मानला जातो. तसेच घटक राज्याच्या विधिमंडळाने केलेले विधेयक राज्यपाल राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवू शकतो. राष्ट्रपती कलम ३५२, ३५६, आणि ३६० अंतर्गत संपूर्ण देशात आणि घटक राज्यांमध्ये आणीबाणी लावू शकतो आणि घटक राज्याचा कारभार आपल्या हातामध्ये घेऊ शकतो, शेषअधिकारही केंद्र सरकारलाच देलेले आहेत. अशाप्रकारे अधिकाराचे जे केंद्रीकरण झालेले आहे, त्यामुळे घटक राज्यांच्या स्वायततेची मागणी पुढे येत आहे जी संघराज्या पुढे एक आव्हान आहे.

**४. घटक राज्यांना असमान प्रतिनिधित्व**

संघराज्य शासन व्यवस्थेमध्ये घटक राज्यांना केंद्रीय कायदेमंडळामध्ये स्थान देण्यासाठी संविधानिक संस्थांची निर्मिती केली जाते. जसे की, कायदेमंडळाच्या दोन सभाग्रहापैकी एका सभागृहामध्ये घटक राज्यांना समान प्रतिनिधित्व दिले जाते. तसेच विधेयकांना मान्यता देण्याचा अधिकारही दिला जातो. परंतु भारतात राज्यसभा या सभागृहात राज्यांना समान प्रतिनिधित्व दिलेले नाही. भारतात घटक राज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यसभेमध्ये प्रतिनिधित्व दिले गेले आहे. त्यामुळे लहान घटक राज्यांचे प्रतिनिधी मोठ्या राज्यांच्या प्रतिनिधींच्या तुलनेत सभागृहात कमी असल्यामुळे लहान घटक राज्यांवर अन्याय होतो. तसेच केंद्रीय कायदेमंडळामध्ये कायदे निर्मिती प्रक्रियेत राज्यसभेस दुय्यम स्थान दिलेले आहे. आर्थिक बाबतीत राज्यसभेस फारसे अधिकार दिलेले नाहीत. तसेच इतर विधेयकाच्या बाबतीतही राज्यसभेने मंजुरी नाही दिली तर कायदेमंडळाची संयुक्त बैठक बोलावली जाते आणि त्यामध्ये बहुमताने निर्णय घेतला जातो. परंतु संयुक्त बैठकीमध्ये ही लोकसभेचे सदस्य संख्या जास्त असल्यामुळे लोकसभेच्या प्रमाणेच विधेयक मंजूर होतात. अशाप्रकारे कायदेमंडळातील घटक राज्यांचे असमान प्रतिनिधित्व आणि राज्यसभेचे दुय्यमत्व हे संघराज्य पुढे एक आव्हान आहे.

**५. केंद्रीकृत घटना दुरुस्ती अधिकार :**

संघराज्य शासन व्यवस्थेत घटनादुरुस्तीचा अधिकार केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यामध्ये समान प्रमाणावर निहीत असतो. परंतु भारतात घटनेच्या कलम ३६८ नुसार घटनादुरुस्तीचा अधिकार केंद्राकडे आहे. बऱ्याच विषयासंदर्भात घटनादुरुस्ती केंद्रीय कायदेमंडळाद्वारेच केली जाते. काही मोजक्या विषयासंदर्भात अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या मंजुरीची आवश्यकता असते. त्यामुळे संपूर्ण देशाला लागू होणारी घटना दुरुस्ती केंद्र सरकार घटक राज्यांना विश्वासात न घेता सुद्धा करू शकते. यातून केंद्र-राज्य संघर्ष होऊन संघराज्यापुढे आव्हान निर्माण होते.

**६. राज्यपाल कार्यालय :**

प्रत्येक घटक राज्याचा घटनात्मक कार्यकारी प्रमुख म्हणून राष्ट्रपती राज्यपालाची नियुक्ती करत असतात. राज्यपाल हे पद भारतातील प्रत्येक राज्यासाठी एक संवेदनशील मुद्दा बनला आहे. कारण ते कधीकधी भारतीय संघराज्याला धोका निर्माण करताना दिसत आहे. राज्यपाल हे केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत. अशा घटनात्मक पदाचा गैरवापर करण्यामध्ये केंद्राचा उघड पाठींबा हा देशात

जोरदार चर्चेचा आणि भिन्न मतांचा विषय झाला आहे. जानेवारी २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेशात राष्ट्रपती राजवट लागू केल्याने, राज्यात निवडून आलेले सरकार असताना भारताच्या घटनात्मक इतिहासात एक विचित्र घटना घडली. १३ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांचा निर्णय असंवैधानिक घोषित केला आणि अरुणाचल प्रदेशमध्ये काँग्रेस सरकारची पुनर्स्थापना करण्याचे आदेश दिले. या महत्त्वाच्या विषयात केंद्र सरकारने राज्यपालांना दिलेला खुला पाठिंबा भारताच्या अर्ध-संघीय रचनेतील उपजत कमकुवतपणा दर्शवतो. देशाचा राजकीय इतिहास कलम ३५६ अंतर्गत केंद्र सरकारने केलेल्या अधिकारांच्या गैरवापराने भरलेला आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्रातील राज्यपालाची भूमिका ही वादात राहिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा राज्यपालाच्या या गैर संवैधानिक कृत्यावर ताशेरे ओढले आहेत. आजही राज्यपालांची भूमिका ही केंद्र सरकार धार्जिणी असलेले दिसते. यामुळे केंद्रीकृत शक्ती मजबूत होत आहेत आणि भारतीय संघराज्याप्रती घटक राज्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे.

**७. एकात्मिक सेवा ::**

एकात्मिक न्यायव्यवस्था हे भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्य आहे. संघराज्याच्या विपरीत, भारतातील सर्वोच्च न्यायालय हे सर्वोच्च आहे आणि इतर सर्व न्यायालये त्याच्या अधीन आहेत. राज्यांमध्ये विशेषत: राज्य प्रकरणांशी संबंधित स्वतंत्र न्यायालये नाहीत. तसेच, भारतातील निवडणुका, लेखा आणि लेखापरीक्षणाची यंत्रणा एकत्रित केली आहे. अखिल भारतीय सेवा आणि इतर केंद्रीय संस्था (CBI, Income Tax, ED) इत्यादी केंद्रीकृत यंत्रणांना अनेक घटक राज्ये आणि टीकाकारांनी संघविरोधी मानले आहेत. तथापि, भारतातील प्रशासनाचे स्वरूप आणि व्याप्ती पाहता, अशा सेवा अत्यावश्यक आहेत कारण त्या भारताचे एकंदर स्वरूप प्रशासनाला प्रदान करतात. या सेवा केंद्र सरकारच्या कारभाराच्या प्रशासनासाठी आहेत. परंतु या सेवांचा वापर केंद्र सरकार सत्ता प्राप्तीसाठी वा घटक राज्यांतील विरोधी पक्षाची सरकारे तोडण्यासाठी किंवा विरोधी पक्षाला संपविण्यासाठी करीत असेल तर अशी परिस्थिती संघाराज्याला धोकादायक ठरते.

**८. केंद्रीकृत नियोजन :**

केंद्र सरकारला भारतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक नियोजनाचे पूर्ण अधिकार आहेत. पूर्वीच्या नियोजन आयोगामार्फत आणि आताच्या नीती आयोगामार्फत केंद्र सरकार राष्ट्रीय आणि प्रादेशिक नियोजनाची आखणी करत असते. त्यामध्ये राज्यांचे प्रतिनिधी असतात. परंतु या नीती आयोगामध्ये सुद्धा राज्यांना दुय्यम स्थान दिलेले आहे. केंद्राच्या दयेवर राज्यांचे आर्थिक अवलंबित्व आणि राज्यांचे प्रशासकीय कनिष्ठत्व यामुळे राज्य कमकुवत बनत चालले आहेत. राज्य फक्त नियोजन ठरवत असताना सूचना करू शकतात परंतु त्या सूचनांचा स्वीकार करणे अथवा ना करणे संपूर्णतः केंद्र सरकारच्या मर्जीवर असते. राज्यांसाठी स्वतंत्र नियोजन आयोगाची आवश्यकता आहे परंतु ते नसल्यामुळे राज्यांच्या विकासात बाधा येत असते. त्यामुळे संघराज्याच्या कामकाजात अडथळा निर्माण होतो.

**९. वित्तीय संघराज्यवादाचा अभाव :**

भारतीय राज्यघटनेने, केंद्राला स्पष्टपणे कर आकारणीचे जास्तीचे अधिकार प्रदान करताना, हा असंतुलन दुर करून केंद्रीय कर महसुलात राज्यांचा वाटा निश्चित करण्यासाठी एक संस्थात्मक यंत्रणा म्हणून वित्त आयोगाची तरतूद केली आहे. वित्त आयोगाने कर आणि अनुदानाच्या तरतुदींचा निर्णय घेताना केंद्र आणि राज्यांमधील असमतोलाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.सध्या केंद्रीय महसूल सुमारे ४० टक्के राज्यांना हस्तांतरित केले जाते. यामध्ये त्यांना नियोजन आयोग आणि केंद्रीय मंत्रालयांकडून मिळणाऱ्या अनुदानाचा समावेश होतो. महसुलाचे असमान वितरण आणि संसाधनांची कमतरता यामुळे देशभरात असमान विकास होतो. बऱ्याच राज्यांना भीती वाटते की सध्याचा वस्तू आणि सेवा कर (GST) उपाय भारतातील वित्तीय संघराज्याच्या विरोधात आहे. याने विविध कर एका करात समाविष्ट केले आहेत. त्यामुळे भारतातील अनेक राज्ये अधिक आर्थिक स्वायत्ततेची मागणी करतात.

**१०. धर्माचा मुद्दा :**

भारत हे धार्मिक विविधतेचे उत्तम उदाहरण आहे. परंतु धार्मिक प्रक्रिया नेहमीच फूट पाडणारी नसावी. जोपर्यंत लोकांच्या बाजूने योग्य सहिष्णुता आहे आणि सरकारचे खरे धर्मनिरपेक्ष धोरण आहे, तोपर्यंत धर्मामुळे संघराज्यात असंतुलन होऊ शकत नाही. परंतु धर्माचा मुद्दा जेंव्हा राजकीय स्वार्थासाठी वापरण्यात येतो तेंव्हा धार्मिक संघर्ष निर्माण होतो, जे कधीकधी संघराज्यास कमकुवत करण्यासाठी अशांततेला जन्म देते.

**११. घटक राज्यांचा असमतोल विकास :**

घटक राज्यांचा असमतोल विकास हे देखील संघराज्यासाठी धोका निर्माण करते. प्रादेशिक असमतोल म्हणजे देशातील विविध प्रदेशांमध्ये संसाधने, संपत्ती, विकास आणि संधी यांचे असमान वितरण होय. भारतामध्ये, प्रादेशिक असमतोल राज्यांमधील आर्थिक असमानता, शिक्षण आणि आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये दिसून येते. उदाहरणार्थ, बिहार आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आणि तामिळनाडू सारख्या राज्यांचा GSDP लक्षणीयरीत्या जास्त आहे. प्रदेशिक असंतुलनाची समस्या दूर करण्यासाठी आर्थिक नियोजन आणि विकास तसेच प्रादेशिक आर्थिक समानता आणि राज्यांची वित्तीय स्वायत्तता आवश्यक आहे.

**१२. बाह्य शक्तींचा हस्तक्षेप :**

बाह्य शक्ती संघराज्यासाठी अडथळे निर्माण करतात. भारताच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये तणाव शेजारी देशांच्या हस्तक्षेपामुळे होत आहे. अरुणाचल प्रदेशच्या काही भागांवर चीनचा दावा भारताच्या प्रादेशिक अखंडतेला धोका आहे. श्रीलंकेतील तामिळ समस्येमुळे भारतात विघटनकारी शक्ती निर्माण होत आहेत. भूतकाळातील खलिस्तान चळवळीत पाकिस्तानचा सहभाग, पाकिस्तान पुरस्कृत सतत होणाऱ्या दहशतवादी कारवाया भारतीय संघराज्य कमकुवत होण्यास मदत करतात.

थोडक्यात भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेपुढे प्रादेशिक असमतोल, भाषिक संघर्ष, केंद्र राज्य अधिकारांचे असमान विभाजन, घटक राज्यांचे राज्यसभेतील असमान प्रतिनिधित्व, केंद्रीकृत घटनादुरुस्ती अधिकार, राज्यपालांची असंवैधानिक भूमिका, केंद्रीकृत एकात्मिक सेवा, केंद्रीकृत नियोजन, वित्तीय संघराज्यवादाचा अभाव, सांप्रदायवाद, घटक राज्यांचा असमतोल विकास, बाह्य शक्तींचा हस्तक्षेप इत्यादी आव्हाने दिसून येतात. या आव्हानांवर मात करून भारतीय संघराज्यास बळकट करणे गरजेचे आहे. संघराज्याला बळकळ करण्यासाठी समतोल विकास, घटक राज्यांची आर्थिक स्वायत्तता, राष्ट्रीय व प्रादेशिक नियोजनात घटक राज्यांचा वास्तविक सहभाग, राज्यपालांची निष्पक्ष भूमिका, केंद्रीय संस्था सीबीआय, ई.डी, इन्कम टॅक्स यांची स्वायत्तता, निवडणूक आयोगाची स्वायत्तता, न्यायालयाचे स्वातंत्र्य, अनुच्छेद ३५६ चा योग्य वापर, इत्यादी घटकांवर लक्ष देणे आवश्यक आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

क. रिकाम्या जागी योग्य उत्तर लिहून विधाने पूर्ण करा.

१. भारतात .................. भाषांना घटनात्मक मान्यता आहे.

२. भारतात राष्ट्रीय नियोजन करण्यासाठी .................. आयोगाची स्थापना करण्यात आली आहे .

३. भारतात घटक राज्यांना .................. प्रमाणात राज्यसभेमध्ये प्रतिनिधित्व दिले गेले आहे.

४. घटक राज्याचा घटनात्मक कार्यकारी प्रमुख म्हणून .................. राज्यपालाची नियुक्ती करत असतात.

५. .................. न्यायव्यवस्था हे भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्य आहे.

## ४.३ सारांश :

भारतात संघराज्य शासन व्यवस्था स्वीकारण्यात आली. परंतु ती अमेरिका या देशाच्या संघराज्यासारखी तंतोतंत नाही. याचा अर्थ भारतीय शासन व्यवस्था बाह्य रूपाने संघराज्य आहे, परंतु अंतरंगात संघराज्यात्मक व एकात्म या दोन्ही शासनाची वैशिष्ट्ये दिसून येतात. भारतीय संविधानात एक प्रकारची संघीय एकात्मक पद्धती स्वीकारण्यात आली असून ती बऱ्याच मर्यादेपर्यंत एकात्म पद्धतीकडे झुकलेली आहे आणि यामध्ये घटक राज्य बहुतांशी केंद्राच्या आधीन आहेत. भारतात केंद्र सरकार व घटक राज्य सरकार असे दुहेरी शासन व्यवस्था स्वीकारण्यात आली आहे. भारतीय संविधानात केंद्र व राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्राच्या विभागणी संबंधी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. भारतीय संविधान पूर्णतः लिखित स्वरूपात असून त्यामध्ये केंद्र व घटक राज्य यांची रचना व अधिकार यांचे विस्तृत मांडणी केलेली आहे. भारतात स्वतंत्र न्यायमंडळ अस्तित्वात असून ते संविधानाचे संरक्षक म्हणून काम करते. केंद्र व घटक राज्य शासन संस्थांनी आपल्या मर्यादेतच काम करावे याबाबत न्यायव्यवस्था दक्ष असते. घटक राज्यांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी राज्यसभा या वरिष्ठ सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. भारतात केंद्रशासन अधिक अधिकार संपन्न असून केंद्र सूचित सर्वाधिक ९९ विषयाचा समावेश आहे तर राज्य सूचीमध्ये ६१ विषय आहेत. तुलनात्मक

दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे विषय केंद्र सूची मध्ये आहेत .समवर्ती सूचीमध्ये ५२ विषय असून त्यावर केंद्र व राज्य दोघांनाही कायदे करता येतात. भारतात केंद्र व राज्यासाठी एकच राज्य घटना आहे. त्यामुळे अशी व्यवस्था एकात्मशासन पद्धतीशी सुसंगत वाटते. भारतीय संविधानाने कॅनडाच्या संविधानाप्रमाणे प्रत्येक नागरिकास एकेरी म्हणजेच केवळ देशाचे नागरिकत्व प्रदान केले आहे. भारतात केंद्र व राज्यांसाठी एकेरी न्यायव्यवस्था अस्तित्वात असून सर्वोच्च न्यायालय न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी विराजमान आहे. राज्यपाल हा राज्य शासनाचा घटनात्मक प्रमुख असतो. भारतीय संसद घटक राज्यांच्या नावात, क्षेत्रात व सीमेत परिवर्तन करू शकते. तसेच नवीन राज्याची निर्मिती करू शकते. संपूर्ण भारतासाठी एकच केंद्रीय निवडणूक आयोग कार्यरत असून केंद्रीय व राज्य पातळीवरील निवडणूक विषयक कायदे करणे, निवडणुका घेणे आदी कार्य त्यास करावे लागतात. भारतातील घटक राज्य आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नाहीत. ही राज्य व्यापक प्रमाणात मध्यवर्ती शासनावर निर्भर आहेत. थोडक्यात भारतीय संघराज्य हे राज्याचा संघ असून ते अविनाशी आहे. देशाचे व येथील जनतेचे विभाजन वेगवेगळ्या घटक राज्यात करण्यात आले असते तरी भारत हे संपूर्णतः एक राष्ट्र आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्दावली :

१. एकात्म शासन – एकात्मक शासनपद्धतीत देशाची संपूर्ण सत्ता केंद्र शासनाकडे असते. या पद्धतीत देशात फक्त केंद्र शासनाचे अस्तित्व असते. प्रशासकीय व अन्य सोयीच्या दृष्टीने देशात राज्यांची निर्मिती करण्यात आलेली असते.

२. संघराज्य शासन – संघराज्य शासन व्यवस्थेत राष्ट्रीय पातळीवर केंद्रशासन कार्यरत असते तर देशातील प्रत्येक घटक राज्यासाठी स्वतंत्र राज्य शासन असते. म्हणजेच संघराज्य शासन व्यवस्थेत दुहेरी शासन व्यवस्था असते.

३. एकेरी नागरिकत्व – भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकास एकेरी म्हणजेच केवळ देशाचे नागरिकत्व प्रदान केले आहे भारतीय व्यक्तींना अमेरिका वा स्विझर्लंड प्रमाणे घटक राज्यांचे वेगळे नागरिकत्व देण्याची व्यवस्था करण्यात आली नाही.

४. एकेरी न्यायव्यवस्था – भारतात केंद्र व राज्यांसाठी एकेरी न्यायव्यवस्था अस्तित्वात असून सर्वोच्च न्यायालय न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी विराजमान आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय उच्च न्यायालय, दुय्यम न्यायालय, केंद्र व राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच देशाच्या नागरिक या सर्वांवर बंधनकारक असतात.

५. शेषा अधिकार – ज्या विषयांचा स्पष्ट उल्लेख कोणत्याही यादीत केला नाही त्यांना शेषा अधिकार असे म्हणतात. शेषा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत.

६. राष्ट्रपती राजवट – घटनेच्या कलम ३५६ नुसार एखाद्या राज्यात संविधानिक तरतुदीनुसार कारभार करणे अशक्य आहे असा अहवाल त्या राज्याच्या राज्यपालाने दिल्यास व राष्ट्रपतीची तशी खात्री पटल्यास त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात येते.

७. अखिल भारतीय सेवा– राज्यघटनेच्या ३१२ व्या कलमानुसार अखिल भारतीय सेवांची तरतूद करण्यात आली आहे. उदा: भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा इत्यादी. या सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक केंद्र शासनाकडून होते व त्यांच्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण असते. मात्र हे अधिकारी राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेत काम करतात.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

स्वयं अध्ययन प्रश्न– १

१. दुहेरी 	२. 'राज्याचा संघ' 	३. अर्ध संघराज्य

४. ९९ 	५. ९

स्वयं अध्ययन प्रश्न–२

१. केंद्रसुचीत 	२. राष्ट्रपती 	३. २६३

४. वित्त आयोगाची 	५. ३१२

स्वयं अध्ययन प्रश्न–३

१. २२ 	२. नीती 	३. लोकसंख्येच्या

४. राष्ट्रपती 	५. एकेरी

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

१. पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा?

   १. भारतीय संघराज्याचा अर्थ सांगून, त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा?

   २. केंद्र राज्य संबंध स्पष्ट करा ?

   ३. भारतीय संघराज्यापुढील आव्हाने स्पष्ट करा?

२. टिपा लिहा :

   १. भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये

   २. केंद्र–राज्य कायदेविषयक संबंध

   ३. केंद्र–राज्य प्रशासकीय संबंध

   ४. केंद्र–राज्य आर्थिक संबंध

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


1. Austin, Granville (1966). Indian Constitution: A Cornerstone of a Nation. OUP. New Delhi.
2. Avasthi and Avasthi, (2017), Indian Constitution, 2nd ed., Lakshmi Narain Agarwal, Agra
3. Basu, D. D., others (2015). Introduction to Indian Constitution, Lexis Nexis, Gurgaon
4. Dasarathy Bhuyan, (2016). Political Process in India, Kitab Mandal, Cuttack
5. Jayal, N. G., and Mehta, P. B., (Eds) (2010) Oxford Companion to India Politics Oxford University Press. New Delhi
6. Laxmikanth, M., (2021). Indian Polity. McGraw Hill Education. New Delhi
7. Stanely A Kochanek, Robert L. Hardgrave, (2006) India Government and Politics in a Developing Natio., Wards Worth Publishing, Boston.

८. ऑस्टिन ग्रॅनव्हिल, (२०१३), भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

९. भोळे, भा. ल., (२००३), भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर,

१०. जोशी.प. ल.. भारतीय संविधान शासन आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर,

११. पाटील वी. बी., व चव्हाण उर्मिला, भारतातील राजकीय प्रक्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. पाटील बी. बी., भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर,

१३. जाधव तुकाराम आणि शिरपूरकर महेश, (२०२१) भारतीय संविधान आणि भारतीय राजकारण, दि युनिक अकादमी प्रकाशन, पुणे.

१४. दिवाण एम, देवधर जे., दिवाण व्ही. (२००४), भारतातील राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर.


❑❑❑

# घटक १
# कायदेमंडळ

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारताचे कायदेमंडळ

१.२.२ लोकसभा

१.२.३ राज्यसभा

१.२.३.१ संसदीय आयधे (उपकरणे)

१.२.३.२ स्थगन प्रस्ताव

१.२.३.३ अविश्वास दर्शक ठराव

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटक अभ्यासानंतर पुढील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

- कायदेमंडळाचा अर्थ समजून घेता येईल.
- लोकसभा सभागृहाची रचना, अधिकार व कार्याची माहिती होईल.
- राज्यसभा सभागृहाची रचना, अधिकार व कार्याची माहिती होईल.
- संसदीय आयुधे (उपकरणे) यातील काहीची माहिती घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

भारताने संसदीय शासनपध्दतीचा अवलंब केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत राहूनच राज्याचा राज्यकारभार करणाऱ्या भारतीय शासनसंस्थेचा अभ्यास करावा लागतो. शासन संस्था म्हणजे राज्यातील जनतेवर राज्य करणारी व नियत्रंण ठेवणारी संस्था होय. शासन संस्थेमध्ये, कायदेमंडळ कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या तीन शाखाचा समावेश होतो. यातील प्रस्तुत घटकात कायदेमंडळाचा अभ्यास करता येईल. कायदेमंडळ हे राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी धोरण निश्चिती करणे, नवीन कायदा तयार करणे, अस्तित्वात असलेला कायद्यात बदल करणे इ. अधिकार आहेत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ कायदेमंडळ (भारतीय संसद)

शासनाच्या कायदे करणाऱ्या शाखेला म्हणजेच कायदेमंडळाला संसद असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेच्या भाग पाच मधील कलम ७९ ते १२२ मध्ये संसदे संबधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतात संसदीय शासनपध्दती असल्यामुळे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचा घनिष्ठ संबंध आहे. भारताच्या व इंग्लडच्या कायदेमंडळाला संसद, अमेरिकेमध्ये काँग्रेस, जपानमध्ये डायट, स्विझर्लंडमध्ये – राष्ट्रीय सभा, रशियामध्ये ड्रामा, चीनमध्ये राष्ट्रीय जन काँग्रेस, स्विडमध्ये रिक्सडँग असे म्हणतात. भारताचे कायदेमंडळ हे द्विगृही स्वरुपाचे आहे. राज्यसभा हे विरष्ठ सभागृह व लोकसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधीत्व करते तर राज्यसभा हे राज्याचे प्रतिनिधीत्व करते. कायदे तयार करणे कायदेमंडळाचे मुख्य कार्य आहे. संसदेत राज्यसभा व लोकसभा या दोन्ही सभागृहाबरोबरच राष्ट्रपतीचा ही समावेश होतो. राष्ट्रपतींना संसदेचे तिसरे सदन म्हणून सुध्दा संबोधले जाते. राष्ट्रपती कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसतो. तरीही तो संसदेचा अभिन्न अंग असते. त्यांच्या स्वाक्षरी शिवाय कायद्याची निर्मिती होऊ शकत नाही.

### १.२.२ लोकसभा

लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम व कनिष्ठ सभागृह आहे. लोकसभा ह जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. प्रत्यक्ष गुप्त व प्रौढ मताधिकाराच्या पध्दतीने जनता लोकप्रतिनिधीची निवड करते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ मध्ये लोकसभेच्या रचनेची तरतूद केली आहे. प्रत्येक घटक राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभा प्रतिनिधीची संख्या ठरवली जाते. संसदीय शासन प्रणालीमध्ये लोकसभेस व्यापक व प्रभावी अधिकार देणात आले आहेत.

**१) सदस्य संख्या**

लोकसभागृहाची सदस्य संख्या ५४५ आहे. त्यापैकी ५२५ घटकराज्यातील मतदार संघातून निवडले जातात, २० सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडले जातात. ॲग्लो इंडीयन जमातीना लोकसभेत योग्य प्रतिनिधीत्व मिळाले नसेल तर त्यांचे दोन सभासद राष्ट्रपतीमार्फत नियुक्त केले जातात. भारतीय राज्यघटनेने

अनुसूचीत जाती व जमाती साठी लोकसभेत राखीव जागाची तरतुद केली आहे. साधारणत: १० लाख लोकसंख्येमागे एक प्रतिनिधीत्व या प्रमाणात लोकसभेचे मतदार संघ पाडले जातात.

**२) उमेदवाराची पात्रता –**

राज्यघटनेच्या कलम ८४ नुसार लोकसभा उमेद्वाराची पात्रता खालीलप्रमाणे असावी लागते.

१) ती व्यक्ती भारताची नागरीक असावी.

२) त्या व्यक्तीने वयाची २५ वर्ष पूर्ण केलेली असावी.

३) संसदेने वेळोवेळी कायदा करुन ठरवून दिलेल्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

४) निवडणूक लढवणारी व्यक्तीचे नाव संसदीय मतदार संघाच्या यादीत मतदार म्हणून नोंदविलेले असले पाहिजे.

५) राखीव मतदार संघातून निवडणूक लढवणारी व्यक्ती संबधीत जाती–जमातीची असावी लागते.

६) ती व्यक्ती सरकारी नौकर, परकीय, दिवाळखोर व भ्रष्टाचारी नसावी.

**३) कार्यकाल –**

लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. लोकसभेच्या सदस्याचा कार्यकाल ही पाच वर्षाचा आहे. लोकसभेचा कार्यकाल राष्ट्रपतीला वाटल्यास वाढवू शकतात. मात्र या आदेशास नंतर लोकसभेची मंजूरी घ्यावी लागते. लोकसभा मदतीपूर्वी विसर्जित करणाचा ही अधिकार राष्ट्रपतीला आहे. १९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती होऊन लोकसभेचा कार्यकाल हा सहा वर्षाचा करण्यात आला. पुढे १९७८ साली ४४ वी घटना दुरुस्ती होऊन पूर्ववत पाच वर्ष करण्यात आला. आजपर्यंत १९७०, १९७७, १९७९, १९९०, १९९७ आणि २००४ मध्ये मुदतपूर्व लोकसभा बरखास्त करण्यात आली होती.

लोकसभेचा सदस्य मूदतपूर्व आपल्या पदाचा राजीनामा लोकसभा सभापतीकडे देऊ शकतो.

**४) लोकसभा सदस्यांची निवड –**

ज्या व्यक्तीचे वय १८ वर्ष पूर्ण झालेले आहे व त्यांचे मतदार यादीत नाव असेल अशा प्रौढ व्यक्तीकडून प्रत्यक्ष गुप्त मतदान पध्दतीद्वारे सदस्याची निवड केली जाते.

**५) सदस्याची बडतर्फी –**

लोकसभा सदस्याला आपल्या सदस्यत्त्वाचा मुदतीपूर्वी स्वमर्जीने राजीनामा देता येतो. व एखादा सदस्य सलग ६० दिवस सभागृहात गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते. एखाद्या सदस्याने सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणल्यास त्याला बडतर्फ करणाचा अधिकार लोकसभा सभापतीना आहे.

६) **गणसंख्या –**

लोकसभेचे कामकाज सुरु करणासाठी एकूण सदस्य संख्येच्या १/३ सदस्य सभागृहात राहणे आवशक आहे. लोकसभेत किमान ५५ सदस्य हजर असल्याशिवाय कामकाजास सुरवात करता येणार नाही.

**लोकसभेचे अधिवेशन –**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८५ नुसार राष्ट्रपतीना संसदेचे अधिवेशन बोलवणाचा अधिकार आहे. लोकसभेचे वर्षातून किमान दोन वेळा अधिवेशन भरवीले जाते. परंतु लोसभेच्या दोन्ही अधिवेशनातील अंतर ६ महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये. अशी अट घालण्यात आली आहे.

**वेतन व भत्ते –**

राज्यघटनेच्या कलम १० नुसार संसद सदस्याचे वेतन व भत्ते ठरविणाचा अधिकार संसदेला आहे. भारताच्य संचित निधीतून वेतन व भत्ते दिले जातात.

**लोकसभेचे पदाधिकारी**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ ते ९७ मध्ये लोकसभा सभापती व उपसभापती यांची तरतूद करण्यात आलेली आहे. लोकसभेच्या कामकाजाचे संचलन, नियत्रंण आणि न्याय मार्गदर्शन करणारे महत्त्वाचे दार म्हणजे लोकसभेचा सभापती होय. लोकसभेच्या निवडणूका झाल्यानंतर पहिल्याच सत्रात लोकसभा सदस्यातून एका सदस्याची सभापती व दुसऱ्या सदस्याची उपसभापती म्हणून निवड केली जाते. सभापती व उपसभापती यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. ते मुदतपूर्व आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

सर्वसाधारणत : लोकसभेच्या सभापतीची निवड सर्व संमतीने होत असते. सभापतीने आपल्या पदाची जबाबदारी भययुक्त निष्पक्ष, निर्भिक, व तटस्थपणे पार पाडणे आवशक असते. सभापती पदाची जबाबदारी पक्षीय राजकारणापलीकडे पार पाडणे अपेक्षित असते.

**सभापतीचे अधिकार व कार्य**

१) सभागृहातील बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविणे व संचलन करणे.

२) सभागृहातील शिस्त व सन्मान यांची हमी देणे.

३) सभागृहात चर्चेल्या जाणाऱ्या विषयाची रुपरेषा ठरविणे, त्याची वेळ निश्चीत करणे व चर्चा घडवून आणणे.

४) सदस्यास वक्तशीरपणा व समयसूचकते विषयी बंधणे पाळावयास लावणे.

५) सभागृहातील कामकाजातील प्रश्न, दुरुस्त्या, विविध प्रस्ताव व ठराव आणि लक्षवेधी सूचना स्वीकारणे किंवा नाकारणे.

६) सदस्यांना मतप्रदर्शनास परवानगी देणे आणि सभासद अवांतर बोलत असल्यास त्याला मुद्यावर आणणे.

७) राष्ट्रपती आणि लोकसभा सदस्य यांच्यातील दूवा म्हणून काम करणे.

८) पक्षातर बंदी कायद्यानुसार सभागृहाच्या सदस्यास दोषी ठरवणे.

**विशेष अधिकार**

१) एखादे विधेयक धन (अर्थ) विधेयक आहे किंवा नाही हे ठरवणे.

२) दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूसविणे.

३) एखाद्या विषयावर दोन्ही बाजूनी सम समान मतदान झाल्यास त्याबाबत निर्णायक मत देणे.

४) सभागृहाची बैठक तहकूब करणे.

५) संसदीय समित्याची कार्यवाही करणे.

**लोकसभागृहाचे अधिकार व कार्य :**

**१) कायदेविषयक अधिकार –**

कायदे निर्मिती हे लोकसभेचे महत्वाचे कार्य आहे. केंद्र व घटकराज्य सरकार यांच्यामध्ये अधिकाराची विभागणी केली आहे. त्यानुसार केंद्र सूचीमधील व समवर्ती सूचीमधील विषयासबंधी कायदा करण्याचा अधिकार आहे. घटकराज्यांनी विनंती केल्यास किंवा राष्ट्रपती राजवट लागू असल्यास राज्यसूचीतील विषयावर सुध्दा कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो. नवीन कायदे तयार करणे, जून्या कायद्यात दुरुस्ती करणे व कालबाहा कायदे रद्द करणे, साधारणत विधेयक प्रथम मंजूरीसाठी पाठविले जाते. दोन्ही सभागृहात एखाद्या विधेयकांसबंधी त्यामध्ये बहुमताने निर्णय घेतला जातो. शेवटी राष्ट्रपती ची स्वाक्षरी होऊन विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते.

**२) कार्यकारी अधिकार –**

संसदीय लोकशाहीच्या अंगभूत वैशिष्ट्यानुसार कार्यकारी मंडळाची निर्मिती कायदेमंडळातूनच होत असल्याने देशाला शासन प्राप्त करुन देणाचे कार्य कायदेमंडळ करत असते. पर्यायी कार्यकारीमंडळ हे लोकसभेला जबाबदार काम करते. लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळ विरुध्द लोकसभेने अविश्वास दर्शविल्यास मंत्रीमंडळास राजीनामा द्यावा लागतो. कार्यकारी मंडळावरती नियत्रंण ठेवणे, आर्थिक तसेच राजकीय साधनाच्या माध्यमातून शासकिय धोरणे, उपाय आणि त्यांच्या अंमलबजावणीची चिकित्सा करुन कार्यकारी मंडळास उत्तरदायीत्व बनवते.

**३) आर्थिक अधिकार –**

एखादे विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार लोकसभा सभापतीना आहे. इतर विधेयक (सामान्य विधेयक) संसदेला कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. मात्र अर्थ विधेयक प्रथम लोकसभेतच मांडावे लागते. लोकसभेत अर्थविधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यसभेच्या मंजूरीसाठी

पाठवले जाते. राज्यसभेला ते विधेयक १४ दिवसाच्या आत मंजूर किंवा ना मंजूर करून पाठवावे लागते. १४ दिवसापर्यंत राज्यसभेने काहीही कळवले नसेल तर राज्यसभेत ते विधेयक मंजूर आहे असे समजले जाते. अर्थ विधेयकाबाबत दोन्ही सभागृहात सहमती न झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जात नाही.

**४) घटनादुरुस्ती विषयक अधिकार**

राज्यघटनेच्या कलम ३६८ नुसार घटना दुरुस्ती करण्याचा अधिकार दोन्ही सभागृहाना समान अधिकार आहे. घटनेतील काही कलमात, तत्वात दुरुस्ती करावयाची असेल तर संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या साध्या बहुमताने करता येते. भारतीय राज्यघटनेमध्ये तीन प्रकाराने घटना दुरुस्ती करता येतो एक संसदेच्या साध्या बहुमताने, विशेष बहुमताने व त्याचबरोबर ५० टक्के घटकराज्याच्या विधीमंडळाच्या मान्यता घेऊन घटनादुरुस्ती करता येते.

**५) निर्वाचन विषयक**

भारताच्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करणाचा अधिकार लोकसभा सदस्याना (निर्वाचीत) आहे.

**६) महाभियोगाचा अधिकार**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिश, निवडणूक आयुक्त, नियत्रंक व महालेखा परिक्षक अशा वरिष्ठ पदावरील व्यक्तीनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग केल्यास महाभियोग प्रस्तावाद्वारे संसद बहुमताने त्यांना पदावरुन दूर करु शकते.

**७) वटहूकूमास मंजूरी देणे**

स्ंसदेचे अधिवेशन चालू नसताना विशिष्ट परिस्थितीत एखाद्या कायद्याची आवश्यकता असल्यास राष्ट्रपती वटहूकूम काढू शकतात. संसदेचे अधिवेशन सुरु झाल्यानंतर त्या वटहूकूमास लोकसभा व राज्यसभेची मंजूरी घ्यावी लागते.

### १.२.३ राज्यसभा

भारतीय राज्यघटनेतील कलम ८० मध्ये राज्यसभेची रचना व अधिकार या विषयी तरतुद केलेली आहे. राज्यसभा हे भारतीय संसदेचे वरिष्ठ व द्वितीय सभागृह आहे. राज्यसभा हे घटकराज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. अनुभवी त तज्ञ सदस्यांचा शासन कारभारात लाभ करुन घेता येतो यासाठी राज्यसभा उपयुक्त ठरते राज्यसभागृह हे लोकसभागृहाने पारित केलेल्या विधेयकाचे पुनर्विलोकन करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. दुसऱ्या सभागृहामुळे एकाच सभागृहाच्या एकाधिकारशाही, हूकूमशाही प्रवृत्तीस आळा घालता येऊ शकतो.

**१) सदस्य संख्या –** भारतीय राज्यघटनेतील कलम ८० नुसार राज्यसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त २५० इतकी निश्चित करण्यात आली आहे.

**२) निवड –** राज्यसभा सदस्याची निवड त्या त्या घटकराज्याच्या विधानसभेच्या निर्वाचीत सदस्यामार्फत होते. राज्यसभा सदस्याची निवडपध्दती अप्रत्यक्ष स्वरुपाची आहे. राज्यसभेचे सदस्य एकल संक्रमणीय प्रमाणीशर प्रतिनिधीत्व पध्दतीने निवडले जातात. १२ सदस्य राष्ट्रपतीमार्फत कला, साहित्य, विज्ञान, सामाजिक सेवा, तज्ञ व्यक्तीची निवड केली जाते.

**३) पात्रता –**

१) ती व्यक्ती भारताची नागरीक असावी.

२) तीचे वय किमान ३० वर्ष पूर्ण असावे.

३) संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटिची पूर्तता करावी.

४) ज्या घटकराज्यातून उमेदवार निवडणूक लढवणार आहे त्या घटकराज्याच्या मतदार संघात तिचे नाव असले पाहिजे.

५) संबधीत उमेदवार शासकिय नोकर, वेडा, दिवाळखोर, गुन्हेगारी व भ्रष्टाचारी नसावा.

**राज्यसभेचा कार्यकाल –**

राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. ते कधीही विसर्जीत केले जाते नाही. दर दोन वर्षानी राज्यसभेचे सदस्य निवृत्त होतात व तया जागेवर तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात. राज्यसभा सदस्याचा कार्यकाल सहा वर्षाचा आहे.

**गणसंख्या –**

सभागृहाचे कामकाज सुरू करणासाठी सभागृहातील एकूण सदस्यापैकी १/३ सदस्य म्हणजेच २५ सदस्य उपस्थित असावे लागतात.

**वेतन व भत्ते –**

संसद वेळोवेळी कायदा करुन राज्यसभा सदस्याना वेतन, भत्ते व इतर सोई–सुविधा दिल्या जातात. भारताच्या संचित निधीतून वेतन व भत्ते दिले जातात.

**राज्यसभेचे पदाधिकारी –**

राज्यसभेत एक अध्यक्ष व उपाध्यक्ष असे दोन पदाधिकारी असतात. भारतीय राज्यघटनेतील कलम ८९ नुसार उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. तर उपाध्यक्ष हा राज्यसभेतील सदस्यातून नियुक्त केले जातात.

**राज्यसभागृहाचे अधिकार व कार्य –**

**१) कायदेविषयक अधिकार :**

सर्व साधारण विधेयकास राज्यसभेची मंजुरी आवशक असते. धनविधेयक व घटनादुरुस्ती विधेयक वगळता अन्य विधेयक प्रथम राज्यसभेमध्ये मांडता येतात. अर्थ विधेयक व घटनादुरुस्ती विधेयक वगळता

अन्य विधेयकाबाबत दोन्ही सभागृहात मत भेद निर्माण झाल्यास संयुक्त बैठक बोलवली जाते. कायदेनिर्मीतीमध्ये लाकसभेप्रमाणेच राज्यसभेला अधिकार आहेत. राज्यसभेच्या संमतीशिवाय विधेयकाचे कायदाात रुपांतर हात नाही. नवीन कायदे करणे, जून्या कायद्यात दुरुस्ती करणे व कालबाह्य कायदे रद्द करणे. असे कायदे राज्यसभा करीत असते.

**२) कार्यकारी अधिकार**

केंद्रीय मंत्रीमंडळ हे घटनेतील तरतुदीप्रमाणे लोकसभेला जबाबदार राहून कार्य करते. परंतु राज्यसभा सुध्दा वेगवेगळ्या मार्गानी मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवीत असते. संसदीय आयुधाच्या माध्यमातून राज्यसभा मंत्रीमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवते.

**३) आर्थिक अधिकार**

आर्थिक क्षेत्रात राज्यसभेला नाममात्र अधिकार आहेत. अर्थविधेयक हे प्रथमत लोकसभेतच पारित केले जाते. अर्थ विधेयकाबाबत राज्यसभेला केवळ १४ दिवसाचा अवधी मिळतो. या अवधीत राज्यसभा ते विधेयक मंजूर, ना मंजूर किंवा शिफारशी व दुरुस्त्यासह परत पाठवते. राज्यसभेने केलेल्या दुरुस्त्या मान्य करणे लोकसभेला बंधनकारक नसतात. अर्थ संकल्पीय भाषण केवळ लोकसभेतच होत असले तरी अर्थसंकल्प मात्र राज्यसभेतही सादर केला जाऊ शकतो.

**४) घटनादुरुस्ती विषयक अधिकार**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २६८ नुसार संसदेस घटनादुरुस्तीचा अधिकार प्राप्त आहे. घटना दुरुस्ती विधेयक राज्यसभेतही मांडता येऊ शकते. घटना दुरुस्ती विधेयका बाबत राज्यसभेच्या मंजुरीशिवाय घटनादुरुस्ती होऊ शकत नाही.

**५) निर्वाचन विषयक**

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकीत मतदान करणाचा अधिकार राज्यसभा सदस्यांना आहे.

**६) महाभियोगाचा अधिकार**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश, निवडणूक आयुक्त, नियत्रंक व महालेखा परीक्षक यानी घटना विरोधी वर्तन केल्यास त्याना पदच्युत करणाचा अधिकार राज्यसभेला आहे. या बरोबर राज्यसभेला वटहूकूमास मंजुरी देणे, आखील भारतीय सेवाची निर्मिती आणि आणीबाणीस मंजुरी देणे इत्यादी विषयक अधिकार व कार्य राज्यसभेला आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) लोकसभेचा कार्यकाल............वर्षाचा आहे.

२) भारतीय कायदेमंडळास............म्हणून संबोधले जाते.

३) ..........सभागृह हे स्थायी स्वरुपाचे आहे.

४) लोकसभा सदस्य म्हणून निवडणूक लढवीणाऱ्या उमेदवाराचे वय........वर्ष असावे लागते.

५) राज्यसभेत........सदस्य राष्ट्रपतीमार्फत नामनिर्देशीत केले जातात.

६) ..........हा राज्यसभेचा पदसिध्द अध्यक्ष असतो.

७) अर्थविधेयक हे प्रथम.........या सभागृहात मांडले जातात.

- **संसदीय आयुधे (Parliamentry Devices)**

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजावण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासकीय कामकाजावर नियत्रंण आणण्याच्या दृष्टीने संसदेला विविध आयुधे प्राप्त होतात. कार्यकारी मंडळावरती नियत्रंण ठेवणे, शासनाला दिशा देणे. प्रशासनातील त्रुटी, गैरव्यवहार शोधून काढणे, योग त्या उपाययोजना सूचविणे, शासनाला धोरणात्मक मार्गदर्शन करणे हा संसदेचा घटनात्मक अधिकार आहे. कार्यकारी मंडळावरती नियत्रंण ठेवणासाठी संसदेला विविध आयुधाचा वापर करता येतो. प्रश्न, प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, शुन्य प्रहर, अल्पकालीन चर्चा, हक्कभंग प्रस्ताव, निंदाव्यंजक ठराव, अविश्वासदर्शक ठराव, विश्वाससदर्शक प्रस्ताव, आणि संयुक्त बैठक, सत्र समाप्ती प्रस्ताव इत्यादी संसदिय आयुधे आहेत. त्या पैकी काही आयुधाचा अभ्यास करावा लागतो.

**प्रश्नोत्तर (Question & Answer)**

संसदेच्या अधिवेशनातील दोन्ही सभागृहात प्रत्येक दिवशी सकाळी ११ ते १२ हा कामाचा पहिला तास प्रश्नोत्तरासाठी राखीव ठेवला जातो. राज्यातील जनतेच्या सार्वजनीक हिताच्या संदर्भात सदस्याच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या, सोडविण्याच्या दृष्टिने तसेच राज्याच्या शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनाच्या उणीवा दुर करण्यासाठी व शासनाची भूमीका समजाऊन घेण्यासाठी प्रश्नोत्तर पध्दतीचा उपयोग होतो. पर्यायाने या प्रश्नोत्तरामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत व कार्यवाही बाबत व त्यातील उणीवा दूर करणाच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे. प्रश्नोत्तराचे प्रकार पडतात. १) तारांकीत प्रश्न २) अतारांकीत प्रश्न ३) अल्पसूचना प्रश्न

**१) तारांकित प्रश्न**

ज्या प्रश्नाना सभागृहात तोंडी उत्तरे दिले जाते व या प्रश्नांना तारांकनाची खूण केलेली असते त्याला तारांकित प्रश्न असे म्हणतात. सदस्यांना अधिवेशनात तारांकित प्रश्न वेळेवर देता यावे या दृष्टीने त्यांच्याकडे विधीमंडळातील सचिवालयामार्फत तारांकित प्रश्नाचा चक्रानुक्रम पाठविण्यात येतो. मंत्र्याना त्यांच्या विभागाशी संबधीत प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी सोईचे व्हावे या दृष्टीने चक्रानुक्रमाने गटवार विभागणी केली जाते. त्यात निरनिराळ्या मंत्र्याकडे असलेल्या खात्यासंबधीचे ताराकिंत प्रश्न तोंडी उत्तराकरीता त्या तारखाना

घेता येतील त्या तारखा दिलेल्या असतात. तारांकित प्रश्नाचा चक्रानुक्रम गटक्रमांक, गटामध्ये समाविष्ट असलेला मंत्री, प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक, प्रश्नाची सूचना मिळाल्याचा दिनांक, मंत्र्याचे नाव व अधिन असलेले विभाग या सबंधीचे विवरण असते.

तारांकित प्रश्नासंबंधी संबंधीत मंत्री या प्रश्नाची तोंडी उत्तरे देतात. मंत्र्यानी दिलेल्या उत्तराशी संबंधीत पूरक किंवा एक उपप्रश्न विचारता येतो. एका दिवसात एक सदस्य एकच तारांकित प्रश्न विचारू शकतो. तारांकित प्रश्न किमान १५ दिवस आधी सूचना द्यावी लागते.

**२) अतारांकित प्रश्न**

जेव्हा सदस्याना प्रश्नाचे केवळ लेखी उत्तर हवे असते व या प्रश्नाना तारांकनाची खूण केलेली नसते त्याला अतारांकित प्रश्न असे म्हणतात. अतारांकित प्रश्नाची सूचना देण्यासाठी सदस्याना कोणतीही मुदत नसते. अशा प्रश्नाचे उत्तर स्वीकृत प्रश्न शासनाला प्राप्त झाल्यापासून एका महिन्याच्या आत द्यावे लागते. ज्या प्रश्नात खास तक्रार नाही केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकीय माहिती विचारली असेल असे प्रश्नही अतारांकित प्रश्न म्हणून स्वीकृत केले जातात.

एखाद्या सदस्याने अतारांकित प्रश्नांचा प्रस्ताव दिला असेल त्या प्रश्नातील विषयाबाबत राज्यशासन प्रामुख्याने जबाबदार असणे, प्रश्न हा सार्वजनिक महत्त्वाचा असणे, संबंधीत मंत्र्याच्या अधिकारकक्षेतील असणे व प्रश्नाला वस्तुस्थीतीचा आधार असणे तेच प्रश्न स्वीकृत केले जातात.

**३) अल्प सूचना प्रस्ताव**

सदस्यास एखाद्या अत्यावश्यक तातडीच्या प्रश्नाचे उत्तर ताबडतोब हवे असेल तर त्यांची सूचना अधिवेशनाच्या प्रांरभीपूर्वी सात दिवसाच्या अगोदर देता येत नाही. अल्पसूचना प्राप्त तातडीने उपस्थित झालेल्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर असले पाहिजेत. अल्प सूचना प्रश्नाची सूचना देताना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे. त्यांचे स्पष्टीकरण द्यावे लागते. ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे. तो थोडक्यात व मुद्देसुदपणे विचारावा लागतो. अल्पसूचना प्रश्न मिळाल्यानंतर संबधीत मंत्री या प्रश्नांची तोंडी उत्तरे देतात आणि उपप्रश्न विचारता येतात. अल्पसूचना प्रश्न केवळ संबधीत मंत्र्याच्या सहमतीनेच विचारता येतो.

एकूणच प्रश्नोत्तराचा तास शासनावर अंकुश ठेवण्याचे प्रभावी साधन असते. विशेषतः मंत्र्याना जागरुक व कार्यक्षक ठेवणासाठी उपयुक्त ठरते.

**स्थगन प्रस्ताव : (adjournment motion)**

स्थगन प्रस्ताव हा संसदेतील सर्वात प्रभावी अस्त्र मानले जाते. सर्वसाधारणपणे सभागृहाचे कामकाज ठरवून दिलेल्या बाबीप्रमाणे चालते. परंतु बऱ्याच वेळा काही गंभीर व तातडीची परिस्थिती निर्माण होते की, त्या बाबतची तातडीने दखल घेणे गरजेचे असते. आकस्मितरित्या उदभवणाऱ्या परिस्थितीमुळे एखादा अत्यंत तातडीचा अथवा सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा विषय उद्‌भवल्यास हा प्रस्ताव मांडला जातो. राज्यात

जनतेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने उद्भवले त्या घटनेचे पडसाद सभागृहात उमटणे हे लोकशाही राज्यव्यवस्थेत अपरिहार्य आहे. उदा. राज्यात अचानक आलेला भुकंप, मोठ्या रेल्वे अपघात होऊन शेकडो माणसे मृत्युमुखी पडणे, पोलिस गोळीबारात मृत्यू, बॉम्बस्फोट या सर्व तातडीने घडलेल्या बाबीचे प्रतिबींब त्याच दिवशी सभागृहात उमटणे आवश्यक असते व त्यासाठी सभागृहासमोरील कामकाज बाजूला सारुन स्थगन प्रस्ताव मांडला जातो.

स्थगन प्रस्तासाठी सभागृहाच्या किमान ५० सदस्याचा पाठींबा आवशक असतो. ज्या कारणासाठी स्थगन प्रस्ताव मांडला जातो ते कारण पुरेसे आहे की नाही या संबधीचा अंतिम निर्णय सभापतीचा असतो. सभागृहाच्या अध्यक्षाने मान्यता दिल्यास सभागृहाचे नेहमीचे कामकाज तहकूब करुन चर्चा केली जाते. प्रस्ताव मांडायचा झाल्यास त्या दिवशी सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास आधी सभागृहाच्या महासचिवाकडे तशी सूचना द्यावी लागते. स्थगन प्रस्तावावर दुपारी चार वाजता चर्चा होते आणि साधारणपणे अडीच तास वेळ राखीव ठेवला जातो.

स्थगन प्रस्ताव हा तथ्यावर आधारित पण संघर्षासाठी नसावा. सार्वजनीक हिताच्या दृष्टिने महत्वाचा असावा. शासनाच्या प्रशासकीय जबाबदारीशीच संबंधित असावा. यामध्ये कायदा करण्याचा भाग निहीत नसावा. प्राथमिक संधी आणि सद्यस्थितीतील विषय मांडवा. स्थगन प्रस्तावाचा उद्देश अतिशय तातडीच्या व नुकत्याच घडलेल्या बाबीकडे सभागृहाचे लक्षवेधणे हा आहे. त्याचे स्वरुप शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे, निदांजनक स्वरुपाचे असल्याचे मानले जाते. त्यामुळे या आयुधाचा वापर अतिशय काटेकोरपणे व गांभीर्याने करण्याची गरज आहे.

- **अविश्वास दर्शक ठराव (No-confidence motion)**

संसदीय शासनव्यवस्थेमध्ये लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळ सामुहिकरित्या लोकसभेला जबाबदार राहते. ज्या क्षणी लोकसभेने मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त केला त्याक्षणी मंत्रीमंडळाला राजीनामा देणे भाग पडते. लोकसभा नियम १९८ प्रमाणे विरोधी पक्षाकडून अविश्वासाचा ठराव मांडला जातो. विश्वासदर्शक ठराव मांडण्यासाठी किमान ५० सदस्यांचा पाठींबा आवश्यक असतो. मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ट बाबतीतील मंत्रीमंडळाच्या कामाविषयी ना पंसती व्यक्त करणाच्या प्रस्तावाची लेखी सूचना देणे यालाच अविश्वास दर्शक ठरावावर मतदान घेतले जाते. ठराव परित झाल्यास पंतप्रधानास राजीनामा द्यावा लागतो.

**स्वयंअध्ययन प्रश्न २**

रिकाम्या जागा भरा.

१) ज्या प्रश्नाना सभागृहात तोंडी उत्तरे दिली जातात त्यांना........प्रश्न असे म्हणतात.

२) ........ठराव हा विरोधी पक्षाकडून मांडला जातो.

३) अविश्वासदर्शक ठराव हा लोकसभा नियम क्रमांक...........प्रमाणे मांडला जातो.

४) अत्यंत तातडीचा अथवा सार्वजनिक महत्त्वाचा विषय उद्‌भवल्यास.........प्रस्ताव मांडला जातो.

५) अविश्वास दर्शक ठराव मांडण्यासाठी किमान.........सदस्याचा पाठींबा आवश्यक आहे.

## १.३ सारांश

भारतीय संसदीय शासन पद्धतीमध्ये कायदेमंडळाला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. राज्यघटनेच्या पाचव्या भागातील प्रकरण दोनमध्ये कलम ७९ ते १२३ यान्वये संसदेची संघटना, रचना, कार्यकाल, अधिकार, पदे, कामकाज पद्धती व विशेषाधिकार याबाबत सविस्तर तरतुद केली आहे. भारताच्या केंद्रिय कायदेमंडळाला संसद असे म्हणतात. संसदेमध्ये राज्यसभा, लोकसभा व राष्ट्रपती या तिन्ही संस्थांचा समावेश होतो. भारताचे कायदेमंडळ हे द्विगृही आहे. लोकसभा हे द्वितीय व कनिष्ठ सभागृह आहे. तर राज्यसभा हे प्रथम व वरिष्ठ सभागृह आहे. लोकसभागृहातील सदस्यांची निवड जनतेमार्फत केली जाते म्हणून लोकसभा सभागृह हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. राज्य सभागृहातील सदस्यांची निवड घटकराज्यातील विधानसभा प्रतिनिधीमार्फत केली जाते. राज्यसभा हे घटकराज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. राज्यसभा हे स्थायी स्वरूपाचे सभागृह आहे. राज्यसभा सदस्याचा कार्यकाल ६ वर्षाचा आहे. दर दोन वर्षानी एक तृतीयांश सदस्या निवृत्त होतात व तेवढेच नवीन सदस्य निवडले जातात. लोकसभेचा कार्यकाल हा ५ वर्षाचा असतो. दर ५ वर्षाला लोकसभेची सार्वजनिक निवडणूक होते. लोकसभेत सभापती व उपसभापती असे दोन पदाधिकारी असतात. सभापतीची निवड लोकसभा सदस्यामार्फत केली जाते. भारताचा उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. सामान्य विधेयक प्रथमतः लोकसभा किंवा राज्यसभेत मांडता येते. परंतु अर्थ विधेयक मात्र प्रथम लोकसभेतच मांडावे लागते. संसदेच्या विराम काळात एखाद्या कायद्याची गरज निर्माण झाल्यास वटहूकूम काढता येतो. तो अधिकार राष्ट्रपतीला आहे. संसदीय आयुधेच्या माध्यमातून शासनाच्या प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवता येते. कार्यकारी मंडळावरती नियंत्रण ठेवण्यासाठी संसदेला विविध आयुधांचा वापर करता येतो.

## १.४ पारिभाषिक शब्दावली

१) **संसद :** भारतीय कायदेमंडळास संसद असे म्हणतात.

२) **गणसंख्या :** गणसंख्या म्हणजे संसदेच्या सभागृहाची सभा भरवण्यासाठी आवश्यक असलेली किमान उपस्थितीची संख्या.

३) **अध्यादेश :** संसदेच्या विराम काळात एखाद्या कायद्याची गरज निर्माण झाल्यास राष्ट्रपती अध्यादेश काढू शकतात. त्या अध्यादेशास कायद्याइतकेच महत्त्व असते.

४) **स्थगन प्रस्ताव :** स्थगन प्रस्ताव म्हणजे सभागृहाचे नेहमीचे कामकाज स्थगीत करून सार्वजनीक महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करणे.

५) **अविश्वासदर्शक ठराव :** मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ठ बाबतीत मंत्रिमंडळाच्या कामाविषयी नापसंती व्यक्त करणाऱ्या प्रस्तावाची लेखी सूचना देणे.

६) **तारांकित प्रश्न :** ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तरे दिली जातात व या प्रश्नांना तारांकनाची खूण केलेली असते त्याला तारांकित प्रश्न असे म्हणतात.

७) **अतारांकित प्रश्न :** ज्या प्रश्नांना सभागृहात लेखी उत्तरे हवी असतात व या प्रश्नांना तारांकनाची खूण केलेली नसते त्याला अतारांकित प्रश्न असे म्हणतात.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

१) पाच २) संसद ३) राज्यसभा ४) २५ वर्षे

५) १२ ६) उपराष्ट्रपती ७) लोकसभा

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१) तारांकित प्रश्न २) अविश्वास दर्शक ३) १९८ ४) स्थगन प्रस्ताव

५) ५० सदस्यांचा

## १.६ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) लोकसभेची रचना, अधिकार व कार्य स्पष्ट करा.

२) राज्यसभेची रचना, अधिकार व कार्य स्पष्ट करा.

३) संसदीय आयुधे यातील प्रश्नोत्तराचा तास व स्थगन प्रस्ताव बाबत चर्चा करा.

४) लोकसभेच्या सभापतीची निवड सांगून लोकसभा सभापतीचे अधिकार व कार्य स्पष्ट करा.

५) अविश्वास दर्शक ठराव.

**ब) टीपा लिहा**

१) स्थगन प्रस्ताव २) लोकसभा सभापती ३) अर्थ विधेयक ४) तारांकित प्रश्न

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) डॉ. भोळे भा. ल. – भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, २००३

२) डॉ. भोगले शांताराम – भारतीय राज्यघटना – विकास, स्वरूप आणि राजकारण

३) मुठाळ राम, भारतीय शासन आणि राजकारण, अंशुल, पुणे

४) प्रा. पाटील बी. बी., उर्मिला चव्हाण – भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१३

५) डॉ. कारेकर शोभा, डॉ. घोडके शरद – भारतीय शासन आणि राजकारण, डायमंड, पुणे

६) कुलकर्णी बी. वाय. – भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, २०००


❑❑❑

# घटक २
# कार्यकारीमंडळ
## (Executive)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

भारताचे कार्यकारीमंडळ

२.२.१ भारताचा राष्ट्रपती

२.२.२ भारताचा उपराष्ट्रपती

२.२.३ भारताचा पंतप्रधान व केंद्रीय मंत्रिमंडळ

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्टे

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर पुढील उद्दिष्टे साध्य होतील.

- भारतीय कार्यकारी मंडळाचा अर्थ व स्वरूप समजून घेता येईल.
- भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार व राष्ट्रपतीपदाची रचना व महत्त्व जाणून घेता येईल.
- भारताच्या उपराष्ट्रपती पदाची रचना व महत्त्व जाणून घेता येईल.
- भारताच्या पंतप्रधानांचे अधिकार समजून घेता येतील.
- भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये, अधिकार व कार्याची माहिती होईल.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. शासन संस्थेत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ यांचा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण भारताच्या कार्यकारीमंडळाचा अभ्यास करणार आहोत. भारताच्या कार्यकारीमंडळात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. त्यांचा सविस्तर अभ्यास आपण या घटकांमध्ये करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### भारताचे कार्यकारी मंडळ (Executive of India)

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५२ ते ७८ मध्ये केंद्रीय कार्यकारी मंडळाची तरतूद केलेली आहे. भारताच्या कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. भारताचा राष्ट्रपती नामधारी व घटनात्मक कार्यकारी प्रमुख असून पंतप्रधान वास्तववादी सत्ता प्रमुख असतो. भारताचा संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो, परंतु प्रत्यक्षात सत्ता पंतप्रधानाकडे असते.

### २.२.१ भारताचा राष्ट्रपती (President of India)

भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या भागात कलम ५२ ते ६२ मध्ये राष्ट्रपती पदासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५२ मध्ये असे म्हटले आहे की, ''भारतासाठी एक राष्ट्रपती असेल''. राष्ट्रपती हा सर्वोच्च कार्यकारी प्रमुख असून तो पंतप्रधान आणि त्याच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यघटनेनुसार सत्तेचा वापर करीत असतो. (कलम ५३)

भारतात इंग्लंड प्रमाणे संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी भारताचा राष्ट्रपती इंग्लंडच्या राजपदाप्रमाणे वंशपरंपरेने सत्तेवर येत नाही. भारताच्या राष्ट्रपतीची निवड जनतेकडून अप्रत्यक्ष पद्धतीने होते. तसेच आणीबाणीच्या काळात राष्ट्रपतीला विशेष अधिकार प्राप्त होतात. राष्ट्रपती हा भारताचा प्रथम नागरिक असून तो भारतातील सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ कार्यकारी प्रमुख म्हणून ओळखला जातो. राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक कार्यक्षेत्रात राष्ट्रपतीला मानाचे व आदराचे स्थान दिले जाते.

### राष्ट्रपती पदासाठी पात्रता

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५८ मध्ये राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारासाठी पुढील प्रमाणे पात्रता दिली आहे–

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२) त्या व्यक्तीने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३) ती व्यक्ती लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावी.

४) ती व्यक्ती भारत सरकार, राज्य सरकार किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही संस्थेमध्ये प्राप्तीचा हुद्दा धारण करणारी नसावी.

५) ती व्यक्ती केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाचा सदस्य नसावी जर असेल तर राष्ट्रपतीपदाची शपथ घेण्यापूर्वी त्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. मात्र उपराष्ट्रपती, राज्यपाल, मंत्री या पदावर असणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीस अपात्र समजले जाणार नाही.

**सूचक व अनुमोदक**

राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे नाव निर्वाचन मंडळातील कमीत कमी ५० सदस्यांनी सुचवले पाहिजे व ५० सदस्यांनी त्यास अनुमोदन दिले पाहिजे तरच उमेदवार निवडणुकीस पात्र ठरतो.

**अनामत रक्कम (Deposit)**

राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्यासाठी उमेदवाराला रुपये १५,०००/- अनामत रक्कम भरावी लागते. निवडून येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मतांच्या १/६ मते प्राप्त झाली नाहीत तर ती अनामत रक्कम जप्त होते.

**निवडणूक प्रक्रिया**

भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष मतदान पद्धतीने होते. जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पद्धतीने राष्ट्रपतीची निवड केली जात नाही. तर जनतेच्या प्रतिनिधींकडून राष्ट्रपती निवडला जातो. घटनेतील कलम ५४नुसार राष्ट्रपतीची निवडणूक एका निर्वाचक मंडळाकडून होते. निर्वाचक मंडळाला निर्वाचन किंवा निवडणूक मंडळ (Electoral College) असेही संबोधले जाते. त्या निर्वाचक मंडळामध्ये भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्य आणि राज्यांच्या विधानसभेतील निवडून आलेले सदस्य यांचा समावेश होतो. विधान परिषदेतील सदस्यांना राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करता येत नाही. तसेच राज्यसभा व लोकसभा या सभागृहातील राष्ट्रपती नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार नसतो. निर्वाचक मंडळाच्या सर्व सभासदांच्या मताचे मूल्य सारखे नसते. घटक राज्यांची लोकसंख्या भिन्न असल्यामुळे त्यांच्या विधानसभेतील सदस्यांना समान मताचा अधिकार देणे योग्य ठरणार नाही म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात मतांचे मूल्य ठरविण्याची तरतूद करण्यात आली आहे. संसदेच्या सदस्यांच्या मताचे मूल्य व विधानसभेतील सदस्यांच्या मताचे मूल्य भिन्न असते.

विधानसभेच्या प्रत्येक सदस्याच्या मताचे मूल्य पुढील सूत्रानुसार काढले जाते.

$$\text{विधानसभेतील प्रत्येक निर्वाचित सदस्याच्या मताचे मूल्य} = \frac{\text{संबंधित घटक राज्याची लोकसंख्या}}{\text{विधानसभेतील निर्वाचक सदस्यांची संख्या}} \times \frac{१}{१०००}$$

संसदेतील सदस्यांच्या मताचे मूल्य खालील सूत्राप्रमाणे काढले जाते.

$$\text{संसदेतील प्रत्येक निर्वाचित सदस्याच्या मताचे मूल्य} = \frac{\text{सर्व घटक राज्यांच्या विधानसभेतील सदस्यांची एकूण मते}}{\text{संसदेतील निर्वाचित सदस्यांची एकूण संख्या}}$$

निर्वाचक मंडळातील मतदारांच्या मताचे मूल्य ठरविल्यानंतर मतदानाच्या दिवशी निर्वाचक मंडळातील मतदार राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी मतदान करतात. राष्ट्रपतीची निवडणूक गुप्त मतदान व प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीने आणि एकल संक्रमणीय मतदान तत्त्वानुसार होते. मतदार आपल्या पसंतीप्रमाणे जेवढे उमेदवार असतील तेवढ्या उमेदवारांच्या नावापुढे १,२,३ असे पसंतीक्रम टाकू शकतो. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी पहिल्या पसंतीची आवश्यक संख्येएवढी मते मिळवावी लागतात.

**निर्वाचन कोटा (Quota)**

राष्ट्रपती पदी निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा) पुढील सूत्रानुसार काढली जाते.

$$\text{निवडून येण्यासाठी आवश्यक असणारी मते (कोटा)} = \frac{\text{राष्ट्रपती पदासाठी झालेले एकूण मतदान (मतसंख्या)}}{\text{निवडून द्यावयाच्या प्रतिनिधींची संख्या + १}} + १$$

मतमोजणीच्या पहिल्या फेरीत ज्या उमेदवाराला पहिल्या पसंती क्रमांकाची आवश्यक संख्ये एवढी मते मिळतील त्याची राष्ट्रपती म्हणून निवड केली जाते. पहिल्या फेरीत कोटा पूर्ण न झाल्यास मतमोजणीची दुसरी फेरी घेतली जाते व सर्वात कमी मते मिळविणाऱ्या उमेदवाराला यातून वगळले जाते व त्याची दुसऱ्या क्रमांकाची मते मोजली जातात. त्याच्या मतपत्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाची मते ज्याला मिळाली असतील त्याच्या पहिल्या पसंती क्रमांकाच्या मतात मिळविली जातात आणि आवश्यक मते मिळविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित केले जाते. जोपर्यंत आवश्यक संख्येएवढी मते प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत मतमोजणीची फेरी चालू ठेवली जाते. आवश्यक मत संख्येएवढी मते मिळविणारा उमेदवार निवडून येतो.

**राष्ट्रपतीचा कार्यकाल**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५६ (१) नुसार राष्ट्रपती पदाचा कार्यकाल ५ वर्षे निश्चित केला आहे. राष्ट्रपतीचा कार्यकाल पदग्रहण केलेल्या दिवसापासून मोजला जातो. मुदतीपूर्वी राष्ट्रपती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा उपराष्ट्रपती कडे देऊ शकतो. तसेच राष्ट्रपतींनी घटनाबाह्य वर्तन केल्यास घटनेच्या कलम ६१ नुसार संसद त्यांच्याविरुद्ध महाभियोग खटला चालवून त्यांना पदच्युत करू शकते. राष्ट्रपतीच्या राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा इतर कोणत्याही कारणाने ते पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती त्या पदाची सूत्रे आपल्या हाती घेतो. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपतीचे काम पाहतात. परंतु सहा महिन्यांच्या आत राष्ट्रपतीपदाची निवडणूक घ्यावी लागते. राष्ट्रपती पदावर असणारी व्यक्ती दुसऱ्यावेळी निवडणूक लढवू शकते.

**राष्ट्रपतींवरील महाभियोगाची प्रक्रिया**

राष्ट्रपतीने घटनाविरोधी वर्तन केले तर त्यांना पदावरून कमी करण्यासंबंधीची महाभियोगाची प्रक्रिया घटनेच्या ६१ व्या कलमात सांगितली आहे. राष्ट्रपतीने घटना विरोधी वर्तन केले तर त्यासंबंधीचे आरोपपत्र संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाने सादर केले पाहिजे. सभागृहातील एकूण सदस्य संख्येच्या कमीत कमी १/४ सदस्यांनी किमान १४ दिवस अगोदर त्यासंबंधीची लेखी सूचना राष्ट्रपतीला द्यावी लागते. तसेच सदर

ठराव सभागृहात एकूण संख्येच्या २/३ बहुमताने पास व्हावा लागतो. त्यानंतर दुसऱ्या सभागृहाकडून त्या ठरावातील आरोपांची चौकशी होते. या चौकशीच्या वेळी राष्ट्रपतीला स्वतः उपस्थित राहून किंवा प्रतिनिधी मार्फत आपले मत मांडण्याचा हक्क असतो. ज्या सभागृहाने अशी चौकशी केली असेल त्या सभागृहात २/३ बहुमताने ठराव मंजूर झाल्यानंतरच राष्ट्रपतीला त्याच्या पदावरून कमी केले जाते. भारतात आतापर्यंत अशा पद्धतीने कोणत्याही राष्ट्रपतीवर महाभियोगाचा खटला चालविलेला नाही.

**राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते**

भारताच्या राष्ट्रपतींचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. राष्ट्रपतीला दरमहा पाच लाख रुपये वेतन मिळते. त्याशिवाय त्यांना इतर सर्व भत्ते, सुखसोयी व सवलती देण्यात येतात. राहण्यासाठी स्वतंत्र निवासस्थान (राष्ट्रपती भवन) असते. तसेच कार्यालयीन सेवक वर्ग, वैद्यकीय सेवा-सवलती दिल्या जातात. राष्ट्रपतीचे वेतन देशाच्या संचित निधीतून दिले जाते.

**राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्ये (Power and functions of the President)**

राष्ट्रपती हा देशाचा सर्वश्रेष्ठ कार्यकारी प्रमुख असतो. राष्ट्रपतीच्या नावाने संपूर्ण देशाचा राज्यकारभार चालतो. घटनेने राष्ट्रपतीला व्यापक स्वरूपाचे अधिकार दिलेले असले तरी राष्ट्रपतीचे अधिकार प्रत्यक्षपणे पंतप्रधान हाताळीत असतो. राष्ट्रपतीला भारतीय घटनेने तसेच संसदेच्या कायद्यानुसार पुढील प्रमाणे अधिकार व कार्ये प्राप्त झाली आहेत.

**१) कार्यकारी अधिकार (अंमलबजावणी विषयक अधिकार)**

राष्ट्रपती देशाचा सर्वोच्च कार्यकारी प्रमुख असल्यामुळे भारताचा सर्व कार्यकारी कारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो. राष्ट्रपती पंतप्रधानांची नेमणूक करतात व त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नेमणूक करतात. भारताचा महान्यायवादी, महालेखापरीक्षक, मुख्य निवडणूक आयुक्त, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, भारताचा महालेखापाल, लोकपाल, रिझर्व बँकेचा गव्हर्नर, वित्त आयोगाचे अध्यक्ष, विविध घटक राज्यांचे राज्यपाल इत्यादी उच्च पदस्थांची नेमणूक राष्ट्रपती करतात. तसेच निवडणूक मंडळ, नियोजन मंडळ, भाषा आयोग, वित्त मंडळ इत्यादी मंडळांची नियुक्ती राष्ट्रपती करीत असतो. अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासवर्ग आयोगाची स्थापना राष्ट्रपती करतात. राष्ट्रपती तिन्ही सैन्य दलाचा प्रमुख असतो. सैन्य दलाच्या प्रमुखांच्या तो नेमणुका करतो. देशातील सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपतीला प्रमुख अतिथी म्हणून मानाचे पद स्विकारण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे अधिकार पत्र स्वीकारणे, परराष्ट्रीय पाहुण्यांचे स्वागत करणे, आंतरराष्ट्रीय सभा संमेलनाला उपस्थित राहून भारताचे प्रतिनिधित्व करणे, परराष्ट्राशी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणे इ. राजनैतिक कामे तो करीत असतो. चीफ कमिशनरच्या सहाय्याने केंद्रशासित प्रदेशांचा राज्यकारभार पाहणे इत्यादी कार्यकारी अधिकार राष्ट्रपतीला घटनेने प्रदान केलेले आहेत.

## २) कायदेविषयक अधिकार

राष्ट्रपती हा संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसतो, तरीही तो संसदेचा एक अविभाज्य घटक असतो. त्यामुळे त्यांना विविध कायदेविषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत. संसदेचे अधिवेशन बोलविणे, स्थगित करणे तसेच पंतप्रधानांच्या सल्ल्याने लोकसभा विसर्जित करणे, संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतीच्या अभिभाषणाने होते. महत्त्वाच्या विधेयकासंबंधी राष्ट्रपती संसदेला संदेश पाठवू शकतो. राष्ट्रपती लोकसभेमध्ये ॲग्लो इंडिया समाजाचे पुरेसे प्रतिनिधी नसतील तर ०२ प्रतिनिधींची नियुक्ती करू शकतो. राज्यसभेत विविध क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ अशा १२ सदस्यांची नेमणूक करू शकतो. संसदेने पारित केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते. राष्ट्रपतीला भारतीय घटनेच्या कलम १२३ नुसार वटहुकूम (अध्यादेश) काढण्याचा अधिकार आहे. तसेच घटक राज्यांची रचना, सीमा व नाव बदलणारी विधेयके, अर्थविधेयके यांना संसदेत सादर करण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्व संमती घ्यावी लागते. राष्ट्रपती वित्त आयोग, लोकसेवा आयोग, महालेखापरीक्षक यांच्याकडून आलेले अहवाल चर्चेसाठी संसदेसमोर ठेवतो.

## ३) अर्थविषयक अधिकार

भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपतीला काही आर्थिक अधिकार दिलेले आहेत. अर्थविधेयक प्रथम राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीनेच लोकसभेत सादर केले जाते. प्रत्येक वर्षासाठी जे अंदाजपत्रक तयार केले जाते ते संसदेसमोर मांडण्याची व्यवस्था राष्ट्रपती करतात. राष्ट्रपतीच्या शिफारशी शिवाय सरकारला संसदेत कोणत्याही अनुदानाची मागणी करता येत नाही. भारताच्या संचित निधीवर राष्ट्रपतीचे नियंत्रण असते. संसदेच्या परवानगीने आकस्मिक कारणासाठी या निधीतून तो पैसा खर्च करू शकतो. केंद्र व राज्यांमध्ये कर उत्पन्नाची वाटणी करण्यासाठी राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची नेमणूक करतो.

## ४) न्यायविषयक अधिकार

न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला प्राणदंडाची किंवा इतर कोणतीही गंभीर स्वरूपाची शिक्षा दिली असेल व त्या व्यक्तीने राष्ट्रपतीकडे दया किंवा क्षमायाचनेचा अर्ज केला असेल तर राष्ट्रपती त्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करू शकतो, ती शिक्षा पूर्णपणे माफ करू शकतो किंवा ती शिक्षा तशीच ठेवू शकतो. देशद्रोही व्यक्तीची शिक्षा कमी करताना राष्ट्रपतीला संसदेची संमती घ्यावी लागते. या अधिकाराचा वापर करताना राष्ट्रपती मंत्रिमंडळाशी सल्ला मसलत करतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ प्रमाणे राष्ट्रपती सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक करतो. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या राज्यकारभारासंदर्भात काही प्रश्न किंवा वाद निर्माण झाल्यास राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाला सल्ला विचारू शकतो. सर्वोच्च न्यायालयातील अधिकारी वर्ग व नोकरवर्ग यांची नियुक्ती, वेतन, निवृत्ती वेतन, सुट्ट्या इत्यादी संबंधी नियम करताना सरन्यायाधीश राष्ट्रपतींची संमती घेतात.

## ५) आणीबाणी विषयक अधिकार

भारतीय राज्यघटनेच्या १८ व्या भागात कलम ३५२, ३५६ व ३६० नुसार राष्ट्रपतीला आणीबाणी विषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत. देशात असाधारण परिस्थिती निर्माण झाल्यास नेहमीच्या शासनपद्धतीद्वारे राज्यकारभार करणे कठीण होते अशावेळी राष्ट्रपती आणीबाणी जाहीर करू शकतो. राष्ट्रपती पुढीलप्रमाणे आणीबाणी घोषित करू शकतात.

### अ) राष्ट्रीय आणीबाणी (कलम ३५२)

युद्ध किंवा बाह्य आक्रमण किंवा अंतर्गत अशांततेमुळे देशाच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्यास राष्ट्रपती कलम ३५२ नुसार राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतो. अशा प्रकारची आणीबाणी संसदेच्या मान्यते शिवाय दोन महिन्यापर्यंत अंमलात राहू शकते. परंतु दोन महिन्याच्या आत त्यास संसदेची मंजुरी घ्यावी लागते. संसदेच्या मंजुरीने सहा महिन्यांपर्यंत आणीबाणीचा कालावधी वाढवता येतो. दर सहा महिन्यांनी संसदेची मंजूरी घ्यावी लागते. संसदेने मान्यता दिली नाही तर आणीबाणीची घोषणा रद्द समजण्यात येते. आणीबाणीच्या काळात जनतेच्या मूलभूत अधिकारांचा संकोच होतो. नागरिकांना मूलभूत अधिकारावरील बंधनाबाबत न्यायालयात दाद मागता येत नाही. आणीबाणीच्या काळात संसदेला राज्यसूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. केंद्र सरकारचे घटक राज्यांच्या कार्यकारी मंडळावर नियंत्रण प्रस्थापित होते. केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्यातील आर्थिक संबंधाबाबत तरतुदीत बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला प्राप्त होतो. भारतात राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी भारत-चीन युद्धाच्या वेळी १९६२ साली, राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी १९७१ साली बांगलादेशच्या युद्धाच्या वेळी, राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी १९७५ मध्ये देशातील अंतर्गत अशांततेच्या कारणाखाली ३५२ कलमानुसार संपूर्ण देशामध्ये आणीबाणी लागू केली होती.

### ब) घटक राज्य आणीबाणी / राष्ट्रपती राजवट (कलम ३५६)

एखाद्या घटक राज्यात राजकीय अस्थैर्य किंवा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास संबंधित घटक राज्याचा राज्यपाल राष्ट्रपतींना त्याबाबतचा अहवाल सादर करतो. त्यानुसार राष्ट्रपती त्या संबंधित घटक राज्यात भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवट लागू करतो. आणीबाणीच्या घोषणेस दोन महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. घटक राज्यातील आणीबाणीमुळे घटक राज्याचा राज्यकारभार राष्ट्रपती राज्यपालामार्फत चालवितात. घटक राज्याचे कायदे करण्याचा अधिकार राष्ट्रपती संसदेकडे सुपूर्त करतो. अशा पद्धतीने आतापर्यंत विविध घटक राज्यांमध्ये आणीबाणी लागू केली होती. जास्तीत जास्त तीन वर्षे राष्ट्रपती राजवट चालू ठेवता येते. काही कारणास्तव सहा महिन्यांनी आणीबाणीची मुदत वाढवता येते.

### क) आर्थिक आणीबाणी (कलम ३६०)

संपूर्ण देशात किंवा कोणत्याही घटक राज्यात आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास भारतीय राज्यघटनेच्या ३६० व्या कलमानुसार राष्ट्रपती भारतात किंवा भारताच्या एखाद्या भागात आर्थिक अस्थिरता

निर्माण झाल्याची खात्री पटल्यास आणीबाणीची घोषणा करू शकतो. आर्थिक आणीबाणीची मुदत २ महिने असते. या कालावधीत संसदेची मंजुरी घ्यावी लागते. आर्थिक आणीबाणीच्या काळात राष्ट्रपतीला केंद्र सरकार व घटक राज्यांना आदेश देण्याचा अधिकार प्राप्त होतो. घटक राज्यांनी केलेले कायदे राष्ट्रपती संमतीसाठी मागवू शकतो. केंद्र सरकार व राज्य सरकारचे अधिकारी, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ते चतुर्थ श्रेणीच्या कनिष्ठ नोकरांचे पगार व भत्ते कपात करण्याचा आदेश राष्ट्रपती देऊ शकतो.

आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण झाल्यास आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार घटनेने राष्ट्रपतीला दिलेला असला तरी सुदैवाने भारतात आतापर्यंत तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही. त्यामुळे ३६० व्या कलमानुसार राष्ट्रपतीने आतापर्यंत कधीही भारतात आर्थिक आणीबाणी घोषित केलेली नाही.

भारताच्या राष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये अभ्यासली असता असे दिसून येते की, राष्ट्रपती हे भारताचे घटनात्मक प्रमुख आहेत. वास्तविक त्यांना आपल्या अधिकारांचा वापर पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करावा लागतो. तरीही  त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेतील राष्ट्रपतीचे महत्व कमी होत नाही.

**राष्ट्रपतींचे विशेषाधिकार**

संकटकालीन परिस्थितीत राष्ट्रपतींना काही विशेषाधिकार प्राप्त होतात. भारतीय राज्यघटनेच्या ३६१ व्या कलमानुसार राष्ट्रपतींना संरक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. राष्ट्रपतीने कर्तव्य पालनाबाबत ज्या कृती केलेल्या असतात त्याबाबत कोणत्याही व्यक्तीला न्यायालयात खटला भरता येत नाही. फक्त संसदेला महाभियोगाचा खटला चालवून राष्ट्रपतींच्या वर्तनाची चौकशी करता येते. राष्ट्रपतींच्या विरोधी कोणत्याही स्वरूपाचा दिवाणी अथवा फौजदारी खटला दाखल करता येत नाही. राष्ट्रपतींना अटक करण्यासंबंधी व कैदेत टाकण्यासंबंधी कोणताही आदेश कोणतेही न्यायालय काढू शकत नाही. एखाद्या व्यक्तीला राष्ट्रपतीविरुद्ध खटला दाखल करायचा असेल तर त्याने प्रथम दोन महिन्यांची नोटीस द्यावी लागते. अशा प्रकारे राष्ट्रपतींना काही विशेषाधिकार प्राप्त झालेले आहेत. भारतातील राष्ट्रपतीचे पद अत्यंत मानाचे, आदराचे व सन्मानाचे मानले जाते.

भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद (१९५२-१९६२) हे होते, तर सध्याचे व १५ वे राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू (२०२२ पासून) या आहेत.

### २.२.२ भारताचा उपराष्ट्रपती (Vice President of India)

'भारताला एक उपराष्ट्रपती असेल' असे भारतीय राज्यघटनेच्या ६३ व्या कलमात म्हटले आहे. उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती (अध्यक्ष) असतो. त्याला इतर कोणतेही लाभाचे पद स्वीकारता येत नाही. (कलम ६४) राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीत त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद केलेली आहे. राष्ट्रपतीने काही कारणास्तव राजीनामा दिल्यास किंवा त्यांना पदावरून दूर केल्यास किंवा त्यांच्या मृत्यूमुळे ते पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती ते पद सांभाळतो. तसेच आजारपण किंवा अन्य कोणत्याही कारणाने राष्ट्रपती गैरहजर असेल तर ते पद उपराष्ट्रपती सांभाळतो व त्यावेळी उपराष्ट्रपतीला

राष्ट्रपतीचे सर्व अधिकार प्राप्त होतात. राष्ट्रपतीला मिळणारे वेतन, भत्ते व सवलती उपराष्ट्रपतीला मिळतात. (कलम ६५) अशावेळी उपराष्ट्रपतीला राज्यसभेचे अध्यक्ष पद स्वीकारता येत नाही.

**उपराष्ट्रपतीची निवडणूक**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ६६ मध्ये उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची तरतूद केलेली आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी असणाऱ्या निर्वाचक मंडळात राज्यसभा व लोकसभा या सभागृहांचे सदस्य समाविष्ट असतात.

**उपराष्ट्रपती पदासाठी पात्रता**

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना पुढील पात्रता पूर्ण करावी लागते.

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे.

२) तिच्या वयाची ३५ वर्षे पूर्ण झालेली असली पाहिजेत.

३) ती व्यक्ती राज्यसभेवर निवडून येण्यास पात्र असली पाहिजे.

४) केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा सरकारच्या नियंत्रणाखालील असणाऱ्या कोणत्याही प्राप्तीच्या हुद्द्यावर ती व्यक्ती असता कामा नये, असेल तर निवडणुकीपूर्वी त्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो.

५) संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा किंवा घटक राज्याच्या विधिमंडळाच्या कोणत्याही गृहाच्या सदस्याला उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढविता येते. परंतु निवडून आल्यानंतर उपराष्ट्रपतीला त्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागतो.

**सूचक व अनुमोदक**

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराला निर्वाचक मंडळातील २० सदस्यांची सूचक आणि २० सदस्यांची अनुमोदक म्हणून संमती असावी लागते.

**अनामत रक्कम (Deposit)**

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला रुपये १५००० अनामत रक्कम (डिपॉझिट) भरावी लागते.

**निवडणूक पद्धती**

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक गुप्त व क्रमदेय मतदान पद्धतीने होते. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्रमणीय पद्धतीनुसार निवडणूक घेतली जाते. निर्वाचक मंडळातील मतदार निवडणुकीवेळी उमेदवाराच्या नावापुढे पसंती क्रमांक टाकतात. पहिल्या पसंतीचा आणि निवडून येण्यास आवश्यक असणारी मते मिळवणारा उमेदवार उपराष्ट्रपती म्हणून निवडून येतो.

थोडक्यात राज्यसभा व लोकसभा या सभागृहातील सदस्यांकडून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने उपराष्ट्रपतीची निवड होते.

**उपराष्ट्रपतीचा कार्यकाल**

उपराष्ट्रपतीचा कार्यकाल त्याने अधिकार पदग्रहण केलेल्या दिवसापासून ५ वर्षे असतो. मुदतीपूर्वी उपराष्ट्रपती स्वमर्जीने राजीनामा देऊ शकतो. तसेच त्यांना पदच्युत करण्याची तरतूद घटनेच्या कलम ६७ मध्ये दिलेली आहे. राज्यसभा सदस्यांच्या साध्या बहुमताने आणि लोकसभेच्या संमतीने उपराष्ट्रपतीला पदावरून काढून टाकता येते. परंतु असा ठराव १४ दिवस अगोदर मांडावा लागतो. ठराव मंजूर झाल्यास नवीन उपराष्ट्रपतीची निवड होईपर्यंत तो आपल्या पदावर राहू शकतो.

**वेतन, भत्ते व सवलती**

उपराष्ट्रपतीला राज्यसभेचा अध्यक्ष या नात्याने दरमहा रुपये ४ लाख वेतन मिळते. याशिवाय त्यांना सर्व प्रकारचे भत्ते, सेवा सवलती तसेच राहण्यासाठी निवासस्थान मिळते. जेव्हा तो राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत त्यांचे काम पाहतो त्यावेळी राष्ट्रपतीला असणारे वेतन व भत्ते त्यांना मिळतात.

**उपराष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये**

भारतीय राज्यघटनेने उपराष्ट्रपतीला उपराष्ट्रपती म्हणून कोणतेही विशेष अधिकार दिलेले नाहीत. परंतु राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपतीला काही अधिकार प्राप्त झालेले आहेत.

१) उपराष्ट्रपती राज्यसभेचे अध्यक्ष पद सांभाळून राज्यसभेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतो.

२) राज्यसभेमध्ये विविध ठराव संमत करून घेण्याचे काम उपराष्ट्रपती पार पाडतो.

३) एखाद्या विधेयकावर समान मते पडली तर उपराष्ट्रपती आपले निर्णायक मत (Casting Vote) देत असतो.

४) राज्यसभेतील सर्व विधेयके उपराष्ट्रपतीच्या सहीने संमत होतात.

५) राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत जेव्हा उपराष्ट्रपती त्यांचे कामकाज पाहतो तेव्हा राष्ट्रपतीचे सर्व अधिकार उपराष्ट्रपतीला प्राप्त होतात.

थोडक्यात राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत राष्ट्रपती पदाची जबाबदारी सांभाळण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद भारतीय राज्यघटने मध्ये केलेली आहे. राष्ट्रपतीचे पद कोणत्याही कारणाने रिकामे झाल्यास नवीन राष्ट्रपती निवडून येईपर्यंत उपराष्ट्रपती त्या पदाची जबाबदारी सांभाळतो त्यावेळी राज्यसभेचा अध्यक्ष म्हणून त्यांना कामकाज पाहता येत नाही. उपराष्ट्रपतीला सामाजिक, आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. तो देशातील विविध सामाजिक, सांस्कृतिक समारंभास सन्माननीय व्यक्ती म्हणून उपस्थित राहू शकतो. विविध समारंभासाठी उपराष्ट्रपतीला मानाने व आदराने पाचारण केले जाते.

भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१९५२-१९६२) हे होते. तर सध्या श्री. जगदीप धनखड (२०२२ पासून) हे भारताचे १४ वे उपराष्ट्रपती आहेत.

## २.२.३ भारताचा पंतप्रधान व केंद्रीय मंत्रिमंडळ

### भारताचा पंतप्रधान (Prime Minister of India)

भारतात संसदीय शासन पद्धती आहे. त्यामुळे संसदीय शासन पद्धतीच्या तत्वानुसार पंतप्रधान हा वास्तववादी कार्यकारी प्रमुख असतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम ७४ नुसार राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल व राष्ट्रपती त्यांच्या सल्ल्याने राज्य कारभार पाहतील असे स्पष्ट केले आहे.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षास बहुमत प्राप्त होते त्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नियुक्त करतात. जेव्हा लोकसभेत कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होत नाही त्यावेळी विविध राजकीय पक्ष एकत्र येऊन आघाडी करून बहुमत स्पष्ट करतात. त्या आघाडीच्या नेत्याची पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नेमणूक करतात. २०२४ साली १८ व्या लोकसभेत भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले आहे.

### पंतप्रधान पदासाठी पात्रता

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२) त्याने वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३) ती व्यक्ती लोकसभा किंवा राज्सभेची सदस्य असावी. नसेल तर ६ महिन्याच्या आत त्याने सदस्यत्व प्राप्त केले पाहिजे.

४) पंतप्रधानांच्या पाठीशी लोकसभेचे बहुमत असणे आवश्यक आहे.

### पंतप्रधानाचा कार्यकाल / मुदत

भारताच्या पंतप्रधानाचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो. लोकसभेत जोपर्यंत सत्तारूढ पक्षाचे बहुमत टिकून असते तोपर्यंत पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ सत्तेवर राहते. पंतप्रधान मुदतीपूर्वी आपल्या पदाचा स्वमर्जीने राजीनामा देऊ शकतो. जर लोकसभेने मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास ठराव पारित केला तर पंतप्रधानाला राजीनामा द्यावा लागतो.

### वेतन, भत्ते व इतर सोयी–सुविधा

पंतप्रधानांना संसदेच्या सदस्याइतकेच वेतन व भत्ते मिळतात. याशिवाय त्यांना प्रवास भत्ता, वैद्यकीय भत्ता, मोफत निवासस्थान व इतर सर्व सोयी – सुविधा प्राप्त होतात.

### पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये

#### १) मंत्रिमंडळाची निर्मिती करणे

पंतप्रधान आपल्या पक्षातील योग्य, कार्यक्षम व्यक्तींची मंत्री म्हणून निवड करतो. आघाडी सरकार असेल तर आघाडीमधील सहभागी पक्षातील सदस्यांना मंत्रिमंडळामध्ये स्थान दिले जाते. संसदीय पद्धतीनुसार मंत्रिमंडळाची निर्मिती प्रंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतीकडून केली जाते.

### २) खातेवाटप करणे

मंत्र्यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांना खाते वाटप केले जाते. मंत्र्यांचा त्या त्या क्षेत्रातील अनुभव, कौशल्य पाहून त्यांना खात्यांचे वाटप केले जाते. काही वेळा खातेपालट करून मंत्रिमंडळाच्या कार्यात सातत्य राखले जाते. खाते वाटप करणे ही पंतप्रधानाची खरी कसोटी असते.

### ३) समानातील प्रमुख नेता

सर्व मंत्र्यांचा दर्जा समान असतो त्या मंत्र्यांचा प्रमुख म्हणून पंतप्रधान मंत्र्यांच्या कार्यावर देखरेख, नियंत्रण ठेवून त्यांना मार्गदर्शन व सूचना देतो. मंत्रिमंडळात मतभेद निर्माण झाल्यास ते दूर करून मंत्र्यांमध्ये समन्वय घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंतप्रधान पार पाडतो.

### ४) सत्तारूढ पक्षाचा नेता म्हणून कार्य

पंतप्रधान हा सत्तारूढ पक्षाचा नेता असतो. त्यामुळे सत्तारूढ पक्षाची ध्येय-धोरणे व कार्ये याची जबाबदारी स्वीकारून सभागृहाला विश्वासात घेऊन तो कार्य करीत असतो. विरोधी पक्ष सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तो देत असतो. संसदेत लोकमताचे खरेखुरे प्रतिबिंब उमटत असते त्यामुळे लोकांच्या इच्छेनुसार राज्यकारभार पार पाडला जातो.

### ५) जनतेचा नेता म्हणून कार्य

पंतप्रधान हा संपूर्ण देशातील जनतेचा नेता असतो. पंतप्रधान या नात्याने तो संपूर्ण जनतेचे प्रतिनिधीत्व करीत असतो. जनहिताची धोरणे तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंतप्रधान पार पाडतो.

### ६) मंत्रिमंडळात एकसूत्रीपणा निर्माण करणे

पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख या नात्याने मंत्रिमंडळाच्या कार्यात एकसूत्रीपणा, एकजूट निर्माण करून राज्यकारभारात आणि प्रशासनात सातत्य व कार्यक्षमता टिकवून धरतो. लोकसभेत मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास ठराव मांडला व तो जर मंजूर झाला तर पंतप्रधानाला सर्व मंत्र्यांसह राजीनामा द्यावा लागतो त्यामुळे मंत्रिमंडळात एकसूत्रीपणा निर्माण करणे हे पंतप्रधानांचे महत्त्वपूर्ण कार्य असते.

### ७) राष्ट्रपती व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून कार्य करणे

पंतप्रधान राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या कार्यासंबंधी माहिती पुरवितो. मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती राष्ट्रपतीला देतो व राष्ट्रपतीने त्याबाबत केलेल्या सूचना, त्यांनी दिलेला सल्ला मंत्रिमंडळापर्यंत पोहोचवितो. एकंदरीत पंतप्रधान हा राष्ट्रपती व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून कार्य करीत असतो.

**८) शांतता सुव्यवस्था निर्माण करणे**

पंतप्रधान संपूर्ण देशामध्ये शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यासंबंधी उपाययोजना करीत असतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आपल्या राष्ट्राचे हित लक्षात घेऊन धोरण निश्चिती करीत असतो व आंतरराष्ट्रीय शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यात सहभागी होत असतो.

**९) कायदेनिर्मितीचे कार्य**

कायदे निर्मितीचे कार्य कायदेमंडळ करीत असले तरी संसदेतील ९०% विधेयके सरकारी असतात त्यांची निर्मिती मंत्रिमंडळामार्फत होत असते. पंतप्रधान मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांना विश्वासात घेऊन विधेयक निर्मितीचे कार्य करीत असतो. लोकांच्या इच्छा, आकांक्षा विचारात घेऊन विधेयक निर्मितीचे कार्य केले जाते व त्या विधेयकास संसदेत मंजुरी घेतली जाते.

**१०) सार्वभौमत्वाची जबाबदारी पार पाडणे**

देशाच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणाची जबाबदारी पंतप्रधानावर असते. तो संरक्षण मंत्र्यामार्फत देशाच्या संरक्षणाची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवून देशाच्या सार्वभौमत्वाचे जतन करीत असतो.

**११) परराष्ट्राशी संबंध प्रस्थापित करणे**

पंतप्रधान परराष्ट्राशी मैत्रीचे, सलोख्याचे संबंध प्रस्थापित करीत असतो. विविध देशांना भेटी देऊन त्यांच्याबरोबर तह, करार करून तो मैत्रीचे संबंध प्रस्थापित करीत असतो. आपल्या देशाची पत, प्रतिष्ठा व महत्त्व वाढवण्यासाठी विविध देशांचे तो दौरे करतो.

**पंतप्रधान पदाचे महत्त्व**

संसदीय शासन पद्धतीत पंतप्रधानाचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. भारताचा राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख असला तरी खरी वास्तववादी सत्ता पंतप्रधानांकडे असते. त्यामुळे संपूर्ण राज्यकारभाराची धुरा पंतप्रधान सांभाळीत असतो. राष्ट्राचा विकास, राष्ट्राचे भवितव्य या सर्व गोष्टी पंतप्रधानांवरती अवलंबून असतात. पंतप्रधानांची निवड जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून होत असते त्यामुळे जनतेचा नेता या दृष्टिकोनातून पंतप्रधानाच्या पदाला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

लॉर्ड मोर्ले यांनी पंतप्रधानाला 'समानातील प्रमुख' असे म्हटले आहे. तसेच पंतप्रधान म्हणजे मंत्रिमंडळरुपी कमानीची मध्यशीला (कोनशीला) असेही पंतप्रधान पदाचे वर्णन केले आहे. रॅम्से मूर यांनी पंतप्रधान म्हणजे 'राज्यरुपी जहाजाचा सुकाणूधारी होय' असे म्हटले आहे. सर विलियम व्ही. हरकोर्ट यांनी पंतप्रधानाला 'तारांगणातील चंद्र' तर डॉ. जेनिंग यांनी पंतप्रधानाला 'गृहमालिकेतील सूर्य' अशी उपमा दिली आहे.

विविध विचारवंतांनी केलेल्या विवेचनावरून पंतप्रधान पदाचे महत्त्व स्पष्ट होते.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू (१९४७-१९६४) हे होते. तर सध्याचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी (२०२४ पासून) हे आहेत.

### भारताचे केंद्रीय मंत्रिमंडळ (Council of Ministers in India)

भारतात संसदीय शासन पद्धतीनुसार राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख असतो. खरी व वास्तववादी सत्ता पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाकडे असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ७४ मध्ये असे म्हटले आहे की, 'राष्ट्रपतीच्या कार्यात सहाय्य करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल'. राष्ट्रपती कडून पंतप्रधानाची नियुक्ती केली जाईल आणि पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्री नियुक्त केले जातील असे घटनेच्या ७५ व्या कलमात स्पष्ट केले आहे. त्यानुसार पंतप्रधान मंत्रिमंडळाची नियुक्ती करतात.

#### मंत्रिमंडळाची निर्मिती

पंतप्रधान आपल्या पक्षातील तसेच आघाडी पक्षातील अनुभवी, कार्यक्षम प्रतिनिधींची मंत्रिमंडळात नेमणूक करीत असतो. मंत्र्यांची निवड ही संसद सदस्यातूनच केली जाते. संसदेचा सदस्य नसणाऱ्या एखाद्या व्यक्तीची मंत्री म्हणून निवड केली तर त्या व्यक्तीला ६ महिन्याच्या आत संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त करावे लागते. सहा महिन्याच्या आत सदस्यत्व प्राप्त केले नाही तर त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागतो. राष्ट्रपती मंत्र्यांना पदग्रहण करतेवेळी पदाची व गोपनीयतेची शपथ देतात.

मंत्र्यांची संख्या ही लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १५ टक्के एवढी असते. मंत्र्यांच्या नेमणुका करताना पंतप्रधानास विशेष काळजी घ्यावी लागते. स्वतःच्या पक्षातील महत्त्वाच्या नेत्यांना डावलता येत नाही. तसेच घटक पक्षातील प्रतिनिधीनाही जागांच्या प्रमाणात मंत्रिमंडळात सामावून घ्यावे लागते. तसेच सर्व घटक राज्यांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळेल याची काळजी पंतप्रधानांना घ्यावी लागते. कारण लोकसभेत त्याला आपल्या पक्षाचे बहुमत सातत्याने टिकवून ठेवावे लागते. पंतप्रधान व मंत्रिमंडळ सामूहिकरित्या लोकसभेला जबाबदार राहून कार्य करते. लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ अधिकार पदावर राहते. लोकसभेने मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास प्रकट केला तर पंतप्रधानास आपल्या मंत्रिमंडळासह राजीनामा द्यावा लागतो.

#### मंत्र्यांचे प्रकार

पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. मंत्रिमंडळामध्ये तीन प्रकारचे मंत्री असतात.

१) कॅबिनेट मंत्री २) राज्यमंत्री ३) उपमंत्री

### १) कॅबिनेट मंत्री (Cabinet Ministers)

पंतप्रधान आपल्या पक्षातील महत्त्वाच्या, ज्येष्ठ व अनुभवी सदस्यांची निवड कॅबिनेट मंत्री म्हणून करतात. कॅबिनेट मंत्री हे प्रथम दर्जाचे मंत्री असतात. कॅबिनेट मंत्र्यांची संख्या १० ते २० च्या आसपास असते. महत्त्वाची खाती कॅबिनेट मंत्र्याकडे देण्यात येतात. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट मंत्र्यांची मंत्रिपरिषद वेळोवेळी घेतली जाते. मंत्रीपरिषदेच्या बैठकीत महत्वाची ध्येय धोरणे ठरवली जातात.

## २) राज्यमंत्री (Minister of State)

राज्य मंत्री हे मंत्रिमंडळातील दुसऱ्या क्रमांकाचे मंत्री म्हणून ओळखले जातात. राज्यमंत्र्यांना एखाद्या मंत्रालयाचा स्वतंत्र कार्यभार दिला जाऊ शकतो किंवा कॅबिनेट मंत्र्याला सहाय्यक म्हणून नेमले जाते. राज्य मंत्र्यांना मंत्रिपरिषदेच्या बैठकींना उपस्थित राहता येत नाही. परंतु त्यांच्या खात्याशीसंबंधित बाबींवर चर्चा करतेवेळी पंतप्रधानांच्या निमंत्रणाने त्यांना मंत्री परिषदेच्या बैठकीस उपस्थित राहता येते. राज्यमंत्र्याकडे स्वतंत्र कार्यभार असल्यास ते कॅबिनेट मंत्र्याप्रमाणे आपल्या अधिकारांचा वापर करू शकतात. प्रत्येक खात्याला एकच राज्यमंत्री असतो. परंतु मोठ्या खात्यांना दोन राज्य मंत्र्यांची नियुक्ती केली जाते. राज्य मंत्र्यांना कॅबिनेट मंत्र्यांच्या एवढेच वेतन आणि भत्ते मिळतात.

## ३) उपमंत्री (Deputy Minister)

उपमंत्री हे तिसऱ्या दर्जाचे मंत्री होत. त्यांना मंत्रालयाचा स्वतंत्र्य कार्यभार दिला जात नाही. ते कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्र्यांना सहाय्यक म्हणून कार्य करतात. उपमंत्र्यांचे वेतन आणि दर्जा राज्यमंत्र्यांपेक्षा कमी असतो.

## मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये

### १) सामूहिक जबाबदारी

मंत्रिमंडळातील सर्व मंत्री व्यक्तिगत व सामुदायिकरित्या लोकसभेस जबाबदार राहून कार्य करतात. लोकसभेत मंत्रिमंडळाच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर झाला तर सर्व मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीत एकदा घेतलेला निर्णय सर्व मंत्रिमंडळावर बंधनकारक असतो. सर्व मंत्री एक गट म्हणून कार्य करतात. मंत्रिमंडळ एकत्रित बुडते किंवा एकत्रित तरते.

### २) वास्तववादी सत्ता

संसदीय शासन पद्धतीमध्ये नामधारी कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीकडे असते व वास्तववादी कार्यकारी सत्ता पंतप्रधानाच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या हातात असते. मंत्रिमंडळ वास्तववादी सत्तेचा वापर करून राज्यकारभार करीत असते.

### ३) गोपनीयता (गुप्तता)

गोपनीयता हे मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. मंत्रिमंडळात घेतलेले सर्व निर्णय गोपनीय (गुप्त) ठेवले जातात. राज्यघटनेच्या कलम ७५ नुसार पदग्रहण करण्यापूर्वी प्रत्येक मंत्र्यास पद व गोपनीयतेची शपथ राष्ट्रपती देतात. मंत्रिमंडळात एकजिनसीपणा राहण्यासाठी गोपनीयता महत्त्वाची असते.

### ४) एकवाक्यता

मंत्रिमंडळात जे निर्णय घेतले जातात त्यामध्ये एकवाक्यता असते. कॅबिनेट मंत्र्यांच्या मंत्रीपरिषदेत निर्णय घेत असताना मंत्र्यांमध्ये कधी कधी मतभेद होतात पण एकदा निर्णय घेतला की तो सर्वांना मान्य करावा लागतो. जोपर्यंत मंत्रिमंडळामध्ये एकवाक्यता असते तोपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर टिकून राहते.

### ५) पंतप्रधानाचे नेतृत्व

पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. मंत्रिमंडळाची निर्मिती त्याच्या सल्ल्याने राष्ट्रपती करतात. मंत्र्यांमध्ये खातेवाटप करण्याचे कार्यही पंतप्रधानच करतात. तसेच कॅबिनेट दर्जाच्या मंत्रिमंडळाच्या मंत्रीपरिषदेचे अध्यक्षस्थान पंतप्रधानच भुषवितात. थोडक्यात मंत्रिमंडळात घेतलेल्या सर्व निर्णयावर पंतप्रधानांचा प्रभाव असतो. पंतप्रधानाचे नेतृत्व सर्व मंत्री मान्य करतात.

### ६) कायदेमंडळाशी घनिष्ठ संबंध

मंत्रीमंडळ संसदेच्या दोन्ही सभागृहाचे प्रतिनिधित्व करते. लोकसभेत बहुमत प्राप्त पक्षातील सदस्यातून मंत्रिमंडळाची निर्मिती होत असते. पंतप्रधान राष्ट्रपतीला सल्ला देऊन लोकसभा बरखास्त करू शकतो. लोकसभा बरखास्त झाल्यास मंत्रिमंडळ ही आपोआप बरखास्त होते. त्यामुळे मंत्रिमंडळाचा कायदेमंडळाशी घनिष्ठ संबंध असतो.

### ७) प्रादेशिक पक्षांचा प्रभाव

अलीकडील काळात कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळत नसल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळावर प्रादेशिक पक्षांचे नियंत्रण व प्रभाव वाढू लागला आहे. प्रादेशिक पक्षांच्या सहकार्यातून संमिश्र (आघाडी) सरकारे अस्तित्वात येऊ लागलेली आहेत. प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्यावरच केंद्रीय मंत्रिमंडळाचे भवितव्य अवलंबून असलेले दिसून येते. १९८९ पासून भारतात विविध पक्षांची मिळून संमिश्र मंत्रिमंडळे सत्तेवर येऊ लागली आहेत.

### अ) मंत्रिमंडळाचे अधिकार व कार्ये

भारताचे केंद्रीय मंत्रिमंडळ संसदीय शासन पद्धतीचे असल्यामुळे राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख असतो आणि पंतप्रधान व मंत्रिमंडळ हे वास्तववादी सत्ता प्रमुख असते. पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या मार्फत देशाचा राज्यकारभार चालतो. राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख असले तरी त्यांचे सर्व अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळ वापरत असते.

मंत्रिमंडळाला पुढीलप्रमाणे अधिकार व कार्ये पार पाडावी लागतात.

### १) शासनाचे धोरण ठरविणे

शासनाचे धोरण ठरविणे हे केंद्रीय मंत्रिमंडळाचे प्रमुख कार्य आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी व जनकल्याणाच्या दृष्टीने मंत्रिमंडळ धोरण निश्चित करत असते. ठरविलेली उद्दिष्टे, योजना कोणत्या मार्गाने यशस्वी होतील यासंबंधीचे धोरण ठरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते.

### २) अंमलबजावणी विषयक कार्य

शासकीय ध्येय-धोरणाची आणि योजनांची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते. मंत्रिमंडळात विविध खाती निर्माण करून अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित मंत्र्यांवर

सोपविली जाते. धोरण ठरविणे, त्या धोरणास संसदेची मंजुरी घेणे व त्या धोरणांची, योजनांची अंमलबजावणी करणे. अशा प्रकारचे कार्य मंत्रिमंडळास करावे लागते.

### ३) कायदेविषयक कार्य

कायदे निर्मितीचे कार्य जरी संसद करीत असली तरी त्या कार्यात मंत्रिमंडळाला काही प्रमाणात जबाबदारी पार पाडावी लागते. मंत्रिमंडळास राज्य कारभार योग्यप्रकारे करता यावा व आपली ध्येय-धोरणे यशस्वी करता यावीत यासाठी काही कायदे करावे लागतात. त्यासाठी विधेयकांची निर्मिती करावी लागते. महत्त्वाची सर्व विधेयके संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडून कायदेमंडळात मांडून ती मंजूर करून घेणे मंत्रिमंडळाची जबाबदारी असते. मंत्रिमंडळाच्या पक्षाचे संसदेत बहुमत असते त्यामुळे ही विधेयके मंजूर होण्यास अडचण येत नाही. एकूणच कायदे निर्मितीच्या कार्यातही मंत्रिमंडळाचे महत्त्वपूर्ण योगदान असते.

### ४) आर्थिक कार्य

मंत्रिमंडळ देशाचे आर्थिक धोरण निश्चित करीत असते. संसदेसमोर वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्याची जबाबदारी अर्थखात्याची असते. अर्थमंत्री विविध खात्याकडून माहिती मागवून अंदाजपत्रक तयार करतो. या अंदाजपत्रकास संसदेची मंजुरी मिळविली जाते. अंदाजपत्रकास संसदेची मंजुरी मिळाल्याशिवाय मंत्रिमंडळास पैसा खर्च करता येत नाही. अर्थविधेयक सुद्धा मंत्रिमंडळाद्वारे लोकसभेत सादर केले जाते. अर्थविधेयक मंजूर झाले नाही तर मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागतो. वार्षिक अंदाजपत्रक, आर्थिक विधेयके संसदेत मांडणे व ती मंजूर करून घेऊन त्याप्रमाणे पैसा खर्च करणे अशाप्रकारची जबाबदारी मंत्रिमंडळाला पार पाडावी लागते.

### ५) नेमणुकी संबंधीचे अधिकार

भारताचा राष्ट्रपती देशाच्या राजकीय क्षेत्रातील व प्रशासनातील वरिष्ठ पदावरील महत्त्वपूर्ण अधिकाऱ्यांच्या नेमणुका पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतो. राज्यपाल, राजदूत, परराष्ट्रात पाठवायचे प्रतिनिधी, सेनाधिकारी, न्यायाधीश, विविध आयोगाचे अध्यक्ष, सदस्य इत्यादींच्या नेमणुका राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच करतो.

### ६) शांतता व सुव्यवस्था विषयक कार्य

देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते. देशात अस्थिरता, अशांतता निर्माण होणार नाही याची दक्षता मंत्रिमंडळाला घ्यावी लागते. यासाठी विविध उपाययोजना व धोरणे आखून कायद्यांची निर्मिती करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते. देशात विविधता असल्यामुळे संघर्ष निर्माण होऊ शकतात ते संघर्ष सोडवून कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे व शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रिमंडळास करावे लागते.

### ७) आंतरराष्ट्रीय संबंध विषयक कार्य

देशाच्या सार्वभौमत्वाचे बाह्य आक्रमणापासून रक्षण करणे, परराष्ट्रांशी युद्ध, तह, करार किंवा मैत्री करणे इत्यादी कार्य मंत्रिमंडळ करीत असते. परराष्ट्र संबंध विषयक कार्य करण्यासाठी व देशाच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण व परराष्ट्र मंत्रालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. परराष्ट्राशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या देशाची पत, प्रतिष्ठा वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मंत्रिमंडळ करीत असते.

थोडक्यात भारतीय राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेत मंत्रिमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण असते हे मंत्रिमंडळाच्या अधिकार व कार्यावरून दिसून येते. संपूर्ण देशाचा राज्यकारभार चालविण्याची वास्तविक जबाबदारी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळावर असते. राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवून धोरण निश्चिती करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मंत्रिमंडळ करीत असते. मंत्रिमंडळाच्या कार्यावरच सरकारचे व देशाचे भवितव्य अवलंबून असते.

## २.३ सारांश

भारतीय शासन पद्धतीमध्ये शासन संस्थेच्या तीन विभागांपैकी कार्यकारी मंडळ एक महत्त्वपूर्ण विभाग होय. संसदीय शासन पद्धतीच्या तत्त्वानुसार भारतात एक नामधारी व एक वास्तववादी सत्ता प्रमुख असे दोन कार्यकारी प्रमुख असतात. राष्ट्रपती हा नामधारी सत्ता प्रमुख तर पंतप्रधान हा वास्तववादी सत्ता प्रमुख असतो. देशाचा संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो. घटनेने सर्व अधिकार राष्ट्रपतींना दिलेले असतात. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या अधिकारांचा वापर पंतप्रधान व मंत्रिमंडळ करीत असते. राष्ट्रपतीची निवड करण्यासाठी एक निर्वाचक मंडळ असते. त्या निर्वाचक मंडळात संसदेचे निर्वाचित सदस्य व विविध घटक राज्यांच्या विधानसभेचे निर्वाचित सदस्य यांचा समावेश होतो. राष्ट्रपतीची निवडणूक गुप्त, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने व एकल संक्रमणीय तत्त्वानुसार होते. राष्ट्रपतीच्या स्वाक्षरी शिवाय कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. राष्ट्रपतींना वटहुकूम (अध्यादेश) काढण्याचा अधिकार आहे. तसेच संकटकाळात राष्ट्रीय, राज्यांतर्गत व आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. राष्ट्रपती हा तिन्ही सैन्य दलाचा प्रमुख असतो. राष्ट्रपतींच्या अनुपस्थिती मध्ये त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद केलेली आहे. उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. राज्यसभेच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे, विधेयके मंजूर करून घेणे, अशाप्रकारे राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने ते कामकाज पाहतात. राष्ट्रपती जेव्हा अनुपस्थितीत असतील तेव्हा राष्ट्रपती पदाचे सर्व अधिकार त्यांना प्राप्त होतात.

पंतप्रधान हा कार्यकारी मंडळाचा वास्तववादी सत्ता प्रमुख असतो. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती कडून नियुक्त केले जाते. कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त झाले नसेल तर आघाडीच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून नियुक्त केले जाते. केंद्रीय मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांची नियुक्ती पंतप्रधानाच्या सल्ल्याने राष्ट्रपतीकडून

केली जाते. मंत्र्यांमध्ये खाते वाटप करणे, मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे, राष्ट्रपती व मंत्रिमंडळ यांच्यात सुसंवाद साधणे, मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कार्ये पंतप्रधानाला करावी लागतात. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १५ टक्के इतकी असते. मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री असे तीन प्रकारचे मंत्री असतात. मंत्रिमंडळ हे सामुदायिकरित्या लोकसभेस नेहमी जबाबदार राहून कार्य करते. लोकसभेत मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास ठराव मांडला आणि तो जर मंजूर झाला तर पंतप्रधानासह मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे कायदे निर्माण करणे, आर्थिक धोरण ठरविणे, देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे इ. कार्ये पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ करीत असते.

## २.४ पारिभाषिक शब्द

अध्यादेश किंवा वटहुकूम - संसदेच्या विश्रांतीच्या काळात एखाद्या कायद्याची गरज निर्माण झाल्यास राष्ट्रपती अध्यादेश किंवा वटहुकूम काढू शकतो. त्या अध्यादेशास कायद्याइतकेच महत्त्व असते.

महाभियोग किंवा प्राभियोग - राष्ट्रपती, उपराष्ट्रपती इत्यादी उच्च पदस्थांनी घटनाविरोधी वर्तन केल्यास त्यांना पदच्युत करण्याची पद्धती.

कोटा (Quota) - निवडून येण्यास आवश्यक असणारी मत संख्या.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

प्रश्न:-

१) राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराचे वय .............. वर्ष असावे लागते.

२) .............. विधेयक राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीनेच लोकसभेत मांडले जाते.

३) भारताच्या राष्ट्रपतीला दरमहा रुपये .............. वेतन मिळते.

४) भारताच्या उपराष्ट्रपतीला दरमहा रुपये .............. वेतन मिळते.

५) राष्ट्रपतीची मुदत .............. वर्षे असते.

६) उपराष्ट्रपती .............. सभागृहाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

७) भारताचा राष्ट्रपती .............. कार्यकारी प्रमुख असतो.

८) भारताचा पंतप्रधान .............. कार्यकारी प्रमुख असतो.

९) पंतप्रधान आपल्या सर्व मंत्र्यांसहित .............. सभागृहाला नेहमी जबाबदार असतो.

१०) भारतीय संरक्षण दलाच्या तिन्ही विभागांचा प्रमुख .............. हा असतो.

११) केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या लोकसभेतील सदस्य संख्येच्या .............. टक्के असते.

१२) एखाद्या घटक राज्यात अस्थिरता किंवा राजकीय पेच प्रसंग निर्माण झाल्यास राष्ट्रपती .............. कलमाद्वारे आणीबाणी घोषित करू शकतो.

१३) राष्ट्रपती राज्यसभेतील .............. सदस्यांची नियुक्ती करतात.

१४) भारताचे पहिले राष्ट्रपती .............. हे होते.

१५) भारताचे पहिले पंतप्रधान .............. हे होते.

१६) भारताचे पहिले उपराष्ट्रपती .............. हे होते.

उत्तरे:–

| | | | |
|---|---|---|---|
| १) ३५ | २) अर्थ | ३) ५ लाख | ४) ४ लाख |
| ५) ५ | ६) राज्यसभा | ७) घटनात्मक | ८) वास्तववादी |
| ९) लोकसभा | १०) राष्ट्रपती | ११) १५ | १२) ३५६ |
| १३) १२ | १४) डॉ. राजेंद्र प्रसाद | | |
| १५) पंडित जवाहरलाल नेहरू | | १६) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | |

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) भारताच्या राष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा?

२) भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक पद्धती विशद करा?

३) पंतप्रधानाची निवड व अधिकार कार्ये स्पष्ट करा?

४) भारतीय संसदीय शासन पद्धतीत पंतप्रधानांची भूमिका स्पष्ट करा?

५) भारतातील केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना अधिकार व कार्ये स्पष्ट करा?

ब) टिपा लिहा.

१) राष्ट्रपतीचे आणीबाणी विषयक अधिकार

२) भारताचा उपराष्ट्रपती

३) पंतप्रधान पदाचे महत्त्व

४) केंद्रीय मंत्रिमंडळाचे वैशिष्ट्ये

५) सामूहिक जबाबदारीचे तत्व

## २.७ संदर्भ ग्रंथ – अधिक वाचनासाठी पुस्तके


१) Basu D. D. (1994) An Introduction to the Constitution of India, New Delhi

२) Pylee M. V. (2016) India's Constitution, S. Chand Publishing

३) देवगावकर एस. जी. (२०१२) भारतीय राजकीय व्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

४) पाटील बी. बी., चव्हाण उर्मिला (२०१३) भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५) घोरमोडे के. यु. (२०१३) भारतीय (संविधान) शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर

६) डॉ. भोळे भा. ल.– भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, (२००३)

७) डॉ. भोगले शांताराम – भारतीय राज्यघटना विकास, स्वरूप आणि राजकारण

८) मुठाळ राम – भारतीय शासन आणि राजकारण, अंशुल, पुणे

९) डॉ. कारेकर शोभा, डॉ. घोडके शरद – भारतीय शासन आणि राजकारण, डायमंड, पुणे

१०) कुलकर्णी बी. वाय. – भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर (२०००)


❑❑❑

# घटक ३
# न्यायमंडळ

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना

  ३.२.२ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार

  ३.२.३ न्यायालयीन सक्रियता

  ३.२.४ न्यायालयीन पुनर्विलोकन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला-

- सर्वोच्च न्यायालयाची रचना सांगता येईल.
- सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार स्पष्ट करता येतील.
- न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना स्पष्ट करता येईल.
- न्यायालयीन पुनर्विलोकनाची संकल्पना समजेल.

## ३.१ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रहो, आपण मागील कार्यकारी मंडळ या घटकातंर्गत राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ अभ्यासले. आत्ता आपण 'न्यायमंडळ' या घटकांतर्गत सर्वोच्च न्यायालय, न्यायालयीन

सक्रियता व न्यायालयीन पुनर्विलोकन समजून घेत आहोत. हा घटक अभ्यासल्यानंतर आपणास सर्वोच्च न्यायालयाची रचना व अधिकार समजतील. न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना कळेल. भारतातील न्यायालयीन पुनर्विलोकन संकल्पनेविषयी माहिती समजेल.

भारतातील न्याय मंडळाचा विकास ब्रिटिश काळात झाला आहे. भारताचे न्यायमंडळ वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे. भारतात संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. मात्र संघराज्यात आढळणारी दुहेरी न्यायव्यवस्था भारतात अस्तित्वात नाही. भारतात एकेरी न्यायव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला आहे. केंद्र व राज्य यांच्यासाठी एकीकृत न्यायव्यवस्था निर्माण केली आहे. त्यामुळे भारताचे न्यायमंडळ पिरॅमिडच्या आकाराचे निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालय हे शिखर न्यायालय असून ते अपिलाचे अंतिम न्यायालय देखील आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खालोखाल घटक राज्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च न्यायालय निर्माण केली आहे. उच्च न्यायालयांच्या खालोखाल जिल्हा व तालुका स्तरावर दुय्यम कनिष्ठ न्यायालय स्थापन केली आहे. भारतात कनिष्ठ न्यायालयात दोन वरिष्ठ न्यायालयाकडे अपील करण्याची पद्धत आहे.

## ३.२ विषय–विवेचन

### ३.२.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना

ब्रिटिश राजवटीत १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यानुसार 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' (संघीय न्यायालय) दिल्ली येथे स्थापन करण्यात आले. या न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध इंग्लंडमधील 'प्रिव्ही कौंशिल'कडे अपील करण्याची तरतूद होती. दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाची अंमलबजावणी झाली. सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात आले. संघीय न्यायालय बरखास्त झाले. संविधानाची कलम १२४ ते १४६ दरम्यान सर्वोच्च न्यायालय विषयी तरतुदी करण्यात आल्या आहेत. दिल्ली तेथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले.

**सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या**

संविधानाच्या कलम १२४ (१) नुसार सर्वोच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश (सरन्यायाधीश) व संसद कायद्याद्वारे निश्चित करेल तेवढे इतर न्यायाधीश अशी संख्या असेल, असे नमूद केले आहे. २०१९ पासून एक मुख्य न्यायाधीश व संसदेने कायदा करून ठरवलेले इतर ३३ न्यायाधीश अशी एकूण ३४ एवढी न्यायाधीशांची संख्या निश्चित केली आहे.

**न्यायाधीशांची पात्रता**

भारतीय संविधानाच्या कलम १२४ (३) प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशासाठी पुढील पात्रता निर्धारित केली आहे.

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी किमान तीन ते पाच वर्ष कार्य केलेले असावे.

किंवा

उच्च न्यायालयात किमान दहा वर्ष वकील म्हणून कार्य केलेले असावे.

किंवा

राष्ट्रपतीच्या मतानुसार संबंधित व्यक्ती प्रख्यात कायदेतज्ञ असावी.

**न्यायाधीशांची नियुक्ती**

संविधानानुसार राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांची नियुक्ती करतील. इतर न्यायाधीशांची नियुक्ती करताना मुख्य न्यायाधीशांशी सल्लामसलत करतील. भारतातील पहिले मुख्य न्यायाधीश न्या. हरिलाल जे. कानिया यांची नियुक्ती करण्यात आली होती. भारताचे सध्याचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांची नियुक्ती केली आहे.

**न्यायाधीशांचा कार्यकाल**

संविधानानुसार सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश वयाची ६५ वर्ष होईपर्यंत पदावर कार्यरत राहतील अशी तरतूद करण्यात आली आहे. निवृत्त होण्यापूर्वी आपल्या पदाचा राजीनामा स्वअक्षरात राष्ट्रपतीला सुपूर्द करू शकतात.

**न्यायाधीशांचे वेतन व भत्ते**

संविधानाच्या कलम १२५ नुसार संसद ठरवेल त्याप्रमाणे न्यायाधीशांना वेतन व इतर सोयी सुविधा दिल्या जातात. न्यायालयाचे स्वातंत्र्य व स्वायत्तता अबाधित राखण्यासाठी न्यायाधीशांना माफक वेतन भत्ते व सेवा सुविधा पुरविल्या जातात. आर्थिक आणीबाणी वगळता इतर वेळी न्यायाधीशांच्या नियुक्तीनंतर त्यांच्या वेतन भत्त्यात नुकसानकारक बदल केली जाऊ शकत नाहीत. सध्या मुख्य न्यायाधीशांना सातव्या वेतन आयोगानुसार दरमहा २ लाख ८० हजार तर इतर न्यायाधीशांना २ लाख ५० हजार वेतन दिले जाते. याशिवाय न्यायाधीशांसाठी भत्ते, ग्रॅच्युइटी व निवृत्तीवेतन देण्याची तरतूद केली आहे.

**पदच्युती प्रक्रिया**

गैरवर्तन व अकार्यक्षमता या कारणामुळे न्यायाधीशांना पदच्युत करता येते. पदच्युत करण्याच्या प्रक्रियेला 'महाभियोग' असे म्हणतात. महाभियोगाचा खटला संसदेत चालविला जातो. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि ठरावाच्या दिवशी सभागृहात मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने न्यायाधीशावरील आरोप सिद्ध मानले जातात. संसदेत आरोप सिद्ध झाल्यास राष्ट्रपती आदेशाद्वारे संबंधित न्यायाधीशाला पदच्युत करतात.

### ३.२.२ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार

सर्वोच्च न्यायालयाला मूळ अधिकार, पुनर्निर्णयाचे अधिकार व सल्लाविषयक अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

**अ) मूळ अधिकार (प्रारंभिक अधिकार)**

मूळ अधिकार क्षेत्रात अशा खटल्यांचा समावेश होतो की जे खटले केवळ सर्वोच्च न्यायालयातच चालवले जातात. इतर न्यायालयात चालवता येत नाहीत. पुढील खटले चालविण्याचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयाला आहे.

१. भारत सरकार आणि एक किंवा अधिक घटक राज्य यांच्यातील वाद.

२. भारत सरकार आणि एक किंवा अनेक घटक राज्य एका बाजूला तर एक किंवा अनेक घटक राज्य दुसऱ्या बाजूला यांच्यातील वाद.

३. दोन किंवा अधिक घटक राज्य यांच्यातील परस्पर वाद.

**ब) सामायिक अधिकार**

जे अधिकार सर्वोच्च न्यायालयाबरोबर उच्च न्यायालय देखील वापरू शकते, अशा अधिकारांना सामायिक अधिकार म्हणतात. या अधिकारांतर्गत भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण केले जाते. संविधानाच्या कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी बंदी प्रात्यक्षिकरण, परमादेश, प्रतिशेध, उत्प्रेषण व अधिकारपृच्छा हे आदेश काढू शकते.

**क) पुनर्निर्णयाचा अधिकार**

सर्वोच्च न्यायालय अपील करण्याचे अंतिम न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाला स्वतः दिलेल्या अथवा उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुध्द पुनरर्निर्णय देण्याचा अधिकार आहे. संविधानाच्या कलम १३२ नुसार सर्वोच्च न्यायालयाला पुनर्निर्णयाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. पुढील खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाला पुनर्निर्णय देता येतात.

१. फौजदारी खटल्या विषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. अशा खटल्यावर पुनर्विचार करून निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. याबाबत उच्च न्यायालयाने संबंधित खटला सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यास योग्य असल्याचे शिफारस पत्र देणे आवश्यक असते.

२. दिवाणी खटल्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. अशा निकालावर पुनर्विचार करून निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. या प्रकारच्या खटल्यात कायद्याचा प्रश्न अंतर्भूत असल्याचे उच्च न्यायालयाने प्रमाणित करणे गरजेचे असते.

३. एखाद्या खटल्यामध्ये घटनेचा अर्थ लावण्यासंबंधी मूलभूत प्रश्न अंतर्भूत असल्याचे उच्च न्यायालयाने प्रमाणित केल्यास संबंधित खटल्यावर पुनर्विचार करून निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे.

४. संविधानाच्या कलम १३६ नुसार सर्वोच्च न्यायालयास अपिलाचे विशेष अधिकार देण्यात आले आहे. या कलमानुसार सैनिकी न्यायालय वगळता भारतातील कोणत्याही न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपिलाची खास परवानगी सर्वोच्च न्यायालय एखाद्यास देऊ शकते.

५. संविधानाच्या कलम १३७ नुसार सर्वोच्च न्यायालय स्वतः दिलेल्या निर्णय किंवा आदेशाचा फेरविचार करून पुन्हा निर्णय देऊ शकते. एखाद्या खटल्यामध्ये नवीन तथ्य समोर आल्यास अथवा एखाद्या पक्षावरती अन्याय झाल्याची शंका वाटल्यास सर्वोच्च न्यायालय स्वतः दिलेल्या निर्णयात फेरबदल करून पुनर्निर्णय देऊ शकते.

### ड) सल्लाविषयक अधिकार

संविधानाच्या कलम १४३ नुसार राष्ट्रपतींनी मागणी केल्यास राष्ट्रपतींना कायदेविषयक सल्ला देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या मुद्द्याविषयी कायदा व वस्तुस्थितीचा प्रश्न निर्माण झाल्यास राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडून सल्ला घेतात. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपती वर बंधनकारक नसतो. तसेच सल्ला देणे सर्वोच्च न्यायालयावर देखील बंधनकारक नाही. आवश्यक नसल्यास सर्वोच्च न्यायालय सल्ला देण्यास नकार देऊ शकते. केंद्र आणि राज्य यांच्यातील वाद मिटविण्यासाठी अनेक वेळेला सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना सल्ला दिला आहे. उदाहरणार्थ केरळ शिक्षण विधेयक, गुजरात विधानसभा निवडणूक प्रकरण (२००२), बाबरी मज्जिद प्रकरण इत्यादी.

### इ) अभिलेख न्यायालयाचा अधिकार

सर्वोच्च न्यायालयातील सर्व कामकाज व निकाल यांची कागदपत्रे लिखित किंवा अभिलेखित करून ठेवले जातात. संविधानाच्या कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालय अभिलेख न्यायालय म्हणून ओळखले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या दिलेल्या निर्णयांना कायदेशीर स्वरूप प्राप्त होते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय भारतातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतात. भविष्यात उद्‌भवणाऱ्या खटल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे अभिलेखित केलेले निर्णय आधारभूत मानले जातात.

### फ) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार

कायदे मंडळांनी केलेले कायदे, कार्यकारी मंडळाची कृती यांचे परीक्षण करून संबंधित कायदा अथवा कृती घटनाबाह्य असल्यास ती वैद्य घोषित करण्याचा अधिकार म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार होय. सर्वोच्च न्यायालय पुढील परिस्थितीत न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार वापरते.

१. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ त्यांच्या अधिकार मर्यादांचे उल्लंघन करत असल्यास सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकन करू शकते.

२. कायदेमंडळांनी केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळानी केलेली कृती घटनात्मक तरतुदीचे उल्लंघन करीत असल्यास सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकन करू शकते.

३. कायदेमंडळाने केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाने केलेले कृती नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे पायमल्ली करत असल्यास सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकन करू शकते.

न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे भारतीय संघराज्य व्यवस्था, भारताचे संविधान व नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचे रक्षण करण्याचे न्यायीक अधिकार सर्वोच्च न्यायालयास देण्यात आले आहेत.

**ग) न्यायालयीन प्रशासनविषयक अधिकार**

संविधानाच्या कलम १४६ नुसार सर्वोच्च न्यायालयाचे कर्मचारी यांच्या नियुक्ती व सेवाशर्ती निर्धारित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालयाच्या प्रशासनासंबंधी निर्देश देऊ शकते.

**समारोप**

भारताचे संविधान, भारताचे संघराज्य व नागरिकांचे मूलभूत अधिकार यांचे रक्षण करण्याचे अधिकार भारतीय संविधानानुसार सर्वोच्च न्यायालयाला बहाल करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या अधिकारांचा वापर करून संविधानाचे रक्षण केले आहे. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या धोरणाला आळा घातला आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण केले आहे. बहुमताची हुकूमशाही निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली आहे. संघराज्यात निर्माण होणारे वाद मिटवण्यात यश मिळवले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे. केवळ कायदेविषयक भूमिका न बजावता समाजाबाबत सामाजिक व आर्थिक बांधिलकी सर्वोच्च न्यायालयाने जपली आहे. भारतीय लोकशाहीला बळकटी देण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) पुढील विधाने चूक की बरोबर लिहा.

१. सर्वोच्च न्यायालय शिखर न्यायालय नाही. ( )

२. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचा कार्यकाळ वयाची ६५ वर्ष इतका आहे. ( )

३. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती कडून केली जाते. ( )

४. न्यायाधीशांचे वेतन राष्ट्रपती निश्चित करतात. ( )

ब) रिकाम्या जागा भरा.

१. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना ……… पद्धतीने पदच्युत केले जाते.

२. ......... रोजी सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात आले.

३. सध्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ......... एवढी आहे.

४. सर्वोच्च न्यायालय अपिलाचे ......... न्यायालय आहे.

५. कलम......... नुसार सर्वोच्च न्यायालय मूलभूत अधिकारांचे रक्षण करते.

६. भारत सरकार विरुद्ध एक किंवा अधिक घटक राज्य यांच्यातील खटला ......... न्यायालयात चालवला जातो.

७. कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालय ......... न्यायालय म्हणून ओळखले जाते.

### ३.२.३ न्यायालयीन सक्रियता

**व्याख्या :** * कायद्याच्या अंमलबजावणी बाबत समाजाभिमुख व विकासात्मक दृष्टीने न्यायालयाने पुढाकार घेणे म्हणजे 'न्यायालयीन सक्रियता' होय.

* कायदेमंडळाने केलेले कायदे अथवा कार्यकारी मंडळांनी घेतलेले धोरणात्मक निर्णय यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी न्यायमंडळांनी केलेल्या प्रयत्नास 'न्यायालयीन सक्रियता' म्हटले जाते.

* संविधानाने ठरवून दिलेल्या जबाबदाऱ्या कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाकडून योग्यरीत्या पार पाडल्या जात नसतील तर राजकीय, आर्थिक व सामाजिक न्याय प्राप्त होणार नाही. अशावेळी न्यायमंडळ सकारात्मक व रचनात्मक भूमिका घेते. जनहित याचिकांबाबत निर्णय घेताना न्यायालय सक्रिय होते. जनहित याचिकांचे प्रमाण जसजसे वाढत गेले तसे तसे न्यायालयाची सक्रियता वाढत गेली आहे. सन १९९५ नंतर अस्थिर व आघाडी सरकार स्थापन झाल्यामुळे न्याय मंडळाच्या सक्रियतेत वाढ झाली. स्त्रिया, बालके, असंघटित कामगार, वेटबिगार इत्यादी कमकुवत घटकांच्या न्यायासाठी न्यायालयाने सक्रिय भूमिका बजावली आहे. न्यायालयीन सक्रियतेमुळे न्याय मंडळाच्या अधिकारक्षेत्रात वाढ झाली आहे. कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या कार्यक्षेत्रात न्याय मंडळाचा हस्तक्षेप होत आहे. न्यायालयीन सक्रियतेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या कार्यात दक्षता वाढत आहे. सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचे रक्षण प्रभावीपणे होत आहे.

**न्यायालयीन सक्रियता**

न्यायालयीन सक्रियता म्हणजे न्यायव्यवस्थेने समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर हस्तक्षेप करून, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा आणि कर्तव्यांचा योग्य उपयोग करून न्याय देण्याचा सक्रिय दृष्टिकोन ठेवणे. ही संकल्पना न्यायालयाच्या भूमिकेचा उल्लेख करते, ज्यामध्ये न्यायालय फक्त कायद्याच्या चौकटीपुरते मर्यादित न राहता लोकांच्या हक्कांचे संरक्षण, संविधानाच्या मुलभूत तत्त्वांचे पालन, आणि शासन यंत्रणेच्या अपयशावर देखरेख ठेवते.

**न्यायालयीन सक्रियतेची संकल्पना**

भारतीय संविधानाने न्यायव्यवस्थेला स्वतंत्रता दिली आहे. तथापि, काही प्रसंगी प्रशासन किंवा विधिमंडळ आपल्या कर्तव्यांमध्ये कमी पडते, किंवा नागरिकांचे मूलभूत हक्क धोक्यात येतात, अशा वेळी न्यायालय लोकांच्या भल्यासाठी पुढे येते आणि सक्रिय भूमिका बजावते.

**न्यायालयीन सक्रियतेची गरज**

१. **लोकशाहीच्या संरक्षणासाठी:** जेव्हा शासनाच्या कोणत्याही शाखा संविधानाचे उल्लंघन करतात तेव्हा न्यायालयाला हस्तक्षेप करण्याची गरज असते.

२. **मूलभूत हक्कांचे रक्षण:** जेव्हा नागरिकांच्या हक्कांवर गदा येते तेव्हा न्यायालय हस्तक्षेप करून त्यांच्या हक्कांचे रक्षण करते.

३. **शासन यंत्रणेची निष्क्रियता:** काही वेळा कार्यकारी शाखा किंवा विधिमंडळ निर्णय घेण्यात किंवा अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरते अशा वेळी न्यायालय हस्तक्षेप करते.

४. **पर्यावरण आणि सामाजिक मुद्द्यांवर ठोस निर्णय:** पर्यावरण रक्षण, महिला आणि बालकांचे हक्क, कामगार हक्क, भ्रष्टाचार यांसारख्या क्षेत्रांत न्यायालय सक्रिय भूमिका बजावते.

**न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे**

१. **हवालादारी प्रकरण** (Vineet Narain Case): सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय आणि इतर तपास यंत्रणांना स्वायत्तता देण्यासाठी निर्णय घेतला.

२. **पर्यावरण विषयक हस्तक्षेप:** सर्वोच्च न्यायालयाने गंगा प्रदूषण आणि वन संवर्धन प्रकरणांवर निर्णय घेतले.

३. **विशेष लोकहित याचिका** (PIL): न्यायालयाने नागरिकांना थेट न्यायालयात जाण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला ज्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळाला.

**फायदे**

- **संविधानाचा दृढपणा:** संविधानातील तत्त्वांचे पालन करण्यासाठी न्यायालयीन सक्रियता महत्त्वाची ठरते.
- **लोकांच्या हक्कांचे रक्षण:** यामुळे समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळतो.
- **प्रशासनावर देखरेख:** प्रशासन आणि विधिमंडळ यांच्यावर जबाबदारी ठेवण्यासाठी न्यायालयीन सक्रियता प्रभावी ठरते.

**मर्यादा**

- **सत्तांचा समतोल:** न्यायालयाचा हद्दीबाहेरचा हस्तक्षेप कार्यकारी आणि विधिमंडळ यांच्यावर आक्रमण मानले जाऊ शकते.
- **न्यायालयाचा वेळ वाया जाणे:** अत्यधिक सक्रियतेमुळे न्यायालयीन प्रक्रियेत उशीर होऊ शकतो.
- **न्यायाधीशांची मर्यादित क्षमता:** न्यायालयाचा सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार नेहमीच यशस्वी ठरत नाही.

**निष्कर्ष**

न्यायालयीन सक्रियता ही लोकशाहीसाठी उपयुक्त साधन आहे, पण त्याचा वापर विवेकाने आणि मर्यादित प्रमाणात व्हायला हवा. समाजाच्या न्याय, समता आणि स्वातंत्र्य यासाठी न्यायालयाने आपली भूमिका सक्रियपणे पार पाडावी पण सत्तांचा समतोल राखणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

## ३.२.४ न्यायालयीन पुनर्विलोकन

कायदे मंडळाने केलेला कायदा किंवा कायदेमंडळाची कृती घटनात्मक तरतूदीशी विसंगत असल्यास तो कायदा अथवा कृती अवैद्य ठरविण्याचा न्यायमंडळाचा अधिकार म्हणजे 'न्यायालयीन पुनर्विलोकन' होय. भारतीय न्यायालयीन पुनर्विलोकन संकल्पनेचा उदय सन १८०३ मध्ये अमेरिकेत मार्बरी विरुद्ध मेडिसन खटल्यामध्ये झाला. न्यायालयीन पुनर्विलोकनाची संकल्पना भारताने अमेरिकेकडून स्वीकारली आहे. भारतातील न्यायालयीन पुरविलोकनाची संकल्पना अमेरिके इतकी शक्तिशाली नाही. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत असे मत व्यक्त केले होते की, 'कोणतेही न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालय स्वतःला कायदेमंडळाचे तिसरे सभागृह बनवू शकत नाही. कोणतेही न्यायालय सर्व जनतेचे प्रतिनिधी असणाऱ्या संसदेच्या इच्छेला विरोध करू शकत नाही. आम्ही केलेल्या त्रुटी ते सांगू शकते; परंतु जिथे सर्व समुदायाच्या भविष्याचा प्रश्न आहे, तिथे न्यायपालिका अडथळा बनू शकत नाही.' अमेरिकेत 'न्यायालयीन सर्वोच्चता' मान्य केल्याने तेथे न्यायालयीन पुनर्विलोकनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जाते. याउलट इंग्लंडने 'संसदीय सर्वोच्चता' मान्य केल्याने तिथे संसदेचे महत्त्व अधिक आहे. भारतात या दोन्ही पद्धतीचा सुवर्ण मध्ये सांधून 'संविधानिक सर्वोच्चता' मान्य केली आहे.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबतच्या संविधानिक तरतुदी**

संविधानात न्यायालयीन पुनर्विलोकन अशी संज्ञा कुठेही स्पष्ट केलेली नाही; परंतु संविधानातील खालील तरतुदीनुसार न्यायालयास न्यायालयीन पुनर्विलोकनाचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

१. संविधानाच्या कलम १३ नुसार राज्याने केलेल्या कायद्यामुळे मूलभूत अधिकाराचे उल्लंघन होत असल्यास; संबंधित कायदा अवैद्य घोषित करण्याचा अधिकार न्यायमंडळास प्राप्त झाला आहे.

२. संविधानाच्या कलम ३२ नुसार भारतीय नागरिक आपल्या मूलभूत अधिकाराचे रक्षण करण्यासाठी संविधानाच्या कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयाकडे व कलम २२६ नुसार उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो.  या आधारे न्याय मंडळांना पुनर्विलोकनाची शक्ती प्राप्त झाली आहे.

३. केंद्र व राज्य यांच्या कायदेविषयक अधिकार क्षेत्राची स्पष्ट नोंद संविधानानुसार कलम २४६ मध्ये केली आहे. केंद्र किंवा राज्य यांनी आपल्या अधिकार क्षेत्राबाहेरील विषयावर कायदा केल्यास संबंधित कायदा अवैद्य घोषित करण्याचा अधिकार न्याय मंडळास प्राप्त झाला आहे.

४. भारतीय संविधानाच्या कलम ३६८ नुसार घटनादुरुस्तीची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. एखादी घटना दुरुस्ती या प्रक्रियेनुसार झालेली नसेल तर न्यायमंडळ संबंधित घटना दुरुस्ती अवैध ठरवून रद्द करण्याचा अधिकार न्यायालयास प्राप्त झाला आहे.

५. भारतीय संविधानाच्या कलम १३२ नुसार संविधानाचा अर्थ लावण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात खटले दाखल होतात. अशा खटल्यावर निर्णय देताना संविधानाचा अर्थ लावून एखादी बाब वैद्य  कि अवैध ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झाला आहे.

एकंदरीत, लिखित संविधान मूलभूत अधिकाराचे रक्षण व केंद्र-राज्य यांच्यातील सत्ता विभाजन ह्या बाबी न्याय मंडळास न्यायालयीन पुनर्विलोकनाचे अधिकार बहाल करतात.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबत न्यायालयाची भूमिका**

न्यायमंडळाने न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबत अनेक निर्णय दिले आहेत. संसदेने केलेले कायदे अवैद्य घोषित केले आहेत. सर्वप्रथम १९५१ साली एके गोपालन विरुद्ध मद्रास राज्य या खटल्यात न्यायालयाने निवारक निरोध अधिनियम १४ चे खंड असंवैधानिक ठरवून रद्द घोषित केले होते. १९६७ साली गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असे मत नोंदवले की, संविधानाच्या तिसऱ्या भागात नमूद केलेल्या मूलभूत अधिकारांमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेस नाही. या निर्णयामुळे संसदेच्या कायदा तयार करण्याच्या अधिकाराला न्याय मंडळाकडून आव्हान देण्यात आले. यामुळे न्यायमंडळ श्रेष्ठ की संसद श्रेष्ठ असा वाद निर्माण झाला. १९७३ साली केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्याचा निर्णय देताना असे स्पष्टीकरण दिले की, संसदेला ३६८ कलमानुसार मूलभूत अधिकारासह संविधानाच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. मात्र संविधानाची मूळ चौकट नष्ट होईल इथपर्यंत संसद या अधिकाराचा वापर करू शकत नाही. या निकालाने संसदेच्या कायदे निर्मितीच्या क्षमतेत वाढ झाली.

न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे न्यायालयाला कायद्यातील किंवा सरकारच्या कोणत्याही कृतीतील घटनात्मक वैधतेचा तपास करण्याचा अधिकार. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १३ नुसार, संविधानाच्या विरोधात असलेल्या कोणत्याही कायद्याला वा निर्णयाला शून्य ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.

न्यायालयीन पुनर्विलोकनाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आणि सत्ता विभागणीच्या तत्त्वांचा समतोल राखणे.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाची वैशिष्ट्ये:**

१. **घटनात्मक सर्वोच्चत्व:** भारतीय संविधान हे सर्वोच्च असून, त्याच्या विरोधात कोणतेही कायदे असू शकत नाहीत.

२. **न्यायालयाचा अधिकार:** सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांना घटनात्मक वैधता तपासण्याचा अधिकार आहे.

३. **जनतेचे रक्षण:** नागरिकांचे मूलभूत हक्क सुरक्षित राहण्यासाठी न्यायालय हा एक महत्वाचा आधार आहे.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाची गरज:**

- कोणत्याही कायद्यामुळे किंवा सरकारी धोरणामुळे नागरिकांच्या हक्कांचा भंग होऊ नये.
- कार्यकारी शाखेने केलेल्या कृतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी.
- संविधानाच्या मूळ तत्त्वांचे पालन करण्यासाठी.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचे प्रकार:**

१. **घटनात्मक पुनर्विलोकन** : एखादा कायदा संविधानाच्या तत्त्वांच्या विरोधात आहे का, याची तपासणी.

२. **प्रशासकीय पुनर्विलोकन** : कार्यकारी शाखेने घेतलेल्या निर्णयांची वैधता तपासणे.

३. **आर्थिक पुनर्विलोकन** : आर्थिक धोरणे व निर्णय संविधानाच्या चौकटीत येतात का, याचा तपास.

**भारतातील काही महत्त्वाची न्यायालयीन पुनर्विलोकनाची प्रकरणे:**

१. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३): या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ''संविधानाची मूलभूत संरचना'' सिद्धांत मांडला.

२. मिनर्व्हा मिल्स प्रकरण (१९८०): या प्रकरणात न्यायालयाने मूलभूत हक्कांना जास्त महत्त्व दिले.

३. गोलकनाथ प्रकरण (१९६७): या प्रकरणात मूलभूत हक्कांच्या बदलावर न्यायालयाने निर्बंध लादले.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचे महत्त्व:**

- घटनात्मक तत्त्वांचे रक्षण.
- सरकारच्या कार्यांवर नियंत्रण ठेवणे.
- लोकशाहीचे भक्कम आधारस्तंभ म्हणून न्यायालयाची भूमिका.

- कायद्याच्या अंमलबजावणीतील पारदर्शकता आणि न्यायप्राप्ती.

**मर्यादा:**

- न्यायपालिका व कार्यपालिकेमध्ये संघर्ष होण्याची शक्यता.
- न्यायालयाने कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करावे लागते.
- न्यायालयीन निर्णयांमुळे कधी कधी विकास प्रक्रियेला विलंब होतो.

**निष्कर्ष:**

न्यायालयीन पुनर्विलोकन हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे अंग आहे. ते संविधानाचे संरक्षण करण्यासाठी व नागरी हक्कांचे रक्षण करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा आहे. मात्र, न्यायालयाने त्याचा उपयोग जबाबदारीने व संविधानाच्या चौकटीत राहून करणे आवश्यक आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) रिकाम्या जागा भरा.

१. न्यायालयीन पुनर्विलोकन संकल्पनेचा उदय ......... येथे झाला.

२. न्यायालयीन पुनर्विलोकन ही संकल्पना भारताने ......... या देशाकडून स्वीकारली.

३. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून न्यायालयाकडे केलेली न्याय याचना म्हणजे ......... होय.

४. कायद्याच्या अंमलबजावणी बाबत समाजाभिमुख व विकासात्मक दृष्टीने न्यायालयाने पुढाकार घेणे म्हणजे ......... होय.

५. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्याचा निर्णय ......... साली देण्यात आला

## ३.३ सारांश

ब्रिटिश काळात भारतात सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात होते. परंतु भारतीय स्वातंत्र्यानंतर त्याला घटनात्मक दर्जा देण्यात आला. भारतीय संविधानातील कलम १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची तरतुद केली आहे. संविधानाचा अर्थ व संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे. कायदेमंडळाने केलेले कार्य किंवा कायदा घटनेशी सुसंगत आहे की विसंगत हे तपासून पहाण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार बहाल केला आहे.

या अधिकाराचा वापर करून न्यायमंडळाने संसद विरुद्ध न्यायमंडळ असा वाद निर्माण केला आहे. गोलकनाथ खटला व केशवानंद भारती खटला यामध्ये परस्पर विरोधी व संभ्रम निर्माण करणारे निर्णय न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार वापरून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. १९५०-५१ साली जमीनदारी व जहागीरदारी निर्मूलन करणारा भू सुधारणा कायदा न्याय मंडळांनी रद्द केला यामुळे भू सुधारणा विषयक निर्णयाला अडथळा निर्माण झाला.'कर्मचारी भविष्य निधी अधिनियम', 'बोनस वाटप अधिनियम'

यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते; परंतु न्यायालयाने यास वैद्य घोषित केले. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा सुधारणावादी उपयोग केला. मालकांच्या हितापेक्षा कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याचा दृष्टिकोन ठेवला.

मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी लोकशाहीत बहुमताची हुकूमशाही निर्माण होऊ नये यासाठी न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार महत्त्वाचा ठरला आहे. गेल्या ७८ वर्षात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाची ठरली आहे. असे असले तरी अलीकडच्या काळामध्ये न्यायालयीन निर्णयामध्ये शंकास्पद कामकाज पद्धती निर्माण झाली आहे. शासनाचा न्यायालयीन निर्णयामध्ये हस्तक्षेप होताना दिसत आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये न्यामंडळाबद्दल नाराजीचा सुर दिसून येतो. असे असले तरी भारतामध्ये न्यायमंडळाने आतापर्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **प्रिव्ही कौन्सिल :** हे युनायटेड किंग्डम (UK) मधील न्याय मंडळाचे अविभाज्य अंग आहे. ब्रिटिश साम्राज्य अंतर्गत येणाऱ्या सदस्य राष्ट्रांसाठी ते शिखर न्यायालय होते. ब्रिटिश राजवटीत प्रिव्ही कौन्सिल हे अपिलाचे अंतिम न्यायालय होते. प्रिव्ही कौन्सिल मध्ये हाऊस ऑफ लॉर्ड्स सभागृहातील सदस्य, लॉर्ड चान्सलर व इतर कायदे तज्ज्ञांचा समावेश होतो.

२. **फौजदारी खटले :** चोरी, हत्या, शारीरिक इजा, बलात्कार, वैयक्तिक गुन्हे यांच्याशी संबंधित खटले फौजदारी खटले म्हणून ओळखले जातात.

३. **दिवाणी खटले :** घर, जमीन व स्थावर मालमत्ते संदर्भातील खटले दिवाणी खटले म्हणून ओळखले जातात.

४. **जनहित याचिका :** न्यायदानाच्या प्रक्रियेत सर्वसाधारणपणे अन्यायग्रस्त व्यक्तीला न्यायालयाकडे दाद मागता येते; परंतु अन्यायग्रस्त व्यक्ती किंवा समुदाय यांच्या वतीने कोणीही न्यायालयाकडे न्याययाचना करू शकते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने न्यायालयाकडे केलेली अशा प्रकारची याचिका ही 'जनहित याचिका' या नावाने ओळखली जाते.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयंअध्ययन प्रश्नो-उत्तरे -१

अ) पुढील विधाने चूक की बरोबर लिहा.

१. (चूक) २. (बरोबर) ३. (बरोबर) ४. (चूक)

ब) रिकाम्या जागा भरा.

१. महाभियोग २. २६ जानेवारी १९५० ३. ३४

४. अंतिम ५. ३२ ६. सर्वोच्च ७. अभिलेख

स्वयंअध्ययन प्रश्नो-उत्तरे -२

अ) रिकाम्या जागा भरा.

१. अमेरिका २. अमेरिका ३. जनहित याचिका

४. न्यायालयीन सक्रियता ५. १९७३

### ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) थोडक्यात टिपा लिहा.

१. न्यायालयीन पुनर्विलोकन

२. न्यायालयीन सक्रियता

३. सर्वोच्च न्यायालयाची रचना

ब सविस्तर उत्तरे लिहा.

१. सर्वोच्च न्यायालयाची रचना व अधिकार लिहा.

२. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ व मूल्यमापन स्पष्ट करा.

### ३.७ संदर्भ ग्रंथ – अधिक वाचनासाठी पुस्तके


१) Basu D. D. (1994) An Introduction to the Constitution of India, New Delhi

२) पाटील बी. बी., चव्हाण उर्मिला (२०१३) भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) डॉ. भोळे भा. ल.- भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, (२००३)

४) डॉ. भोगले शांताराम - भारतीय राज्यघटना विकास, स्वरूप आणि राजकारण

५) कुलकर्णी बी. वाय. - भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर (२०००)


❑❑❑

# घटक ४
# भारतातील पक्ष पद्धती

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ राजकीय पक्ष: अर्थ व व्याख्या

४.२.२ भारतातील राजकीय पक्ष पध्दतीची वैशिष्ट्ये

४.२.३ प्रमुख राष्ट्रीय पक्ष

४.२.४ भारतातील आघाडीचे राजकारण

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासाअंती आपण–

- राजकीय पक्ष काय? हे समजावून घेणार आहोत.
- भारतातील राजकीय पक्षांची वैशिष्ट्ये समजावून घेणार आहोत.
- भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्षांची विचारधारा व कार्यक्रम समजावून घेणार आहोत.
- आघाडीचे राजकारण म्हणजे काय? हे समजावून घेणार आहोत.

## ४.१ प्रस्तावना

लोकशाही देशामध्ये राजकीय पक्षांना महत्वाचे स्थान असते. भारतामध्ये देखील राजकीय पक्षांची भूमिका महत्वाची आहे. भारतात अनेक राजकीय पक्ष आहेत. त्यांची प्रामुख्याने दोन गटात वर्गवारी केली जाते, राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष याशिवाय विविध भागात काही स्थानिक पक्ष देखील आपणास पहावयास मिळतात. प्रत्येक राजकीय पक्ष म्हणजे काही लोकांचा संघटीत समुह असतो. निवडणूकीच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करणे हा त्यांचा उद्देश असतो. भारतातील पक्ष पध्दतीचे विश्लेषण किंवा वैशिष्ट्ये स्पष्ट करणे कठिण काम आहे. कारण राजकीय पक्षांची रचना, कार्यपध्दती, विस्तार, विचारधारा यांच्यात एकवाक्यात दिसत नाही. सध्या भारताच्या राजकारणात सात मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आहेत. याशिवाय प्रत्येक घटक राज्यात एक दोन प्रबल प्रादेशिक पक्ष आहेत. याशिवाय असंख्य स्थानिक राजकीय पक्ष देखील राजकारणात सक्रिय आहेत. त्यांचा परिणाम निवडणूकांच्या निकालांवर होत असतो. आघाडी शासन हा बहुपक्ष पध्दतीचा परिणाम आहे. गेल्या तीन दशकात अपवाद वगळले तर केंद्रासह अनेक घटक राज्यात आघाडीचे सरकार सत्तेवर आलेले दिसून येते. अशावेळी शासनाच्या अंतर्गत पक्षांमध्ये स्पर्धा सुरु असते.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ राजकीय पक्ष – अर्थ व व्याख्या

आधुनिक काळात राजकीय पक्षांचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला जात आहे. या अभ्यासाला स्टॅसिऑलॉजी (stasiology) असे म्हटले जाते.

राजकीय पक्ष म्हणजे लोकांचा सुसंघटीत समुह होय. हा समुह एका विशिष्ट विचारधारेवर आधारित असतो. निवडणूकीच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करणे व सामाजिक व राजकीय परिवर्तन करणे हा या संघटनेचा उद्देश असतो. उदा. भारतामध्ये भारतीय जनता पक्ष व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे दोन प्रमुख राष्ट्रीय पक्ष म्हणून ओळखले जातात.

आर.जी.गेटल यांच्या मते, ''शासनाला नियंत्रित करणारी आणि स्वत:च्या धोरणांची अंमलबजावणी करणासाठी प्रयत्नशील असणारी नागरीकांची राजकीय संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय.''

राजकीय पक्ष विशिष्ट विचारधारेचे समर्थन करत असतात. आपली विचारधारा कशी योग आहे. हे लोकांना पटवून देणाचे काम राजकीय पक्ष निवडणूकीपूर्वी करत असतात. लोकमताचा पाठींबा मिळवून सत्ता स्थापन करणासाठी चांगल्या व गैर सर्व मार्गांचा अवलंब राजकीय पक्षांकडून केला जातो. भारतातील राजकीय पक्षांचा अर्थ व स्वरुप समजावून घेणासाठी त्याची वैशिष्ट्ये समजावून घेणे आवशक आहेत. ती पुढीलप्रमाणे –

### ४.२.२ भारतातील पक्ष पध्दतीची वैशिष्ट्ये

**१) बहु पक्ष पध्दती**

भारतामध्ये बहुपक्ष पध्दती आहे. जगातील सर्वात जास्त राजकीय पक्ष असणारा देश म्हणून भारताची ख्याती आहे. भारतात ७ राष्ट्रीय पक्ष ५० पेक्षा जास्त प्रादेशिक पक्ष व २४०० नोंदणीकृत स्थानिक राजकीय पक्ष आहेत. प्रत्येक राजकीय पक्षाला देशातील विविध भागात कमी अधिक प्रमाणात लोकांचा पाठींबा आहे. त्यामुळे कित्येक पक्षांचे एक किंवा दोन आमदार किंवा खासदार निवडून आलेले दिसतात.

**२) एक प्रबळ पक्ष पध्दती**

१९५० ते १९९० या काळात काँग्रेस पक्षाचे भारताच्या राजकारणात प्राबल्य होते. १९९१ ते २०१४ या काळात भारतीय जनता पक्षाचा काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून उदय झाला. अशा प्रकारे 'एका पक्षाचे प्रभुत्व' (One Party Dominance) हे भारताच्या पक्ष पध्दतीचे एक वैशिष्ट्य मानावे लागेल. प्रबळ पक्ष इतर पक्षांना वैद्य व अवैद्य मार्गाने रोखण्याचा प्रयत्न करत असतो.

**३) विचारधारेबाबत गोंधळ**

राजकीय पक्ष तत्वत एखाद्या विचारधारेवर आधारीत असतात. परंतु भारतातील बहुतांश राजकीय पक्षांच्या विचारधारा आणि व्यवहार यात अंतर दिसून येते. केवळ कम्युनिस्ट पक्ष आपल्या विचारधारेशी चिकटून आहेत. तथापि इतर राजकीय पक्ष सत्ता मिळवणासाठी वैचारिक तडजोड करताना दिसून येतात. सत्ता प्राप्तीसाठी एकमेकाविरुध्द निवडणूक लढविणारे राजकीय पक्ष सोईसाठी एकत्र येताना दिसतात.

**४) व्यक्तीकेंद्रीत राजकीय पक्ष**

अपवाद वगळले तर भारतातील राजकीय पक्ष व्यक्ती केंद्रीत आहेत पक्षाचा नेता पक्ष आणि विचारधारा यांच्यापेक्षा मोठा असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. पक्ष ही व्यक्ती व कुंटुंब केंद्रीत व्यवस्था असल्याचे दिसून येते. गांधी घराणाचे वर्चस्व काँग्रेस पक्षावर दिसून येते, त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर पवार कुंटुंबियांचे वर्चस्व आहे. त्याचप्रमाणे शिवसेना ठाकरे, आम आदमी पार्टी - अरविंद केजरीवाल, जनता दल-देवगोंडा, डी.एम.के - स्टॅलीन व करुणानिधी अशा प्रकारे पक्षाचे नेतृत्व त्या पक्षाची ओळख आहे. अनेक पक्ष व्यक्ती केंद्रीत असल्याने काळाच्या ओघात संपुष्टात देखील आले आहेत.

**५) प्रादेशिक व धार्मिक अस्मितांचा प्रभाव**

भारतात शेकडो राजकीय पक्षांचा उगम हा प्रादेशिक अस्मितांवर आधारीत आहे. त्याचप्रमाणे जात व धार्मिक अस्मिता सुध्दा अनेक राजकीय पक्षांच्या उगमाचे कारण ठरले आहे. उदा. भाजपा - हिंदूत्व, महाराष्ट्रातील शिवसेना, मनसे, एम. आय. एम, या पक्षांचा त्याचप्रमाणे, डी.एम. के, अकाली दल, झारखंड मुक्ती मोर्चा इत्यादी इतर राज्यातील प्रश्न देखील धार्मिक किंवा प्रादेशिक अस्मितावर आधारीत आहेत.

**६) गटबाजीचे राजकारण व पक्ष फुटीची कारणे –**

सर्वच राजकीय पक्षांमध्ये कमी अधिक प्रमाणात अंतर्गत गटबाजी दिसून येते. यातूनच पक्षात बाहेर पडून नवीन पक्ष निर्माण केले जातात. काही वेळा पक्षात उभी फूट पडते. कोणत्या गटाला मुळ राजकीय पक्ष म्हणावे असा प्रश्न निर्माण हातो. याबाबत अनेकदा कोर्टात दावे प्रतिदावे दाखल होतात. देशातील ८ ते १० पक्ष वगळता इतर राजकीय पक्षांची निर्मिती ही गटबाजीतून अथवा पक्षफुटीमुळे झाली आहे. उदा. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तृणमुल काँग्रेस पक्ष, हे एकेकाळी काँग्रेस पक्षाचेच घटक होते. मनसे आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना ही मूळची शिवसेनेचीच शकल आहेत. जनता दलाचे देखील अनेक गट आज पहावयास मिळतात.

**७) पक्षांतर व पक्षांतरबंदी कायदा –**

राजकारणात पक्षांतर करणे हा स्थायी भाव झाला आहे. एखाद्या पक्षातील मूळचा पक्ष सोडून, दुसऱ्या पक्षात जाताना दिसतात. एवढेच नव्हे स्वत:च्या पक्षाने निवडणूकीचे तिकीट नाकारल्यास काहीजण दुसऱ्या पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवितात. सर्वच राजकीय पक्षांनी पक्षांतर बंदी कायद्याचा दुरुपयोग आपल्या सोयीच्या राजकारणासाठी केला आहे.

**८) प्रभावी विरोधी पक्षांचा अभाव –**

संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाच्या भुमिकेला महत्वाचे स्थान आहे. तथापी भारतातील विरोधी पक्षाची भुमिका प्रभावी नसल्याचे दिसून येते. विरोधी पक्ष सोयीनुसार विरोध किंवा समर्थन करतात. सर्व विरोधक सुध्दा एकत्र असत नाहीत. अनेकदा विरोधाभास दिसून येतो. एखादा राजकीय पक्ष घटक राज्यामध्ये सत्तेवर असेल आणि केंद्रात विरोधक म्हणून असेल तर अशा वेळी त्यांची महागाईच्या विरोधातील भूमिका एकसारखी असत नाही.

**९) भ्रष्टाचार व भांडवलशाही प्रवृत्ती –**

भारताच्या राजकारणात सक्रिय असणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये पैशाचा मोठा व्यवहार चालतो. यात पारदर्शकता नाही. पक्षांना भांडवलदार पैसा पुरवतात, त्यामुळे सर्वच पक्षांना भांडवलदारांचे हीत जपावे लागते.

अशा प्रकारे भारतामधील राजकीय पक्षांची कार्यपध्दती आहे.

## ४.२.३ भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष

भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, आम आदमी पार्टी, कम्युनिस्ट पार्टी, बहुजन समाज पार्टी हे भारतातील राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख राजकीय पक्ष आहेत याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, नॅशनल पीपल्स पार्टी यांना राष्ट्रीय पक्ष म्हणून दिलेली मान्यता तांत्रिक कारणामुळे रद्द करणात आली आहे. त्यामुळे राष्ट्रीय पक्षांची संख्या कमी जास्त होत असते.

भारतीय राजकारणात भाजपा, कम्युनिस्ट आणि बसपा या पक्षांची ओळख अनुक्रमे उजवे, डावे आणि उपेक्षितांचे राजकीय पक्ष म्हणून आहे. याशिवाय काँग्रेस व इतर समविचारी पक्षांना मध्यवर्ती विचारधारांचे राजकीय पक्ष म्हणून ओळखले जाते. या घटकात आपण काँग्रेस, भाजपा, कम्युनिस्ट आणि बसपा या पक्षांचा अभ्यास करणार आहोत.

### ४.२.३.१ काँग्रेस

#### पार्श्वभूमी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला प्रामुख्याने 'काँग्रेस' या नावाने ओळखले जाते हा भारतीय राजकारणातील एक प्रमुख जूना पक्ष आहे.

ब्रिटीश सनदी सेवक ए. ओ. ह्यूम यांनी १८८५ साली काँग्रेस पक्षाची स्थापना केली. या पक्षाने देशाच्या स्वांतत्र्य चळवळीत मोलाचे योगदान दिले. पंडीत जवाहरलाल नेहरु व इंदिरा गांधी यांनी स्वांतत्र्यानंतर या पक्षाचे दिर्घकाळ नेतृत्व केले. १९८४ मध्ये राजीव गांधी यांच्याकडे पक्षाची धुरा आली. १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांनी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. सध्या मल्लिकार्जुन खर्गे हे पक्षाध्यक्ष आहेत त्याचप्रमाणे सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियंका गांधी हे या पक्षाच्या शिखर स्थानावर आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेस हा मुख्य विरोधी पक्ष म्हणून पुन्हा उर्जित अवस्थेमध्ये आला आहे. याशिवाय काही घटक राज्यांमध्ये हा सत्तारुढ पक्ष आहे.

#### विचारधारा

धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, सर्वसमावेशक विकास, सामाजिक न्याय या विचारांवर हा पक्ष कार्यरत आहे.

#### महत्त्वाची धोरणे

१) १९६० व १९७० च्या दशकात हरीत क्रांती घडवून आणण्याचे श्रेय काँग्रेस पक्षाला जाते.

२) बँकाचे राष्ट्रीयकरण करुन ग्रामीण भागात बँकींग सुविधा पुरविल्या गेल्या (१९७० व ८० च्या दशकात) तसेच गरिबी हटाओ धोरणाचा पुरस्कार केला.

३) १९९१ मध्ये मुक्त आर्थिक धोरणाचा स्विकार केला व खाजगीकरणाला मोठा वाव दिला गेला.

४) देशाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात मोलाचे योगदान दिले. विशेषत हमरस्ते, विमानतळ, धरण बांधणी, रेल्वे जाळे, विद्यापीठांची व संशोधन संस्थांची स्थापना इत्यादीमध्ये काँग्रेसचे योगदान आहे.

५) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना व मध्यान भोजन यांची सुरुवात काँग्रेस पक्षाने केली.

६) इंदिरा आवास योजनेतून घरांची निर्मिती केली.

७) १९८६ साली लागू केलेल्या शैक्षणिक धोरणाची योजना काँग्रेस पक्षाची आहे.

**अपयशाची कारणे**

१) दिर्घकाळ सत्तेत राहिल्यामुळे बहुतांश नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यामुळे या पक्षाला १९९६ नंतर उतरती कळा लागली.

२) एकाधिकारशाही वृत्तीचा आरोप काँग्रेस पक्षावर केला जातो, त्यामुळे अनेकांनी गेल्या दोन दशकात हा पक्ष सोडला.

३) नेहरु- गांधी घराणाची मक्तेदारी या पक्षावर असल्याचा आरोप नेहमी केला जातो.

४) अंतर्गत कलहामुळे देखील काँग्रेस पक्षाची वाताहात झाल्याचे दिसून येते.

५) भाजपाचा २०१४ नंतर केंद्रामध्ये झालेला उदय हा देखील काँग्रेसच्या ऱ्हासाचे एक कारण म्हणावे लागेल. त्याचप्रमाणे भारतीय स्वातंत्र्यानंतर उदयास आलेले राजकीय पक्ष काँग्रेसच्या नुकसानीस कारणीभूत ठरले.

**४.२.३.२ भाजपा**

**पार्श्वभूमी –**

भाजपा अर्थात भारतीय जनता पक्ष हा साारुढ पक्ष आहे व आज रोजी भारतातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून त्याची ओळख निर्माण झाली आहे.

भारतीय जनसंघ या हिन्दू राष्ट्रवादावर आधारीत संघटनेतून भाजपा चा उदय झाला. १९४० साली अटल बिहारी वाजपेयी, आणि लाल कृष्ण आडवाणी यांनी या पक्षाच्या स्थापनेमध्ये वाढ करण्यामध्ये मोलाची भुमिका घेतली. १९४० व १९९० च्या दशकात रामजन्मभूमीचा विषय केंद्रस्थानी ठेवून या पक्षाने आपला विचार जनमानसात पोहचविण्याचा प्रयत्न केला. प्रारंभीच्या काळात केवळ उत्तरभारत, गुजरात, दिल्ली या राज्यांपुरता मर्यादित असणाऱ्या पक्षाने हळू हळू दक्षिणेत आपला विस्तार वाढविला २००० नंतर संपूर्ण देशभर या पक्षाने आपला विस्तार केला.

१९९८ साली अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाने पहिल्यांदा केंद्रात इतर पक्षांच्या मदतीने सत्ता मिळविली. उजव्या व हिन्दूत्ववादी पक्षांच्या मदतीने २०२४ पर्यंत हा पक्ष सत्तेवर आहे.

२०१४ साली पुन्हा एकदा नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली या पक्षाने केंद्रात स्पष्ट बहुमत प्राप्त केले. त्याचप्रमाणे २०१९ व २०२४ च्या निवडणुकीतदेखील या पक्षाने इतर पक्षांच्या मदतीने सत्ता मिळविली. आज रोजी १० ते १२ राज्यात हा पक्ष सत्तेवर आहे. काही राज्यात आघाडी स्थापन करून या पक्षाने सत्ता मिळविली आहे. नरेंद्र मोदी, अमित शहा, राजनाथ सिंग, नितीन गडकरी हे या पक्षातील वरीष्ठ नेते आहेत.

**विचारधारा –**

भाजपा हा उजव्या विचारधारेचा हिंदूत्ववादी राजकीय पक्ष आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळातील सौम्य हिन्दूत्ववादाने नरेंद्र मोदी यांच्या काळात आक्रमक हिन्दूत्ववादाचा स्विकार केलेला दिसून येतो.

**धोरण व कार्यक्रम**

१) अयोध्या या ठिकाणी भव्य अशा राम मंदिराची उभारणी करण्यात यश

२) ३७० वे कलम रद्द करुन जम्मू काश्मिर राज्याला असणारा विशेष दर्जा काढून टाकला व इतर राज्याप्रमाणे त्याला भारताचा अविभाज्य भाग करणात आला.

३) समान नागरी कायदा तयार करण्यासाठी भाजपा धोरण आखत असल्याचे सांगितले जाते.

४) नागरीकत्व अधिनियमात दुरुस्ती करुन इतर शेजारील देशातून येणाऱ्या अल्पसंख्यांक हिन्दू, शिख व बौध्द धर्मियांना आश्रय देणाचे धोरण स्विकारले.

५) तिहेरी तलाख देणाची पध्दत बंद करणे व मुस्लीम महिलांना संरक्षण देणे हे या पक्षाचे धोरण आहे.

६) डीजीटल इंडिया या धोरणातून भारताला एक महासत्ता करणाचे उद्दिष्ट भाजपा ने केले आहे.

७) खाजगीकरणाच्या धोरणातून देशाचा औधोगिक व आर्थिक विकास करणावर भर देण्यात आला आहे.

८) पंतप्रधान किसान सन्मान योजना एक महत्वाची व प्रभावीपणे राबविली गेलेली योजना, यातून दरवर्षी तीन वेळा प्रत्येकी रु २००० चे अनुदान शेतकऱ्याला दिले जाते.

**अपयशाची कारणे /मर्यादा**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेला चार दशकांपेक्षा जास्त कालावधी झाला. तथापि अद्यापही या पक्षाला समाजातील सर्व घटकांचा म्हणावा तसा पाठींबा मिळत नाही. समाजातील प्रस्थापित वर्गाचा, उच्च वर्णीयांचा पक्ष म्हणून भाजपची ओळख आहे. भारत देश धर्मनिरपेक्ष असतानासुद्धा या पक्षाने कट्टर हिंदूत्व स्विकारले.

अल्पसंख्यांक मुस्लीम, ख्रिश्चन, दलीत या वर्गाचा भाजपाला पाठींबा मिळत नाही.

तमिळनाडू, केरळ, या सारख्या काही राज्यामध्ये अद्याप या पक्षाला आपली कामगिरी चांगली करता आलेली नाही.

काँग्रेस प्रमाणे या पक्षावर देखील भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले जात आहेत. पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांची एकाधिकारशाही य पक्षात दिसून येते. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत भाजपाला बहुमत प्राप्त करण्यात अपयश आले.

### ४.२.३.३ कम्युनिस्ट पार्टी (साम्यवादी पक्ष)

**पार्श्वभूमी –**

साम्यवादी पक्षाची स्थापना देखील स्वांतत्र्यपूर्व काळात झाली. रशियातील साम्यवादी चळवळीचा प्रभाव भारतात झाल्यामुळे २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात भारतात साम्यवादी विचारांचा प्रसार सुरु झाला. या पक्षाच्या स्थापनेबाबत मतभिन्नता आहेत. साम्यवादी पक्षाची स्थापना १९२५ साली झाली. तथापि स्वांतत्र्यानंतर या पक्षात अनेकदा फूट पडली व विविध साम्यवादी पक्ष निर्माण झाले. १९६४ साली साम्यवादी पक्षात दोन गट निर्माण झाले. मूळचा पक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) (Communist Parth of India) म्हणून ओळखला जातो. याउलट दुसरा गट मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) Communist Parth of India (Marxist) म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भाकप ची स्थापना १९६४ साली झाली असे म्हणावे लागेल.

स्वांतत्र्यपूर्व काळात या पक्षाने प्रस्थापित सत्तेविरुध्द सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबल्यामुळे या पक्षावर बंदी घालण्यात आली. अनेक वर्षे भुमिगत राहून हा पक्ष काम करत होता. स्वांतत्र्यानंतर या पक्षावरील बंदी उठविण्यात आली. तथापि साम्यवादी विचारधारेतील काही गट हे हिंसक मार्गाने परिवर्तन करणावर ठाम होते. त्यामुळे साम्यवादी पक्षाची अनेक गट व संघटना तयार झाल्या. आज रोजी भारतीय राजकारणात भाकप हा प्रादेशिक पक्ष आहे आणि माकप हा राष्ट्रीय पक्ष आहे. १९९१ नंतर मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाला चालना मिळाल्यामुळे साम्यवादी चळवळ आणि पक्षांची राजकारणातून पिछेहाट झाली आहे. त्यामुळे भाकपा चे संख्याबल खूपच कमी झाले आहे. प. बंगाल, केरळ, त्रिपुरा, या काही राज्यामध्येच भाकपचा प्रभाव दिसून येतो.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी (माकपा) पार्लमेंट मधील तिसरा मोठा पक्ष म्हणून दिर्घकाळ स्वत:चे अस्तित्व टीकवून होता. ज्योती बसू, बुध्ददेव भट्टाचार्य, सिताराम येचूरी, हे या पक्षातील अलीकडच्या काळातील काही जेष्ठ नेते मंडळी आहेत.

**धोरण व कार्यक्रम**

कामगार, श्रमजीवी, आणि भूमीहीन मजूर यांच्या हिताचे रक्षण करणे हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

खाजगीकरण आणि उदीकरणाच्या धोरणाला मर्यादा असाव्यात अशा प्रकारची भूमिका या पक्षाने घेतली होती. सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण करणास भाकपाचा विरोध असतो.

खुप अल्पकाळ हा पक्ष इतर पक्षांच्या सोबत केंद्रात सत्तेत राहीला आहे. दिर्घकाळ हा पक्ष काँग्रेसचा विरोधक म्हणून काम करत होता. पश्चिम बंगाल, त्रिपुरा आणि केरळ या तीन राज्यात हा पक्ष दिर्घकाळ सत्तेवर होता. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत या पक्षाला म्हणावे तसे यश मिळालेले नाही. तथापि इंडिया आघाडीच्या माध्यमातून कम्युनिस्ट विचार पुन्हा जोमाने काम करण्यासाठी पुढे आल्याचे दिसून येते.

**४.२.३.४ बसपा (बहुजन समाज पार्टी)**

१९८४ साली बहुजन समाज पार्टीची स्थापना कांशीराम यांनी केली. 'बहुजन' या शब्दाचा अर्थ संख्येने जास्त असणारा समाज. देशातील अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती व इतर मागास जाती यांची एकत्रित लोकसंख्या ८० ते ८५ टक्के आहे. या सर्व मागास लोकांना सत्ता प्राप्त करून देणाच्या उद्देशाने कांशीराम यांनी बसपा ची स्थापना केली. डॉ. आंबेडकरांचा विचार प्रमाण माणून या पक्षाची स्थापना करणात आली आहे. समाजातील उपेक्षित वर्गाला सत्ता मिळवून देणे हे या पक्षाचे मुख्य उद्दिष्ट होते. काँग्रेस, भाजपा या दोन्ही पक्षामध्ये मागास समाजातील मतांचा केवळ वापर केला जातो, परंतु त्यांना सत्तेचा लाभ दिला जात नाही असे कांशीराम यांचे मत होते.

२००१ नंतरच्या लोकसभा आणि उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूकांमध्ये बसपाला चांगले यश प्राप्त होत गेले. सुरुवातीला समाजवादी पार्टीसोबत व नंतर भाजपा सोबत युती करुन बसपाने मायावती यांना चार वेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचविले. तथापि वैचारीक मतभेदामुळे पहिले तीन कार्यकाल त्यांना पूर्ण करता आले नाहीत. २००७ च्या उत्तर प्रदेश विधान सभा निवडणुकीत बसपाला स्पष्ट बहुमत मिळाले व पाच वर्षे मायावती यांनी मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. परंतु ही त्यांची कारकिर्द भ्रष्टाचार व इतर अनेक कारणांनी वादग्रस्त ठरली. त्यामुळे २०१२ च्या नंतर झालेल्या निवडणूकांमध्ये बसपाला पराभवाला सामोरे जावे लागले. सध्या हा पक्ष कोणत्याही राज्यात सत्तेवर नाही. केवळ काही विधानसभा व लोकसभेत निवडणूकीत काही मतदार संघात हा पक्ष आपले उमेदवार उभे करतो. त्यामुळे इतर पक्षाच्या उमेदवाराच्या निकालावर त्याचा परिणाम होतो. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत या पक्षाला एकही जागा जिंकता आलेली नाही. नजीकच्या भविष्यात या पक्षाला सत्ता प्राप्त करणे सोपे असणार नाही. मायावतींच्या नंतरचा वारसदार कोण? कशा पध्दतीने पक्ष सांभाळणार? यावर पक्षाचे भवितव्य अवलंबून आहे.

बसपाच्या भारतीय राजकारणातील उदयामुळे १९९६ ते २००४ या काळात काँग्रेसला फटका बसला कारण दलित आणि मुस्लीम जो काँग्रेसचा पारंपारिक मतदार होता तो बसपाकडे वळल्यामुळे काँग्रेसची हानी झाली.

उत्तर प्रदेश वगळता इतर राज्यात बसपाला चांगली कामगिरी करता आली नाही. भारतीय राजकारणामध्ये वंचिताची राजकारणातील वेगळी भुमिका बसपा च्या माध्यमातून मांडण्यात आली. कम्युनिस्ट विचारधारेपेक्षा हा वेगळा विचार कांशीराम यांनी मांडला.

**४.२.३.५ आप (AAP) – आम आदमी पक्ष**

आप म्हणजे आम आदमी पार्टी, याचा अर्थ या देशातील सामान्य माणसाचा पक्ष. काँग्रेस पक्षाच्या भ्रष्ट कारभाराला या देशातील जनता त्रस्त झाली. त्यातून आण्णा हजारे यांनी २०११ साली भ्रष्टाचार विरोधी मोठे आंदोलन या देशात उभे केले. यातूनच अरविंद केजरीवाल या तरुण नेतृत्वाचा उदय झाला. त्यांनी २०१२ साली या पक्षाची स्थापना केली. त्यांना त्यावेळी शांती भूषण, प्रशांत भूषण, कुमार विश्वास, योगेंद्र यादव, किरण बेदी, मेघा पाटकर यांनी पाठींबा दिला. २०१५ व २०२० साली दिल्ली विधानसभेत स्पष्ट

बहुमत मिळवून हा पक्ष सत्तेवर आला. त्यानंतर पंजाब, हरियाणा, गुजरात, गोवा इत्यादी राज्यात या पक्षाने आपला विस्तार वाढविला त्यामुळे २०२२ साली दिल्लीसह पंजाबमध्ये आम ने सत्ता स्थापन केली.

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कमी कालावधीत या पक्षाने आपला मतदार विस्तार वाढविला त्यामुळे २०२३ साली या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला 'भ्रष्टाचार मुक्त भारत' हा या पक्षाचा मुख्य उद्देश दिसून येतो. अनेक राजकीय वारसा नसणाऱ्या लोकांना निवडणूकीची संधी उपलब्ध करुन दिली व सामान्य माणसाला आमदार व मंत्री करण्याचे काम या पक्षाच्या माध्यमातून झाले.

दिल्लीमध्ये या पक्षाने चांगली कामगिरी केल्याने या पक्षाला एकहाती दुसऱ्यांदा सत्ता मिळाली. पंजाबमध्ये सुध्दा हा पक्ष चांगली कामगिरी बजावत आहे. तथापि २०२४ च्या लोकसभेच्या निवडणूकीत या पक्षावर देखील भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले व या पक्षाचे प्रमुख नेते अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदीया यांना दिर्घकाळ तुरुंगात ठेवण्यात आले.

प्रस्थापित लोकांच्या विरोधात नवीन लोकांना राजकारणात संधी मिळाली पाहिजे असा विचार समोर ठेवून या पक्षाने आपला विस्तार इतर राज्यामध्ये सुरू केला. त्यामुळे विधानसभा निवडणूकांमध्ये काही प्रमाणात आपची मतदानाची टक्केवारी वाढत आहे.

### ४.२.४ भारतातील आघाडीचे राजकारण

आघाडीचे राजकारण समजावून घेणासाठी प्रथम 'आघाडी' म्हणजे काय समजावून घ्यावे लागेल. जेंव्हा लोकसभा किंवा एखाद्या विधानसभा निवडणूका होतात आणि कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होत नाही, तेंव्हा दोन किंवा जास्त पक्ष एकत्र येतात व सत्ता स्थापन करतात. तेंव्हा त्यास 'आघाडी' किंवा 'युती' असे म्हटले जाते. याला इंग्रजीमध्ये कोईलीएशन किंवा अलायन्स असे म्हटले जाते.

१९९० नंतर देशात आणि महाराष्ट्रासह अनेक घटक राज्यात आघाडीचे प्रयोग झाले. यात काही आघाड्या या निवडणूकीपूर्वी एकत्र आलेल्या पक्षांच्या होत्या, तर काही आघाड्यांची निर्मिती निवडणूकांच्या निकालानंतर झाली. समविचारी पक्ष एकत्र येवून आघाडी स्थापन करणे राजकारणात काही गैर नाही. तथापि काही वैचारीक विरोध असणारे राजकीय पक्ष केवळ सत्ता मिळविण्यासाठी एकत्र आल्याची अनेक उदाहरण गेल्या ३५ वर्षात घडली आहेत.

आज रोजी भारताच्या राजकारणात दोन प्रमुख आघाड्या आहेत. १) भाजपाच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए. व २) काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया (पूर्वीचे युपीए) आघाडी.

#### १) एन.डी.ए आघाडी (National Democratic Allianle)

१९९८ व १९९९ साली एन.डी.ए. अर्थात नॅशनल डेमॉक्टीक अलायन्स ची स्थापना अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली झाली. भाजपा च्या नेतृत्वाखाली शिवसेना, अकाली दल, या सारख्या उजव्या विचारधारांचे पक्ष यात सहभागी झाले. याशिवाय काँग्रेस पासून दूरावलेले व काँग्रेसचा विरोध करणारे काही इतर पक्ष देखील एन.डी.ए. आघाडीत सामील झाले.

१९९८ व १९९९ च्या लोकसभा निवडणूकीत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. नसल्यामुळे दोन्ही वेळा अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए चे सरकार स्थापन झाले. यातील काही घटक पक्ष निवडणूकीपूर्वीच आघाडीत होते व काही पक्ष नंतर काही अटींसह यात सामील झाले. या काळात समाजवादी पार्टी, तृणमुल काँग्रेस आणि ए.आय.ए.डी.एम.के या पक्षांनी भाजपाला आपल्या सोईनुसार धोरणामध्ये बदल करण्यास प्रवृा केले.

२००४ व २००९ च्या लोकसभा निवडणूकीत भाजप प्रणीत एन.डी.ए. ला यश प्राप्त करता आले नाही. त्यामुळे याकाळात हा विरोधी पक्ष म्हणून काम करत होता. लालकृष्ण आडवाणी, अरुण जेटली, सुषमा स्वराज्य यांनी या काळात पक्षाचे नेतृत्व केले आणि एक प्रभावी विरोधी पक्ष म्हणून काम केले.

२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळे या काळात मोदीच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए. मध्ये असणाऱ्या घटक पक्षांना दुय्यम वागणूक मिळाली विशेष महाराष्ट्रातील शिवसेनेला भाजपाने अपमान कारक वागणूक दिली. त्यामुळे नवीन आघाडीचे समीकरण निर्माण झाले. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीनंतर शिवसेना भाजप युती तुटली. या काळात भाजपाने मित्र पक्षाना सन्मानाची वागणूक दिली नाही. त्यामुळे अनेक भाजपाचे मित्र पक्ष भाजपावर नाराज होते.

२०२४ च्या लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षाला लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे पुन्हा राष्ट्रीय राजकारणाचे समीकरण बदलले. तेलगु देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू आणि जनता दलाचे नितीश कुमार एनडीए मध्ये आघाडीतील महत्व वाढले. या दोन पक्षांच्या पाठींब्या शिवाय भाजपाला बहुमताचा आकडा पार करता येत नव्हता. त्यामुळे भाजपच्या एकाधिकारशाहीला लगाम बसला. आघाडीतील मित्र पक्षांचा आदर करणे भाजपाला क्रमप्राप्त ठरले. त्याच प्रमाणे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीला २०० पेक्षा जास्त जागा मिळाल्यामुळे सभागृहातील विरोधकांचा आवाज वाढला.

**युपीए आघाडी (United Progressive Alliance) (सध्या इंडिया आघाडी)**

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारला युपीए (United Progressive Alliance) असे म्हटले जाते. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीनंतर झालेल्या कोणत्याही लोकसभा निवडणूकीत काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळू शकले नाही. त्यामुळे त्यानंतर स्थापन झालेल्या काँग्रेस सरकारला इतर पक्षांची मदत घ्यावी लागली. १९९१ च्या निवडणूकीनंतर काँग्रेस पक्षाने समविचारी पक्षांची मदत घेऊन अल्पमतातील नरसिंहराव यांच्या सरकारने पाच वर्षाचा आपला कार्यकाल पूर्ण केला.

१९९६ देवगौडा यांच्या सरकारला काँग्रेसने बाहेरुन पाठिंबा दिला. हा आघाडीचा प्रयोग ११ महिनेच चालला. देवगौडा यांनी राजीनामा दिल्यानंतर इंद्रकुमार गुजराल हे पंतप्रधान झाले परंतु काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्याने १९९८ साली पुन्हा निवडणूका झाल्या. या निवडणूकीत देखील कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तथापि भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून मित्र पक्षांच्या मदतीने सत्तेवर आला. हे अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार १३ महिने सत्तेवर राहीले. पुन्हा १९९९ साली लोकसभा निवडणूका झाल्या व

भाजपाचे संख्याबल वाढले. दुसऱ्यांदा वाजपेयी पंतप्रधान झाले १९९९ ते २००४ या काळात वाजपेयींच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए आघाडीचा यशस्वी प्रयोग झाला.

२००४ साली एन.डी.ए. आघाडीला अपयश आले व काँग्रेस पक्षाने बाजी मारली. २००४ व २००९ या दोन्ही निवडणूकात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली युपीए (UPA) हे आघाडीचे सरकार सत्तेवर आले मनमोहन सिंग यांनी या सरकारचे नेतृत्व केले. या काळात घटक पक्षाचा दबाव पंतप्रधानांवर असल्याने निर्णय घेण्यावर अनेक मर्यादा येत असत. युपीए १ व युपीए २ या दोन्ही काळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. परंतु या सरकारला कमजोर सरकार म्हणून टिकेला सामोरे जावे लागले. अनेकदा भ्रष्टाचाराचे आरोप होऊन देखील पंतप्रधानांना काही कारवाई करता आली नाही. केवळ भाजपाला सत्तेपासून दूर ठेवणाच्या उद्देशाने युपीए सरकार मधील सर्व घटक पक्ष एकत्र होते.

२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेस व युपीए आघाडीचा दारुण पराभव झाला. मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने १९८५ नंतर पहिल्यांदा केंद्रामध्ये स्पष्ट बहुमताचे सरकार स्थापन झाले.

२०२४ च्या लोकसभा निवडणूकीपूर्वी युपीए चे नामांतर इंडिया आघाडी असे करण्यात आले. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सर्व भाजपा विरोधक एकत्र आले व निवडणूकीत त्यांना यश मिळाले. परंतु बहुमत प्राप्त करता आले नाही. परंतु एक प्रबळ विरोधी गट म्हणून आज इंडिया आघाडी सक्रिय आहे. इंडिया आघाडीची ताकद वाढल्याने मोदींच्या एकाधिकारशाहीवर मर्यादा आल्याचे दिसून येते. दहा वर्षे युपीए आघाडीचे सरकार केंद्रात होते. तर दहा वर्षे युपीएला विरोधी पक्ष काम करावे लागले.

अशा प्रकारे भारतातील आघाडीच्या राजकारणात भाजपा आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांच्या नेतृत्वाखाली इतर पक्ष सहभागी होतात. पक्षीय संख्याबळ सत्तेमध्ये महत्वाची भूमिका बजावते हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते.

## ४.३ सारांश

भारतात बहुपक्ष पध्दती आहे. १९५० ते १९७८ या काळात काँग्रेस पक्षाची दिर्घकाळ सत्ता होती. १९८० ते २०१० या काळात भाजपाचा पर्याय म्हणून उदय झाला. २०१४ पासून भाजपा सर्वात प्रभावी पक्ष म्हणून भारतीय राजकारणात सक्रिय आहे. काँग्रेस व भाजपा प्रमाणेच इतर विविध घटकांचे हितसंबध जपणारे लहान मोठे राजकीय पक्ष भारतात अस्तित्वात आहेत. त्यामुळे अनेक राज्यामध्ये देखील आघाडींचे सरकार स्थापन झालेले दिसून येते. प्रादेशिक पक्षांचे स्थान देखील महत्वाचे आहे. बसपा आणि आप चा उदय हे देखील भारताच्या पक्षीय राजकारणातील एक वेगळी ओळख आहे.

गेल्या ७५ वर्षात राजकीय पक्षांचे विविध प्रयोग भारताच्या संसदीय लोकशाहीत झाल्याचे दिसून येते. काँग्रेस व भाजपा यांनी स्पष्ट बहुमत असताना सत्तेचा केलेला वापर आणि अल्पमतामध्ये असताना त्यांची भूमिका या दोन्हींचे विवेचन आपण केले आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द

आघाडी – दोन किंवा जास्त पक्ष एकत्र येणे यास आघाडी असे म्हणतात.

युती – दोन किंवा जास्त पक्ष एकत्र येणे आणि सत्ता स्थापन करणे यास युती असे देखील म्हटले जाते.

उजवे पक्ष – भारतातील प्रस्थापित व उच्च वर्णीय जनतेचे हितसंबध जपणारे राजकीय पक्ष उदा – भाजपा, अकाली दल इ.

डावे पक्ष – भारतातील मजूर व श्रमजीवी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे राजकीय पक्ष उदा. कम्युनिस्ट पार्टी, समाजवादी पार्टी

## स्वयं अध्ययन प्रश्न

१) भारतात कोणती पक्ष पध्दती आहे?

२) भारतातील दोन राष्ट्रीय पक्षांची नावे सांगा

३) काँग्रेस पक्षाची स्थापना केंव्हा झाली?

४) सध्या भारतात कोणता विरोधी पक्ष म्हणून काम करत आहे?

५) भाजपाची स्थापना केंव्हा झाली?

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) बहुपक्ष पध्दती

२) काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, आम आदमी पार्टी

३) काँग्रेस – १८८५

४) काँग्रेस

५) १९८०

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१) भारतातील पक्ष पध्दतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा?

२) काँग्रेस पक्षाची विचारधाराव ध्येयधोरणे स्पष्ट करा?

३) भाजपाचा उदय व ध्येयधोरणांचा आढावा घ्या?

४) आघाडीचे राजकारण यावर टीकात्मक परीक्षण करा?

५) भारतातील साम्यवादी पक्ष यावर भाष्य करा?

६) बहुजन समाज पक्ष उदय आणि सद्यस्थिती याची चर्चा करा?

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


१) तुंडे विजय आणि संदीप नरकेर, भारतीय राज्यव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२) पवार प्रकाश, 'भारतीय पक्षव्यवस्थांची उत्क्रांती प्रतिमान आणि ऱ्हास', समाज प्रबोधन पात्रिका, (डिसेंबर २०१७)

३) पळशीकर सुहास, देश प्रदेश, युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१५)

४) भोळे भास्कर, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर (२००३)

५) पळशीकर सुहास, (संपा.), 'भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे.


❑❑❑